

# सॉमरसेट मॉम

## पॅसिफिकच्या बेटांवरील कथा

वृषाली जोशी

# पॅसिफिकच्या बेटांवरील कथा

मूळ लेखक – सॉमरसेट मॉम

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# पॅसिफिकच्या बेटांवरील कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# पॅसिफिकच्या बेटांवरील कथा


लेखक : सॉमरसेट मॉम

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १७ जुलै २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# पॅसिफिकच्या बेटांवरील कथा

होनोलुलू

तलाव

मॅकिंटॉश

पाऊस

एडवर्ड बर्नार्डचे पतन


# सॉमरसेट मॉम



इंग्लीशमधील सर्वाधिक लोकप्रिय क्लासिक लेखकांमध्ये सॉमरसेट मॉमचे नाव घेतले जाते. त्याच्या कथांवरून अडतीस सिनेमे, शेकडो नाटके यांची निर्मिती झाली. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्या यांच्या काही हजार प्रती छापल्या गेल्या. जगातील जवळपास सर्व .भाषांमध्ये त्यांच्या कथांचे अनुवाद झाले. त्यांच्या कथांवरून निर्मिती झालेल्या सिनेमांची यादी भली मोठी आहे.

Honolulu

# होनोलुलू



शहाणा प्रवासी फक्त कल्पनेत प्रवास करतो. एका म्हाताऱ्या फ्रेंच माणसाने [ तो खरे तर सॅव्होयार्ड होता. ] एकदा ‘माझी खोलीतील सफर’ नावाचे पुस्तक लिहिले. मी ते वाचलेले नाही व ते कशाबद्दल आहे, ते देखील मला माहिती नाही. पण ते नाव माझ्या कल्पनेला आकर्षक वाटले. अशा प्रवासात मी जग पालथे घालू शकतो. पैशाचे पाठबळ असेल तर मी ही संधी घेत, शेकोटीभोवतालची सजावट करत, बर्चच्या झाडांच्या जंगलांसकट आणि त्याच्या पांढऱ्या घुमटांच्या चर्चसकट असलेल्या रशियाला जाऊ शकतो. व्होल्गा खूप मोठी व रुंद आहे आणि एका मागे पडणाऱ्या गावाच्या शेवटी असणाऱ्या, दारूच्या दुकानात मेंढीच्या कातडीचे जाडेभरडे कोट घातलेले दाढीवाले लोक दारू पीत बसलेले आहेत. ज्या टेकडीवरून, नेपोलिअनने पहिल्यांदा मॉस्को पाहिले, आणि मी शहराची विस्तीर्णता पाहिली, त्या टेकडीवर मी उभा आहे. मी खाली उतरून माझ्या अनेक मित्रांपेक्षा अगदी जवळून माहिती असणाऱ्या लोकांना बघेन. अल्योशा, व्हरोन्स्काय आणि अजून डझनभर. पण माझी दृष्टी एका पोर्सेलीनच्या तुकड्यावर पडते आणि मला चीनचा उग्र वास येतो. मी भाताच्या शेतातील अरुंद जलमार्गातील, एका खुर्चीवर बसलो आहे. किंवा झाडांनी वेढलेल्या डोंगराच्या कडेने प्रकाशित सकाळी जातो आहे. तेव्हा माझ्याबरोबरचे लोक, आनंदाने गप्पा मारत चालले आहेत. मला लांबून सतत गूढ, गंभीर असा धर्मस्थळामधील घंटेचा खर्जातील आवाज ऐकू येतो आहे. पेकिंगच्या रस्त्यात, वेगवेगळया प्रकारच्या लोकांची गर्दी दिसते आहे. मंगोलियाच्या वाळवंटातून विचित्र औषधे व कातडी आणणाऱ्या आणि नाजूकपणे पाऊले टाकणाऱ्या उंटांच्या ओळीला वाट देण्यासाठी ती बाजूला होते आहे. इंग्लंडमधील, लंडनमधील, हिवाळयातील विशिष्ट

दुपारी, जेव्हा ढग ओथंबून येतात आणि इतके थंड असते, की तुमचे हृदय आक्रसते. पण तुम्ही खिडकीतून बाहेर पाहिलेत, तर तुम्हाला समुद्रातील प्रवाळयुक्त बेटांच्या किनाऱ्यावर गर्दी केलेली नारळाची झाडे दिसतात. जेव्हा तुम्ही चालता, तेव्हा लखलखणाऱ्या सूर्यप्रकाशामुळे दोरी इतकी कमालीची चंदेरी दिसते, की तुम्ही त्याकडे दृष्टी टाकू शकत नाही. डोक्यावर विविध पक्षी प्रवाळ व वाळूवर किलबिलाट करत असतात. ते प्रवास एकदम छान असतात. तो प्रवास तुम्ही तुमच्या खोलीतील शेकोटीशेजारी बसून करता. आणि मग तुमचे कुठलेच भ्रम नाहीसे होत नाहीत.

पण कॉफीत मीठ घालणारे काही लोक आहेत. ते म्हणतात, त्यामुळे ती आगळ्यावेगळ्या पद्धतीने चविष्ट आणि मनमोहक लागते. अशाच पद्धतीने काही अद्भुतरम्य जागा तुम्ही खास अटळपणे अनुभवावी अशी झलक देतात. तुम्ही सर्वांगसुंदरतेची अपेक्षा करत असता आणि तुम्हाला सौदर्य काय देईल असा गुंतागुंतीचा प्रत्यय त्या तुम्हाला आणून देतात. थोर माणसाची कमी स्तुती केली जाईल, असा त्याच्या चारीत्र्यातील तो कमकुवतपणा असतो. पण त्यामुळे तो जास्त रुचीपूर्ण बनतो.

होनोलुलूला जाण्याचे मला काहीच कारण नव्हते. ते युरोपपासून बरेच दूर आहे. सॅनफ्रँसिस्कोहून खूप लांबचा प्रवास आहे. त्या नावाशी इतक्या विचित्र आणि मोहक आठवणी जोडल्या गेल्या आहेत, की माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. मला ज्याची अपेक्षा आहे, अशा तंतोतंत चित्राची माझ्या मनात कशी माहिती नाही, पण छबी तयार झाली आहे. पण मला जे सापडले, त्याने मी फारच आश्चर्यचकित झालो आहे. ते अगदी साच्यातले पाश्चिमात्य शहर आहे. गालाच्या उतरत्या भागासारख्या तात्पुरत्या झोपड्या, दगडी आणि पडझड झालेली घरे, काचेच्या

खिडक्यांच्या झकपक दुकानांच्या ओळीत उभी आहेत. रस्त्यांवरून विजेवर चालणाऱ्या मोटारी आवाज करत धावत असतात. फोर्ड्स, ब्युक्स, पॅकार्ड्स अशा सर्व प्रकारच्या! कडेला थोडी उंच पदपथाची रेष असते. अमेरिकन संस्कृतीत गरज असलेल्या वस्तुनी दुकाने भरलेली आहेत. प्रत्येक तिसरे घर ही बँक आहे आणि प्रत्येक पाचवे घर वाफेच्या बोटींचे कार्यालय आहे.

रस्त्यातून नाना प्रकारच्या लोकांची गर्दी आहे. हवेकडे दुर्लक्ष करणारे, काळे कोट घातलेले, उंच व कडक कॉलर्सचे, गवतकाड्यांच्या मऊसर टोप्या घातलेले अमेरिकन्स आहेत. फिकट तपकिरी रंगाचे, कुरकुरीत केसांचे, शर्ट पँट घातलेले हवाईचे स्थानिक लोक आहेत. पण खूप चटपटीत, चकाकीत टाय घातलेले व चामड्याचे बूट घातलेले मिश्र जातीचे लोकही आहेत. फार तत्पर अशा त्यांच्या हास्यासह नीटनेटके पांढरे सुती कपडे घातलेले, जपानी लोक व त्यांच्यामागे, एक दोन पाऊलांवर चालणाऱ्या, पाठीवर मूल घेतलेल्या, देशी कपड्यातील त्यांच्या बायका आहेत. भडक रंगांच्या फ्रॉकमधील, त्यांच्या छोट्या डोक्यावरील केस कापलेली, बाहुलीसारखी आकर्षक दिसणाऱी जपानी मुले आहेत. मग अमेरिकन कपडे विचित्रपणे घातलेले, जाड आणि श्रीमंत चिनी आहेत. हातविरहीत, गुडघ्यांपर्यंत असणारे कपडे घातलेल्या स्वच्छ गोऱ्या, फिकट निळ्या किंवा काळ्या रंगाच्या त्यांच्या बायकांनी जादुई पद्धतीने, नीटपणे त्यांचे काळे केस इतके घट्ट बांधले आहेत, की तुम्हाला वाटेल, ते कधीच विस्कटता येणार नाहीत. शेवटी मोठ्या स्ट्रॉच्या टोप्या घातलेले फ़िलिपाइन्स पुरुष आणि गडद पिवळे, विणलेले, फुगीर हातांचे सुती कपडे घातलेल्या बायका आहेत.

ही पूर्व पश्चिमची भेटायची जागा आहे. नव्याने मागे पुढे खांदे हलवत चालणारे, म्हातारे लोक आहेत. आणि तुम्हाला अपेक्षित अशी अद्भुतरम्यता सापडली नाही, तर ते तुमची उत्सुकता फारच वाढवणारे ठरेल. हे सगळे वेगवेगळया भाषा बोलणारे व वेगवेगळया विचारांचे विचित्र लोक एकमेकांजवळ रहातात. त्यांचे देव वेगवेगळे आहेत. मूल्ये वेगवेगळी आहेत. भूक आणि प्रेम या त्यांच्या दोन भावना फक्त सारख्या आहेत. जर तुम्ही बघितलेत, तर त्यांच्यात तुम्हाला भरपूर उत्साह व कार्यतत्परता आढळून येईल. जरी आकाश खूप निळे आणि हवा खूप मऊसर असली, तरी का ते मला माहिती नाही, पण गर्दीतून काहीतरी, गरमागरम नाडी थडथडवणाऱ्या अशा भावना उठत आहेत.

जरी कोपऱ्यावरचा, उंचावर उभा असलेला देशी पोलीस पांढरा दंडुका घेऊन, वाहतुकीची व्यवस्था बघतो आहे व वरवर ते दृष्य मान देण्यासारखे दिसत आहे, तरी त्याखाली अंधार व काही गूढ असे दिसते आहे. ते तुम्हाला तुमच्या हृदयात कळ उठवणारे, थरारक असे वाटेल. जेव्हा जंगलातील रात्री अचानक सन्नाटा पसरलेला असतो आणि खालच्या आवाजात, सतत ड्रम बडवला जात असतो, तेव्हा तुम्ही सगळे कसली अपेक्षा करत असता, मला माहिती नाही.

जर मी अतुलनीय अशा होनोलुलूमध्ये रहात असतो, तर ते फक्त माझ्या मनाने, मला जी गोष्ट सांगायची आहे, ती सांगण्यासाठी आणि या काही फार वेगळया नसलेल्या परंतु सुस्पष्ट असणाऱ्या संस्कृतीत मला असे करणे चक्रावून टाकत आहे. अगदी मध्यावर असणाऱ्या फोनमधून, ट्राममधून आणि रोजच्या दैनिकातून अशा असामान्य आणि अविश्वसनीय गोष्टी इथे कशा काय घडतात, हे मला समजू शकत नाही. किंवा निदान मी

असा विचार तरी करू शकत नाही. ज्या मित्राने मला होनोलुलू दाखवले, त्यालाही पहिल्यापासून दोन इतक्या वेगळ्या गोष्टी अस्तित्वात असणे हे फार धक्कादायक वाटते.

तो विंटर नावाचा एक अमेरिकन होता. मी त्याला न्यूयॉर्कमधील एका ओळखीच्या माणसाकडून आणलेले पत्र दिले. तो चाळीशी ते पन्नाशीमधील माणूस होता. त्याचे केस विरळ व काळे होते. कानशीलांवर ते करडे झाले होते. अरुंद चेहऱ्यावरील नाक डोळे उठावदार होते. डोळ्यात चमक होती. आणि त्याचा मोठा शिंगापासून केलेला वाटणारा चष्मा घातल्यामुळे, तो नम्र पण लाजरा दिसत होता. त्याहून जराही वेगळा नव्हे. तो उंच असून बाकीच्या बाबतीत खूपच वेगळा होता. तो होनोलुलूत जन्मला होता. त्याच्या वडिलांचे मोठे दुकान होते. त्यात ते फॅशन करणाऱ्या माणसाला लागणारे, टेनिस रॅकेट्सपासून ते पावसापासून बचाव करणारे कॅनव्हासचे कापड व होजीआरीचे कपडे विकत असत. तो व्यवसाय चांगला तेजीत चालला होता. जेव्हा त्या मुलाने दुकान सांभाळायला नकार दिला, तेव्हा मी त्यांचा, विंटर पेरेचा, मुलावर असलेला राग समजू शकतो. मुलाने अभिनेता बनायचे खूळ डोक्यात घेतले होते. माझ्या मित्राने वीस वर्षे कधी न्यूयॉर्कला रंगमंचावर, पण जास्त करून, रस्त्यावर काढली होती. कारण त्याचा अभिनय फार उच्च कोटीचा नव्हता. पण शेवटी मूर्ख नसल्याने, त्याने ठरवले, की क्लेव्हेलँड, ओहियोमध्ये लहानसहान कामे करण्यापेक्षा, होनोलुलूमध्ये घट्ट मोजे वगैरे विकायचे दुकान काढावे. त्याने रंगमंच सोडून व्यवसाय चालू केला. मला वाटते, कठीण परिस्थितीनंतर तो खूप वर्षे जगला. त्याने मोठ्या आरामशीर मोटारीतून फिरायची, गोल्फकोर्सजवळील मोठ्या घरात रहायची चंगळ अनुभवली. आणि माझी

खात्री आहे, तो हुशार असल्याने, त्याने व्यवसाय पूर्णपणे व्यवस्थित चालवला. पण त्याला कलेशी पूर्णपणे फारकत घेणे जमले नाही. तो आता अभिनय करत नव्हता. पण त्याने रंगविणे सुरु केले. त्याने मला त्याच्या स्टुडिओत नेले व त्याचे काम दाखवले. ते काही वाईट नव्हते, पण माझी त्याच्याकडून जी अपेक्षा होती, त्यात बसणारे नव्हते. तो फक्त लहान, कदाचित आठ बाय दहाची, स्थिर चित्रे काढून नाजूकपणे रंगवत असे. त्याचे चित्र पुरे करणे, फार सुंदर असे. त्याला बारीसारीक तपशील भरायची ओढ असे. त्याचे फळाच्या कापांचे चित्र तुम्हाला घिरलँडजोच्या चित्राची आठवण करून देत असे. जेव्हा तुम्ही त्याच्या चिकाटीचे कौतुक करता, तेव्हा त्याच्या कलाकारीच्या कसबामुळे नक्कीच भारावून जाता. मी कल्पना करतो, की तो अभिनेता म्हणून जरी यशस्वी झाला नसला, तरी काळजीपूर्वक बघितल्यास, त्याचे परिणाम फार नाव होण्याइतके, पुरेसे धीट व मोठे नव्हते. ज्या विरोधाभासात्मक तऱ्हेने त्याने मला शहर दाखवले, त्या त्याच्या उद्यमशीलतेचे मी कौतुक करतो. त्याने मनातल्या मनात असा विचार केला असेल, की अमेरिकेत कुणीच त्याची बरोबरी करू शकणार नाही. पण त्याला हे देखील स्पष्ट दिसले, की त्याचा दृष्टीकोन विनोदी होता. त्याने मला अनेक इमारतींभोवती फिरवले. आणि त्या इमारतींच्या वास्तुकलेचे मी योग्य कौतुक केले, तेव्हा त्याचे समाधान झाले. त्याने मला श्रीमंत माणसांची घरे दाखवली. तो म्हणाला, “हे स्टुब्सेसचे घर आहे. हे बांधायची किंमत शंभर हजार डॉलर आली असेल. स्टुब्सेस हे एक उत्तम कुटुंब आहे. सत्तर वर्षांपूर्वी म्हातारा स्टुब्स मिशनरी म्हणून इथे आला.”

त्याने थोडे कां कू करत, त्याच्या मोठ्या गोल चष्म्यामधून चमकत्या डोळयांनी माझ्याकडे पाहिले. तो म्हणाला, येथील सर्व उत्तम कुटुंबे मिशनरी

कुटुंबे आहेत. तुमच्या वडीलांनी किंवा आजोबांनी इतर धर्माच्या लोकांना ख्रिश्चन केले नाही, असे लोक होनोलुलूमध्ये मोठे झालेले नाहीत.”

“असे आहे होय?”

“तुला तुझे बायबल माहिती आहे का?”

“चांगलेच.”

त्यात असा एक धडा आहे, त्यात असे म्हटले आहेः वडिलांनी आंबट द्राक्षे खाल्ली. मुलांचे दात काठावर आहेत. माझा असा तर्क आहे, की होनोलुलूमध्ये हे वेगळे असते. वडिलांनी स्थानिक लोकांना ख्रिश्चन केले आणि मुलांनी त्यांच्या जमिनीवर उड्या मारल्या.”

मी पुटपुटलो, “जे स्वतःला मदत करतात, त्यांना देव मदत करतो.”

असे खरेच होते. जेव्हा या बेटावरील स्थानिक लोकांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला, तेव्हा त्यांच्याकडे राखून ठेवण्यासारखे काहीच शिल्लक राहिले नाही. मिशनऱ्यांच्या कामाचा मोठा मोबदला म्हणून, राजांनी त्यांना जमिनी दिल्या आणि मिशनऱ्यांनी स्वर्गामध्ये संपत्ती जमा करून, जमिनी विकतही घेतल्या. ती नक्कीच चांगली गुंतवणूक होती. एका मिशनऱ्याने व्यापार मागे ठेवला --- मला वाटते, त्याला कायदा न मोडणारा व्यापार म्हणता येईल --- तो जमिनीचे व्यवहार करणारा बनला. पण असे दिसणे दुर्मिळ होते. बहुतेकांच्या मुलांनी त्याच्या व्यापारी बाजूकडे लक्ष दिले. ओहो, इथे पन्नास वर्षांपूर्वी आलेल्या वडिलांनी विश्वास संपादन करण्याचे काम केले.

त्याने त्याच्या घड्याळाकडे बघितले. “अरेच्या, हे तर बंद पडले आहे. म्हणजे आता पेयपान करायची वेळ झाली आहे.”

आम्ही कडेला लाल जास्वंदीची झाडे असलेल्या छान रस्त्याने गेलो, आणि शहरात आलो.

“तू कधी युनियन सलूनमध्ये गेला आहेस का?”

“अजून नाही.”

“आपण तिथे जाऊ.”

ती होनोलुलूमधील प्रसिद्ध जागा असल्याचे मला माहिती होते. मी त्यात मोठ्या जागरूक कुतुहलाने शिरलो. किंग रस्त्यापासून एका अरुंद मार्गाने, तुम्ही तेथे जाऊ शकता. त्या मार्गावर तुम्ही एका कार्यालयात जायला तितकेच तहानलेले असता, जितके सलूनमध्ये जायला तहानलेले असता. ती बारच्या समोर असलेली, तीन दरवाजे असलेली एक चौकोनी खोली आहे. त्याच्या दोन कोपऱ्यात, आडोसा करून दोन केबिन बनवलेली आहेत. दंतकथेप्रमाणे, त्या यासाठी बांधल्या होत्या, की राजा कलाकूआ तिथे प्रजेला न दिसता दारू पिऊ शकेल. आणि असा विचार करणे सुखकर आहे, की त्यापैकी एखाद्या केबिनमध्ये तो कोळशासारखी काळी दारू पित रॉबर्ट लुई स्टीव्हन्सनचे पुस्तक वाचत बसला असेल.

तिथे सोनेरी चौकटीत त्याचे तैलरंगातील चित्र आहे. पण तिथे व्हिक्टोरिया राणीची दोन चित्रेही आहेत. त्याशिवाय भिंतीवर अठराव्या शतकातील, जुन्या चित्रांची ओळ कोरलेली आहे. त्यातील एक तिथे कसे आले कुणास ठाऊक, पण ते डे विल्डे याने काढलेले नाटकातील चित्र आहे. याशिवाय तिथे रंगवण्यासाठी वेगवेगळे दगड वापरलेली आलेखात काढलेली ख्रिसमसच्या तयारीची चित्रे आहेत. आणि वीस वर्षांपूर्वीच्या ‘इल्ल्युस्ट्रेटेड लंडन न्यूज’ या वर्तमानपत्राचा काही भाग पण कोरलेला

आहे. मग अजून तिथे व्हिस्कीच्या, जीनच्या, शँपेनच्या व बिअरच्या जाहिराती आणि बेसबॉलच्या खेळाच्या संघाचे व स्थानिक वाद्यवृंदाचे फोटोदेखील लावलेले आहेत.

मी झगमगीत रस्त्यावर बाहेर सोडून आलेल्या, आधुनिक व घाईगर्दीच्या युगातील ही जागा वाटत नाही तर मृतवत युगातील वाटते. ती कालपरवाच्या भूतकाळातील रसास्वादाची जागा वाटते. ती मिणमिणता उजेड असलेली अंधारी जागा आहे तिथे धूसर चमत्कारिक हवा आहे. आणि तुम्ही अशी कल्पना करू शकता, की झाकलेल्या गोष्टी करण्यासाठी ती योग्य जागा आहे. जेव्हा दुष्ट माणसे दुसऱ्यांची आयुष्ये हातात घेऊन, आक्रमक कृत्ये करतात, तेव्हा एकसुरी, चांगला न वाटणारा भडक रंगाचा काळ तिथे सुचवला जातो.

जेव्हा मी आत गेलो, तेव्हा सलून भरलेले होते. बारमध्ये व्यावसायिक लोक गटाने चर्चा करत बसलेले होते. कोपऱ्यात दोन स्थानिक लोक दारू पित बसले होते. बहुधा दुकानाचे मालक असणारे दोन तीन लोक फासे खुळखुळवत बसले होते. बाकीचे लोक सरळ समुद्राकडे जात होते. ते ट्रामचे कॅप्टन होते. त्यांचे सहकारी आणि इंजिनिअर्स होते. ज्याकरता ही जागा प्रसिद्ध होती, ते होनोलुलूचे दारूचे मिश्रण करत बसलेली, बारमागील काही माणसे होती. पांढऱ्या कपड्यातील, जाड, दाट, काळे कुरळे केस असलेल्या, घोटून दाढी केलेल्या व मोठे तेजस्वी डोळे असलेल्या मिश्र जातीच्या दोन माणसांनी, त्यांनी तयार केलेल्या पेयाचे दोन पेले भरून आणले.

तेथील अर्ध्याअधिक लोकांना विंटर ओळखत होता. जेव्हा आम्ही बारमध्ये आलो, तेव्हा एकट्याच उभ्या असलेल्या, एका जाड, लहानशा चष्मिस माणसाने त्याला एक पेय दिले.

विंटर म्हणाला, "नको, कॅप्टन, तुला माझ्याबरोबर एक घ्यायला पाहिजे."

तो माझ्याकडे वळला.

"मी तुझी कॅप्टन बटलरशी ओळख करून देतो."

त्या लहानशा माणसाने माझ्याबरोबर हातमिळवणी केली. आम्ही बोलायला सुरवात केली. पण माझ्या भोवतालने माझे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे मी त्याच्याकडे कमी लक्ष देऊ शकलो. आम्ही प्रत्येकासाठी त्या मिश्र पेयाची मागणी केल्यावर, वेगळे झालो. जेव्हा आम्ही मोटारीकडे परत आलो आणि त्यात बसून लांब जाऊ लागलो, तेव्हा विंटर मला बोलला, "आपण बटलरपासून पळालो, म्हणून मला आनंद झाला. मला तुला त्याला भेटवायचे होते. तुला त्याच्याबद्दल काय वाटते?"

मी उत्तरलो, "मी त्याच्याबद्दल फारसा विचार केला, असे मला मुळीच वाटत नाही."

तुझा निसर्गाच्या मोठ्या शक्तीवर, जादूटोण्यावर विश्वास आहे का?"

मी हसत म्हणालो, "माझा विश्वास आहे का, हे मलाच नक्की माहिती नाही."

"एक दोन वर्षांपूर्वी त्याच्या बाबतीत एक विचित्र गोष्ट घडली. ती मला तुला सांगितलीच पाहिजे."

"कशा प्रकारची गोष्ट?"

विंटरने माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

तो म्हणाला, “माझ्यापाशी याचे स्पष्टीकरण नाही. पण या गोष्टी खऱ्या असल्याचे निर्विवाद आहे. तुला असल्या गोष्टीत रस आहे का?”

“कसल्या गोष्टी?”

“भूल घालणे, जादू आणि अशाच.”

“मला त्यात रस नसलेले, अजून तरी कोणी माहिती नाही.”

विंटर क्षणभर थांबला. “मला वाटते, मी स्वतः तुला सांगत नाही. तू ते त्याच्याच तोंडून ऐक. म्हणजे तुझे तुला काय ते ठरवता येईल. आज रात्री आपण ते केल्यास तुला चालेल का?”

“हो, चालेल.”

“ठीक आहे. मी त्याला विचारतो. आपण त्याच्या बोटीवर जाऊ शकतो की नाही, ते बघतो.”

विंटरने मला त्याच्याविषयी काही सांगितले. कॅप्टन बटलरने त्याचे सर्व आयुष्य प्रशांत महासागरावर काढले होते. आतापेक्षा तो तेव्हा चांगल्या परिस्थतीत होता. कारण तेव्हा तो प्रथम ऑफिसर आणि मग एका प्रवासी वाहतूक करणाऱ्या, बोटीचा कॅप्टन होता. तो कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर काही माल विकत असे. पण त्याची बोट बुडून, खूप प्रवासी बुडून मेले.

विंटर म्हणाला, “मला वाटते, पिऊन.”

“अर्थात चौकशी झाली. त्याच्या सर्टिफिकेटवर तशी कायमची नोंद करण्यात आली. आणि मग त्याला हाकलले गेले. काही वर्षे त्याने दक्षिणेकडील समुद्रावर काम मिळवायचा प्रयत्न केला. पण आता तो दोन शिडांच्या लहानशा जहाजाचा मुख्य होता. ते होनोलुलू आणि त्याच्या

जवळपासच्या बेटांवर ये जा करत असे. ते एका चिन्याच्या मालकीचे होते आणि बटलरकडे ते तसले सर्टिफिकेट असणे, याचा अर्थ त्या चिन्याच्या दृष्टीने एवढाच होता, की त्याच्याकडून कमी पगारावर काम करून घेता येणार होते. गोरा मनुष्य जहाजाचा प्रमुख असल्याचा नेहमीच फायदा होता.

त्याच्याबद्दल असे ऐकल्याने, मी जास्त त्रास घेऊन, हे आठवायचा प्रयत्न केला, की तो कसा होता. मला त्याचा गोल चष्मा आणि त्यामागील गोल निळे डोळे आठवत होते. हळूहळू माझ्या मनात मी त्याला आठवत गेलो. तो समस्येकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टीकोन नसलेला छोटासा जाड माणूस होता. त्याचा चेहरा पौर्णिमेच्या चंद्रासारखा गोल होता. नाक बसके व गोल होते. त्याचे केस छान, छोटेसे होते. त्याचा चेहरा लाल असून तो नेहमी गुळगुळीत दाढी केलेला असे. त्याचे हात जाडसर असून, बोटांच्या तळाशी खड्डा होता व पाय बुटके होते. तो आनंदी प्राणी होता. दुःखी अनुभवातून जाऊनही तो ते उगाळत बसला नव्हता. जरी तो चौतीस किंवा पस्तीस वर्षांचा असला, तरी तो खूप तरुण दिसत असे. शेवटी मी त्याच्याकडे वरवर लक्ष दिले होते. आणि आता मला त्याचे नुकसान करणारी व आयुष्य नासवणारी घटना माहिती असली तरी मी स्वतःला खात्री दिली, की मी त्याला परत भेटेन, तेव्हा त्याला जास्त काळजीपूर्वक न्याहाळीन. वेगवेगळ्या माणसांमधील भावनिक प्रतिसादातील फरकाचे निरीक्षण करणे, मोठे चौकस काम होते. काहीजण भयंकर लढायांमधून व भविष्यात होणाऱ्या मृत्यूच्या भीतीतून व कल्पनाही नसलेल्या संकटातून जातात. तरीही त्यांचा आत्मा काही क्लेश न होता बचावतो. तर काहीजण विशाल एकाकी समुद्रावरील चंद्राला घाबरुन थरथर कापू लागतात. किंवा झाडाझुडुपांच्या गर्दीतील पक्ष्याला गातांना ऐकून काहीजणांना त्यांचे

आयुष्य बदलून टाकेल इतकी जोरदार फिट येते. हे बळकट असल्याने होते की दुर्बल असल्याने? कल्पनाविलासाच्या अभावाने होते की चारित्र्याच्या अस्थिरपणामुळे होते? मला माहिती नाही. मी जेव्हा माझ्या मनात ते जहाज बुडल्याची घटना आठवतो, बुडणाऱ्यांच्या किंकाळया आणि भयानक परिस्थिती डोळयासमोर उभी करतो, नंतरची कंटाळवाणी लांबलचक चौकशी, मेलेल्यांसाठी आक्रोश करणारे लोक आणि त्याच्याबद्दलच्या टोचणाऱ्या गोष्टी वर्तमानपत्रात छापून आलेल्या पाहून, लज्जा आणि दुष्कीर्तीने त्याने गांगरून जाणे, हे सर्व मी आठवतो. कॅप्टन बटलर त्याच्या यशस्वी साहसांबद्दल बोलतांना, शाळेत जाणाऱ्या मुलाबद्दल हवाईमधील मुलींबद्दल, लेवेलीबद्दल आणि वेश्यावस्तीबद्दल ज्या कटू मोकळेपणे बोलेल, तसाच बोलला. तो खुल्या दिलाने हसला. एखाद्याला वाटले असेल, की तो पुन्हा हसू शकणार नाही. मला त्याचे चमकणारे, पांढरे दात आठवतात. ते त्याच्या दिसण्याचा सर्वात चांगला भाग होते. मला त्याच्यात रुची वाटू लागली. त्याचा आणि त्याच्या आनंदी दुर्लक्ष करण्याचा विचार करताना, मी ती विशिष्ट गोष्ट विसरलो. ती ऐकण्यासाठी मला त्याला परत भेटावे लागले. तो कशा प्रकारचा माणूस आहे, हे शोधून काढण्याकरता मला त्याला भेटायचे होते.

विंटरने जरूर ती कारवाई केली आणि जेवणानंतर आम्ही जेट्टीजवळ गेलो. जहाजाची बोट आमच्यासाठी थांबली होती. आम्ही त्यात बसलो. बंदरापासून काही अंतरावर जहाज नांगरलेले होते. पण जेट्टीपासून फार लांब नव्हते. आम्ही तिथे पोचलो, तेव्हा चार तारांच्या हवाईयन गिटारचा आवाज ऐकला. आम्ही शिडीवर चढलो.

विंटर रस्ता दाखवत बोलला, “मला वाटते, तो केबिनमध्ये आहे.”

ती एक लहानशी गचाळ व घाणेरडी केबिन होती. त्यात एका बाजूला टेबल होते. बाकी सर्व भिंतींना चिकटून मोठी बाके होती. मला वाटते, तिथे आजारी माणसांना झोपवले जात असावे. एक पेट्रोलियमचा दिवा मंद उजेड देत होता. एक देशी मुलगी गिटार वाजवत होती. आणि बटलर जागेवर बसून, अर्धवट लोळत, डोलत होता. त्याचे डोके तिच्या खांद्यावर होते. आणि हात तिच्या कंबरेभोवती होता.

विंटर मूर्खासारखे पण विनोदाने म्हणाला, “कॅप्टन, आम्ही तुला त्रास देऊ इच्छित नाही.”

बटलर उठून आमच्याशी हातमिळवणी करत म्हणाला, “आत या. तुम्ही काय घेणार?”

ती उबदार रात्र होती. आणि उघड्या दारातून, निळ्या आकाशातील अगणित तारे दिसत होते. कॅप्टन बटलरने गंजीफ्रॉक घातला होता. त्यातून त्याचे गोरे, जाड दंड दिसत होते. त्याने फार मळकी पँट घातली होती. त्याच्या पाऊलांमध्ये काही नव्हते. पण त्याच्या कुरळ्या केसांवर त्याने खूप जुनी, आकारहीन टोपी घातली होती.

“मला तुमची ओळख या प्रिय मुलीशी करून देऊ दे. ती गोड मुलगी आहे, नाही का?”

आम्ही एका सुंदर व्यक्तीबरोबर हातमिळवणी केली. ती कॅप्टनपेक्षा बरीच उंच होती. मागच्या पिढीतील मिशनऱ्याची माननीय, नैतिक मुलगी होती. तिच्या स्थानिक आईवर मिशनऱ्याने केलेल्या अत्याचारातून तिचा जन्म झालेला असावा. तिच्या अंगावरील मिशनऱ्याच्या आवडीच्या सैलसर, पूर्ण उंचीच्या गाउनमधून, तिचा सुंदर बांधा लपून रहात नव्हता.

एखाद्याला तिच्या वयामुळे आलेल्या जाडेपणाबद्दल क्वचितच संशय आला असता. पण आता ती डौलदार व चटपटीत दिसत होती. तिची तपकिरीसर कांती फार चमकत होती. तिचे डोळे मोठे होते. तिचे काळे केस भरघोस आणि छान होते. त्यांच्या कुरळया बटा तिच्या चेहऱ्याभोवती पसरलेल्या होत्या. जेव्हा ती स्वागतपर हसे, तेव्हा तिचे पांढरे, एकसारखे व लहान दात दिसत. ती नक्कीच अतिशय आकर्षक होती. कॅप्टनचे तिच्यावर वेड्यासारखे प्रेम होते. त्याची नजर तिच्यावरून ढळत नव्हती. त्याला सतत तिला स्पर्श करायचा होता, हे कळायला अगदी सोपे होते. पण मला काय विचित्र वाटले असेल, तर ते म्हणजे ती सुद्धा त्याच्यावर आरक्त झालेली दिसत होती. तिच्या डोळयात चमक होती, हे नक्की. तिचे ओठ थोडे विलग झालेले होते, जसे काही ती प्रेमभावनेने सुस्कारा टाकत होती. हे उचंबळवणारे व हलवणारे दृष्य असल्याचे मला वाटू लागले होते. पण परका माणूस त्या प्रेमळ जोडीचे काय करणार? मला वाटले विंटरने मला इथे आणायला नको होते. मला वाटले, अंधारी केबिन अजून छान होत चालली होती आणि आता ती टोकाच्या प्रणयासाठी तयार झाली होती. तरीही सगळया जगापासून अलग अशा ताऱ्यांनी चमकणाऱ्या आकाशाखाली असलेले, होनोलुलूच्या बंदरातील ते गर्दीचे जहाज मी कधीच विसरणार नाही. रात्री प्रशांत महासागरातील जहाजाने मला एका हिरव्या डोंगराळ बेटावरून दुसऱ्या बेटावर सफर करणाऱ्या त्या प्रेमिकांचा विचार करायला आवडते. तो करतांना, एक अद्भुतरम्यतेची मंद झुळूक माझ्या गालावरून वहात गेली.

तरी अद्भुतरम्यता चिकटलेला बटलर जगातील सर्वात शेवटचा माणूस होता. हे बघणे कठीण होते, की त्याच्यात प्रेमात पडण्यासारखे काय

होते. त्याने घातलेल्या कपड्यात, तो नेहमीपेक्षा गोलमटोल दिसत होता. त्याचा गोल चष्मा त्याच्या गोल चेहऱ्याला अयोग्य कोन देत होता. तो चर्च कामगारासारखा वाईट स्थितीत दिसत होता. त्याचे संभाषण जुन्या जमान्यातील अमेरिकन गोडव्यासारखे होते. त्याने सांगितलेली गोष्ट पुसट आठवत असल्याने, निराशादायकपणे मी नंतर माझ्या शब्दात सांगतो. शिवाय तो स्वभावाने चांगला असला, तरी शपथ घेतल्याशिवाय एक वाक्यदेखील धड जुळवू शकत नव्हता. जरी त्याचे बोलणे फक्त लैंगिकतेबद्दल पश्चात्तापदग्धता दाखवत असले, तरी ऐकायला कठोर वाटत होते. तो करमणूक व हसणे आवडणारा माणूस होता. आणि कदाचित तेच त्याच्या गुप्त प्रेमाच्या यशस्वितेचे गमक असेल. कारण स्त्रिया बहुधा गंभीर प्राणी नसतात. पण पुरुष त्यांना ज्या गंभीरणाने वागवतात, त्याने त्या कंटाळतात. त्याना हसवणाऱ्या, विचित्र पण करमणूक करणाऱ्या माणसाला त्या क्वचितच विरोध करतात. त्यांचे विनोदाचे अंग हे नैसर्गिक असते. इफेससची डायना नेहमी निष्काळजीपणे वाऱ्याबरोबर व त्याच्या टोपीवर बसणाऱ्या, लाल नाकाच्या विदुषकाबरोबर तात्पुरते प्रेम करायला तयार असते. मला समजते, की कॅप्टन बटलर मध्ये गोडवा आहे. जर मला बोट बुडाल्याची दुःखी गोष्ट माहिती नसती, तर त्याला आयुष्यात कशाचीच काळजी नाही, असे मला वाटले असते.

आम्ही आत शिरल्यावर आमच्या यजमानाने घंटी वाजवली. आता एक चिनी स्वयंपाकी आत आला. त्याने बरेच पेले व सोड्याची बाटली आणली होती. व्हिस्की आणि कॅप्टनचा रिकामा पेला टेबलावर पडलेलाच होता. पण चिन्याला बघितल्यावर मी नक्कीच सुरवात केली. कारण तो मी पाहिलेला जगातील सर्वात कुरूप व्यक्ती होता. तो खूप बुटका, जाडसर

असून मोठ्या कष्टाने चालत होता. त्याने पांढरी पँट व बनियन घातला होता. पण आता ते खराब झाले होते. त्याच्या कडक, करड्या केसांवर त्याने ट्विडची जुनी, घट्ट टोपी घातली होती. ते कुठल्याही कुरूप चिनी माणसाला शोभून दिसले असते, पण त्याला ते फार वाईट दिसत होते. त्याचा मोठा चौकोनी चेहरा खूप बसका होता. जसे काही त्याच्यावर जोरदार ठोसा मारला गेला होता. आणि त्यावर बारीक पुटकुळया होत्या. पण त्याच्यात सर्वात विश्वासार्ह काय होते, तर वरच्या ओठावरील खूप मोठी फट. त्यावर कधीच काही उपाय केले गेले नाहीत. त्यामुळे त्याचा वरचा फट असलेला ओठ, त्याच्या नाकाच्या कोनात गेलेला होता. आणि त्या उघड्या भागात, मोठा टोकेरी दात होता. तो भयानक दिसत असे. तो त्याच्या तोंडाच्या कोपऱ्यात, सिगरेटचा शेवटचा तुकडा ठेऊन आला. का कुणास ठाऊक, पण त्याचे हावभाव राक्षसासारखा दिसत होते.

त्याने व्हिस्की ओतली व सोड्याची बाटली उघडली. कॅप्टन म्हणाला, “जॉन, ओतू नकोस.”

तो काही बोलला नाही. पण त्याने प्रत्येकाच्या हातात पेला दिला. मग तो बाहेर गेला.

त्याच्या जाड्या कठोर चेहऱ्यावर चकाकी आणत बटलर बोलला, “मी तुला माझ्या पडद्याच्या फटीकडे बघतांना पाहिले.

मी म्हणालो, “काळोख्या रात्री त्याला भेटणे मी पसंत करणार नाही.”

काही कारणाने कॅप्टन समाधानाने बोलला, “तो घरेलू आहे. पण एका गोष्टीसाठी तो चांगला आहे. मी जगाला सांगेन. फक्त तुम्ही जेव्हा त्याच्याकडे बघाल, तेव्हा पेय नक्कीच प्या.”

पण माझे डोळे टेबलावरील भिंतीवर लोंबकळणाऱ्या कलाबाश [समशीतोष्ण कटिबंधातील सदाहरित झाड] झाडावर पडले. मी उठून, ते बघू लागलो. मी वस्तुसंग्रहालयाबाहेर पाहिलेल्या झाडापेक्षा मला हवे तसे हे जुने झाड होते.

कॅप्टन मला निरखत बोलला, “येथील एका बेटावरील मुख्य अधिकाऱ्याने मला ते दिले. मी त्याच्यावर केलेल्या उपकारांची त्याने अशा रीतीने परतफेड केली.”

मी उत्तरलो, “नक्कीच त्याने दिले.”

मी नवल करत होतो, की मी काळजीपूर्वक व गुप्तपणे कॅप्टन बटलरकडे त्यासाठी एक मागणे मागू शकतो की मी अशी कल्पना करू शकत नाही, की त्याने अशा वस्तु विकत दुकानात बसावे आणि तेव्हा जणू काही माझे विचार समजल्यासारखे तो म्हणाला, “मी ते दहा हजार डॉलरना विकेन.”

विंटर बोलला, “नाही मला असे वाटत नाही. ते विकणे गुन्हा ठरेल.”

मी विचारले, “का?”

विंटर बोलला, “ते गोष्टीत येईल. नाही का, कॅप्टन?”

“नक्कीच येईल.”

“मग आपण ती ऐकू या.”

तो उत्तरला, “अजून फार रात्र झाली नाही.”

त्याने माझे कुतूहल शमवण्यापूर्वी रात्र खूप चढली. मध्यंतरीच्या काळात आम्ही फार व्हिस्की प्यायलो. तेव्हा कॅप्टन बटलरने सॅनफ्रँन्सिस्कोचे व दक्षिणेकडील समुद्रांवरचे त्याचे जुन्या दिवसांचे अनुभव आम्हाला सांगितले. ती तरुण मुलगी शेवटी तिच्या तपकिरीसर हातावर मुटकुळे करून झोपली. तिच्या श्वासोच्छवासाने तिची छाती सावकाश वरखाली होत होती. झोपेत ती वाईट मनस्थिती असलेली, पण काळसर सुंदरी दिसत होती.

त्या बेटांच्या समूहापैकी जिथे सामान उतरवायला जहाज जाई, तेव्हा तो त्याच्या विचित्र जुन्या जहाजाबरोबर हिंडे. देशी लोकांना कामाबद्दल फारसे प्रेम नव्हते. राबणारे चिनी, लबाड जपानी यांच्या हातातून व्यापार निसटला होता. तिच्या वडिलांची एक चिंचोळी जमीन होती. तिथे त्यांनी केळी व अळूची लागवड केली होती. त्यांच्याकडे मासेमारीसाठी बोट होती. जहाजावरील माणसाशी त्यांचे काही नातेसंबंध होते. त्यानेच कॅप्टनला एका आळशी संध्याकाळी त्यांच्या लहानशा, गचाळ घरी नेले होते. त्यांनी एक व्हिस्कीची बाटली व हवाईयन गिटार नेले होते. कॅप्टन काही लाजरा माणूस नव्हता. जेव्हा त्याने सुंदर मुलगी पाहिली, तेव्हा तो तिच्यावर प्रेम करू लागला. तो त्या गावची भाषा सहज बोलू शके. त्याने मुलीची भीती बघता बघता घालवली. त्यांनी संध्याकाळ नाचगाण्यात घालवली. ते संपल्यावर ती त्याच्याशेजारी बसली होती आणि त्याने तिच्या कंबरेभोवती हात घातला होता. त्या बेटावर ते जहाज खूप दिवस थांबले. नेहमी घाई असणाऱ्या कॅप्टननेदेखील जहाजाने लवकर ते बेट सोडावे, असा काही प्रयत्न केला नाही. तो त्या उबदार लहानशा बेटावर आरामशीर रहात होता आणि आयुष्य लांबलचक होते. सकाळी आणि संध्याकाळी तो

जहाजाभोवती पोहत असे. किनाऱ्यावर एक मेणबत्त्या, साबण वगैरेचे दुकान होते. तिथे खलाशांना व्हिस्कीचा एक पेला मिळू शकत असे. तो दिवसातील बराचसा वेळ तेथील मालक असलेल्या व इतर मिश्र जातीच्या लोकांबरोबर पत्ते खेळण्यात घालवत असे. रात्री तो आणि त्याचा मित्र, बनाना त्या सुंदर मुलीच्या घरी जात आणि तिथे एक दोन गाणी म्हणत व गोष्टी सांगत. त्या मुलीच्या वडिलांनी सुचवले, की त्याने तिला बरोबर घेऊन जावे. त्यांनी मित्रत्वाने त्यावर बातचीत केली. मुलीने कॅप्टनच्या अंगावर रेलून, तिच्या हातांनी आणि मृदु हसऱ्या कटाक्षांनी दबाव आणून, त्याला घायाळ केले. कॅप्टनला ती आवडू लागली. तो घरगुती मनुष्य होता. समुद्रावर तो कधीकधी मलूल असे. तिच्यासारख्या सुंदर मुलीला जहाजावर घेऊन जाणे, फार छान होते. तो व्यवहारी होता. त्याने ओळखले, की कोणीतरी त्याचे मोजे धुवायला व त्याच्या कपड्यांकडे लक्ष द्यायला असले, तर उपयोगी ठरेल. एका चिनी माणसाकडून ही कामे करून घेतांना त्याचे कपडे फाटले जात. देशी लोक त्यापेक्षा कपडे बरे धूत असत. जेव्हा कॅप्टन होनोलुलूला जाई, तेव्हा त्याला चांगले कपडे लागत. फक्त पैसे ठरवण्याचा प्रश्न होता. वडीलांना दोनशे पन्नास डॉलर्स हवे होते. आणि कॅप्टन चिकू माणूस नसला, तरी एवढे पैसे द्यायला तयार नव्हता. पण तो तसा उदार होता आणि त्याच्या मानाने मुलीचा खूप मऊमुलायम चेहरा पाहून, त्याला भांडण करवेना. त्याने एकशे पन्नासवर सौदा तोडला. अजून तीन महिन्यांनी शंभर डॉलर्स वाढवायचे कबूल केले. त्या रात्री खूप चर्चा झाली. दोन्ही पक्ष आपापले म्हणणे सोडायला तयार नव्हते. त्यामुळे कॅप्टन संतापला. त्याला रात्री नेहमीसारखी झोप आली नाही. त्याला त्या सुंदर मुलीची स्वप्ने पडत राहिली. प्रत्येक वेळी तो जागा झाला, की त्याला तिचे

मऊ भारणारे ओठ त्याच्या ओठांवर दाब देत असल्यासारखे वाटे. सकाळी तो स्वतःला शिव्या घाले. कारण मागच्या वेळी तो होनोलुलूला असतांना रात्री पोकर खेळतांना त्याच्याकडे फारच कमी पैसे होते. कालच्या रात्री जर तो मुलीबरोबर प्रेमाचे चाळे करत असेल, तर आज सकाळी तो तिच्या आठवणींने वेडा होत असे.

तो मित्राला म्हणाला, "हे बघ बनाना, मला ती मुलगी पाहिजे. तू जाऊन त्या म्हाताऱ्याला सांग, की मी आज रात्री पाव भाजायचा लगदा आणणार आहे आणि तिला ठरवून टाक. मला वाटते सकाळी आपले जहाज येथून निघेल."

मला माहिती नाही की मित्र, बनाना, अशा विचित्र नावाने का ओळखला जात होता. त्याला व्हीलर म्हटले जाई. पण जरी त्याचे ते इंग्लिश आडनाव असले, तरी त्याच्यात जराही गोरे रक्त नव्हते. तो उंच होता. बळकटपणाकडे झुकणारा होता. पण हवाईतील नेहमीच्या माणसांपेक्षा खूप काळा होता. तो आता तरुण राहिला नव्हता. त्याचे कुरकुरीत, जाड, कुरळे केस करडे झाले होते. त्याचे वरचे पुढील दात सोन्यात केलेले होते. त्याला त्या दातांचा अभिमान होता. त्याचे डोळे चकणे होते आणि त्यामुळे तो चमत्कारिक दिसे. कॅप्टन विनोदी असल्याने, त्याला त्याच्यात कायम विनोदाचा स्रोत दिसे. तो त्याला पराभव पत्करायला लावायला मागेपुढे बघत नसे, कारण त्याला माहिती होते, त्याच्या मित्राला ते भावनाशीलतेने आवडे. बहुतेक देशी लोकांसारखा नसलेला बनाना अबोल माणूस होता. जर चांगल्या स्वभावाच्या एखाद्या माणसाला त्याला कुणी न आवडण्याचा अधिकार असला, तर कॅप्टन बटलरला तो आवडत नसे. त्याला समुद्रावर असताना कुणी बोलका माणूस बरोबर असलेला आवडे. तो स्वतः

बडबड्या, समाजप्रिय प्राणी होता. त्यासाठी मिशनऱ्याला व अबोल माणसाला दिवसभर प्यायला उद्युक्त करणे पुरेसे होते. त्याने मित्राला उठवण्याचा पुरेसा प्रयत्न केला. म्हणजे, त्याने त्याला दया न दाखवता, गवताच्या भाऱ्याने फटकावले. पण तो हसवायचा गरीब प्रयत्न होता. त्यामुळे तो अशा निष्कर्षाला आला, की प्यायलेला असो वा नसो, बनाना हा गोऱ्या माणसासाठी चांगला सहकारी नव्हता. पण तो चांगला खलाशी होता. ज्याच्यावर विश्वास टाकता येईल अशा मित्राची किंमत जाणण्याइतका, कॅप्टन पुरेसा तर्कनिष्ठ होता. त्याच्यासाठी परदेशात येणे काही नवीन नव्हते. जेव्हा जहाज समुद्रात असे, तेव्हा तो काही करू शकत नसे. तेव्हा त्याची दारू संपेपर्यंत तो त्याच्या अरुंद पलंगावर पडून रहात असे, हे समजून घेण्यासारखे होते. पण बनाना समाजाशी फारच फटकून रहायचा. पण तो विश्वासू माणूस असल्यामुळे, ते शक्य होते. कुणी बोलणारे भेटले तर कॅप्टनला ती मेजवानी वाटे. ती मुलगी ठीक होती. शिवाय त्याला जर माहिती असेल, की ती मुलगी त्याची वाट बघते आहे, तर तो पिणे टाळत असे.

तो त्याचा मित्र असलेल्या, मेणबत्त्या, साबण वगैरे विकणाऱ्या दुकानदाराकडे गेला. आणि एक जीनचा पेग घेतांना त्याला कर्ज देण्याबद्दल विचारले. जहाजाच्या कॅप्टनला अशा दुकानदारासाठी एक दोन उपयुक्त गोष्टी करणे शक्य असते. खालच्या आवाजातील पाऊण तासाच्या संभाषणानंतर [ सगळ्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी माहिती करून देण्याचे उद्दिष्ट नव्हते. ] कॅप्टनने त्याच्या मागील खिशातील चिठ्ठ्यांचा गठ्ठा काढून परतपरत वाचला. त्या रात्री तो जेव्हा परत जहाजावर गेला, तेव्हा मुलगी त्याच्याबरोबर गेली.

कॅप्टन बटलरने आधीच जे करायचे ठरवले होते, ज्याचा तर्क केला होता, त्यासाठी तो कारण शोधत होता, ते खरेच व्हायच्या बेतात होते. त्याने प्यायचे सोडले नाही. पण जास्त प्यायली नाही. जेव्हा तो दोन तीन आठवडे शहरापासून दूर होता, तेव्हा जहाजातील काम करणाऱ्या मुलांबरोबर आनंदी होता. पण त्या तरुण मुलीकडे जायलाही तो आनंदाने तयार होता. इतक्या शांतपणे झोपलेल्या मुलीबद्दल तो विचार करत होता. तो केबिनमध्ये शिरुन तिच्यावर वाकल्यावर, ती कसे तिचे आळसटलेले डोळे उघडेल आणि त्याच्यासाठी हात पसरेल. त्यात तो गुंग होऊन जाईल. त्याला आढळले, तो पैसे वाचवतो आहे. आणि तो उदार माणूस असल्याने, त्याने मुलीच्या बाबतीत योग्य गोष्ट केली. तिच्या लांब केसांसाठी त्याने तिला चांदीची मागील बाजू असलेले ब्रश, सोन्याची साखळी आणि नव्याने बनवलेली लाल माणकाची अंगठी दिली. ओहो, पण जिवंत असणे, आणि त्यासाठी जवळ स्त्री असणे, चांगले होते.

सबंध वर्ष गेले. तरी त्याला तिचा कंटाळा आला नाही. तो स्वतःच्या भावनांचे विश्लेषण करणारा माणूस नव्हता. पण हे इतके नवलपूर्ण होते, की त्याचे लक्ष खेचले गेले. त्या मुलीमध्ये काहीतरी विशेष असले पाहिजे. तिच्यात तो नेहमीपेक्षा जास्त गुंतून पडल्याचे, त्याला जाणवले. कधीकधी त्याला वाटे, की त्याने तिच्याशी लग्न केले, तर काही वाईट नाही.

मग एक दिवस मित्र जेवायला किंवा चहाला आला नाही. पहिल्या जेवणाच्या वेळी त्याबद्दल बटलरने फार त्रास करून घेतला नाही. पण दुसऱ्या वेळी त्याने चिनी स्वयंपाक्याला विचारले, “माझा मित्र कुठे आहे? तो चहासाठी आला नाही?”

चिंक म्हणाला, “वॉन्टची [भारतीय जमातीचा माणूस उर्फ बनाना] नाही.”

“तो आजारी आहे का?”

“नाही, आजारी नाही.”

दुसऱ्या दिवशी बनाना परत आला. पण तो नेहमीपेक्षा जास्त वाईट मनस्थितीत होता. जेवणानंतर त्याने मुलीला विचारले की त्याला काय झाले आहे. तिने हसून तिचे खांदे उडवले. तिने कॅप्टनला सांगितले, की बनाना तिच्यावर भाळला आहे, पण तिने त्याला दूर केल्यामुळे तो तसा झाला आहे. कॅप्टन विनोदी असल्याने आणि त्याचा स्वभाव हेवा करण्याचा नसल्याने, त्याला ते फारच मजेशीर वाटले, बनानासारख्याने प्रेमात पडावे. जो माणूस चकणा आहे, त्याला ही थोर, गरीब संधी वाटली होती. जेव्हा चहा आला, तेव्हा त्याने त्याला आनंदाने झाडले. पण त्याने अशा तऱ्हेने हवेत इमले बांधायचे नाटक केले, की दुसऱ्याला काही माहिती नसल्याबद्दल, त्याची खात्री होती. पण त्याने काही छान गर्विष्ठ गुद्दे मारले. त्याला तो जसा मजेशीर वाटत होता, तसे त्या मुलीला वाटत नव्हते आणि नंतर तिने त्याला अजून काही न बोलण्याची विनंती केली. तिला गंभीर झालेले पाहून, त्याला नवल वाटले. ती म्हणाली, की त्याला तिचे लोक कसे आहेत, ते माहिती नाही. जेव्हा ते चिडतील, तेव्हा ते काहीही करतील. ती जरा घाबरली होती. हे त्याला इतके विचित्र वाटले की तो खूप हसला.

“जर तो तुला काही त्रास देऊ लागला, तर तू त्याला धमकी दे, की तू मला सांगशील. त्यामुळे त्याला वचक बसेल.”

“मला वाटते, त्याला तू काढून टाक.”

“तुझ्यासारख्या गोड मुलीवरून नाही. मी त्याच्याकडे एक चांगला खलाशी म्हणून बघतो. पण त्याने तुला सोडले नाही, तर मी त्याला चांगला धडा शिकवेन.

कदाचित त्या मुलीकडे, ती मुलगी असल्याने, एक वेगळे शहाणपण होते. तिला माहिती होते, की एखाद्या माणसाने एकदा काही ठरवले, की त्याच्याशी वाद घालण्यात काही अर्थ नसतो. त्यामुळे फक्त त्याचा हट्टी पणा वाढतो. त्यामुळे ती शांत राहिली. आणि आता त्या छान बेटांमधील शांत समुद्रातून मार्ग काढणाऱ्या गचाळ जहाजात जाड्या लहानशा कॅप्टनला माहिती नसलेले, एक वेगळे, तणावपूर्ण नाटक सुरु झाले. त्या मुलीचा विरोध बनानाला क्रृद्ध करून गेला. त्यामुळे तो त्याच्यातील मनुष्यत्व हरवून बसला आणि केवळ आंधळी इच्छा म्हणून राहिला. त्याने तिच्यावर आनंदाने वा हळूवारपणे प्रेम केले नाही, तर दुष्टपणे, रानटी भीतीदायकपणे प्रेम केले. तिची त्याच्याबद्दलची नाराजी आता द्वेषभावनेत बदलली. जेव्हा त्याने तिला शोधून काढले, तेव्हा तिने त्याला कटू रागाने टोमणे मारून, उत्तर दिले. छुपे युद्ध सुरूच होते. आणि काही काळानंतर कॅप्टनने तिला जेव्हा विचारले, की तिला बनाना अजून त्रास देतो आहे का, तेव्हा ती खोटे बोलली.

पण एका रात्री, ते होनोलुलूमध्ये असतांना, कॅप्टन जहाजाच्या कडेला अगदी वेळेवर आला. ती पहाटेची वेळ होती. बनाना कुठली तरी देशी दारु पित होता. आणि खूपच प्यायला होता. कॅप्टनने जहाज वल्हवताना देशी भाषेत काही आवाज ऐकले. तो शिडीवर चढला. त्याने बनानाला त्याच्या शेजारच्या केबिनचे दार जोराने उघडतांना पाहिले. तो

त्या मुलीच्या अंगावर ओरडत होता. त्याने शपथपूर्वक सांगितले, की तिने जर त्याला आत येऊ दिले नाही, तर तो तिला ठार मारेल.

बटलर ओरडला, "अरे ए, तू काय करतो आहेस?"

मित्राने हँडल सोडून दिले आणि कॅप्टनकडे रानटीपणे द्वेषाने पाहिले. तो काही न बोलता बाजूला झाला.

"इकडे थांब. तू त्या दाराशी काय करत होतास?"

मित्राने उत्तर दिले नाही. त्याने रागारागाने कॅप्टनकडे पाहिले. कॅप्टन बोलला, "ए घाणेरड्या, चकण्या, काळ्या कोळशा, माझ्याशी विचित्रपणा केलास, तर मी तुला चांगलाच धडा शिकवेन."

तो मित्रापेक्षा फुटभर कमी उंचीचा होता. त्याच्याशी बरोबरी करू शकला नसता. पण त्याला देशी चक्रम लोकांशी दोन हात करायची सवय होती. त्याच्याकडे त्याचे वाघनख तयार होते. कदाचित कुणी सभ्य माणूस ते वापरत नसावा. पण कॅप्टन बटलर काही सभ्य नव्हता. त्याला सभ्य माणसाशी कसे वागायचे माहिती नव्हते. कॅप्टन काय करणार आहे, हे बनानाला माहिती व्हायच्या आत, कॅप्टनचा उजवा हात बनानावर पडला आणि त्याने स्टीलच्या रिंगसकट त्याच्यावर मूठ उगारली. त्याला पकडून जबड्यावर ठोसा लगावला. जणु कोयता उगारल्याच्या आविर्भावात, एखाद्या बैलासारखा तो त्याच्यावर तुटून पडला.

कॅप्टन म्हणाला, "आता तो शिकेल."

बनाना हलला नाही. मुलगी केबिनचे दार उघडून बाहेर आली.

"तो मेला का?"

"नाही."

त्याने काही लोकांना बोलावून मित्राला त्याच्या केबिनमधील पलंगावर न्यायला सांगितले. त्याने समाधानाने त्याचे हात चोळले. त्याचे गोल, निळे डोळे चष्म्यामागून चकाकू लागले. मुलगी विचित्रपणे शांत होती. तिने तिचे हात त्याच्या गळयात टाकले. जसे काही ती त्याला न दिसणाऱ्या संकटापासून वाचवत होती.

बनाना पुन्हा चालू लागायच्या दोन तीन दिवस आधी, जेव्हा तो त्याच्या केबिनमधून बाहेर आला, तेव्हा त्याचा चेहरा सुजलेला आणि फाटलेला होता. काळया त्वचेच्या अंधारातून, त्याच्या रागावलेल्या चेहऱ्याचा दाट ब्रश झालेला दिसत होता. बटलरने त्याला सहजतेने आणि शांतपणे डेकवर चालतांना पाहून बोलावले. न बोलता, तो त्याच्याकडे चालत गेला.

फार गरम असल्याने, बटलर त्याचा चष्मा घसरड्या नाकावर बसवत त्याला म्हणाला, "हे बघ, बनाना, यासाठी मी तुला कामावरून काढून टाकणार नाही. पण तुला आता समजले असेल, की मी जेव्हा मारतो, तेव्हा ते फार वाईट रीतीने मारतो. हे विसरू नकोस. आणि मला अजून काही विनोदी प्रकार करायला लाऊ नकोस."

नंतर त्याने त्याचा हात बाहेर काढून, बनानाकडे बघून त्याचे मोठे सुंदर असे चांगल्या विनोदाचे चमकदार हास्य केले. मित्र बनानानेही त्याचा हात पसरला आणि त्याचे सुजलेले ओठ अचानक हलवून, मोठे रुंद राक्षसी हास्य केले. कॅप्टनच्या मनातील तो प्रसंग केव्हाच पुसून गेला आणि जेव्हा ते तिघे जेवायला एकत्र बसले, तेव्हा त्याने बनानाला त्याच्या दिसण्यावरून, जिभेने झोडपले. तो कसाबसा खात होता आणि त्याचा सुजलेला चेहरा

वेदनेने पिळवटून निघत होता. तो खरोखर एक उबग येण्यासारखा प्राणी दिसत होता.

त्या संध्याकाळी जेव्हा तो वरच्या डेकवर त्याचा पाइप ओढत बसला होता, तेव्हा कॅप्टनच्या अंगातून एक शिरशिरी गेली. तो गुरगुरला, "अशा रात्री मी का शहारतो आहे, हे मला समजत नाही. कदाचित मला ताप आला असेल. दिवसभर मला थोडे विचित्र वाटते आहे."

जेव्हा तो झोपायला गेला, तेव्हा त्याने क्विनाइन घेतले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला बरे वाटत होते. पण थोडेसे दमल्यासारखे वाटत होते. जसे काही तो एखाद्या लाजलावण्या प्रकरणातून, सुटला होता.

त्याने एक गोळी घेत म्हटले, "मला वाटते माझे यकृत बिघडले आहे."

त्याला त्या दिवशी फारशी भूक नव्हती. संध्याकाळी त्याला फार अस्वस्थ वाटू लागले. त्याने त्याला माहिती असलेला पुढचा उपाय केला. त्याने दोन तीन पेग गरम व्हिस्की प्यायली. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. आणि सकाळी जेव्हा त्याने स्वतःला आरशात तपासले, तेव्हा त्याला वाटले, की तो बरोबर दिसत नाही आहे.

"जर होनोलुलूला जाईपर्यंत मी ठीक झालो नाही, तर मी डॉ डेनबायला फोन करेन. तो मला नक्की बरे करेल."

तो खाऊ शकत नव्हता. त्याला खूप गळून गेल्यासारखे वाटत होते. त्याला झोप चांगली लागली. पण उठल्यावर त्याला ताजेतवाने वाटत नव्हते, तर दमल्यासारखे वाटत होते. अंथरुणात पडून रहाण्याचा विचार करू न शकणारा, तो उत्साही छोटा माणूस, पण त्याला मोठ्या प्रयत्नांनी

जोर लाऊन, अंथरुणाबाहेर पडावे लागले. काही दिवसांनी त्याला छळणारा अशक्तपणा सहन करणे, त्याला अशक्य झाले. मग त्याने तिथून न उठण्याचे ठरवले.

तो म्हणाला, “जहाजाकडे बनाना बघू शकेल. त्याने पूर्वीही ते काम केलेले आहे.”

रात्रीनंतर आता तो कसा अंथरुणात चुपचाप पडून आहे, याचा विचार करून, तो स्वतःशीच थोडा हसला. हे त्या मुलीला आणण्यापूर्वी झाले. तो तिच्याकडे बघून हसला आणि तिचे हात दाबले. ती कोड्यात पडली आणि तिला काळजी वाटू लागली. त्याने पाहिले, की तिला त्याच्याविषयी काळजी वाटते आहे. त्याने तिचे सांत्वन करायचा प्रयत्न केला. तो आयुष्यात कधी एक दिवससुद्धा आजारी पडला नव्हता. तो म्हणाला, की बाहेर जाऊन, एका आठवड्यात तो पावसासारखा तंदुरुस्त होईल.

ती म्हणाली, “माझी अशी इच्छा आहे की तू बनानाला काढून टाकावेस. मला वाटते, या सर्वांच्या मुळाशी तो आहे.”

त्याचे निळे डोळे मलूल झाले. ते मिचकावत, तो म्हणाला, “मी असे करणार नाही. असे केल्यास जहाज चालवायला कोणीच उरणार नाही. मी त्याला बघितले, की तो चांगला खलाशी असल्याचे माझ्या लक्षात येते. अग मुली, तू असे समजतेस का, की तो माझ्यावर विषप्रयोग करतो आहे?”

तिने काही उत्तर दिले नाही. पण ती एकदोनदा चिनी स्वयंपाक्याशी बोलली आणि तिने कॅप्टनच्या खाण्यापिण्याची काळजी घ्यायला सुरवात केली. पण तो आता अगदीच थोडे खात होता. आणि मोठ्या मिनतवारीने

ती त्याला दिवसातून तीन वेळा, कपभर सूप प्यायला लावी. तो आजारी होता, यात काही संशय नव्हता. त्याचे वजन भरभर घटत होते. त्याचा तजेलदार चेहरा अशक्त व ओढलेला दिसू लागला. त्याला काही दुखत नसे. पण दिवसेंदिवस तो खराब व थकलेला दिसू लागला. तो झिजत चालला होता.

या वेळी त्याची गोलाकार सफर चार आठवडे चालली. आणि ते

होनोलुलूला येईपर्यंत, कॅप्टन स्वतःच्या तब्येतीबद्दल काळजीत होता. गेले दोन आठवडे तो त्याच्या अंथरुणातून बाहेर पडला नव्हता. उठायला व डॉक्टरकडे जायला, त्याला फारच अशक्तता जाणवत होती. त्याने त्याला जहाजावर येण्यासाठी निरोप पाठवला. डॉक्टरने त्याला तपासले. पण काही निष्कर्ष काढू शकला नाही. त्याला ताप नव्हता.

तो म्हणाला, “कॅप्टन, हे बघ. मी तुझ्याशी मोकळेपणे बोलतो. तुला काय झाले आहे, ते मला कळत नाही. आणि तुझ्याकडे असेच बघत रहाणे मला नको वाटते. तू हॉस्पिटलमध्ये ये. म्हणजे तुला आमच्या निरीक्षणाखाली ठेवता येईल. तुझ्यात तसा काही दोष सापडत नाही, ते मला माहिती आहे. काही आठवडे हॉस्पिटलमध्ये राहिलास, की तू बरा होशील.”

“पण मी जहाज सोडू शकत नाही.”

चिनी मालक विचित्र माणूस होता. तो म्हणाला, जर कॅप्टन बटलरने आजारपणामुळे जहाज सोडले, तर तो त्याला कामावरून काढून टाकेल.

बटलरला ते परवडणारे नव्हते. तो जहाजावर राहील तिथपर्यंतच, त्याची नोकरी टिकणार होती. बनाना त्याचा एक चांगला मित्र होता. शिवाय

तो त्या मुलीलाही सोडू शकत नव्हता. तिच्याहून चांगली सेवा कुणी केली नसती. जर त्याला आजारपणातून कोणी बाहेर काढू शकत असले, तर ती तीच होती. प्रत्येकाला मरण एकदाच येते. आणि त्याला ते शांतपणे यावे, असे वाटत होते. त्याने डॉक्टरचा सल्ला मानला नाही आणि शेवटी डॉक्टरने त्याचा नाद सोडून दिला. तो संशयाने बोलला, "मी तुला कुठली औषधे घ्यायची, ते लिहून देतो. आणि त्याने काही फरक पडतो का, ते बघू. तू काही दिवस विश्रांती घे."

कॅप्टन उत्तरला, "मी उठलो, तर त्यात काही भीती आहे, असे मला वाटत नाही. मला एखाद्या मांजराइतके अशक्त वाटते आहे."

डॉक्टरचा स्वतःचा, लिहून दिलेल्या औषधांवर जेवढा विश्वास होता, तेवढाच त्याचा होता. तो एकटा असे, तेव्हा सिगरेट ओढून स्वतःचे मनोरंजन करत असे. पृथ्वीवर सिगरेटइतके चांगले काही नसल्याचे, त्याचे मत होते. आपण इतके काही आजारी नाही, असे स्वतःचे समाधान करून घेण्यासाठीच तो सिगरेट ओढत असे. तो आजारी असल्याचे ऐकून, त्याचे वेगवान वाफेच्या बोटी चालवणारे, काही मित्र त्या संध्याकाळी त्याला भेटायला आले. त्यांनी एक व्हिस्कीची बाटली व फिलीपाईन सिगरेटींचा एक खोका संपवत, त्याच्या आजारपणाविषयी चर्चा केली. त्यांच्यापैकी एकाला आठवले, की कसे त्यांच्यापैकी एकाला असा विचित्र आजार झाला होता आणि अमेरिकेतील कुठलाही डॉक्टर त्याला बरे करू शकला नाही. त्याने वर्तमानपत्रात एका औषधाची जाहिरात पाहिली आणि त्याने ते घेऊन बघायचे ठरवले. त्या दोन बाटल्या रिचवल्यानंतर तो पूर्णपणे बरा झाला. पण कॅप्टन बटलरला त्याच्या आजाराने स्पष्टपणे असा नवा पण विचित्र विचार दिला होता, की ते बोलत असतांना तो त्यांची मने तपासत

होता. त्याना वाटत होते, की तो मरायला टेकला आहे. ते गेले, तेव्हा तो घाबरून गेला होता.

त्या मुलीने त्याची अवस्था पाहिली. देशी डॉक्टरला दाखवू, असे ती त्याच्या मागे लागली होती आणि तो जोरात विरोध करत होता. पण शेवटी ती जिंकली. तो त्रासिक डोळ्यांनी तयार झाला व शहारला. हे विनोदी होते, की अमेरिकन डॉक्टर त्याला काय झाले आहे, ते सांगू शकत नव्हते. पण आपण घाबरलो आहोत, ही त्या मुलीला त्याला कळून द्यायचे नव्हते. एखाद्या काळुंद्र्याकडून, त्याने तपासून घेतले असते, तर ते केवळ तिला बरे वाटावे, म्हणूनच केले असते. तिला काय करायचे, ते करायला त्याने परवानगी दिली.

दुसऱ्या दिवशी रात्री देशी डॉक्टर आला. कॅप्टन एकटाच झोपला होता पण अर्धवट जागा होता. केबिन मंद प्रकाशाची होती. हळूच दार उघडले गेले आणि ती मुलगी पाय न वाजवता आली. तिने दार उघडून ठेवले आणि तिच्यामागे कुणीतरी शांतपणे आले. कॅप्टन हसला. पण आता तो इतका अशक्त झाला होता, की त्याचे हास्य म्हणजे केवळ त्याच्या डोळ्यातील चमक उरली होती. डॉक्टर थोडा म्हातारा, बारीक आणि सुरकुतलेला होता. डोक्याला पूर्ण टक्कल होते. तोंड माकडासारखे होते. तो वाकलेला होता आणि जुन्या झाडासारखा वेडावाकडा होता. तो माणसासारखा जवळजवळ दिसतच नव्हता. पण त्याचे डोळे चकाकत होते. अर्धवट उजेडात, ते लाल रंगात चमकल्यासारखे वाटत होते. त्याने जणु चिंध्या झालेली पट्टेवाली मळकट पॅंट घातली होती आणि वरचा भाग उघडाच होता. त्याने ढुंगणावर बसून दहा मिनिटे कॅप्टनकडे बघितले. मग त्याचे तळहात व पायाचे तळवे बघितले. मुलगी त्या डॉक्टरकडे

घाबरलेल्या डोळ्यांनी बघत होती. काहीही बोलले गेले नाही. नंतर त्याने कॅप्टनने घातलेल्या कपड्यांबद्दल विचारले. मुलीने त्याला कॅप्टन सतत जी टोपी घाले, ती दिली. ती दोन्ही हातात घट्ट धरून, तो जमिनीवर बसला. मागे व पुढे झुकून, त्याने सावकाशीने काही अतर्क्य शब्द पुटपुटले.

शेवटी त्याने एक सुस्कारा टाकला व टोपी टाकून दिली. त्याने त्याच्या पँटमधून एक जुना पाइप काढला व पेटवला. मुलगी त्याच्याकडे जाऊन, त्याच्या बाजूला बसली. तो तिच्या कानात काही कुजबुजला. ती एकदम आक्रमक झाली. काही मिनिटे ते घाईघाईने खालच्या आवाजात काही बोलले आणि मग ते उभे राहिले. तिने त्याला पैसे दिले आणि दार उघडले. तो जसा आला, तसाच शांतपणे निघून गेला. मग ती कॅप्टनकडे गेली व वाकून त्याच्या कानात बोलली, “तुझा शत्रू उर्फ मित्र, तुझ्या मरणासाठी प्रार्थना करत आहे.”

तो अधीरतेने बोलला, “अग मुली, काहीतरी मूर्खासारखे बोलू नकोस.”

“हे खरे आहे. हे देवाचे म्हणणे आहे. म्हणूनच अमेरिकन डॉक्टरांना काही करता आले नाही. आमचे येथील लोक काही करू शकतील. मी असे केलेले बघितले आहे. मला वाटले, तुम्ही गोरे असल्याने सुरक्षित आहात.”

“मला कोणी शत्रू नाही.”

“बनाना.”

“तो कशाला माझ्या मरणाची प्रार्थना करेल?”

“त्याने असे करण्यापूर्वी, तू त्याला काढून टाकायला हवे होतेस.”

“मला वाटते, तू म्हणतेस, तशी बनाना काळी जादू करतो, असे मला मुळीच वाटत नाही. मी थोडेच दिवसात उठून खाणे खाऊ शकेन.”

ती थोडा वेळ गप्प राहिली. ती त्याच्याकडे हेतूपूर्णतेने बघत राहिली. शेवटी ती त्याला म्हणाली, “तू मरतो आहेस, हे तुला कळत नाही का?”

त्या दिवशी वाफेच्या बोटींचे दोन कॅप्टन त्याच्याकडे आले होते, त्यांनाही तसेच वाटत होते. पण ते तसे बोलले नाहीत. कॅप्टनच्या अशक्त चेहऱ्यावर एक शहारा उमटला. “डॉक्टर म्हणतात, की खरे तर मला काही झालेले नाही. पण मला काही दिवस विश्रांती घ्यावी लागेल. मग मी बरा होईन.”

तिने तिचे ओठ त्याच्या कानांजवळ आणले, जसे काही तिला कदाचित हवा काही ऐकेल, अशी भीती वाटत असावी. “तू मरत आहेस. मरत आहेस. मरत आहेस. चंद्राबरोबर तूही नाहीसा होणार आहेस.”

“हे तुला माहिती आहे का?”

“जर बनाना आधी मेला नाही, तर चंद्राबरोबर तूही नाहीसा होणार.”

तो काही घाबरट मनुष्य नव्हता. तिच्या शब्दांनी बसलेल्या धक्क्यातून तो आधीच बाहेर आलेला होता. तिच्या जोरदार भावना आणि शांतपणा त्याला दिसत होता. त्याच्या डोळ्यात अजून हास्य तरळले.

“मला वाटते, मुली, मी ती संधी घेईन.”

“अमावस्येला अजून बारा दिवस आहेत.” तिच्या आवाजातील स्वराने त्याला एक कल्पना सुचली.

“अग मुली, इकडे बघ. हे सगळे थोतांड आहे. माझा यावर विश्वास नाही. बनानाबद्दलच्या तुझ्या या माकडचेष्टा माझ्यावर चालवू नकोस. तो कुरूप असेल, पण माझा जिवलग मित्र आहे.”

त्याला अजून बरेच काही बोलायचे होते. पण तो दमला. अचानक तो गलितगात्र झाला आणि चक्कर येऊन पडला. नेहमी अशा वेळीच त्याला बरे नाहीसे होई. त्याने डोळे मिटले. मुलीने क्षणभर त्याला पाहिले आणि ती केबिनबाहेर पडली. चंद्र जवळजवळ पूर्ण दिसत होता. त्याने अंधाऱ्या समुद्राच्या पाण्यावर चंदेरी रस्ता बनवला होता. निरभ्र आकाशात तो चमकत होता. तिने त्याकडे भीतीने पाहिले, कारण तिला माहिती होते, की तो नाहीसा झाल्यावर तिचा प्रिय माणूस मरणार होता. ती त्याला वाचवू शकते. ती एकटीच त्याला वाचवू शकते. पण शत्रू लबाड होता. तिलाही लबाड बनायला पाहिजे. तिला वाटले, कोणीतरी तिला बघते आहे. न वळता अचानक तिच्यावर झडप घातलेल्या भीतीने तिला सावलीवरून असे वाटले की मित्राचे डोळे अंगार ओकल्यासारखे तिच्याकडे बघत आहेत. तिला कळेना, तो काय करेल. त्याला तिचे विचार समजले असते, तर ती आधीच पराभूत झाली असती. कसेबसे प्रयत्न करून, तिने तिचे मन पूर्णपणे रिकामे केले. फक्त बनानाचे मरणच तिच्या प्रियकराला वाचवू शकते आणि ती त्याला मारेल. तिला माहिती होते, की पाणी असलेल्या कलाबाश झाडात त्याचे प्रतिबिंब पाडले, आणि जर ते पाणी हलवले, तर तो अंगावर वीज पडल्यासारखा मरेल. कारण प्रतिबिंब म्हणजे त्याचा आत्मा आहे. पण त्याच्याइतका हा धोका कुणालाच माहिती नाव्हता. आणि त्याला संशय येणार नाही, अशा रीतीने फसवूनच हे करायला लागेल. त्याला हे कधीच कळायला नको, की त्याला मारायला टपलेला कुणी शत्रू आहे. तिला काय

करायचे होते, ते तिला माहिती होते. पण वेळ कमी होता. वेळ फारच कमी होता. आता तिला कळून चुकले, की मित्र गेला आहे. तिने मोकळा श्वास घेतला.

दोन दिवसांनी जहाज निघाले. आणि आता अमावस्येला अजून दहा दिवस राहिले होते. कॅप्टन बटलरकडे बघवत नव्हते. त्याचा फक्त सापळा शिल्लक राहिला होता. कुणाचा तरी आधार घेतल्याशिवाय त्याला हलता येत नव्हते. तो मोठ्या मुश्किलीने बोलू शके. पण अजून तिला काही करायची हिंमत झाली नव्हती. तिला माहिती होते, सर्व काही धीराने घेतले पाहिजे. मित्र लबाड होता, लबाड. ते एका लहानशा बेटावर गेले. सामान उतरवले गेले. आता अजून फक्त सात दिवस राहिले होते. आता काही सुरु करायला हवे होते. तिच्या आणि कॅप्टनच्या काही सामाईक गोष्टी तिने केबिनबाहेर आणल्या. त्यांची एक मोट बांधली. जिथे ती आणि बनाना जेवण घ्यायचे, त्या डेकवरील केबिनमध्ये ते ठेवले. जेवायच्या वेळी, जेव्हा ती आत गेली, तेव्हा तिने पाहिले, की तो वळला. तिने त्याला त्या गाठोड्याकडे बघताना पाहिले. ती जहाज सोडायची, तिची तयारी करत होती. त्याने टर उडवल्यासारखे तिच्याकडे पाहिले. हळूहळू ती काय करते आहे, हे कॅप्टनला कळू नये म्हणून, तिने तिचे सर्व सामान आणि कॅप्टनचे काही कपडे केबिनबाहेर आणले. या सर्वांचे गाठोडे बांधले. शेवटी बनानाला ग्प्प बसवेना. त्याने काही कपड्यांकडे बोट दाखवून विचारले, “तू याचे काय करणार आहेस?”

तिने तिचे खांदे थरथरवले.

“मी माझ्या बेटावर परत चालले आहे.”

त्याने मोठे हास्य केले. कॅप्टन मरतो आहे आणि ती सगळ्या वस्तू घेऊन निघून चालली आहे. “तू या गोष्टी तुझ्याबरोबर नेऊ शकणार नाहीस, असे मी म्हटले, तर तू काय म्हणशील? त्या कॅप्टनच्या आहेत.”

ती म्हणाली, “त्याचा तुला काही उपयोग नाही.

तिथे भिंतीवर कलाबाश टांगलेले होते. मी केबिनमध्ये आल्यावर जे बघितले होते व ज्याबद्दल बोललो होतो, तेच ते होते. तिने ते खाली काढले. ते धुळकटलेले होते. तिने त्यावर बाटलीने पाणी ओतले. आणि बोटांनी ते धुतले.

“तू त्याचे काय करत आहेस?”

ती म्हणाली, “मी ते पन्नास डॉलरला विकू शकते.”

“जर तुला ते घ्यायचे असेल, तर मला पैसे द्यावे लागतील.”

“तुला काय हवे आहे?”

“मला काय हवे आहे, ते तुला माहिती आहे.”

तिच्या ओठांवर क्षणिक हसू आले. तिने त्याच्याकडे एक झटपट कटाक्ष टाकला आणि निघून गेली. त्याला इच्छा झाल्याने त्याने श्वास रोधून धरला. तिने थोडे शहारवून, तिचे खांदे उचलले. रानटीपणे त्याने तिच्यावर झेप घेतली आणि तिला हाताने विळखा घातला. मग ती हसली. तिने तिचे मऊ, गोल हात त्याच्या मानेभोवती टाकले आणि ती तिच्या स्त्रीत्वासकट त्याला शरण गेली.

सकाळी तिने त्याला गाढ झोपेतून उठवले. सूर्याची तिरपी किरणे केबिनमध्ये आली. त्याने तिला त्याच्या छातीशी दाबून धरले. मग तो तिला म्हणाला, की कॅप्टन एक दोन दिवसांपेक्षा जास्त जगणार नाही. आणि

जहाजाच्या मालकाला जहाजाचा मुख्य म्हणून दुसरा गोरा माणूस सहजासहजी मिळणार नाही. जर बनाना कमी पैशांवर काम करायला तयार झाला, तर त्याला ते काम मिळेल आणि मुलीला त्याच्याबरोबर रहाता येईल. त्याने तिच्याकडे प्रेमभरल्या नजरेने बघितले. ती त्याच्या अंगावर रेलली. तिने परदेशी लोकांसारखे, कॅप्टनने तिला शिकवले होते तसे, त्याच्या ओठांचे चुंबन घेतले. तिने त्याला तिथे रहायचे वचन दिले.

बनाना खूष होऊन प्यायला.

आता ते होणार किंवा मग कधीच नाही.

ती उठून तिचे केस सारखे करण्यासाठी टेबलाशी गेली. तिथे आरसा नव्हता, तिने कलाबाशमधील पाण्यामध्ये प्रतिबिंब दिसण्यासाठी पाहिले. तिने तिचे सुंदर केस बांधले. नंतर तिने बनानाला तिच्याकडे येण्याची खूण केली व कलाबाशकडे बोट दाखवले.

ती म्हणाली, "तिथे पाण्याच्या तळाशी काहीतरी आहे."

ताबडतोब, काही संशय न येता बनानाने पूर्णपणे पाण्यात पाहिले. त्याच्या चेहऱ्याचे प्रतिबिंब पाण्यात पडले. क्षणार्धात तिने आक्रमकपणे तिच्या दोन्ही हातांनी ते पाणी हलवले. त्यामुळे पाणी उसळले. बनानाचे प्रतिबिंब हलून त्याचे तुकडे तुकडे झाले. अचानक बनाना घशातून ओरडत व मुलीकडे बघत, मागे झाला. ती तिथे तिच्या चेहऱ्यावर विजयपूर्वक द्वेष झळकवत उभी होती. त्याच्या डोळ्यात भीती उमटली. त्याचे जाड शरीर वेदनेने पिळवटून निघाले. आणि त्याने काही जहाल विष घेतल्याप्रमाणे धप्प असा आवाज येऊन तो वेडावाकडा जमिनीवर कोसळला. त्याचे शरीर थरथर कापू लागले आणि तो दगडासारखा स्तब्ध झाला. ती दुष्टपणे

त्याच्यावर वाकली. तिने त्याच्या हृदयावर हात ठेवला आणि मग त्याची खालची पापणी ओढून बघितली. तो ठार मेला होता.

ती कॅप्टन बटलरच्या केबिनमध्ये गेली. त्याच्या गालावर फिकट रंग होता. त्याने तिच्याकडे गोंधळून बघितले.

तो कुजबुजला, "काय झाले?"

दोन दिवसात तो ते पहिले शब्द बोलला.

ती म्हणाली, "काही झाले नाही."

"मला मजेशीर वाटत आहे.

मग तो डोळे मिटून झोपला. तो रात्रभर व दिवसाही झोपला. जेव्हा तो उठला, तेव्हा त्याने खाणे मागितले. पंधरा दिवसात, तो बरा झाला.

मध्यरात्री विंटर व मी बोट वळवत किनाऱ्याशी आलो. आम्ही खूप व्हिस्की व सोडा प्यायलो होतो.

विंटरने विचारले, "तुला हे ऐकून काय वाटले?"

"मला काही स्पष्टीकरण सुचवायचे आहे, असे तुला वाटले असेल, तर तसे अजिबात नाही. काय पण तुझा प्रश्न आहे!"

कॅप्टन त्यातील प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवतो.

ते साहजिक आहे. पण तुला माहिती आहे का, मला सर्वात रुचीपूर्ण काय वाटले, की खरे की खोटे, पण अशा गोष्टी अशा लोकांवर केल्या जातात. मला नवल वाटते, की अशा जागांमधील सर्वसामान्य माणसांमध्ये, अशा सुंदर मुलीमध्ये, अशा भावना उचंबळून कशा काय येतात? तो गोष्ट

सांगत असतांना मी तिला तिथे झोपलेले बघितले, तेव्हा मला चमत्कार घडवणाऱ्या प्रेमाच्या शक्तीची विलक्षण कल्पना सुचली.''

विंटर म्हणाला, ''पण ती ती मुलगी नव्हती.''

''म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?''

तुला पूर्वीचा तो चिनी स्वयंपाकी लक्षात आला नाही का?''

''अर्थातच आला. मी पाहिलेला तो सर्वात कुरूप माणूस होता.''

''म्हणूनच बटलरने त्याला ठेवले होते. ती मुलगी त्या चिनी स्वयंपाक्याबरोबर मागील वर्षी पळून गेली. ही नवीन मुलगी आहे. दोन तीन महिन्यांपूर्वीच त्याने तिला आणली आहे.''

काय म्हणतोस? माझा तर विश्वासच बसत नाही.''

''त्याला वाटते, की हा स्वयंपाकी बरा आहे. पण मला त्याच्याइतकी खात्री वाटत नाही. चिन्याबद्दल काही बोलले जाते. जेव्हा तो एखाद्या स्त्रीला खूष करू बघतो, तेव्हा ती स्त्री त्याला विरोध करू शकत नाही.

मग आम्ही जेवलो.

# The Pool

# तलाव



जेव्हा लॉसनने अपियामधील हॉटेल मेट्रोपोलचा मालक चॅपलीन याच्याशी माझी ओळख करून दिली, तेव्हा मी त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. आम्ही हॉटेलच्या लोकांसाठी असलेल्या स्वागतकक्षाजवळील खोलीत पेयपान करत बसलो होतो आणि त्या बेटाविषयी असलेल्या प्रवादांबद्दल ऐकून, मी माझे मनोरंजन करून घेत होतो. चॅपलीनने माझे छान मनोरंजन केले. तो व्यवसायाने खाणींचा इंजिनिअर होता. तो अशा ठिकाणी स्थिरस्थावर झाला होता, की जिथे त्याच्या व्यावसायिक ज्ञानाला पाहिजे तशी किंमत नव्हती. तरीही सहसा असे दिसत होते, की तो खाणींचा फार हुशार इंजिनिअर होता. तो जाड वा बारीक नसलेला, छोटासा मनुष्य होता. त्याचे केस विरळ व काळे होते. ते करडे होत चालले होते. त्याच्या लहानशा विस्कटलेल्या मिशा होत्या. त्याचा चेहरा थोडासा उन्हामुळे व थोडासा दारूमुळे खूप लाल झाला होता. तो इतक्या भव्य, दुमजली हॉटेलचा न नेमलेला मुख्य होता. त्याची बायको तेथील व्यवस्थापक होती. ती चोपन्न वर्षांची ऑस्ट्रेलियन बाई असून, उंच आणि त्रासलेली, नम्र बाई होती. तिच्या अस्तित्वाचा दबदबा होता आणि ती निश्चयाची होती. तो छोटासा मनुष्य नेहमी प्यायलेला असे. तिला घाबरत असे व पटकन उद्दीपित होत असे. परक्याला लवकरच घरगुती भांडणे ऐकू येत, ज्यात ती तिच्या लाथेचा आणि मुठीचा उपयोग करून, त्याला कह्यात ठेवत असे. त्याने अती दारू प्यायल्यामुळे तिने त्याला त्याच्या खोलीत चोवीस तास कोंडून ठेवल्याचे, सगळ्यांना माहिती होते. नंतर तो त्याच्या तुरुंगातून सुटायला घाबरलेला दिसू लागला. त्याच्या व्हरांड्यातून खालील रस्त्यावरील लोकांशी, तो काहीशा दयनीय रीतीने बोलतांना दिसू लागला. त्याच्या गतायुष्यातील

खऱ्या खोट्या गोष्टी सांगणारा तो एक वल्ली होता. पण त्यामुळे श्रवणीय ठरला होता. त्यामुळे जेव्हा लॉसन येत असे, तेव्हा येणाऱ्या अडथळयामुळे मी नाराज होत असे. दिवसा जरी नाही, तरी हे स्पष्ट होते, की रात्री त्याला प्यायला दारू भरपूर असे. मला उत्साह नसला तरी, त्याच्या आग्रहाला बळी पडून, मी त्याच्याबरोबर पित असे. मला आधीच माहिती होते, की चॅपलीनला डोके कमी होते. दारुच्या पुढच्या फेरीला त्याला उत्साही बनवण्यासाठी नम्रपणे मला ती मागवावी लागे आणि मग मिसेस चॅपलीन माझ्याकडे रागाने बघे.

लॉसनच्या बाबतीत आकर्षक असे काही नव्हते. तो अशक्त, पिवळसर तपकिरी व लांब चेहऱ्याचा थोडा बारीक मनुष्य होता. त्याची हनुवटी अरुंद असून, नाक चांगले मोठे होते आणि भुवया काळया व गचाळ होत्या. त्यामुळे तो वेगळाच दिसे. त्याचे डोळे मोठे आणि काळे होते. तो आनंदी होता, पण मला त्याचा आनंदीपणा खरा वाटत नसे. तो वरवरचा होता. तो त्याने जगाला फसवण्यासाठी घातलेला मुखवटा वाटे. मला संशय येई, की तो त्याचा कंजूषपणा लपवत असे. तो त्याला चांगला खेळकर म्हटले जावे, यासाठी काळजीत असे. खात्रीने तो दिलदार व मित्रत्वाने वागणारा होता. पण का कुणास ठाऊक, मला तो लबाड व सतत बदलणारा वाटायचा. तो मोठ्या, कर्कश आवाजात खूप बोलायचा. तो आणि चॅपलीन यांनी एकमेकांच्या सणासुदीच्या मोठ्या आवाजात साजऱ्या केलेल्या गोष्टी या दंतकथा बनून राहिलेल्या होत्या. इंग्लिश क्लबच्या ओल्या रात्री, अमाप व्हिस्की ढोसलेल्या तिरंदाजीच्या मोहिमा आणि, ज्यात तिथे उतरल्यापासून परत बोटीवर चढेपर्यंत काय केले, ते न आठवू शकण्यातील अभिमान होता, सिडनीला केलेली आनंदसहल अशा स्मृतीदेखील त्यात होत्या. ती

प्यायलेल्या डुकरांची जोडी होती. पण त्यांच्या शरीरावरील व मनावरील ताबा सुटलेल्या अवस्थेतही चॅपलीन शिवीगाळ करून आक्रमक होई. पण लॉसन जरी प्यायलेला असला तरी, तो नक्की सभ्य माणूस होता.

शेवटी तो त्याच्या खुर्चीमधून, भेलकांडत उठला.

तो म्हणाला, "ठीक आहे. मी घरी जातो. तुला जेवणापूर्वी भेटतो."

चॅपलीन म्हणाला, "बायको ठीक आहे?"

"हो."

तो बाहेर गेला. त्याच्या बोलण्यातील एक अक्षर विशेष वाटल्यामुळे, मी वर बघितले.

लॉसन दारातून बाहेर उन्हात गेला, तेव्हा चॅपलीन पसरटपणे बोलला, "चांगला माणूस! सर्वात चांगल्या माणसांपैकी एक. तो पितो, हे दयनीय आहे."

हे चॅपलीनने विनोद न करता केलेले निरीक्षण होते. "आणि जेव्हा तो प्यायलेला असतो, तेव्हा तो लोकांशी भांडण करतो."

"तो नेहमी पितो का?'

"आठवड्यातून तीन चार वेळा तरी पितो. या बेटाने त्याला असे केले आहे. हे इथेलचे कृत्य आहे."

"इथेल कोण आहे?"

"त्याची बायको. ती मिश्र जातीची आहे. त्याने तिला येथून नेले. म्हाताऱ्या ब्रेव्हल्डची मुलगी. एवढीच गोष्ट केली. पण तिला ते सहन झाले नाही. आता ते परत आले आहेत. जर तो मरेपर्यंत प्यायला नाही, तर एक

दिवस तो स्वतःला टांगून घेणार आहे. चांगला माणूस! प्यायलेला असतांना तो फार वाईट असतो.”

चॅपलीनने जोरात ढेकर दिली.

“मी जाऊन माझे डोके शॉवरखाली ठेवतो. मला आजचे शेवटचे पेय घेतले पाहिजे. नेहमी शेवटचे पेय तुम्हाला मारते.”

त्याने शॉवर असलेल्या खबदाडात जायचे ठरवत, खात्री न वाटता, जिन्याकडे पाहिले. मग कृत्रिम गंभीरपणे उठला.

तो म्हणाला, “लॉसनला तयार करण्यासाठी मी तुला पैसे देईन. चांगला वाचक असलेला मनुष्य. तो शांत असेल, तेव्हा तुला आश्चर्य वाटेल. बोलायला चांगला आहे. तो हुशारही आहे.”

चॅपलीनने या काही बोलण्यातून, मला सगळी गोष्ट सांगितली.

मी समुद्राच्या काठाने चक्कर मारून परत आलो, तेव्हा लॉसन परत हॉटेलमध्ये आलेला होता. तो लोकांसाठी असलेल्या खोलीत एका केनच्या खुर्चीत, रुतून बसला होता. त्याने चष्म्यातून माझ्याकडे पाहिले. हे सरळ दिसत होते, की तो दुपारभर पित होता. तो शिथिल दिसत होता. त्याचा चेहरा सुजलेला व सूडाने पेटलेला दिसत होता. पण मला असे दिसले, की त्याने मला ओळखले नाही. तिथे अजून दोन तीन माणसे फासे खुळखुळवत बसलेली होती. त्यांनी त्याची दखल घेतली नाही. त्याची स्थिती नक्कीच नेहमीसारखी लक्ष वेधून घेणारी होती. मी तिथे बसून खेळू लागलो.

अचानक लॉसन म्हणाला, “तू फारच समाजप्रिय प्राणी आहेस.”

तो खुर्चीतून बाहेर आला आणि गुडघे वाकवून, वेडीवाकडी पाऊले टाकत, दाराकडे गेला. मला कळले नाही, की आक्रमक होण्यापेक्षा, त्याचे

वागणे जास्त विचित्र होते का. तो गेल्यावर एका माणूस दबलेले हसू हसला. तो बोलला, “आज लॉसनने दारूचा चांगलाच डोस घेतलेला दिसतो आहे.” दुसरा म्हणाला, “मी दारू प्यायलो तर, मला त्याच्यापेक्षा कमी चढणार नाही. माझे तारू वर चढलेलेच राहील.”

दुःखांतिकेचा परिणाम साधण्यासाठी, दया आणि भीती या दोन गोष्टी गरजेच्या असतात, असे विद्वान सांगतात. पण या कमनशिबी माणसासाठी त्याच्या जीवनाच्या वाटेत अद्भुतरम्य आकृती असेल, आणि त्याच्या आयुष्यात, दया आणि भीतीचा प्रादुर्भाव होणार आहे, असे कुणाला वाटले असेल?

मी त्याला दोन तीन दिवस परत पाहिले नाही.

एका संध्याकाळी मी हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरील व्हरांड्यात रस्त्याकडे बघत बसलो होतो, तेव्हा लॉसन तिथे आला आणि माझ्याशेजारी खुर्चीत बसला. तो फार प्यायलेला नव्हता. त्याने काही लहानसहान शेरेबाजी केली. जेव्हा मी फारसे लक्ष दिले नाही, तेव्हा तो थोडा क्षमायाचनेच्या सुरात हसला.

“दुसऱ्या दिवशी मी खूप प्यायलो होतो.”

मी काही उत्तर दिले नाही. खरे तर बोलण्यासारखे काही नव्हते. मी डास दूर करायच्या फोल आशेने माझ्या पाइपमधून धुम्रवलये सोडत राहिलो. आणि कामावरून घरी परतणाऱ्या देशी लोकांकडे पहात राहिलो. ते काळजीपूर्वक व डौलाने हळूहळू लांब पाऊले टाकत चालले होते. त्यांच्या चपला नसलेल्या पाऊलांचा आवाज ऐकायला विचित्र वाटत होता. त्यांचे कुरळे वा सरळ काळे केस, सहसा चुन्याच्या निवळीसारखे

पांढरे असलेले होते आणि त्यांच्या नजरेत असामान्य फरक होता. ते उंच आणि दणकट होते. नंतर बेटावरील शांतीदूतांचा जथा व कायद्याने बांधलेले कामगार, गात गात जवळून चालले होते. ते सामोअन्सपेक्षा लहानसे व बुटके, काळे , मोठ्या डोक्याचे व रंगवलेल्या लाल केसांचे होते. मधून मधून एक गोरा मनुष्य त्याच्या घोडागाडीतून हॉटेलच्या परिसरात चाललेला दिसत होता. लगूनमधील शांत पाण्यात दोन तीन शिडाच्या बोटी डौलदारपणे चमकत होत्या.

शेवटी लॉसन म्हणाला, “मला समजत नाही, अशा ठिकाणी दारू पिण्याशिवाय दुसरे आपण काय करू शकतो.”

मी काहीतरी बोलायचे म्हणून म्हणालो, “तुला सामोआ आवडत नाही का?”

“ते सुंदर आहे, नाही का?”

त्या बेटाच्या अकल्पनीय सौदर्याचे वर्णन करायला त्याने वापरलेले शब्द अपुरे वाटत होते. त्यामुळे मी हसलो व त्याच्याकडे बघण्यासाठी वळलो. त्याच्या अंधारी, उदास डोळ्यातील भाव बघून मी चमकलो. त्यात असहनीय राग होता. त्यात त्याच्या मनात कधी असतील असे न वाटणाऱ्या, फसव्या, अशा खोल दुःखी भावना होत्या. पण त्या गेल्या व तो हसला. त्याचे हसणे साधे व थोडे शहाणे होते. त्यामुळे त्याचा चेहरा इतका बदलला, की मी माझ्या पहिल्या भावनेपासून माघारी फिरलो.

तो बोलला, “मी इथे पहिल्यांदा आलो, तेव्हा मी सगळीकडे फिरलो.”

तो क्षणभर गप्प राहिला.

तो सांगू की नको, असे करत बोलला, “तीन वर्षांपूर्वी मी काही चांगल्या कारणाने येथून लांब गेलो. पण परत आलो. माझ्या बायकोला परत यायचे होते. तुम्हाला माहिती आहे का, तिचा जन्म इथला आहे.”

“हो.”

परत तो गप्प झाला. आणि मग रॉबर्ट लुई स्टीव्हन्सनबद्दल एक धोकादायक शेरा मारला. मला त्याने विचारले, मी वैलीमाला गेलो आहे का. काही कारणाने तो माझ्याबरोबर जमवून घ्यायचा प्रयत्न करत होता. त्याने स्टीव्हन्सनच्या पुस्तकांबद्दल बोलायला सुरवात केली. आणि यथावकाश संभाषण लंडनकडे वळले.

तो म्हणाला, “मला वाटते, कोव्हेंट बाग अजून जोरात चालू आहे. मला वाटते, मी तेथील नृत्यनाट्यापेक्षा कशालाच जास्त मुकलो नाही. तू ट्रीस्टन आणि लसोल्डे पाहिले आहेस का?”

त्याने मला अशा तऱ्हेने प्रश्न विचारला, की त्याला उत्तर मिळणे, फार महत्वाचे होते. मी जेव्हा म्हणालो, की थोड्या सहजपणे मी म्हणू शकतो, की मी पाहिले आहे, तेव्हा तो खूष झाल्यासारखा दिसला. तो वॅगनरसंबंधी बोलू लागला. संगीतकार म्हणून नव्हे, तर एक साधा माणूस म्हणून! त्याला विश्लेषण करता येणार नाही, असे भावनेचे समाधान त्याला त्यामुळे मिळाले.

तो म्हणाला, “मला वाटते बेरेयुथ ही खरोखर तिथे जाण्यासारखी जागा आहे. माझ्याकडे तेवढे पैसे नव्हते. वाईट नशीब! अर्थात पण एका रात्री कोव्हेंट बागेपेक्षा ते वाईट होते. सगळे दिवे, संगीत आणि विशेष प्रसंगासाठी खास कपडे केलेल्या स्त्रिया तिथे होत्या. वाल्कुरेचा पहिला

प्रवेश ठीक झाला, नाही का? आणि ट्रीस्टनच्या शेवटी अरे बापरे!" आता त्याचे डोळे इतके चमकत होते व चेहरा इतका उजळला होता, की हाच तो माणूस का, असा प्रश्न पडावा. त्याच्या पिवळसर तपकिरी खप्पड गालांवर, एक प्रकारची चकाकी आली होती. त्याचा आवाज कर्कश व नकोसा असल्याचे मी विसरून गेलो. त्याच्याकडे एक प्रकारचा गोडवा होता.

"देवाशप्पथ मला आज लंडनमध्ये असलेले आवडेल. तुला पाल माल रेस्टॉरंट माहिती आहे का? मी तिथे खूप वेळा जात असे. पिकॅडेली सर्कसमधील सर्व दुकाने उजळलेली आणि गर्दी! मला वाटते, तिथे उभे रहाणे आणि बस व टॅक्सी जणू कधी थांबणारच नाही आहेत, अशा तऱ्हेने धावतांना बघणे, म्हणजे अवाक् करणारे ठरावे. मला स्ट्रँडदेखील आवडते. गॉड आणि चेरिंग क्रॉसच्या काय ओळी आहेत?"

मला धक्का बसला. मी विचारले, "तुला थॉम्पसन म्हणायचे आहे का?"

मी त्या ओळी म्हटल्या.

"जेव्हा तुम्ही उदास असता, तेव्हा तुम्ही अजून उदास होऊ शकत नाही

तुमच्या खूप भावनिक दुःखावर रडा

चेरिंग क्रॉस आणि हेवन्समधील जेकब लॅडरची गर्दी चमचमेल."

त्याने एक पुसटसा सुस्कारा टाकला.

'हाउन्ड ऑफ हेवन' ही प्रसिद्ध कविता मी वाचली. ती थोडीशी खरी आहे.

मी पुटपुटलो, "सहसा असा विचार केला जातो."

“इथे तुला अशी कविता म्हणून दाखवणारे, कुणी भेटणार नाही. त्याना हे भाव खाण्यासाठी केलेले वाटेल.”

त्याच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाचे भाव होते. त्यामुळे तो माझ्याकडे आला. त्याला पश्चात्ताप वाटणाऱ्या जगाशी व त्याला माहिती नसणाऱ्या आयुष्याशी जोडणारा दुवा मी होतो. कारण फार काळापूर्वी नव्हे, मी त्याचे प्रेम असणाऱ्या लंडनला मी असतांना, तो माझ्याकडे हेव्याने व आश्चर्याने बघत असे. त्याच्या जोराने उच्चारलेल्या शब्दांनी मी चक्रावून गेलो होतो, तेव्हा तो पाच मिनिटे काही बोलला नाही.

तो म्हणाला, “मी कंटाळलो आहे. मी कंटाळलो आहे.”

“मग तू ते सरळ सांगत का नाहीस?”

त्याच्या चेहऱ्यावर वाईट भाव दिसायला लागले.

“माझी फुफ्फुसे थोडी अशक्त झाली आहेत. मला इंग्लीश थंडी आता सहन होत नाही.”

त्याच क्षणी तिथे व्हरांड्यात एक मनुष्य आला आणि लॉसन एकदम मनाच्या शांततेत बुडाला.

तो मनुष्य बोलला, “आता काहीतरी प्यायची वेळ झाली आहे. माझ्याबरोबर कोण स्कॉच घेणार आहे? लॉसन?”

लॉसन एखाद्या दूरच्या जगातून उठल्यासारखा दिसला. तो उठून म्हणाला, “आपण बारमध्ये जाऊ या.”

जेव्हा तो तेथून गेला, तेव्हा मला अपेक्षा होती, त्यापेक्षा त्याच्याबद्दल जास्त दयेचे विचार माझ्या मनात आले. त्याने मला त्याच्यात रुची निर्माण करून कोड्यात टाकले. काही दिवसांनी मी त्याच्या बायकोला

भेटलो. मला माहिती होते, की त्यांच्या लग्नाला पाच सहा वर्षे झाली आहेत. आणि मला बघून नवल वाटले, की ती अजूनही खूप तरुण दिसत होती. जेव्हा त्याने तिच्याशी लग्न केले, तेव्हा ती सोळापेक्षा जास्त वयाची नसावी. तिच्या प्रेमात पडावे, इतकी ती सुंदर होती. ती स्पॅनिश माणसाहून जास्त काळी नव्हती. ती लहानशी, छोट्या हातापायांची, बारीक पण डौलदार, अशी सुंदरतेची मूर्ती होती. तिचे नाक डोळे छान होते. पण मला सर्वात धक्कादायक काय वाटले असेल, तर ती तिची नाजूकता. मिश्र जातीच्या लोकांमध्ये नियम असल्यासारखी कातडी खडबडीत असे. ते थोडे असेतसे वाटत. पण तुमचा श्वास तुम्हाला रोधायला लावेल, असा वेगळाच मऊपणा व नाजुकपणा तिच्यात होता. तेथील वातावरणात देखील ती खूप सुसंस्कृत वाटत असे. सम्राट तिसऱ्या नेपोलियनच्या दरबारातील, जगात बोलल्या जाणाऱ्या प्रसिद्ध सुंदरींपैकी एक होती. तिने साधा सुती फ्रॉक व काड्यांची टोपी घातली असली, तरी तिचा डौल फॅशनेबल होता. लॉसनने तिला पहिल्यांदा पाहिले असेल, तेव्हा त्याला ती जादूमयी भासली असेल.

तो अलीकडेच इंग्लिश बँकेची स्थानिक शाखा सांभाळण्यासाठी इंग्लंडहून परतला होता. उन्हाळ्याच्या सुरवातीला सामोआला पोचल्यावर, त्याने हॉटेलमध्ये एक खोली घेतली होती. त्याने झटपट निरनिराळ्या सगळ्या प्रकारच्या लोकांशी ओळखी करून घेतल्या. बेटावरचे आयुष्य सोपे आणि छान होते. हॉटेलच्या लोकांसाठी असलेल्या मोकळ्या जागी सावकाशीने खूप वेळ गप्पा मारल्या. इंग्लिश क्लबमधील संध्याकाळी लोकांच्या एका गटाबरोबर पूल खेळण्यात मस्त घालवल्या. अपियामधील लगूनच्या कडेने फिरुन दुकाने, बंगले आणि स्थानिक गाव बघण्यात, त्याला

मजा येई. शनिवार रविवार तो एखाद्या शेतकऱ्याच्या घरी किंवा टेकडीवर घालवी. त्याला यापूर्वी स्वातंत्र्य वा मोकळा वेळ काय असतो, हे माहितीच नव्हते. सूर्यप्रकाशामुळे तो प्रदूषणमुक्त होई. जेव्हा तो झाडाझुडुपांमधून, चक्कर मारे, तेव्हा त्याच्या भोवतालच्या सौदर्याने त्याचे डोके थोडे शांत होई. तो देश फारच सुपीक होता. विचित्र झाडांचा गुंता असलेला जंगलातील काही भाग अजून मानव अस्पर्शी होता. जमिनीखालील वनस्पतींची वाढ व वेली यामुळे तो गूढ त्रासदायक वाटे.

पण त्याला भूल घालणारी जागा म्हणजे अपियापासून एक दोन मैल दूर असलेला तलाव. तिथे संध्याकाळी बरेच वेळा तो अंघोळीला जात असे. तिथे खडकांमधून वाहणाऱ्या झऱ्यासारखी एक लहानशी खळखळणारी नदी होती. पुढे जाऊन तिचा खोल तलाव झाला होता व त्यानंतर ती दगडधोंडे असलेली उथळ नदी झाली होती. तिथे गावातील लोक कधीकधी अंघोळीसाठी किंवा कपडे धुण्यासाठी येत. काठावर थोडासा दिमाख दाखवत उभ्या असलेल्या नारळाच्या झाडांची गर्दी झाली होती. त्यावर वेली चढल्या होत्या. आणि त्यांचे प्रतिबिंब हिरव्या पाण्यात पडले होते.

डेव्होन्शायरमधील टेकड्यांमध्ये तुम्ही असे दृष्य पाहिले असेल. पण तरीही ते वेगळे होते. कारण याला समशीतोष्ण कटिबंधाची श्रीमंती, भावनामयता व क्रियाशीलता नसलेली आल्हादकता होती. यामुळे जणू हृदय पाझरू लागे. पाणी ताजे, पण थंड नव्हते. दिवसाच्या उन्हानंतर ते मधुर लागे. तिथे अंघोळ करण्याने फक्त शरीरच नव्हे, तर आत्माही ताजातवाना होत असे.

लॉसन तिथे गेला, तेव्हा तिथे कुणीही नव्हते. तो तिथे खूप वेळ रेंगाळला. आळशीपणे पाण्यात तरंगत बसला. मग संध्याकाळच्या उन्हात, शरीर सुकवले. एकटेपणाचा व मैत्रीपूर्ण शांततेचा मनमुराद आनंद लुटला. मग त्याला तो लंडनला नसल्याची किंवा तेथील आयुष्य दूर गेल्याची खंत वाटली नाही. कारण येथील आयुष्यही पूर्ण, नाजूक आणि सुंदर होते.

इथे त्याने प्रथम इथेलला पाहिले.

दुसऱ्या दिवशी निघणाऱ्या बोटींविषयक पत्रांचे काम संपवायचे असल्याने, तो खूप उशीरापर्यंत काम करत बसला होता. एका संध्याकाळी जवळजवळ अंधार होऊ लागलेला असतांना, तो तलावाकडे गेला. त्याने त्याचा घोडा बांधला आणि तीरावर हिंडू लागला. तिथे एक मुलगी बसली होती. तो आल्यावर तिने चोहीकडे बघितले व हळूच पाण्यात शिरली. माणसाच्या चाहुलीने, ती एकदम जलपरीसारखी नाहीशी झाली. त्याला नवल वाटले. त्याचे मनोरंजन झाले. त्याला नवल वाटले, की ती कुठे लपून बसली. तो पाण्यात उतरला आणि त्याने तिला खडकावर बसलेले पाहिले. तिने त्याच्याकडे चौकस नसलेल्या नजरेने पाहिले. त्याने सामोअन भाषेत तिला अभिवादन केले.

‘‘तलोफा [ मी दुःखी, कमनशिबी आहे. ]

तिने अचानक हसत उत्तर दिले व परत पाण्यात शिरली. ती सहज पोहत होती. तिच्यामागे तिचे केस पाण्यावर पसरले होते. तो तिला तलावभर बघत होता. तो काठावर चढला. सर्व रहिवाशांसारखे तिने तिच्या गाउनसकट स्नान केले. तिच्या नाजूक अंगाला पाणी चिकटून बसले. तिने तिचे केस झटकले. ती तिथे निरागसपणे उभी राहिल्यावर, ती एखाद्या

पाण्यातील वा जंगलातील एखाद्या रानटी प्राण्यासारखी दिसू लागली. आता त्याला ती मिश्र जातीची असल्याचे दिसले. तो पोहत तिच्याकडे गेला आणि इंग्लिशमध्ये तिला म्हणाला, "तू फार उशीरा पोहत आहेस."

तिने तिचे केस हलवले आणि ते डौलदार बटांच्या स्वरूपात खांद्यावर पसरू दिले.

ती म्हणाली, मी एकटी असलेले मला आवडते."

"मलाही."

ती देशी लोकांच्या मोकळेपणे मुलासारखे हसली. तिने कोरडा गाउन डोक्यातून घातला आणि ओला गाउन खाली घरंगळू दिला. तिने तो पिळला आणि जाण्यासाठी तयार झाली. क्षणभर ती घुटमळत थांबली आणि मग निघून गेली. अचानक काळोख झाला.

लॉसन परत हॉटेलात गेला. तेथील पेयासाठी फासे खुळखुळवणाऱ्या लोकांना तिचे वर्णन करून विचारले, की ती कोण आहे. आणि लवकरच त्याला समजले, की ब्रेव्हाल्ड नावाचे तिचे वडील नॉर्वेमधून आलेले होते. ते हॉटेलच्या बारमध्ये नेहमी दिसत असत.

तिचे वडील रम आणि पाणी पीत होते. ते थोडे म्हातारे होते आणि जुन्या झाडासारखे वेडेवाकडे होते. ते या बेटावर जहाजातील ऑफिसर म्हणून, चाळीस वर्षांपूर्वी आले होते. ते लोहार, व्यापारी, शेतकरी होते आणि एके काळी चांगले धनवान होते. पण नव्वदच्या दशकातील मोठ्या वादळामुळे नाशाप्रत गेले. आता त्यांच्याकडे एका नारळीबागेशिवाय उपजीविकेचे काही साधन उरले नव्हते. त्यांना चार देशी बायका होत्या. आणि त्याने, गालातल्या गालात हसत सांगितल्याप्रमाणे, त्याला मोजता

येणार नाहीत, इतकी मुले होती. त्यातील काही मेली, काही बेट सोडून बाहेरील जगात गेली. आणि आता फक्त इथेल उरली होती.

नेल्सन म्हणाला, “ती गोड आहे. समुद्रावरचा माल आहे. मी एकदोनदा तिच्याकडे मित्रत्वाने नजर टाकली आहे. पण त्याचे पुढे काही झाले नाही.”

दुसरा मिलर नावाचा माणूस म्हणाला, “म्हातारा ब्रेव्हाल्ड काही तितका मूर्ख नाही आहे. त्याला आयुष्यभर सुखात ठेऊ शकेल, असा जावई त्याला हवा आहे.”

ते ज्या प्रकारे त्या मुलीविषयी बोलत होते, ते लॉसनला आवडले नाही. त्याने तेथून बाहेर जाणाऱ्या पत्राचा उल्लेख करून, त्यांचे लक्ष वळवले. पण दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तो परत तलावावर गेला. तिथे इथेल होती आणि सूर्यास्ताचे गूढ, व पाण्याची नीरव शांतताही होती. बारीक खोडांच्या माडांची शोभा त्यात अजून भर टाकत होती. ते जादूभरे दृष्य हृदयात अनोख्या भावना उचळंबवत होते. काही कारणाने त्याला त्यावेळी तिच्याशी बोलायचे नव्हते. तिने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. हिरव्या तलावात, ती पोहत होती. तिने सूर मारला. ती एकटी असल्यासारखी तीराला लागली. त्याला वाटत होते, तो तिथे नाही, अदृष्य झाला आहे. अर्धवट विसरलेल्या कवितांच्या ओळी आणि त्याच्या शाळेच्या दिवसातील ग्रीसच्या पुसट आठवणी त्याच्या कल्पनेतून वहात होत्या. जेव्हा तिने तिचे ओले कपडे बदलले व कोरडे घातले व निघून गेली, त्याला ती होती त्या जागी जास्वंदीचे शेंदरी फूल दिसले. ती अंघोळ करायला आली, तेव्हा तिने ते तिने केसात माळलेले होते. ते काढून ठेऊन, ती पाण्यात उतरली होती. ती नंतर ते विसरली किंवा परत ते केसात घालायची काळजी

घेतली नाही. त्याने ते हातात घेऊन वेगळ्याच भावनेने त्याच्याकडे पाहिले. त्याला ते सहजपणे ठेवावेसे वाटले. पण त्याची भावनामयता त्याला चिडायला भाग पाडू लागली. त्याने ते टाकून दिले. ते झऱ्यात वहात चाललेले पाहून, त्याच्या हृदयात कळ उठली.

अशा एकांत जागी असलेल्या व तिथे कुणी फिरकत नसणाऱ्या, तलावात येण्याचा तिच्या स्वभावात काय विचित्रपणा होता, याचे त्याला नवल वाटले. देशी लोक पाण्याशी एकनिष्ठ होते. ते रोज इथे किंवा अजून कुठे दिवसातून एकदा तरी, पण बहुधा दोनदा, अंघोळ करत. ते गटाने, हसत, पूर्ण कुटुंबासकट आनंद साजरा करत. तुम्हाला नेहमी मुलींचा गट दिसे. झाडांमधून उतेलेल्या प्रकाशामध्ये ते मिश्र जातीचे लोक उथळ पाण्यात खेळतांना दिसत. या तलावात काही गुप्त गुपित असल्यासारखी जणु इथेलला तिच्या इच्छेविरुद्ध तिथे येण्याची मोहिनी पडली होती.

कशी गूढ व शांत रात्र होती! त्याने हळूच तलावाच्या पाण्यात प्रवेश केला. आवाज होऊ नये म्हणून, तो आळशीपणे कोमट पाण्यात अंधारात पोहत राहिला. पाणी सुवासिक व संथ वाटत होते. चांदण्यांनी भरलेल्या आकाशाखालून, तो गावात परतला. त्याला जगाची शांतता प्रतीत झाली.

आता तो रोज संध्याकाळी तलावावर जाऊ लागला. रोज संध्याकाळी त्याला इथेल दिसत असे. आता त्याने तिचा लाजरेपणा घालवला होता. ती खेळकरपणे व मित्रत्वाने वागू लागली. ते तलावावरील खडकांवर बसू लागले. तिथे पाण्याचा प्रवाह जोरदार होता. ते त्याच्या काठावर शेजारी शेजारी बसून, तिथे जमणारी धूळ गूढपणे कवेत घेणारे पाणी बघत बसत. तिथे प्रत्येकाला प्रत्येकजण काय करतो, ते ठाऊक असायचे. त्या गावात या दोघांची बातमी षटकर्णी व्हायला काही वेळ लागला नाही.

हॉटेलमधील माणसांकडून त्याच्यावर उद्धटपणे आगपाखड होऊ लागली. तो हसून, त्यांच्याकडे दुर्लक्ष करू लागला. त्यांची खरमरीत सूचना अमान्य करण्यासारखी नव्हती. त्याच्या भावना प्रामाणिक व खऱ्या होत्या. एखादा कवी चंद्रावर जसे प्रेम करेल, तसे त्याचे इथेलवर प्रेम होते. तो तिच्याकडे एक बाई म्हणून नव्हे तर कोणीतरी परग्रहावरची देवता म्हणून बघत होता. ती तलावाची जान होती.

हॉटेलमध्ये एक दिवस बारवरून जातांना, त्याने म्हाताऱ्या ब्रेव्हाल्डला त्याच्या नेहमीच्या गबाळया निळया अवतारात तिथे उभे असलेले पाहिले. तो इथेलचा बाप असल्याने, त्याला त्याच्याशी बोलायची इच्छा झाली. म्हणून तो आत गेला. मान हलवून स्वतःच्या पेयाची मागणी नोंदवली. सहज वळला आणि म्हाताऱ्याला त्याच्या बरोबर पेयपान करायला बोलावले. त्यांनी स्थानिक विषयांवर काही वेळ गप्पा मारल्या. लॉसन अस्वस्थपणे जागरूक होता. म्हातारा त्याला त्याच्या लबाड निळ्या डोळयांनी निरखत होता. त्याची पद्धत मान्य करण्यासारखी नव्हती. ती मुद्दाम होऊन स्वतःचा फायदा बघणारी वाटत होती. आणि तरीही म्हाताऱ्याच्या त्याच्या नशीबाशी लढण्याच्या भीतीदायक हवेने ती दुष्ट वाटत होती. लॉसनला आठवले, की गुलामांच्या व्यापारातील जहाजावर तो एके काळी कॅप्टन होता. प्रशांत महासागरात त्याला ब्लॅकबर्डर म्हणत. बेटावरील सोलोमनबरोबर झालेल्या मारामारीत त्याला त्याच्या छातीत जखम झाली असल्याने, तिथे मोठा हार्निया झाला होता. जेवणाची घंटी झाली.

लॉसन म्हणाला, “मला गेले पाहिजे.”

त्याच्या श्वासाचा आवाज करत ब्रेव्हाल्ड म्हणाला, “तू एकदा माझ्या घरी का येत नाहीस? ते काही फार मोठे नाही, पण तुझे स्वागत होईल. तुला इथेल माहिती आहे.”

“मी आनंदाने येईन.”

“रविवार दुपार ही चांगली वेळ आहे.”

वैलिमाला जाणाऱ्या मुख्य रस्त्यापासून थोडा आत, नारळांच्या झाडीत असलेला, ब्रेव्हाल्डचा बंगला बेशिस्तीचा व गचाळ होता. बंगल्याभोवती खूप लहानसहान झाडे लावलेली होती. त्यांच्या पसरलेल्या पानांमधून चिंध्या पांघरलेल्या एका आल्हादक बाईसारखे दुःखद सौदर्य दिसत होते. जिकडे तिकडे ऐपत असूनही दुर्लक्ष केलेले दिसत होते. छोटी, उंच पाठीची, बारीक काळी डुकरे इकडे तिकडे फिरत होती व कोंबडीची पिल्ले उकिरडा चिवडताना कलकलाट करत होती. तीन चार देशी लोक व्हरांड्यात रेंगाळत होते. जेव्हा लॉसनने म्हाताऱ्या ब्रेव्हाल्डबद्दल विचारले, तेव्हा आतून त्याला बोलावणारा, म्हाताऱ्याचा फाटका आवाज त्याला ऐकू आला आणि त्याला तो हॉलमध्ये बसून पाइप ओढतांना दिसला.

तो म्हणाला, बस. आरामशीरपणे बस. इथेल काही किरकोळ काम करते आहे.”

ती आली. तिने स्कर्ट, ब्लाउज घातला होता व केसांची युरोपियन रचना केली होती. रोज तलावावर येणाऱ्या तिच्यातील रानटी, भित्रा डौलदारपणा आता नसला, तरी ती नेहमीसारखी व त्यामुळे तिच्याजवळ जाण्यास, जास्त सोपी वाटत होती. तिने लॉसनशी हातमिळवणी केली. त्याने पहिल्यांदाच तिच्या हातांना स्पर्श केला.

ती म्हणाली, “मला आशा आहे की तुम्ही आमच्याबरोबर चहा घ्याल.”

त्याला माहिती होते, की ती मिशन शाळेत होती आणि त्याचे मनोरंजन झाले. शिवाय ती रीतभात पाळून, त्याच्या फायद्याचे जे बोलत होती, त्यामुळे त्याला भरून आले.

टेबलावर चहाची तयारी आधीच केलेली होता. मिनिटाभरात ब्रेव्हाल्डच्या चौथ्या बायकोने चहाची किटली आणली. ती देशी, दिसायला चांगली बाई होती. फार तरुण नव्हती. ती इंग्लिशमध्ये काही बोलली व खूप हसली. चहा म्हणजे जवळजवळ जेवणच होते. जास्त भर पाव आणि लोण्यावर होता. मग वेगवेगळे केक होते. संभाषण जुजबी होते. मग हळूच एक सुरकुतलेली म्हातारी आली.

जमिनीवर मोठ्याने आवाज करत, ब्रेव्हाल्ड बोलला, “ती इथेलची आजी आहे.”

ती चुळबुळत खुर्चीच्या कडेला बसली. ते तिच्यासाठी नेहमीपेक्षा वेगळे असल्याचे दिसत होते. ती जमिनीवर जास्त मोकळेपणे बसली असती. ती शांतपणे चमकत्या, एकटक डोळयांनी, लॉसनकडे बघत राहिली. बंगल्यामागील स्वयंपाकघरात, कुणीतरी संगीत वाद्य वाजवायला सुरवात केली आणि दोन तीन आवाज देवाच्या स्तुतीपर गाणे म्हणू लागले. पण त्यात धार्मिकतेपेक्षा संगीताचा आनंद जास्त वाटत होता.

लॉसन जेव्हा हॉटेलमध्ये परत आला, तेव्हा तो विचित्रपणे आनंदी होता. ते लोक ज्या वेड्यावाकड्या पद्धतीने रहात होते त्याने, मिसेस ब्रेव्हाल्डच्या थोड्या नॉर्वेजियन विलक्षण चांगल्या, हसऱ्या स्वभावाने

आणि काहीतरी आगळ्यावेगळया, भुरळ पाडणाऱ्या आजीच्या चमकदार गूढ डोळयांनी त्याला भरून आले. त्याला आजपर्यंत माहिती असलेल्यात, हे जास्त नैसर्गिक आयुष्य होते. त्या क्षणी, ती सुपीक, मैत्रीपूर्ण जमीन व संस्कृती त्याच्यावर उलटू बघत होती. त्या जुन्या काळातील नैसर्गिक लोकांच्या सहवासाने, त्याला मोकळे वाटत होते.

त्या हॉटेलमध्ये त्याची चिडचिड होत होती. समुद्रासमोरील, त्याच्या स्वतःच्या पांढऱ्या शुभ्र छोट्याशा बंगल्यात, रहायला गेल्यास त्याच्या दृष्टीसमोर सतत विविध रंगांचे लगून रहातील. त्याला ते सुंदर बेट आवडले. लंडन आणि इंग्लंडची काही मातब्बरी त्याला वाटेनाशी झाली. या विसरलेल्या जागी, प्रेम आणि आनंद यामुळे जगात सर्वात श्रीमंत ठरलेल्या जागी, तो त्याचे उरलेले दिवस तो काढणार होता. त्याने ठरवले, की काही अडथळे आले, तरी तो इथेलशीच लग्न करणार.

पण काही अडथळे आलेच नाहीत. ब्रेव्हाल्डच्या घरी त्याचे नेहमी स्वागत झाले. तो म्हातारा माणूस सतत हसत, नेहमी त्याच्या बाजूनेच होता. त्या घरी असणाऱ्या काही देशी माणसांची झलक त्याला बघायला मिळाली. एकदा लावा-लावामधील, पूर्ण शरीरावर टॅटू काढलेला एक उंच, पांढऱ्या केसांचा मनुष्य, ब्रेव्हाल्डबरोबर बसलेला होता. तो मिसेस ब्रेव्हाल्डच्या भावाचा मुलगा असल्याचे त्याला सांगण्यात आले. पण त्याने फारसा त्रास दिला नाही. इथेल त्याच्याबरोबर आनंदी होती. त्याच्याकडे बघितल्यावर तिच्या डोळयात उमटणारा प्रकाश त्याला खूप आनंदी करून जाई. ती सुंदर आणि निरागस होती. तिने ती जिथे शिकली, तिने तिच्या मिशन शाळेसंबंधी व तेथील सिस्टर्ससंबंधी त्याला जेव्हा सांगितले, तेव्हा त्याने ते त्याने नीटपणे ऐकून घेतले. पंधरा दिवसातून एकदा दाखवल्या

जाणाऱ्या सिनेमाला तो तिच्याबरोबर गेला. त्यानंतर तिच्याबरोबर नाचला. उपोलूमध्ये मनाने आनंदी लोक कमी असल्यामुळे, त्या नाचासाठी बेटाच्या सर्व भागातून, समाजाच्या सर्व स्तरातील लोक येत असत. चांगल्या ड्रेसमधील गोऱ्या बायका आणि तसेच अमेरिकन कपडे केलेल्या मिश्र जातीच्या बायका, देशी लोक, पांढरे गाउन घातलेल्या काळया मुलींची ओळ आणि सवय नसलेल्या कपड्यात असलेले, पांढरे बूट घातलेले तरुण. सर्व काही चटपटीत आणि आनंदी असे. तिचे कौतुक करणारा व तिच्या बाजूला उभा रहाणारा गोरा माणूस तिच्या मैत्रिणींना दाखवायला इथेलला आवडे. लवकरच अशी अफवा उठली, की तो तिच्याशी लग्न करणार आहे. मग तिच्या मैत्रिणी तिच्याकडे हेव्याने पाहू लागल्या. मिश्र जातीच्या मुलीसाठी गोऱ्या माणसाबरोबर लग्न करणे, ही मोठी गोष्ट होती. असे क्वचितच होत असे. पण याचे पर्यावसान कशात होईल, ते कुणाला सांगता येत नसे.

बँक व्यवस्थापक म्हणून असलेल्या लॉसनच्या हुद्द्यामुळे, त्याच्याकडे बेटावर वेगळया नजरेने बघितले जात असे. जर तो इथेलमध्ये इतका गुंतला नसता, तर अनेक गोऱ्या बायकांच्या व इतरांच्याही नजरा त्याला त्याच्याकडे वळलेल्या दिसल्या असत्या. त्या एकत्रपणे त्याच्याविषयी कुजबुज करत असत.

नंतर हॉटेलमध्ये रहाणारे लोक व्हिस्की पीत असतांना नेल्सन बोलला, "काय रे, ते म्हणतात, की लॉसन त्या मुलीबरोबर लग्न करणार आहे."

मिलर म्हणाला, "असे असेल तर तो फारच मूर्ख आहे.

मिलर जर्मन अमेरिकन होता. त्याने त्याचे नाव मुलर बदलून मिलर केले होते. तो, जाडा, मोठा सोनेरी कडांचा चष्मा असलेला, टक्कल पडलेला, घोटून दाढी केलेला मनुष्य होता. त्याचे कपडे नेहमी स्वच्छ पांढरे असत. तो खूप दारू पित असे. रात्रभर तो हॉटेलच्या मुलांबरोबर दारू पित बसायला तयार असे, पण त्याला ती कधी चढत नसे. तो आनंदी व चांगल्या स्वभावाचा, पण खूप गर्विष्ठ होता. सॅनफ्रँनसिस्कोमध्ये त्याचे ऑफीस होते. त्याच्या कामात कुणी ढवळाढवळ केलेली, त्याला चालत नसे. कॅलीको, मशिनरी आणि इतर बराच काही माल बेटावर विकला जात असे आणि त्याचे सगळ्या विक्रेत्यांशी असलेले चांगले संबंध, हे त्याच्या व्यवसायाचा एक भाग होता.

नेल्सन बोलला, “त्याला समजत नाही आहे, की तो काय करतो आहे. कुणीतरी त्याला शहाणपणा शिकवायला पाहिजे.”

मिलर म्हणाला, “माझे ऐकशील, तर तुझा संबंध नसलेल्या बाबतीत, तू काही

ढवळाढवळ करू नकोस. जेव्हा एखादा माणूस मूर्ख बनायचे ठरवतो, तेव्हा त्याला ते करून देण्याशिवाय काही इलाज नसतो.”

“मी येथील स्थानिक मुलींबरोबर चांगला वेळ घालवतो, पण जेव्हा लग्नाचा प्रश्न येतो, तेव्हा --- मी जगाला सांगतो, ही लग्न करायच्या लायकीची नाही.”

तिथे चॅपलीनदेखील होता. तो म्हणाला, “मी असे करणारे पुष्कळजण पाहिले आहेत, पण ते चांगले नाही.”

नेल्सन म्हणाला, “चॅपलीन, तू त्याच्याशी बोलले पाहिजेस. इतर कुणाहीपेक्षा तू त्याला जास्त ओळखतोस.”

मिलर म्हणाला, “मी चॅपलीनला सांगेन, त्याला एकटे सोडलेले बरे.”

त्या दिवसातही लॉसन इतका प्रसिद्ध नव्हता. आणि खरोखर कुणी त्याच्या बाबतीत डोके खुपसायचा त्रास घेतला नाही. मिसेस चॅपलीन दोन तीन गोऱ्या बायकांबरोबर बोलली, पण त्या एवढेच बोलल्या, की हे दयनीय आहे. आणि जेव्हा त्याने मिसेस चॅपलीनला सांगितले, की तो इथेलबरोबर लग्न करणार आहे, तेव्हा त्याला काही सांगण्यासाठी फार उशीर झाला होता.

एक वर्ष लॉसन सुखी होता. अपिया जिथे बांधले गेले तिथे, देशी लोकांच्या गावालगत, खाडीसमोर त्याने बंगला घेतला. तो नारळांच्या झाडांमध्ये, प्रशांत महासागराच्या भावविभोर निळाईत होता. त्या लहानशा घरात इथेल, जंगलातील प्राण्यासारखी डौलदारपणे सुखी होती. ते काहीही बोलत असत व हसत असत. कधीकधी हॉटेलमधील एक दोघेजण संध्याकाळ घालवायला येत. कधीतरी रविवारी ते दिवसभर देशी मुलीशी लग्न केलेल्या कुणाच्या शेतावर जात असत. अपिया मधील मिश्र जातीचे कुणी ना कुणी व्यापारी, सतत मेजवान्या देत असत, तिथे ते जात असत. मिश्र जातीचे लोक आता लॉसनला वेगळी वागणूक देत असत. लग्नामुळे, तो त्यांना त्यांच्यातील वाटू लागला होता. ते त्यांचे हात त्याच्या खांद्यावर टाकत. त्याच्या पाठीवर थाप मारत. अशा भेटीगाठींमध्ये त्याला इथेलला बघायला आवडे. तिचे डोळे चमकवत, ती हसे. तिचा आनंद बघून, तो खूष होई. कधीकधी तिचे नातेवाईक बंगल्यावर येत. त्यात अर्थात म्हातारा

ब्रेव्हाल्ड आणि तिची आई असे. आणि भाऊदेखील असत. गाउन घातलेल्या देशी बायका आणि लावा-लावा घातलेले, केस लाल रंगवलेले व अंगभर टॅटू काढलेले पुरुषही फुकटच येत असत. तो बँकेतून परत येई, तेव्हा ते बसलेले असत. तो त्यांच्याबरोबर ओढून ताणून हसे.

तो म्हणे, "त्यांना फार खायला घालू नको."

"ते माझ्या कुटुंबातील आहेत. ते जेव्हा एखादा पदार्थ करायला सांगतात, तेव्हा मला तो करावाच लागतो."

त्याला माहिती होते, की जेव्हा गोरा माणूस देशी किंवा मिश्र जातीच्या मुलीशी लग्न करतो, तेव्हा तिच्या नातेवाईकांनी त्याला मान देणे अपेक्षित असते. तो इथेलचा चेहरा हातात घेऊन, तिच्या लाल ओठांचे चुंबन घेई.

कदाचित तिला हे समजावे, अशी त्याची अपेक्षा नसे, की लग्नापूर्वी पुष्कळ वाटणारा पगार आता बायको व घर आल्यावर, काळजीपूर्वक वापरला पाहिजे.

मग इथेलला मुलगा झाला.

जेव्हा पहिल्यांदा लॉसनने मुलाला हातात घेतले, तेव्हा त्याच्या हृदयातून एक कळ उठली. त्याला तो इतका काळा असेल, याची कल्पना नव्हती. शेवटी त्याच्यात देशी रक्त होतेच. पण तरीही त्याने इंग्लिश माणसासारखे न दिसण्यासाठी खास, असे काही कारण नव्हते. पण त्या पिवळसर फिकट कांतीच्या, काळ्या केसांच्या व काळ्या डोळ्यांच्या मुलाला हातात घेऊन, ते देशी मूलच वाटे. जवळपासच्या बायका त्यांच्या लग्नाकडे दुर्लक्ष करत असत. तो लग्नापूर्वी ज्या लोकांकडे जेवायला

सरावलेला होता, ते आता त्याच्याशी थोडे अंतर ठेऊन वागत. त्यांचा लाजीरवाणेपणा ते जास्त प्रेम दाखवून झाकायचा प्रयत्न करत.

ते म्हणत, “मिसेस लॉसन कशा आहेत? इतक्या सुंदर स्त्रीचा नवरा असल्याने, तू फार नशीबवान आहेस.”

पण ते त्यांच्या बायकोबरोबर असले, तर भेटल्यावर इथेलला ओशाळल्यासारखे होई. त्या वरवर त्यांचा वरचष्मा दाखवायचा प्रयत्न करत. लॉसन हसून साजरे करे.

तो म्हणे, “त्या सगळ्या खड्ड्यातील संथ पाण्यासारख्या आहेत. त्यांच्या मेजवान्यांना त्यांनी मला बोलावले नाही, तर माझ्या रात्री काही अस्वस्थपणे जाणार नाहीत.”

पण आता त्याला थोडा राग येऊ लागला.

काळे मूल त्याचा चेहरा पडण्यास, कारणीभूत ठरू लागले. तो त्याचा मुलगा होता. त्याला अपियामधील मिश्र जातीची मुले आठवली. ती पिवळटसर त्वचेची, अशक्त, दुस्वास करण्यासारखी, पण काही बाबतीत लहान वयात जास्त क्षमता असलेली दिसत. ती त्याला शाळेत जातांना न्यूझीलंडच्या बोटीत दिसत. देशी मुलांना घेणारी शाळा शोधावी लागे. ती भित्री आणि लज्जास्पद दिसत. त्यांच्यातील विचित्र उपजत गुणांमुळे ती गोऱ्या लोकांपासून वेगळी पडत. ती आपला गट करून वावरत. ती आपापसात देशी भाषा बोलत. मोठे झाल्यावर ते त्यांच्यातील देशी रक्तामुळे, कमी पगाराच्या नोकऱ्या स्विकारत. मुली कदाचित गोऱ्या माणसाशी लग्न करत. पण मुलांना तशी संधी नसे. त्याना त्यांच्यासारख्याच मिश्र जातीच्या वा देशी मुलीशी लग्न करावे लागे. लॉसनने त्याच्या मनाशी

भावनामयतेने निश्चय केला, की तो त्याच्या मुलाला अशा लज्जित आयुष्यापासून दूर ठेवेल. कुठल्याही परिस्थितीत त्याला परत युरोपला जायला हवे. पण जेव्हा तो इथेलला बघायला गेला, तेव्हा नाजूक, सुंदर अशा तिला अंथरुणात झोपलेले पाहून व देशी बायकांनी तिला गराडा घातलेला बघून, त्याचा निश्चय बळावला. जर त्याने तिला त्याच्या लोकांमध्ये नेले, तर ती पूर्णपणे त्याच्यावर निर्भर राहील. तो तिच्यावर इतके मनापासून प्रेम करे, की त्याला तनामनाने तिच्याशी एकरूप व्हावेसे वाटे. त्याला जाणीव होती, की इथे तिची पाळेमुळे खोल रुजलेल्या जगातून ती त्याच्यापासून थोडी तरी दूर जाते.

तो शांतपणे कामाला गेला. विचित्र सहजप्रवृत्तीतून, त्याने गुप्तपणे त्याच्या, ॲबेर्डीनमध्ये जहाज कंपनीत असलेल्या भावाला पत्र लिहिले, की त्याची तब्येत [ ज्या कारणामुळे इतर बऱ्याच लोकांसारखा तो या बेटावर आला होता. ] आता सुधारली असून त्याला आता युरोपला न परतण्याचे काही कारण उरले नाही. त्याने त्याला काही परिणामकारक उपाय वापरून, डीसाईडमध्ये त्याच्यासाठी कमी पगाराची का असेना, पण नोकरी शोधायला सांगितली. मात्र तेथील वातावरण त्याच्यासारख्या फुफ्फुसांच्या विकाराने आजारी असलेल्या माणसासाठी, बरे असायला हवे. ॲबेर्डीनहून सामोआला पत्र पोचायला पाच ते सहा आठवडे लागत. इथेलला तयार करण्यासाठी त्याच्याकडे पुष्कळ वेळ होता. तिला एखाद्या मुलासारखा आनंद झाला. ती तिच्या मैत्रिणींमध्ये ती इंग्लंडला जात असल्याबद्दल, कशा बढाया मारू लागली, ते बघून त्याचे मनोरंजन झाले. तिच्यासाठी ती प्रगतीची पायरी होती. ती तिकडे जाऊन पूर्णपणे आंग्लाळली असती. आता लवकरच जायचे, या विचाराने, ती हुरळून गेली. किंकार्डीनमधील बँकेत

त्याला नोकरी मिळणार असल्याचे मोठे पत्र आले, तेव्हा तिचा आनंद गगनात मावेना.

जेव्हा त्यांचा मोठा प्रवास संपला आणि ग्रॅनाईटची घरे असलेल्या छोट्याशा स्कॉट गावात ते स्थिरस्थावर झाले, तेव्हा लॉसनला जाणवले, की त्याला आता त्याच्या लोकांमध्ये रहायला किती बरे वाटते आहे. त्याने वनवासासारख्या अपियामध्ये काढलेल्या तीन वर्षांकडे, एकदा परत बघितले. आता सर्वसामान्य आयुष्य सुरु झाल्याने, त्याने सुटकेचा निःश्वास टाकला. परत एकदा गोल्फ खेळणे व मासे पकडणे, चांगल्या प्रकारे पकडणे, छान वाटत होते. प्रशांत महासागरात ते पकडणे, म्हणजे फार मजा नव्हती. तिथे तुम्ही एकदा जाळे टाकलेत, की एक मोठा, मंद मासा पकडता. इथे रोजचे वर्तमानपत्र वाचून, तुमच्यासारख्या लोकांना भेटून व बोलून, आणि फ्रीजमधील मास खायला लागत नसल्याने, व हवाबंद बाटलीतील दूध प्यावे लागत नसल्यानेही, चांगले वाटत होते. प्रशांत महासागरापेक्षा, इथे खूपच मस्त वाटत होते. आता इथेल पण त्याची एकट्याची होती. लग्नानंतर दोन वर्षांनी, तो तिच्यावर जास्त मनापासून प्रेम करू लागला होता. तो तिला क्वचितच नजरेआड करे. त्याची गरज वाढून, त्यांच्यातील सुसंवाद अधिक जवळचा झाला. पण येथील नावीन्यतेचा पहिला भर ओसरल्यावर, त्याच्या अपेक्षेपेक्षा ती येथील आयुष्यात कमी रस घेऊ लागली. ती तिच्या परिसराची एकरूप झाली नाही. ती निरुत्साही झाली. जसजसा हिवाळा सुरु झाला, तसतशा तिच्या थंडीच्या तक्रारी सुरु झाल्या. ती सकाळी अंथरुणातून बाहेर पडेनाशी झाली. दिवसभर तिचा मुक्काम सोफ्यात होऊ लागला. कधीकधी कादंबऱ्या वाचत, पण बहुतेक वेळा

काही न करत, असा ती वेळ घालवू लागली. ती फिकुटलेली व ताण आलेली दिसू लागली.

तो बोलला, "प्रिये, काही काळजी करू नकोस. तुला लवकरच याची सवय होईल. उन्हाळा येईपर्यंत थांब. इथे जवळ जवळ अपियाइतकेच गरम असते."

अनेक वर्षांपेक्षा, त्याची बळकटी वाढली.

ती ज्या निष्काळजीपणे घराची व्यवस्था बघे, त्याचे सामोआत काही वाटले नाही. पण इथे ते विचित्र वाटू लागले. जेव्हा कोणी येत असे, तेव्हा घर पसरलेले व अस्वच्छ असलेले त्याला आवडत नसे. इथेलवर थोडे हसत व रुसत, तो आवरा आवरी करू लागे. इथेल त्याला आळशीपणे बघत राही. ती तासनतास मुलाशी खेळत बसे. ती त्याच्याशी तो बाळ असल्यासारखे, तिच्या देशातल्यासारखे बोले. ते थांबावे म्हणून लॉसनने शेजारीपाजारी ओळखी वाढवायला सुरवात केली आणि सतत मेजवान्यांना जाऊ लागले. तिथे बायका पारंपारिक मौखिक पद्धतीने चालत आलेली गाणी, म्हणत असत आणि पुरुष चांगल्या रीतीने शांत बसत. इथेल लाजरी होती. ती अलग पडे. कधीकधी लॉसन अचानक काळजीत पडे व तिला विचारी, की ती सुखी आहे का. ती उत्तर देई, "हो, मी चांगली सुखात आहे."

पण तिचे डोळे अशा काही विचारात बुडालेले दिसत, की त्याचा तर्क चालत नसे. ती आतल्या आत कुढत राही आणि त्याला वाटे की तो तिला लग्नापूर्वी तलावात पोहताना ओळखत होता, तेवढे ओळखतच नाही. त्याला वाटे की ती त्याच्यापासून काही लपवते आहे. मग तो अस्वस्थ होई. तो तिच्यावर मनापासून प्रेम करे, पण त्याला त्रास होई.

त्याने एकदा तिला विचारले, “तुला अपिया सोडल्याचा त्रास होतो का?”

ती उत्तरली, “छे छे, इथे खूप छान आहे.”

पुढच्या विचाराने त्याला विचित्र संशय येई आणि मग तो त्या बेटाबद्दल व तेथील लोकांबद्दल काही शेरेबाजी करत सुटे. तिला अगदी क्वचित तेथून पत्रे येत. मग एक दोन दिवस चेहरा पाडून बसे.

एकदा तो बोलला, “मला तिकडे जाण्याची ओढ कधीच वाटत नाही. गोऱ्या माणसाला रहायची ती जागा नाही.”

पण कधीकधी तो लांब असताना इथेल रडे आणि मग तो विचार करू लागे. अपियामध्ये ती बडबडी होती. त्यांच्या लहानसहान सामाईक आयुष्याबद्दल, गावगप्पांबद्दल ती खूप बोलत राही. पण इथे ती हळूहळू शांत होऊ लागली. तो तिला खुलवायचा प्रयत्न करे पण तरी ती निरुत्साहीच रहात असे. त्याला वाटे की तिच्या आधीच्या आयुष्यातील आठवणी तिला त्याच्यापासून दूर खेचत आहेत. मग तो त्या बेटाचा, समुद्राचा, ब्रेव्हाल्डचा व तो आता त्यांची आठवण नको असे वाटणाऱ्या तेथील काळया लोकांचा द्वेष करू लागे. जेव्हा ती सामोआबद्दल बोले, तेव्हा तो ते कटूपणे व विनोदाने घेऊ लागला. वसंत ऋतुतील एका संध्याकाळी जेव्हा बर्चच्या झाडांना पालवी फुटत होती, तेव्हा गोल्फ खेळून परत येतांना, त्याने तिला नेहमीप्रमाणे सोफ्यावर पहुडलेले पाहिले नाही. ती खिडकीशी उभी होती. ती नक्कीच त्याच्यासाठी थांबली होती. तो खोलीत आल्याबरोबर ती त्याला सामोआ भाषेत बोलली, “मला हे सहन होत नाही.

मी आता अजून, इथे राहू शकणार नाही. मी याचा द्वेष करते. मी याचा द्वेष करते.”

तो चिडून म्हणाला, “कृपया सुसंस्कृत भाषेत बोल.” ती त्याच्याकडे गेली व त्याला लाज वाटत कवटाळले. तिचे हावभाव काहीसे गावठी होते. “आपण इथून निघून जाऊ. आपण सामोआला परत जाऊ. तू मला इथे रहायला लावलेस, तर मी मरून जाईन. मला घरी जायचे आहे.”

तिचा बांध फुटून, ती रडू लागली. त्याचा राग मावळला. त्याने तिला जवळ घेतले. त्याने तिला सांगितले, की त्याला नोकरी सोडणे शक्य नाही. नाहीतर खायचे काय? त्याची अपियामधील जागा केव्हाच भरली गेली होती. तिथे जाऊन काही फायदा नव्हता. त्याने ते तिला पटेल, असे सांगायचा प्रयत्न केला. तेथील जीवनातील अडचणी, पुढे त्याना नक्कीच भोगावे लागणारे लाजलावणे प्रकार आणि त्यांच्या मुलाला पुढे भोगावा लागणारा कटूपणा.

स्कॉटलंडमध्ये शिक्षण व तदनुषंगिक गोष्टी चांगल्या मिळतील. शाळा चांगल्या व स्वस्त आहेत. मुलगा ॲबेर्डीन विद्यापीठात जाऊ शकतो. मी त्याला खराखरा स्कॉटीश बनवेन.”

त्याचे नाव ॲंड्र्यू ठेवले होते. लॉसनला त्याला डॉक्टर बनवायचे होते. तो गोऱ्या बाईशी लग्न करेल.

इथेल रागावून म्हणाली, “मला मी मिश्र जातीची असल्याची लाज वाटत नाही.”

“अर्थातच नाही, प्रिये. त्यात लाज वाटण्यासारखे काही नाही.”

तिच्या मऊ गालावर गाल घासत, त्याला खूप अशक्त वाटले.

तो म्हणाला, “तुला माहिती नाही, की मी तुझ्यावर किती प्रेम करतो. माझ्या मनात काय आहे, हे सांगणे शक्य व्हावे, म्हणून मी तुला जगातील काहीही द्यायला तयार आहे.”

त्याने तिचे ओठ चुंबिले.

उन्हाळा आला. दरी हिरवीगार व सुवासिक झाली. टेकड्या फुले येणाऱ्या बार्क झुडुपांनी बहरून गेल्या. एका सूर्यप्रकाशाच्या दिवशी आणि दुसऱ्याही दिवशी, त्या बर्चच्या झाडांमधील सावलीमध्ये उंच रस्त्याच्या उजेडापेक्षा छान वाटत होते. इथेल सामोआबद्दल बोलेनाशी झाली आणि लॉसनला थोडे कमी उदास वाटू लागले. त्याला वाटले की ती आता भोवतालच्या वातावरणाला सरावेल. त्याचे तिच्याबद्दलचे प्रेम इतके भावनामय होते, की तो तिच्या हृदयात शोक करण्यासाठी जागाच ठेवत नसे. एक दिवस स्थानिक डॉक्टरने त्याला रस्त्यात थांबवले.

“लॉसन, मी काय म्हणतो, तुझ्या मिसेसला उंचावरील झऱ्यात नहातांना जरा काळजी घ्यायला सांग. तो काही प्रशांत महासागर नाही.”

“मला माहिती नाही.”

लॉसनला नवल वाटले. त्याला ती बाब लपवायचे सुचले नाही. “ती तिथे पोहते का? मला माहिती नव्हते.”

डॉक्टर हसले. “पुष्कळ लोकांनी तिला पाहिले आहे. ते त्याबद्दल बोलत असतात. कारण ती तशी निसरडी जागा आहे. पुलाच्या वरच्या बाजूचा तलाव आहे, तिथे पोहायला बंदी आहे. पण त्यात काही त्रास आहे, असे नव्हे. मला माहिती नाही, ते पाणी तिला सहन कसे होते.”

डॉक्टर म्हणत होते तो तलाव लॉसनला माहिती होता. अचानक त्याला आठवले की उपोलूमधील तलावात रोज संध्याकाळी पोहायची इथेलला सवय होती. उंचावरील स्वच्छ झरा खडकातून वळणे घेत खुषीने खळाळत असे. आणि मग लहानसा वाळुमय किनारा असलेला शांत खोल तलाव तयार होत असे. त्यावर नारळाची नव्हे, पण इतर झाडांची दाट सावली पडलेली असे. वाळूचा तट होता. सूर्याचे कडक उन्ह पानांमधून, त्या चकाकणाऱ्या पाण्यावर पडे. पण इथे ती पोहायला जाते, हे बघून त्याला धक्का बसला. त्याच्या कल्पनेत, त्याने इथेलला रोज तिथे जाताना पाहिले. काठावर कपडे काढून, थंड पाण्यात शिरतांना पाहिले. घरी अपियामध्ये ती ज्या तलावावर प्रेम करे, त्यातील पाण्यापेक्षा हे थंड होते. क्षणभर त्याला मागील सर्व आठवले. अजून एकदा त्याने तिला झऱ्याच्या विचित्र, जंगली स्वरूपात पाहिले. त्या दुपारी तो नदीकडे गेला. पायांचा आवाज न करता, झाडांमधून आणि गवतातून, त्याने काळजीपूर्वक मार्ग काढला. जिथून त्याला तलाव दिसू शकेल, अशा जागी तो आला. इथेल काठावर अगदी स्वस्थपणे पाण्यात बघत बसलेली होती. असे दिसत होते, की पाणी तिला खेचत होते. त्याला नवल वाटले, की काय विचित्र गोष्टी तिच्या डोक्यात चालू असतात. शेवटी ती उठली. एक दोन मिनिटे, ती त्याच्या नजरेआड गेली. मग परत त्याला ती गाउन घातलेली दिसली. तिच्या नंग्या पाऊलांनी ती शेवाळलेल्या काठावरून अलगद चालत होती. ती पाण्याच्या कडेला आली. आणि हळूच पाण्याचा आवाज न करता, स्वतःला पाण्यात लोटून दिले. ती शांतपणे पोहत राहिली. तिचे पोहणे मनुष्यमात्रासारखे वाटत नव्हते. त्याच्यावर त्याचा इतका विचित्र परिणाम का झाला, हे त्याला कळत नव्हते. ती महत्प्रयासाने चढून वर येईपर्यंत, तो थांबला. तिच्या वस्त्रावरील

शरीराला चिकटलेल्या पाण्याच्या चुण्यांसकट ती क्षणभर थांबली. त्यामुळे तिच्या शरीराचा आकार उठून दिसत होता. मग छातीवरून सावकाश हात फिरवत तिने एक आनंदाचा सुस्कारा सोडला. मग ती अदृष्य झाली. लॉसन वळला आणि गावात परतला. त्याच्या हृदयात कळ येत होती.

कारण त्याला जाणवले, की ती अजूनही त्याला अनोळखी आहे. त्याची प्रेमाची भूक कायम असमाधानीच रहाणार, हे त्याला समजले.

त्याने काय पाहिले, हे तो काही बोलला नाही. त्याने त्या घटनेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. पण तो तिच्याकडे चौकसपणे पाहू लागला. तिच्या मनात काय आहे, याचा छडा लावू लागला. तिच्या बाबतीतील त्याचा हळूवारपणा दुप्पट झाला. त्याच्या आत्यंतिक प्रेमाने, तो तिला तिचे खोल दुःख विसरायला लाऊ लागला.

मग एक दिवस, जेव्हा तो घरी आला, तेव्हा ती घरात नसल्याने त्याला नवल वाटले.

त्याने नोकराणीला विचारले, “बाईसाहेब कुठे गेल्या आहेत?”

प्रश्नामुळे थोडे चमकून ती उत्तरली, “सर, त्या मुलाबरोबर ॲबेर्डीनला गेल्या आहेत. त्या म्हणाल्या त्या शेवटच्या गाडीशिवाय परतणार नाहीत.”

“ओहो, ठीक आहे.”

इथेलने तिच्या बाहेर जाण्यासंबंधी त्याला काहीच सांगितले नाही, हे त्याला त्रासदायक वाटले. पण त्याने ते फार मनावर घेतले नाही. ती उशीरा आली आणि परत ॲबेर्डीनला गेली. ती कदाचित दुकानांमधून हिंडत असेल वा सिनेमाला गेली असेल. असे वाटून तो आनंदी झाला. तो

शेवटच्या गाडीसाठी स्टेशनवर गेला. पण ती न आलेली पाहून, अचानक घाबरला. तो घरी येऊन झोपायच्या खोलीत गेला, तेव्हा त्याला तिच्या मेकपच्या वस्तू जागेवर दिसल्या नाहीत. त्याने कपड्यांचे कपाट व खण उघडले. ते अर्धे रिकामे होते. ती निघून गेली होती.

तो फारच रागावला. ॲबेर्डीनला फोन करून चौकशी करायला, फारच रात्र झाली होती. पण त्याला आधीच माहिती होते, की चौकशी त्याला कदाचित चांगलाच धडा शिकवणार आहे. बँकेत कामाची घाई चालू असल्याचे नेमके दिवस, तिने दुष्टपणे लबाडी करून, निवडले होते. आणि त्याला तिचा पाठलाग करणे शक्य नव्हते. तो कामात बुडून गेला होता. त्याने एक कागद घेतला आणि पाहिले, की उद्या सकाळी एक बोट ऑस्ट्रेलियाला निघाली होती. ती आता लंडनच्या वाटेवर असेल. त्याच्या गालावरून दुःखाने ओघळणारे अश्रु त्याला थोपवता आले नाहीत.

तो ओरडला, मी तिच्यासाठी जगातील जे जे करणे शक्य होते, ते केले. आणि ती मात्र मला फसवून, निघून गेली. ती किती दुष्ट आहे! राक्षसीपणे दुष्ट आहे!" दोन दिवस गूढ रीतीने गेले. नंतर त्याला तिचे पत्र मिळाले. तिच्या शाळकरी मुलीच्या हस्ताक्षरात, तिने ते लिहिले होते. तिला लिहायची नेहमीच अडचण असे.

प्रिय बर्टी,

मला आता तिथे रहाणे सहन होत नाही. मी घरी चालले आहे.

अच्छा.

इथेल

तिने एखाद्या शब्दानेही खंत प्रगट केली नव्हती. तिने त्याला येण्याबद्दलही विचारले नाही. हताश होऊन, लॉसन जमिनीवर चेहरा ठेऊन झोपला. त्याने शोधून काढले, की बोटीचा पहिला थांबा कुठे आहे. आणि त्याला माहिती होते, की ती परत फिरणार नाही, तरी त्याने तिला एक तार पाठवली व त्यात तिला परतण्याबद्दल लिहिले. तो दयनीय रीत्या काळजी वाटून थांबला. त्याला वाटत होते, की तिने प्रेमाचा एखादा शब्द तरी लिहावा. पण तिने उत्तरही दिले नाही. तो एकापाठोपाठ एक अशा आक्रमक अवस्थेतून गेला. एका क्षणी त्याला असेही वाटले, की चला, तिच्यापासून सुटका मिळाली. आणि तिला पैसे न पाठवून तो तिला परत यायला भाग पाडेल. तो एकाकीपणे मोडून पडला. त्याला त्याचा मुलगा आणि ती, हवे होते. त्याला माहिती होते, की त्याने कितीही सोंग आणले, तरी एकच गोष्ट करण्यासारखी होती आणि ती म्हणजे, तिच्या मागोमाग जाणे. आता त्याला तिच्याशिवाय जगणे शक्य नव्हते. भविष्यातील सर्व बेत पत्त्याच्या बंगल्यासारखे कोसळून पडले. त्याने अधीर रागाने ते पत्ते विस्कटून टाकले. त्याच्या भविष्याचे काही का होईना, पण त्याने इथेलला परत आणलेच पाहिजे. त्याला शक्य झाले, तेव्हा तो ॲबेर्डीनला गेला आणि त्याच्या बँक व्यवस्थापकाला म्हणाला, की त्याला ताबडतोब निघायला हवे. व्यवस्थापकाने मान्य केले नाही. इतक्या आयत्या वेळी असे सांगणे गैरसोयीचे होते. पण लॉसनने काही ऐकले नाही. पुढची बोट निघण्यापूर्वी त्याला मोकळे व्हायचे होते. आणि त्याचे काय आहे नाही ते विकून, तो त्यावर चढेपर्यंत त्याला चैन पडत नव्हते. कसाबसा तो शांत राहिला. तोपर्यंत त्याला भेटणाऱ्यांनी त्याला क्वचितच मनाच्या समाधानात पाहिले. त्याचे इंग्लंडमधील शेवटचे कृत्य होते, की इथेलला अपियाला तार करणे,

की तो तिथे येतो आहे. त्याने सिडनेपासून दुसरी तार पाठवली. शेवटी पहाटे त्याची बोट अपियाला पोचली, त्याने परत खाडीच्या कडेची पांढरी घरे पाहिली, तेव्हा त्याला खूप बरे वाटले. डॉक्टर व दलाल धक्क्यावर आले. ते दोघे जुन्या ओळखीचे होते. त्याला त्यांचे ओळखीचे चेहरे बघून बरे वाटले. जुन्या आठवणींसाठी व तो खूप उदास होता म्हणूनही, त्याने त्यांच्याबरोबर एक दोन पेये घेतली. त्याला बघून इथेल खूष होईल का, याची त्याला शंका होती. जेव्हा तो लहान बोटीतून जेट्टीवर आला, तेव्हा तेथील थांबलेल्या गर्दीकडे त्याने उत्सुकतेने पाहिले. ती त्याला न दिसल्यामुळे तो उदास झाला. मग त्याला त्याच्या जुन्या निळया कपड्यात, ब्रेव्हाल्ड दिसला. तेव्हा त्याला दिलासा मिळाला.

त्याने किनाऱ्यावर उडी मारत विचारले, "इथेल कुठे आहे?"

"ती बंगल्यावर आमच्याबरोबर रहाते आहे."

लॉसन दुःखी झाला पण त्याने आनंदाचे सोंग आणले.

"ठीक आहे. मी इथे राहू शकतो का? मला वाटते इथे बस्तान बसवण्यासाठी मला एकदोन आठवडे लागतील.

"अर्थात हो. तुमच्यासाठी नक्कीच सोय आहे."

कस्टममधून गेल्यावर, ते हॉटेलवर गेले. तिथे त्याच्या बऱ्याच जुन्या मित्रांनी त्याचे स्वागत केले. तिथून निघण्यापूर्वी, त्याने बरेच पेय प्यायले. शेवटी ते दोघे ब्रेव्हाल्डच्या घरी गेले. त्याना खूप आनंद झाला होता. त्याने इथेलला बाहुपाशात घेतले. तिच्या मिठीत त्याच्या सर्व कटू आठवणी त्याने मागे टाकल्या. त्याच्या सासूला व म्हाताऱ्या, सुरकुतलेल्या आजीलादेखील, त्याला बघून बरे वाटले. देशी व मिश्र जातीचे लोक आत

आले व त्याच्याभोवती त्याच्याकडे बघत बसले. ब्रेव्हाल्डकडे व्हिस्कीची बाटली होती आणि आलेल्या प्रत्येकाला ती चाखायला मिळाली. लॉसन त्याच्या छोट्या, काळया मुलाला गुडघ्यावर घेऊन बसला. त्यांनी त्याचे इंग्लीश कपडे काढून, त्याला जवळजवळ उघडेच ठेवले होते. गाउन घातलेली इथेल बाजूला बसली होती. त्याला तो परतणारा उधळ्या असल्याचे जाणवले. दुपारी तो परत हॉटेलवर गेला. आणि परत आला, तेव्हा फार आनंदी होता. प्यायलेला होता. इथेल आणि तिच्या आईला माहिती होते, की गोरे लोक येता जाता पितात. ते त्यांच्याकडून अपेक्षितच असते. ते सर्वजण खूप हसले व त्याला अंथरुणाशी घेऊन गेले.

एक दोन दिवसात तो काम शोधू लागला. त्याने इंग्लडला जाण्यासाठी जी नोकरी सोडली होती, त्या उंचीची नोकरी तर काही त्याला मिळाली नसती. पण त्याच्या अनुभवामुळे, तो कुठल्यातरी व्यापारी संस्थेला उपयोगी ठरू शकला असता. कदाचित शेवटी त्याचे नुकसान झाले नसते.

तो म्हणाला, “शेवटी बँकेत किती पैसा मिळणार? व्यापारच खरा!”

त्याला आशा होती त्याला इतकी गरज निर्माण होईल, की तो कुणाला तरी भागीदारीत घेऊन, धंदा सुरु करेल आणि काही वर्षात तो श्रीमंत न होण्याचे काही कारण नव्हते.

तो इथेलला बोलला, “माझे काम सुरु झाले, की लगेच आपण घर घ्यायच्या मागे लागू. आपण इथे राहू शकत नाही.”

ब्रेव्हाल्डचा बंगला इतका लहान होता, की ते बंकर बेडवर झोपत असत. आणि घरात सदैव गर्दी असे. तिथे शांतीही नव्हती आणि खासगीपणाही.

"ठीक आहे. आपल्याला पाहिजे तसे, घर मिळेपर्यंत इथे ठीक आहे."

त्याला स्थिरस्थावर व्हायला आठवडा लागला. नंतर तो बेन नावाच्या एका माणसाच्या कंपनीत शिरला. पण जेव्हा तो इथेलशी तिथून हलण्याच्या गोष्टी करू लागला, तेव्हा तिच्या नवीन बाळाचा जन्म होईपर्यंत, तिथेच रहायचे असल्याचे ती बोलली, कारण लवकरच तिला दुसरे मूल होणे अपेक्षित होते.

ती म्हणाली, "जर तुला आवडत नसेल, तर तू हॉटेलात जाऊन रहा."

त्याला अशक्त वाटू लागले. "इथेल, तू असे कसे काय सुचवू शकतेस?"

तिने खांदे उडवले. "आपण इथे राहू शकत असतांना घर घेण्याची गरज काय?"

तो कुरकुर करू लागला.

जेव्हा लॉसन त्याच्या कामानंतर परत बंगल्यात गेला, तेव्हा त्याला तिथे देशी लोकांची गर्दी दिसली. ते सिगरेट ओढत, लोळत, कावा पित, सतत बडबड करत होते. ती जागा घाणेरडी व अव्यवस्थित झाली होती. त्याचा मुलगा रांगत देशी मुलांबरोबर खेळत होता. ते सामोअनशिवाय कुठली भाषा बोलत नव्हते. तो कामावरून परततांना, त्याच्या वाटेवर

असलेल्या हॉटेलात जाऊन, दारू पिऊन मित्र असलेल्या देशी लोकांच्या संगतीत संध्याकाळ घालवू लागला. कारण तो फक्त त्याच वेळी त्यांना सहन करू शकत असे. आणि जरी तो तिच्यावर अधिक मनापासून प्रेम करू लागला होता, तरी त्याला वाटे, की इथेल त्याच्यापासून दूर जात आहे. जेव्हा मूल जन्माला आले, तेव्हा त्याने सुचवले, की त्याना आता स्वतःचे घर हवे. पण इथेलने नकार दिला. तिच्या स्कॉटलंडमधील मुक्कामामुळे, ती आता तिच्या लोकांमध्ये येऊन पडली होती. आता परत त्यांच्यात आल्यामुळे, ती फार उत्साही होती. तिने सोडून दिलेल्या गावठी पद्धती पुन्हा अंगीकारल्या. लॉसन अधिक पिऊ लागला. दर शनिवारी रात्री, तो इंग्लिश क्लबमध्ये जाई आणि बेसुमार दारू पिई.

तो जितका जास्त पिऊ लागे, तितका जास्त तो भांडखोर होई. एकदा तो बेनशी, त्याच्या मालकाशी, आक्रमकपणे भांडला. बेनने त्याला डच्चू दिला. मग त्याला दुसरे काम शोधावे लागले. दोन तीन आठवडे तो रिकामा होता. आणि तेव्हा बंगल्यात बसण्याऐवजी, तो हॉटेलात किंवा इंग्लिश क्लबमध्ये फिरे आणि दारू पित राही. जर्मन अमेरिकन, मिलरने त्याला दयेपोटी त्याच्या कार्यालयात नेले. पण तो व्यापारी वृत्तीचा असल्याने, लॉसनची आर्थिक बाबतीतील कुशलता चांगली असली, तरी परिस्थिती अशी होती की पूर्वीपेक्षा कमी पगार असला, तरी त्याला नकार देणे अवघड होते. मिलरने त्याला ती नोकरी देऊ करण्यास काही खळखळ केली नाही. इथेल आणि ब्रेव्हाल्डने त्याला ती स्विकारल्याबद्दल दोष दिला. एका मिश्र जातीच्या माणसाच्या हाताखाली काम करायचे म्हणून त्याला कटूपणे पश्चात्ताप होत होता. इथेलने जेव्हा त्याला टोकले, तेव्हा तो रागाने चवताळून उठला.

तो बोलला, "एका काळ्या माणसाच्या हाताखाली काम करणे म्हणजे माझे मरणच आहे."

ती म्हणाली, "पण तुला कदाचित करावे लागेल."

सहा महिन्यात त्याला या लज्जास्पद नोकरीला सामोरे जावे लागले. दारुची चटक वाढत होती. तो फार पित होता. तो त्याचे काम वाईट पद्धतीने करे. एक दोन वेळा त्याने कामाबद्दल काही नाराजी दाखवल्याने, मिलरने त्याला तंबी दिली होती, ती मान्य न करता, तो जोराने स्वतःचे समर्थन करत होता. एक दिवस मोठ्या आवाजात वाद घातल्याबद्दल, त्याने त्याची टोपी फेकली व चालू पडला. पण आतापर्यंत त्याची जी कीर्ती पसरली होती, त्यामुळे त्याला नवीन नोकरी मिळेना. काही काळ तो रिकामा राहिला. आणि मग त्याला अती दारुमुळे, ताप येऊन मन भरकटणे व भास होणे, असा आजार झाला. जेव्हा तो बरा झाला, तेव्हा लाजलावण्या पद्धतीने अशक्त झाला. तेव्हा त्याला सततचा ताण सहन होईना. तो पेडरसनकडे जाऊन त्याला नोकरी मिळण्याबद्दल विचारू लागला. त्याच्या दुकानात गोरा माणूस आला तर पेडरसनला आनंद होणार होता आणि लॉसनची आकडेमोडीतील गती त्याच्यासाठी उपयुक्त होती.

त्या वेळेपासून त्याची अधोगती, भरभर चालू राहिली. गोऱ्या लोकांनी त्याला दुष्टाव्याची वागणूक दिली. ते त्याला अपमानास्पद वागणुकीने बाजूला सारून, त्याच्याविषयी फक्त दया दाखवत असत. तो दारू पिऊन आक्रमक झाल्यावर, त्याला खूप घाबरत असत. कुठल्या तरी विशेष गोष्टीने त्रास होण्यासाठी, तो पात्र ठरत होता. तो नेहमी शब्दांनी किंवा हावभावांनी अपमान होण्याच्या काठावर असे.

आता तो पूर्णपणे देशी व मिश्र जातीच्या लोकांमध्ये राहू लागला. त्याला गोऱ्या लोकांना मिळणारा मान मिळेनासा झाला. त्यांच्याकडून त्याला उबग येईल अशी वागणूक मिळू लागली. त्यांना त्याच्या चढेलपणाचा त्रास होऊ लागला. आता तो त्यांच्यापैकीच एक होता. आणि त्यांना कळत नसे, की तो एवढा भाव का खातो. ब्रेव्हाल्डही त्याला मान न देता व त्याच्याकडे लक्ष न देता, त्याला कःपदार्थ समजू लागला. इथेलने चुकीच्या माणसाशी लग्न केले, असे त्याला वाटू लागले. अपमानकारक प्रसंग घडू लागले. एक दोन माणसे त्याला मारायला आली. जेव्हा भांडण झाले, तेव्हा इथेलने तिच्या कुटुंबाच्या बाजूने रहाणे पसंत केले. त्याना वाटू लागले, की हा प्यायलेला असेल, तरच बरा असतो. कारण तो जेव्हा प्यायलेला असे, तेव्हा अंथरुणावर खूप वेळ झोपलेला असे.

मग त्याच्या लक्षात आले, की त्याच्यापासून काही लपवले जात आहे. त्याचे रात्रीचे मिश्र जातीच्या प्रकारचे, वाईट जेवण जेवण्यासाठी तो घरी येई, तेव्हा बहुतेक वेळा इथेल घरी नसे. त्याने विचारले, की ती कुठे आहे, तर ब्रेव्हाल्ड उत्तर देत असे, की ती तिच्या एखाद्या मैत्रिणीबरोबर संध्याकाळ घालवण्यासाठी गेली आहे. एकदा ब्रेव्हाल्डने सांगितलेल्या घरापर्यंत, तो तिच्या मागावर गेला. पण तिथे ती नव्हती. ती परत आल्यावर त्याने तिला विचारले, की ती कुठे गेली होती, ते ती म्हणाली तिच्या वडिलांनी एक चूक केली. ती अमुकतमुककडे गेली होती. पण त्याला माहिती होते, की ती खोटे बोलते आहे. तिने छान कपडे घातले होते. तिचे डोळे चमकत होते. आणि ती सुंदर दिसत होती.

"माझ्या मुली, मला फसवू नकोस. मी तुला होत्याची नव्हती करून टाकेन."

"ती रागाने म्हणाली, "तू दारुडा पशू!"

त्याला वाटले की मिसेस ब्रेव्हाल्ड आणि आजी त्याच्याकडे आक्रमकतेने बघत होत्या. मात्र ब्रेव्हाल्ड त्याच्याशी हसून खेळून होता. त्या दिवसात अगदी वेगळे असे, त्याच्या जावयाशी तो काही गुप्त पद्धतीने, युक्तीबाजपणे वागत होता. मग त्याचा संशय वाढला. त्याला वाटले की गोरे लोक त्याच्याकडे कुतुहलाने पहात आहेत. जेव्हा तो हॉटेलमध्ये नेहमीच्या जागी आला, तेव्हा तो आल्यावर एकदम सगळे गप्प झाले. त्यावरून त्याला समजले, की ते त्याच्यासंबंधी बोलत होते. काहीतरी घडले होते आणि ते तो सोडून सगळ्यांना माहिती होते. त्याला भयंकर द्वेष वाटू लागला. त्याला वाटले, इथेलची कुणा गोऱ्या माणसाशी भानगड चालू आहे. तो एकामागून एक सगळ्यांकडे परीक्षेच्या नजरेने बघू लागला. पण त्याला काही सुगावा लागला नाही. तो बिचारा ठरला. कोणावर संशय घ्यावा वा कुणाला त्याबद्दल पकडावे, हे त्याला काही कळेना. तो वेडा व्हायची पाळी आली. कुणावर राग काढावा, तेदेखील त्याला समजेना. शेवटी ज्याने अजिबात काहीही केलेले नाही अशा माणसाला, त्याच्या आक्रमकतेला बळी पडावे लागले. एका दुपारी तो एकटाच हॉटेलात नेहमीच्या जागी वाईट मनस्थितीत बसला होता. त्या बेटावर त्याच्याबद्दल सहानुभूती असलेला चॅपलीन हा एकच माणूस होता. तो त्याच्या शेजारी येऊन बसला. त्यांनी पेयांची मागणी नोंदवली व थोडा वेळ आता नजीकच्या काळात घेतल्या जाणाऱ्या शर्यतींबद्दल गप्पा मारल्या. मग चॅपलीन बोलला,"मला वाटते आपण सगळ्यांनी पैसे काढून नवीन ड्रेस शिवून घेतले पाहिजेत." लॉसन दुष्टपणे दबलेले हसू हसला. मिसेस चॅपलीनच्या हातात पैशांचे व्यवहार असतात, त्यामुळे तिला एखाद्या

प्रसंगासाठी नवीन फ्रॉक हवा असेल, तर ती काही नवऱ्याला पैशासाठी विचारत नसेल.

चॅपलीनने मित्रत्वाने विचारले, तुझी मिसेस कशी आहे?"

लॉसनने गडद भुवया चढवत विचारले, "ए भिकारड्या, तुला त्याच्याशी काय करायचे आहे?"

"मी तुला एक साधा प्रश्न विचारत होतो."

"ठीक आहे, तुझा साधा प्रश्न तुझ्यापाशीच ठेव."

चॅपलीन काही धीराचा मनुष्य नव्हता. त्याचे बेटावर अनेक वर्षे रहाणे, त्याची व्हिस्कीची बाटली आणि त्याच्या घरगुती भानगडी, यामुळे त्याचा स्वभाव लॉसनपेक्षाही जास्त प्रमाणात राग हाताबाहेर जाण्याचा होता.

"हे बघ, तू माझ्या हॉटेलात असतांना सभ्य माणसासारखा वागत जा. नाहीतर तू चाकू काढण्यापूर्वी तू रस्त्यावर असशील."

मान खाली घालून लॉसन लाल व काळा झाला.

तो चिडून धापा टाकत म्हणाला, "मला तुला एकदाच हे सांगू दे, की हे तू इतरांवर सोड. जर तुमच्यापैकी कुणी जर माझ्या बायकोवर वाईट नजर ठेवली, तर मग काय होईल, ते तुम्ही बघाच."

"तुझ्या बायकोच्या नादी कोण लागणार आहे?"

"तुला वाटते, तितका मी मूर्ख नाही. मला समोरची दगडी भिंत दिसते तसेच माणसांचे अंतरंगही दिसते. मी तुला सरळसरळ धमकी देतो, मी माझ्या बायकोबरोबरचे कुठलेही अयोग्य वर्तन खपवून घेणार नाही. असे झाल्यास, मी कुणाच्या जिवाचीही पर्वा करणार नाही."

“असे बघ, तू एकदा काय ते स्पष्ट बोल, आणि तू शांत झाल्यावर परत ये.”

लॉसन बोलला, “मला पाहिजे तेव्हा मी काय ते सांगेन. त्याआधी मिनिटभरदेखील नाही.”

ही कमनशिबी बढाई होती. कारण हॉटेलचा मालक म्हणून त्याच्याकडे असलेल्या अनुभवातून चॅपलीनने तो ज्या लोकांबरोबर मिळून मिसळून वागे, अशा सभ्य लोकांशी वागायचे विशिष्ट कसब प्राप्त केले होते. लॉसनच्या तोंडून शब्द बाहेर पडत नाहीत तोच, त्याला कॉलरला व दंडाला धरून, धसमुसळेपणे रस्त्यावर ढकलून देण्यात आले. तो पायऱ्यांवरून धडपडत, आंधळे करणाऱ्या सूर्याच्या उन्हात कोलमडला.

याचा परीणाम म्हणून, त्याचे इथेल बरोबर पहिले आक्रमक प्रकरण झाले. लाज वाटून तो हॉटेलमध्ये परत जाईना. त्या दुपारी तो नेहमीपेक्षा लवकर घरी गेला. घरी परत गेला, तेव्हा त्याने इथेलला बाहेर जायचे कपडे करतांना पाहिले. नेहमीप्रमाणे, ती गाउन घालून, पायात काही न घालून आणि काळ्याभोर केसात फूल माळून बाहेर न पडता, तिने पांढरे रेशमी मोजे घातले. उंच टाचांचे बूट घातले आणि तिचा सर्वात नवीन गुलाबी सुती ड्रेस घातला.

“तू स्वतःला फार शहाणी समजतेस का? तू कुठे चालली आहेस?”

मी क्रॉसलेमध्ये चालले आहे.”

“मी तुझ्याबरोबर येतो.”

तिने थंडपणे विचारले, “का?”

“मला सारखे तू आनंदाने इकडे तिकडे फिरलेले आवडत नाही.”

“मी तुला काही विचारलेले नाही.”

“मी त्याची काही पर्वा करत नाही. तू माझ्याशिवाय कुठे जाणार नाही आहेस.”

“मी तयार होईपर्यंत तू पडून रहा.”

तिला वाटले, तो प्यायला आहे आणि अंथरुणावर पडल्यापडल्या तो झोपून जाईल. तो खुर्चीत बसला आणि सिगरेट प्यायला लागला. ती त्याच्याकडे वाढत्या रागाने पाहू लागली. ती तयार झाली, तेव्हा तो उठला. त्यादिवशी बंगल्यात कुणी नव्हते. ब्रेव्हाल्ड शेतावर कामाला गेला होता. त्याची बायको अपियाला गेली होती.

इथेलने त्याला तोंड दिले.

“तू प्यायला आहेस. मी तुझ्याबरोबर कुठेही येणार नाही.”

“हे खोटे आहे. तू माझ्याशिवाय जाणार नाही आहेस.”

तिने खांदे उडवले व त्याच्या अंगावरून जाऊ लागली. पण त्याने तिचा हात पकडून ठेवला.

सामोन भाषेत अडखळत, ती बोलली, “ए राक्षसा, मला जाऊ दे.”

“तुला माझ्याशिवाय का जायचे आहे? मी तुला सांगितले ना, की माझ्याशी काही माकडचाळे चालणार नाहीत?”

तिने मूठ वळून त्याच्या चेहऱ्यावर मारली. त्याचा तोल गेला त्याचे सर्व प्रेम, सर्व द्वेष त्याच्यात उफाळून आले. तो भानावर राहिला नाही.

“मी तुला शिकवतो. मी तुला चांगले शिकवतो.”

त्याने घोडागाडीचा चाबूक घेतला आणि तिला मारू लागला. ती किंचाळू लागली. त्याने तो आणखी बिथरला आणि तिला अजून मारू लागला. तो मारतांना तिला शिव्या देत होता. मग त्याने तिला पलंगावर फेकले. ती हुंदके देत भीतीने व रागाने थरथरत राहिली. त्याने चाबूक फेकला व आणि खोलीबाहेर पडला. इथेलने त्याला गेलेले ऐकले आणि ती रडायची थांबली. तिने काळजीपूर्वक आजूबाजूला पाहिले. मग स्वतःला उठवले. तिला फार लागले नव्हते, पण सूज आली होती. तिचा ड्रेस फाटला होता. देशी बायकांना मार खायची सवय असते. त्याने काय केले त्यामुळे ती रागावली नाही. जेव्हा तिने आरशात स्वतःकडे पाहिले व केस सारखे केले, तिचे डोळे चमकत होते. त्यात एक निराळा भाव होता. कदाचित तिला त्याच्याबद्दल पूर्वी कधी नाही इतके प्रेम वाटले.

पण लॉसन आंधळेपणे जो बाहेर पडला, तो थेट शेतावर गेला आणि अचानक दमला. मुलासारखा धापा टाकत, एका झाडाखाली त्याने स्वतःला झोकून दिले. त्याला लाज वाटत होती व चमत्कारिक वाटत होते. त्याने इथेलचा विचार केला. त्याच्या कोवळ्या प्रेमात त्याची सर्व हाडे मऊ झाल्यासारखे त्याला वाटले. त्याने भूतकाळाचा, त्याच्या आशांचा विचार केला. त्याला त्याने जे केले, त्याची त्याला भीती वाटू लागली. त्याला ती पूर्वीपेक्षाही जास्त हवी होती. त्याला तिला मिठीत घ्यायचे होते. त्याला लगेच तिच्याकडे जायला हवे. तो उठला. तो इतका अशक्त झाला होता, की चालताना त्याचा तोल जात होता. तो घरात शिरला. ती तिच्या मोडक्या झोपायच्या खोलीत आरशासमोर बसली होती.

“ओहो, इथेल, मला क्षमा कर. मला माझी खूप लाज वाटते आहे. मला कळत नव्हते, मी काय करतो आहे.”

तो तिच्यापुढे गुडघ्यांवर बसला आणि भित्रेपणे तिच्या स्कर्टला हात लावला.

"मी काय केले, याचा विचार मला करवत नाही. हे भयंकर आहे. जगातील दुसऱ्या कुणावरही मी तुझ्याइतके प्रेम करत नाही. तुझे दुःख कमी व्हावे म्हणून, मी काहीही करायला तयार आहे. मी तुला मारले आहे. मी मला कधीच क्षमा करू शकणार नाही. पण कृपया तू म्हण, की तू मला क्षमा केली आहेस."

त्याला अजूनही तिच्या किकाळ्या ऐकू येत होत्या. ते सहन करणे अवघड होते. त्याच्या गालावरून अश्रू ओघळत होते. त्याने तिचे हात हातात घ्यायचा प्रयत्न केला. त्याच्या लज्जित अवस्थेत, त्याने त्याचा चेहरा तिच्या मांडीवर ठेवला. त्याचे शरीर हुंदक्यांबरोबर गदगदत होते. तिच्या चेहऱ्यावर असे भाव आले, की तो तिचा विचार करायच्याही लायकीचा नाही. त्याला तिच्यासमोर असे रडतांना पाहून तिला देशी बाईप्रमाणे दुःख झाले. बिचारा प्राणी! क्षणभर ती असा विचार करायच्या काठावर आली, की त्याच्यात काहीतरी आहे. त्याने कुत्र्यासारखी तिच्या पायाशी लोळण घेतली. तिने त्याला रागाने लाथ मारली.

"चालता हो. मी तुझा द्वेष करते."

त्याने तिला पकडायचा प्रयत्न केला. पण तिने त्याला ढकलून दिले. ती उभी राहिली व तिचा ड्रेस काढू लागली. तिचे बूट तिने लाथाडले. आणि पायातून मोजे काढून टाकले. मग तिने तिचा जुना गाउन घातला.

"तू कुठे चालली आहेस?"

“तुला त्याच्याशी काय करायचे आहे? मी तलावावर चालले आहे.”

तो म्हणाला, “मलाही येऊ दे.”

त्याने तो लहान मुलगा असल्यासारखे विचारले.

“तू मला तेवढेही करून देणार नाहीस का?”

त्याने विचित्रपणे रडत, त्याच्या हातात त्याचा चेहरा लपवला. ती थंड, कडक डोळ्यांनी त्याला ओलांडून निघून गेली.

त्या वेळेपासून ती त्याला तुच्छ समजू लागली. लॉसन, इथेल, दोन मुले, ब्रेव्हाल्ड, त्याची बायको व आई यांच्याबरोबर लहानशा बंगल्यात गर्दी करून रहातांना, फोल नाती व वरवरचे संबंध नेहमीच राहिले. त्यांना जवळजवळ तसे रहावेच लागले. लॉसन तिथे काही कारणाशिवाय कोणाच्या खिसगणतीत नसल्यासारखा राहिला. तो सकाळच्या न्याहारीनंतर बाहेर पडे. आणि फक्त जेवायला घरी येई. त्याने भांडणे सोडून दिले. आणि जेव्हा पैसे नसल्याने तो इंग्लिश क्लबमध्ये जाऊ शकत नसल्यामुळे, तो ब्रेव्हाल्ड किंवा देशी लोकांबरोबर मनापासून काही ना काही खेळत राहिला. फक्त तो प्यायलेला असे, तेव्हा तो दमल्यासारखा व घाबरल्यासारखा असे. इथेल त्याला कुत्र्यासारखे वागवी. कधीकधी ती त्याच्या रानटी वासनेला शरण जाई. त्यांच्यातील द्वेषाची तेढ तिला घाबरवून टाके. पण जेव्हा नंतर तो भीतीने शरण येई व शोक करू लागे, तेव्हा तिला त्याचा इतका राग येई, की तिने कदाचित त्याच्या थोबाडीतदेखील दिली असती. कधी तो आक्रमक होत असे. पण आता तिला त्याची सवय झाली होती. तो जेव्हा तिला मारायला बघे, तेव्हा ती

लाथा मारून त्याला थोडेसे ओरबाडे. त्यांच्या भयानक माऱ्यामाऱ्या चालत. त्यात नेहमी तो जिंके, असे नव्हे. लवकरच हे सर्व अपियाभर पसरले की त्यांचे संबंध फारच वाईट झाले आहेत. लॉसनबद्दल फार कमी लोकांना सहानुभूती होती.

आणि हॉटेलमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात असे, की ब्रेव्हाल्डने त्याला अजून घरातून हाकलून कसे दिले नाही.

एक मनुष्य बोलला, "ब्रेव्हाल्डचा फार कुरूप पाहुणा! एखाद्या दिवशी त्याने लॉसनला ठार केले, तर मला काही नवल वाटणार नाही."

अजूनही इथेल संध्याकाळी पोहायला तलावावर जात असे. त्याचे तिला फार आकर्षण होते. ते मानवी नसावे, तर एखाद्या जलपरीला थंड पाण्याची आत्ममग्न ओढ असावी तसे ते होते. कधीकधी लॉसनही जात असे. मला माहिती नाही, त्याला का जावेसे वाटे. कारण तो आला, की इथेलची चिडचिड होई. तो तिथे जाण्याचे कारण असे असू शकेल, की त्याने तिला प्रथम पाहिले त्या जागी त्याच्या हृदयाला पडलेले भोक कदाचित शिवले जाईल, अशी त्याला आशा वाटे. त्याच्या प्रेमाने किंवा प्रेमाशिवायच्या वेडेपणाने, त्याचे हट्टीपण ते प्रेम पुन्हापुन्हा आठवे. एक दिवस तो तिथे त्याला अलीकडे न वाटणाऱ्या भावनेने पाण्यात उतरला. त्याला अचानक जगातील शांतता प्रतीत झाली. संध्याकाळ संपत आली होती लहानशा पातळ ढगासारखा, संधीप्रकाश झाडांवर रेंगाळत होता. आवाज न करता मंद झुळूक वहात होती. त्यावर आकाशात चंद्रकोर होती. त्याने इथेलला पाण्यात पाठीवर पोहतांना पाहिले. तिचे केस डोक्याभोवती पसरले होते. तिने हातात एक मोठे जास्वंदीचे फूल धरले होते. तिला वाखाणण्यासाठी तो क्षणभर थांबला. ती ओफेलीयासारखी दिसत होती.

तो आनंदाने ओरडला, “हॅलो, इथेल.”

तिने अचानक काही हालचाल करून, फूल टाकून दिले. ते तरंगत दूर गेले. तिने काठ जवळ येईपर्यंत दोन चार हात मारले आणि उभी राहिली.

ती बोलली, “निघून जा. इथून निघून जा.”

तो हसला.

“स्वार्थीपणा करू नकोस. आपल्या दोघांसाठी भरपूर जागा आहे.”

“तू मला एकटे का सोडत नाहीस? मला एकटीला रहायचे आहे.”

तो चांगल्या भावाने उत्तरला, “ते जाऊ दे. मला स्नान करायचे आहे.”

“जा. पुलावर जा. मला तू इथे नको आहेस.”

अजूनही हसत तो म्हणाला, “मी जाऊ शकत नाही.”

तो अजिबात रागावला नव्हता. त्याला ती भावनेच्या भरात असल्याचे दिसले नाही. तो त्याचा कोट काढू लागला.

ती किंचाळली, “इथून चालू पड. मला तू इथे नको आहेस. तू तेवढेही करू शकत नाहीस का? निघून जा.”

“प्रिये, असे काय करतेस?” तिने खाली वाकून टोकेरी दगड घेतला आणि लगेच त्याच्यावर मारला. त्याला बुडी घायला वेळ मिळाला नाही. जोराने ओरडत त्याने हात कपाळाशी नेला आणि तो काढला, तेव्हा तो रक्ताळला होता. इथेल स्तब्ध झाली. रागाने ती धापा टाकत होती. तो फिका पडला. एकही शब्द न बोलता, कोट घेऊन, तो निघून गेला. इथेल परत पाण्यात शिरली. झऱ्याने तिला हळूहळू उथळ पाण्याकडे नेले.

दगडाने त्याला चांगली जखम झाली होती. काही दिवस लॉसनला डोक्याला पट्टी बांधून फिरावे लागले. क्लबमधील लोक विचारू लागले, तेव्हा त्याने एका गोष्टीचा मनाशी शोध लावून ठेवला होता. पण त्याला ती सांगायची वेळ आली नाही. कोणी त्याबद्दल काही विचारले नाही. त्यांनी त्याना त्याच्या डोक्याकडे चोरून कटाक्ष टाकतांना पाहिले. पण ते काही बोलले नाहीत. शांततेचा अर्थ होता, की त्याना ती कशी झाली, ते माहिती होते. आता त्याची खात्री झाली, की इथेलचा कुणी प्रियकर होता. आणि त्या सगळ्यांना माहिती होते, की तो कोण होता. पण कोणीही त्याला तसे जराही सुचवत नव्हते. त्याने इथेलला कधी कुणाबरोबर पाहिले नाही, कोणी तिच्याबरोबर असण्याची इच्छाही दाखवली नाही. किंवा त्याच्याबरोबर काही विचित्र वर्तन केले नाही. तो रानटीपणे रागावला. तो राग ज्याच्यावर काढावा, असे कुणी नसल्याने, तो वाटेल तसे पित सुटला. मी बेटावर यायच्या थोडे आधी त्याला त्याला अती दारुमुळे, ताप येऊन मन भरकटणे व भास होणे, असा आजार झाला होता. मला कॅस्टर नावाच्या माणसाच्या घरी इथेल भेटली. तो अपियापासून दोन तीन मैलांवर त्याच्या देशी बायकोबरोबर रहात असे. मी त्याच्याबरोबर टेनिस खेळत असे. आम्ही जेव्हा दमत असू, तेव्हा तो एखादा कप चहा प्यायचे सुचवी. आम्ही घरात गेलो आणि गबाळ्या हॉलमध्ये इथेल मिसेस कॅस्टरबरोबर गप्पा मारत बसलेली दिसली.

तो म्हणाला, "हॅलो इथेल, मला माहिती नव्हते, तू इथे आहेस."

मी तिच्याकडे उत्सुकतेने पाहू लागलो. लॉसनने नुकसानकारक भावपूर्णतेने तिच्या प्रेमात पडावे, असे तिच्यात काय होते. पण अशा गोष्टी कोण स्पष्ट करू शकते? ती सुंदर होती, हे खरे होते. ती सामोआमधील लाल

जास्वंदीचे डौलदार, आल्हादक, भावविभोर फूल होती. पण मला सर्वात आश्चर्य कसले वाटले तर, त्यांची गोष्ट लक्षात घेता, मला खूपसे माहिती होते. तिचा ताजेपणा, व साधेपणा! ती शांत होती आणि थोडी लाजरीही होती. तिच्यात आततायीपणा वा आक्रमकता नव्हती. देशी लोकांमध्ये सहसा दिसणारी, उत्सुक वृत्ती नव्हती. आणि यावर विश्वास ठेवणे कठीण होते, की नवरा बायकोत भयंकर प्रकार घडून येण्यासाठी, ती दुसऱ्यावर वर्चस्व गाजवणारी व आक्रमक होती. पण तसे ते घडत असल्याचे, आता सगळ्यांना माहिती होते. तिच्या छानशा गुलाबी फ्रॉकमध्ये ती युरोपियन असल्यासारखीच दिसे. ज्यात तिला घरच्यासारखे वाटे, त्या देशी काळ्या पार्श्वभूमीवर तुम्ही क्वचितच अशी कल्पना करू शकला असता. ती बुद्धिमान होती, अशी कल्पना मी केली नव्हतीच पण काही काळ तिच्याबरोबर राहिल्यावर, तिच्याबद्दल वाटणारी आत्यंतिक ओढ कंटाळ्यात बदलेल, अशीही कल्पनाही मी केली नव्हती. त्याचे मला आश्चर्य वाटले. या गोष्टीने मला सुचवले, की एखादा विचार मनात सुचावा आणि त्याला शब्दरूप देण्यापूर्वी तो हवेत विरून जावा, तसे काहीसे तिच्या दिलखेचकपणामध्ये आणि विशिष्ट गोडव्यात होते. कदाचित ती नुसती कल्पनाच होती. जर मला तिच्याविषयी काहीच माहिती नसते, तर मला ती मिश्र जातीची इतरांसारखीच पण एक सुंदर मुलगी वाटली असती.

जरी मी पापासिआमधील पाण्यातील खडकावरून घसरलो नसलो आणि त्या गावंढ्या गावात रहायचे ठरवले नसले, तरी सामोआमधील लोक पाहुण्यांबरोबर बोलतात, त्या हवापाणी, प्रवास अशा निरनिराळ्या गोष्टी ती माझ्या बरोबर बोलली. ती स्कॉटलंडबद्दल बोलली. कदाचित मला तिच्यात तिच्या त्या भागाचे अतिशयोक्तपणे आरामशीर व श्रीमंत

असल्याचे वर्णन करायची मानसिकता सापडली. तिने मला शहाणपणा नसल्यासारखे विचारले, की ज्यांना ती ओळखत होती, त्या मिसेस अमुक आणि मिसेस तमुक यांना मी ओळखतो का.

जर्मन अमेरिकन मिलर आल्यावर त्याने आपुलकीने सर्वांशी हातमिळवणी केली आणि त्याच्या आनंदी, मोठ्या आवाजात व्हिस्की व सोड्यासाठी विचारले. तो फार जाड होता आणि त्याच्या अंगावरून सतत घाम गळत असे. त्याने त्याचा सोनेरी काड्यांचा चष्मा काढून पुसला. तेव्हा तुम्हाला दिसले, की मोठ्या, गोल काचांमागे असलेले त्याचे चांगले, दयाळु लहानसे डोळे लबाड आणि गर्विष्ठ होते. तो येईपर्यंत तिथे फारसे चैतन्य नव्हते. पण तो चांगल्यापैकी गोष्टी सांगणारा, आनंदी व मैत्रीपूर्ण होता. लवकरच त्याला दोन बायका होत्या. इथेल आणि माझ्या मित्राची बायको. त्या दोघी त्याच्या घरामध्ये बसून, आनंदाने हसत होत्या. बेटावर मिलरची कीर्ती बायकांचा पुरुष, अशी होती आणि तुम्ही बघाल, की कसा हा जाड, वयस्क, कुरूप माणूस अजून बायकांना भूल पाडू शकतो. त्याचा विनोद त्याच्याबरोबरच्या लोकांना समजण्यासारखा होता, बळकट आणि कृतीशील असे ते प्रकरण होते. त्याचे पाश्चिमात्य उच्चार त्याच्या बोलण्याला एक विशिष्ट वळण देत. शेवटी तो माझ्याकडे वळला.

“ठीक आहे, जर आपल्याला जेवायला परत यायचे असेल, तर आता निघायला हवे. तुला आवडत असेल, तर तुला मी माझ्या मोटारीत घेतो.

मी त्याचे आभार मानत उठलो. त्याने इतरांशी हातमिळवणी केली. बळकट आणि मोठा असा तो, खोलीबाहेर जाऊन, गाडीत बसला.

आम्ही निघाल्यावर, मी वाटेत म्हणालो, “लॉसनची बायको छान छोटीशी आहे. पण तो तिला ज्या पद्धतीने वागवतो, ते फार वाईट आहे. तो तिला मारतो. जेव्हा मी बायकांना मारणारे पुरुष बघतो, तेव्हा माझ्या अंगावरचे केस उभे रहातात.”

आम्ही थोडे पुढे गेल्यावर, तो म्हणाला, “तिच्याशी लग्न करणारा तो फारच मूर्ख होता. तेव्हाही मी हे बोललो होतो. जर तो तसा नसता, तर त्याने तिला चाबकाने मारले नसते. तो जणू मिश्र जातीचा आहे, मिश्र जातीचा.”

वर्ष संपत आले होते. मी सामोआ सोडण्याची वेळ जवळ आली होती. माझी सिडनीला जाणारी बोट चार जानेवारीला होती. योग्य ते समारंभ करून, हॉटेलमध्ये नाताळ साजरा झाला. त्याकडे नवीन वर्षाच्या समारंभाचा सराव म्हणून बघितले गेले. तेव्हा जमणाऱ्या लोकांनी ठरवले, की नवीन वर्षाची रात्र जागून काढायची. गाजावाजा करत जेवण झाले. मग थोडे रेंगाळणे झाले. सगळेजण साध्या इंग्लिश क्लबमध्ये पूल खेळण्यासाठी गेले. तिथे खूप गप्पाटप्पा, हसणे, काही पैजा लावणे व थोडासा खेळ झाला. फक्त मिलर सोडून बाकी त्याच्याहून लहान असणाऱ्या सगळयांनी भरपूर दारू प्यायली. पण त्याच्या डोळयांचा उत्साह व हातांची खात्री कमी झाली नाही. त्याने तरुणांचे पैसे विनोद करत, उदारपणे परत त्यांच्या खिशात टाकले. यानंतर तासाभराने, मी दमलो व बाहेर पडलो. मी रस्ता ओलांडला आणि समुद्रकिनाऱ्यावर आलो. तिथे तीन चंद्रमुखी स्त्रिया जणु त्यांचा प्रियकर समुद्रावर स्वार होण्याची वाट बघत थांबल्यासारखी, लगूनचे व रात्रीच्या ताऱ्यांचे निरीक्षण करणारी, तीन नारळाची झाडे उगवली होती.

संध्याकाळभर लॉसन कुठे होता, कुणास ठाऊक! पण निरुत्साहाने व कंटाळल्यासारखा, विचित्रपणे थोडा लाजत, धूळभरल्या, रिकाम्या रस्त्याने, दहा ते अकराच्या दरम्यान तो क्लबमध्ये आला. बिलियर्डच्या खोलीत जाण्यापूर्वी तो बारमध्ये गेला आणि पेयपान केले. त्याला तिथे जमलेल्या खूप गोऱ्या लोकांमध्ये जाऊन मिसळायला लाज वाटत होती. आत्मविश्वास येण्यासाठी त्याला व्हिस्कीच्या कडक डोसची गरज होती. तो हाताचा शर्ट घालून, अजूनही त्याचा पेला घेऊन उभा होता. त्याने बारमधील पेये देणाऱ्या माणसाकडे नजर टाकली.

तो बोलला, "जॅक, बाहेर ये."

पांढरे जाकीट व लावा-लावा घातलेला बारमधील पेये देणारा माणूस काही न बोलता छोट्याशा खोलीतून बाहेर आला.

तो मोठा अमेरिकन म्हणाला, "इकडे बघ, लॉसन, मला तुझ्याशी थोडे बोलायचे आहे.

"या भिकार बेटावर इथे आज फुकट मिळणाऱ्या काही गोष्टींपैकी ही एक आहे."

मिलरने त्याचा सोनेरी काड्यांचा चष्मा नाकावर नीट बसवत, लॉसनकडे थंड, रोखलेल्या नजरेने पाहिले. "असे बघ, तरुण माणसा, मला समजले, की तू मिसेस लॉसनला परत मारत आहेस. मी हे सहन करणार नाही. हे ताबडतोब थांबवले नाहीस, तर तुझ्या घाणेरड्या शरीरातील प्रत्येक हाड मी मोडून टाकेन."

मग लॉसनला कळले, की तो इतका काळ काय शोधत होता. तो मिलर होता. त्या टक्कल पडलेल्या, जाड्या, गोल चेहऱ्याच्या, दुहेरी

हनुवटीच्या, सोनेरी काड्यांचा चष्मा असलेल्या, उद्धट नजरेच्या, सभ्य व दयाळू आणि तत्वे पायदळी तुडवणाऱ्या धर्मगुरुसारख्या अशा त्या माणसाला बघून, त्याला बारीक, कुमारीकेसारख्या असणाऱ्या इथेलचा विचार मनात आला व तो अचानक शहारला. त्याच्या काही चुका असल्या तरी लॉसन भित्रा नव्हता. आणि एकही शब्द न बोलता त्याने मिलरवर आक्रमकपणे हल्ला केला. मिलरने पेला असलेल्या हाताने, तो गुद्दा परतवण्याचा प्रयत्न केला. त्याच्या उजव्या हाताच्या झोक्याने त्याने लॉसनच्या कानावर गुद्दा मारला. त्या अमेरिकनपेक्षा लॉसन चार इंचाने बुटका होता. आणि तितकासा बळकट नव्हता, तर अशक्त आणि नाजूक होता. फक्त आजारपणाने नव्हे तर निरुत्साही बनवणाऱ्या समशीतोष्ण हवामानामुळे आणि पेयपानामुळे! बारच्या पायरीशी तो एखाद्या ओंडक्यासारखा अर्धवट गुंगीत पडला. मिलरने चष्मा काढला आणि रुमालाने पुसला.

"मला वाटते, आता तुला कळले असेल, की कसली अपेक्षा करायची. तुला तंबी मिळाली आहे, ती पाळ."

त्याने त्याचा पेला हातात धरुन परत बिलीयर्डची खोली गाठली. तिथे इतका आवाज होता, की काय झाले, हे कुणालाच कळले नाही. लॉसन उठला व अजून दुखणाऱ्या कानाशी हात नेला. मग तो क्लबबाहेर पडला.

रात्रीच्या अंधारात एका गोऱ्या माणसाला मी रस्ता ओलांडतांना पाहिले. पण तो कोण होता, ते मला समजले नाही. तो समुद्रकिनाऱ्याशी आला. झाडाखाली बसलेल्या मला ओलांडून तो गेला व खाली बघू लागला. मग मला तो लॉसन असल्याचे कळले. पण तो नक्कीच प्यायलेला होता, त्यामुळे काही बोलला नसावा. तो गेला. तो संभ्रमावस्थेत दोन तीन

पाऊले चालला आणि मागे फिरला. तो माझ्याकडे आला आणि वाकून, माझा चेहरा बघितला.

तो म्हणाला, “मला वाटलेच, की तू आहेस.”

तो बसला व त्याचा पाइप काढला.

मी म्हणालो, ‘क्लबमध्ये गरम होत होते आणि फार गडबड होती.”

“तू इकडे का बसला आहेस?”

“मी चर्चच्या मध्यरात्रीच्या समूहप्रार्थनेसाठी थांबलो आहे.”

“जर तुला चालणार असेल, तर मी तुझ्याबरोबर येतो.”

लॉसनला दारू चढलेली नव्हती. आम्ही शांतपणे थोडावेळ पाइप ओढत बसलो. लगूनमध्ये एका मोठ्या माशाची वळवळ चालू होती. जेट्टीपासून थोड्या अंतरावर एका बोटीचा उजेड दिसत होता.

त्याने विचारले, “पुढच्या आठवड्यात तू परत चालला आहेस?”

‘हो.”

“परत एकदा घरी जाण्यात आनंद असेल. पण मला आता ते सहन होणार नाही. तुला कळले असेल, मी थंडीबद्दल बोलतो आहे.”

मी बोललो, “इंग्लंडमध्ये आता ते शेकोटीभोवती कुडकुडत बसले असतील.”

वारा अजिबात पडला होता. रात्रीच्या सुगंधाची मोहिनी पसरली होती. मी फक्त पातळसा शर्ट आणि सूट घातला होता. मी रात्रीच्या सुंदर शांतपणाचा आनंद उपभोगत होतो आणि हात आल्हादकपणे ताणत होतो.

मी हसत म्हणालो, “एखाद्याला भविष्यकाळासाठी काही नवीन निश्चय करायला लावेल, अशी ही नवीन वर्षाची संध्याकाळ नाही.”

त्याने काही उत्तर दिले नाही. पण माझ्या सहज बोलण्याने त्याच्या डोक्यात काय विचार घोळू लागले कुणास ठाऊक, पण त्याने बोलायला सुरवात केली. तो खालच्या आवाजात, काही हावभाव न करता, पण अस्खलित उच्चारांसकट बोलत होता. काही काळ माझ्या कानांवर अत्याचार करणाऱ्या, मारामारी व शिवीगाळीनंतर त्याला ऐकणे, म्हणजे माझ्या मनात सुटकेचा भाव होता.

“मी फार वाईट राडा केला आहे. पण ते तसे होणारच होते, नाही का? मी खोल खड्ड्यात पडलो आहे आणि त्यातून वर यायचा काही मार्ग मला सापडत नाही. हा पूर्णपणे अंधारी खड्डा आहे.” हे बोलताना तो हसत होता. “आणि विचित्र गोष्ट ही आहे, की मी कुठे चुकलो, हेच मला कळत नाही.”

मी माझा श्वास रोधून धरला. जेव्हा माणसाला त्याच्या आत्म्याचा नागडेपणा जाणवून, तो ते आपल्याला दाखवतो, तेव्हा त्यासारखे लाजीरवाणे दुसरे काही नाही. तुम्हाला वाटते, की कुणीच इतके क्षुल्लक नसेल. पण त्याच्यात असे काही होते, की आपला दयाभाव जागा व्हावा.

जर मला समजले असते, की ही सगळी माझी चूक आहे, तर हे इतके टोकाला गेले नसते. हे खरे आहे, की मी प्यायचो. पण गोष्टी वेगळ्या झाल्या असत्या, तर मी वेगळा वागलो असतो. खरे तर मी दारूचा इतका चाहता नव्हतो. मला वाटते, मी इथेलशी लग्न करायलाच नको होते. तसे केले असते, तर बरे झाले असते. पण माझे तिच्यावर इतके प्रेम होते.”

त्याचा आवाज कापू लागला.

खरे तर ती इतकी वाईट नव्हती. हे आमचे दुर्दैव होते. कदाचित आम्ही एखाद्या उमरावाइतके सुखी झालो असतो. जेव्हा तिने दार लावून घेतले तेव्हा मी तिला सोडून द्यायला हवे होते. पण मी तसे करू शकलो नाही. मी फार हट्टाला पेटलो होतो. आणि तिच्या पोटात मूल होते.”

“तुला तुझ्या मुलाचा लळा आहे का?”

“मला होता. मला दोन मुले आहेत. पण आता मला त्यांचे काही विशेष वाटत नाही. तुम्हाला ती देशी मुलेच वाटतील --- मला त्यांच्याशी सामोआमध्ये बोलावे लागते.”

“तुला पुन्हा नव्याने सर्व सुरु करणे, जमेल का? की सर्वांवर लाथ मारून ती जागा सोडणे तू पसंत करशील?”

“आता मला काही शक्ती उरली नाही. मी संपलो.”

“तुझे तुझ्या बायकोवर अजून प्रेम आहे का?

“आता नाही. आता नाही.” हे शब्द उच्चारताना त्याच्या आवाजात भीती होती.

“आता माझे तिच्यावर प्रेम उरले नाही. मी आता हरलो. तिच्या प्रेमातून बाहेर पडलो.”

चर्चच्या घंटा वाजत होत्या.

मी म्हणालो, “तुला खरेच मध्यरात्रीच्या प्रार्थनेला यायचे असेल, तर आपण आता निघालेले बरे.”

“चल.”

आम्ही उठून रस्त्याने चालू लागलो. पांढरे चर्च समुद्राकडे तोंड करून दिमाखात उभे होते. बाजूची प्रोटेस्टंट प्रार्थनास्थळे एकत्र घरे असल्यासारखी दिसत होती. रस्त्यावर दोन तीन गाड्या उभ्या होत्या आणि भिंतीच्या कडेने खूपसे पिंजरे लावले होते. बेटाच्या सर्व भागातून लोक सेवा करण्यासाठी आले होते. मोठ्या उघड्या दारातून, गर्दी दिसत होती. उंचावरील येशूची मूर्ती प्रकाशात झगमगत होती. तिथे थोडे गोरे लोक व खूपसे मिश्र जातीचे लोक होते. पण सर्वात जास्त देशी लोक होते. लावा-लावा चांगले दिसत नाही, असे चर्चने ठरवल्यामुळे, सगळ्या माणसांनी पँट घातली होती. मागील बाजूस उघड्या दाराजवळ आम्हाला खुर्च्या दिसल्या. आम्ही त्यावर बसलो.

लॉसनची नजर जिथे होती, तिथे मी पाहिल्यावर मला खूपशा मिश्र जातीच्या लोकांबरोबर इथेल दिसली. त्या सर्वांचे पोषाख चांगले होते. पुरुष उंच कडक कॉलरमध्ये आणि चकाकणाऱ्या बुटात होते, तर बायकांनी मोठ्या आनंदी टोप्या घातल्या होत्या. आमच्या बाजूने जातांना, इथेल तिच्या मैत्रिणींकडे मान हलवून हसली. धर्मार्थ सेवा सुरु झाली.

जेव्हा ती संपली, तेव्हा लॉसन आणि मी, गर्दीबाहेर पडतांना बघण्यासाठी, एका कडेला उभे राहिलो. मग त्याने त्याचा हात हलवला.

तो म्हणाला, “शुभ रात्र. तुझा घरी जाण्याचा प्रवास सुखाचा होवो.”

“पण मी जाण्यापूर्वी तुला भेटेन.”

तो रागावल्यासारखा मंद हसला.

“पण मी दारू प्यायलो आहे का नाही, यावर ते अवलंबून राहील.”

तो वळला आणि गेला. मला त्याचे विस्कटलेल्या, दाट भुवयांखालील ते मोठे रानटीपणे चकाकणारे, काळे डोळे आठवत राहिले. काय करावे याबद्दल खात्री नसल्याने मी थांबलो. मला झोप येत नव्हती. मी विचार केला, की जायला निघण्यापूर्वी तासभर क्लबमध्ये जाऊन काय चालले आहे, ते पहावे. मी जेव्हा तिथे गेलो, तेव्हा बिलीयर्डची खोली रिकामी होती. पण पाच सहा लोक बाहेर मोकळ्या जागी टेबलाभोवती पोकर खेळत, बसले होते. मी तिथे गेल्यावर मिलरने वर पाहिले.

तो बोलला, "बस आणि खेळ."

"ठीक आहे."

मी काही वेफर्स आणले व खेळू लागलो. अर्थात तो जगातील मोठा दिलखेचक खेळ होता. माझा तासाभराचा वेळ वाढून दोन व नंतर तीन तासांचा झाला. पेये देणारा आनंदी व टक्क जागा असणारा देशी माणूस किती वाजले, याचा विचार न करता, आम्हाला पेये द्यायला तयार होता. कुठून तरी त्याने डुकराच्या मासाचा व पावाचा तुकडा आणला. आम्ही खेळत राहिलो. त्यांच्या तब्येतीसाठी जेवढी बरी, त्यापेक्षा खूप जास्त दारू लोक प्यायले. खेळ आरडाओरडा करत कसाही चालला होता. मी जिंकण्याची वा हरण्याची फारशी पर्वा न करता, नम्रपणे खेळत होतो. पण मला मिलर खूप रस घेऊन खेळतांना दिसला. तो सगळ्यांबरोबर पेल्यामागून पेले रिचवत होता. पण शांत व डोक्याने स्थिर होता. त्याचा वेफर्सचा ढीग वाढला होता. आणि त्याच्यासमोरील एका चांगल्या कागदावर, त्याने दुःखाने कोणाकोणाला किती पैसे दिले, ते लिहून ठेवले होते. तो ज्यांच्याकडून पैसे घेत होता, त्या तरुण माणसांवर तो खुशीने डाफरत होता. पण खेळात तो अजिबात चुकत नव्हता. त्याच्या नजरेतून

काही सुटत नव्हते. शेवटी खिडकीतून हळूवारपणे, लाजाळूपणे दबत, जणू तिला तिथे काहीच काम नसल्यासारखी पहाटेची चाहूल लागली. मग दिवस उजाडला.

मिलर बोलला, “मी समजतो, की आपण आपल्या दिमाखदार पद्धतीने गेले वर्ष सरतांना पाहिले आहे. आता आपण लकी ड्रॉ काढू. माझ्यासाठी मच्छरदाणी. मी आता पन्नासचा झालो. आता मला इतकी जागरणे झेपणार नाहीत.”

व्हरांड्यात उभे राहून, आम्ही ताजी, सुंदर सकाळ पाहिली. लगून रंगीबेरंगी काचेसारखे दिसत होते. कुणीतरी झोपण्यापूर्वी पाण्यात डुबकी घायचे सुचवले. पण कुणी पायाला फसवेपणे चिकटणाऱ्या वाटेने जायला व लगूनमध्ये अंघोळीला तयार नव्हते. दाराशी मिलरची गाडी उभी होती. त्याने सगळ्यांना त्यात बसायला लावले. आम्ही उड्या मारून आत बसलो व सुनसान रस्त्याने निघालो. आम्ही तलावाशी पोचलो, तेव्हा तिथे दिवस नुकताच उगवतांना दिसला. पाण्यात झाडांच्या सावल्या पडल्या होत्या. तिथे अजून रात्रीचा अंमल चालू होता. आम्ही अगदी उत्साहात होतो. आमच्याकडे पोहायचे कपडे वा टॉवेल नव्हते आणि माझ्या काळजीपूर्वकतेने, मी नवल करत होतो, की आम्ही आम्हाला कोरडे कसे करणार आहोत. आमच्या कोणाच्याच अंगावर फारसे काही नव्हते. आम्हाला ते काढायला फारसा वेळ लागला नाही. नेल्सन, तो जहाजावरील सामानाचा छोटासा राखणदार, प्रथम नग्न झाला.

तो बोलला, “मी तळाशी चाललो.”

त्याने सूर मारला. त्याच्यापाठोपाठ, अजून एकाने सूर मारला. पण तो त्याच्यापेक्षा लवकर बाहेर आला. मग नेल्सन बाहेर आला आणि लपतछपत, एका बाजूला गेला.

“मला एकटे सोडा.”

“काय झाले?”

नक्की काहीतरी झाले होते. त्याचा चेहरा घाबरलेला होता. दोघांनी त्याला हात दिला आणि तो घसरू लागला.

“तिथे खाली एक मनुष्य आहे.”

“मूर्खासारखे बरळू नकोस. तू प्यायला आहेस.”

“ठीक आहे, जर कोणी नसेल, तर मला अती दारुमुळे, ताप येऊन मन भरकटणे व भास होणे, असा आजार झाला. पण मी तुम्हाला सांगतो, तिथे खाली एक मनुष्य आहे. त्याला बघून मी फार घाबरलो.”

मिलरने त्याच्याकडे क्षणभर पाहिले. तो पूर्ण पांढरा पडला होता. तो थरथरत होता.

तो मोठ्या ऑस्ट्रेलीयनला म्हणाला, “आपण खाली जाऊन बघू या.”

नेल्सन बोलला, “तो कपडे घातलेला व उभा होता. मी त्याला पाहिले. त्याने मला पकडायचा प्रयत्न केला.”

मिलर म्हणाला, “चल, तयार हो. तयार आहेस का?”

त्यांनी पाण्यात सूर मारला. आम्ही शांतपणे किनाऱ्यावर थांबलो. एखादा माणूस पाण्याखाली जेवढा श्वासोच्छवास करू शकेल, त्यापेक्षा

जास्त वेळ, ते पाण्याखाली होते. मग कॅस्टर वर आला. आणि त्याच्यापाठोपाठ त्याला फीट येत असल्याप्रमाणे लाल चेहऱ्याने मिलर आला. ते त्यांच्यामागे कुणाला तरी ओढत होते. दुसऱ्या माणसाने त्यांना मदत करण्यासाठी उडी मारली. तिघांनी मिळून ते ओझे बाजूला नेले. त्यांनी ते सरळ केले. मग आम्ही बघितले, तो लॉसन होता. त्याने त्याच्या कोटाला मोठा दगड बांधला होता आणि पाय बांधले होते.

त्याच्या डोळ्यांवरील पाणी निपटत, मिलर म्हणाला, "त्याने चांगले काम केले आहे."

# Mackintosh
# मॅकिन्टॉश



त्याने समुद्राच्या पाण्यात काही मिनिटे सपासप हात मारले. पोहायला ते फारच उथळ होते आणि शार्कच्या भीतीने तो खोल पाण्यात जाऊ शकत नव्हता. मग तो बाहेर आला व शॉवर घेण्यासाठी, बाथरूममध्ये गेला. प्रशांत महासागराच्या खारट चिकट पाण्यानंतर हे ताजे पाणी छान आणि उबदार वाटत होते. जरी आताशी कुठे सात वाजून गेले होते, तरी समुद्रात पोहणे फारसे सुखावह वाटत नव्हते. तर ते तुमचा थकवा वाढवत होते. तो अंग कोरडे करून गाउनमध्ये शिरला. त्याने चिनी स्वयंपाक्याला

हाक मारून सांगितले, की तो पाच मिनिटात न्याहारीसाठी येतो आहे. ती छान राखलेली हिरवळ आहे असे तेथील व्यवस्थापक असलेल्या वॉकरला अभिमानपूर्वक वाटत असे. पण खरे तर खडबडीत असलेल्या त्या गवतात अनवाणी पायांनी चालत तो त्याच्या रहायच्या जागेकडे गेला व कपडे केले. याला फार वेळ लागला नाही. कारण त्याने फक्त शर्ट व पँट घातली. तो दुसऱ्या टोकाला असलेल्या बॉसच्या घरी गेला. ते दोघे जेवण एकत्र घेत असत. पण चिनी स्वयंपाक्याने सांगितले, की वॉकर घोड्यावरून फेरफटका मारायला गेला आहे व अजून तासभर तरी परत येणार नाही.

मॅकिन्टॉश खूप झोपला. त्याच्यासमोर ठेवलेली अंडी, सिताफळे व डुकराचे भाजलेले मास, याकडे त्याने अरुचीने पाहिले. त्या रात्री बेसुमार डास होते. तेथे लावलेल्या मोठ्या मच्छरदाणीत बरेचजण झोपले होते. त्यांचे घोरणे धोकादायक व दया न येणारे होते. लांबवरील ऑर्गनमधून येणाऱ्या भसाड्या सुरांशी त्यांचे साम्य होते. जेव्हा त्याला डुलकी लागे, तेव्हा तो अशा विश्वासाने जागा होई, की अजून एकजण तिथे आला आहे. इतके उकडत होते, की तो नागडा झोपला होता. त्याने कूस बदलली. समुद्रातील खडकावर आपटणाऱ्या लाटांचा हळूहळू सतत येणारा बारीक आवाज इतका अस्वस्थ करणारा होता, की तो शेवटी त्याच्या सद्सदविवेकबुद्धीवर ठळकपणे चढून, ऐकू येईनासा झाला. त्याची तालावरची सुरावट त्याच्या दमलेल्या नसांवर घणाघाती घाव पाडू लागली. त्याने ते सहन करण्यसाठी जणू रागाने बोटांची मूठ आवळली. काही झाले तरी जगाच्या अंतापर्यंत हा आवाज बंद होणार नाही, तर चालू राहील, हा विचार सहन करणे अवघड होते. निसर्गाच्या निर्दयी शक्तीशी त्याची ताकद

जरी तुल्यबल असली, तरी मानसिकता काही आक्रमकता दाखवायचा जोर धरत होती.

त्याला वाटले, की त्याने स्वतःवर ताबा ठेवला पाहिजे. नाहीतर तो वेडा होईल. आता खिडकीबाहेर लगूनकडे आणि खडकावर लाटा आपटून होणाऱ्या फेसाकडे व त्या तेजस्वी दृष्याकडे बघतांना, तो शहारला. ढगांवाचून असलेले आकाश बाऊल उपडा घातल्यासारखे दिसत होते. त्याने त्याचा पाइप पेटवला व अपियाहून काही दिवसांपूर्वी आलेले ऑकलँडचे कागदपत्र पाहिले. त्यातील सर्वात नवीन तीन आठवड्यांपूर्वी आले होते. ते बघून, त्याला खूपच मंदपणाची जाणीव झाली.

मग तो कार्यालयात गेला. ती एक कडेला दोन बाके असलेली. रिकामी, मोठी खोली होती. त्यावर खूप देशी पुरुष व बायका बसले होते. व्यवस्थापक येईपर्यंत, ते गप्पा मारत होते. जेव्हा मॅकिन्टॉश आला, तेव्हा सगळ्यांनी त्याला अभिवादन केले.

“टालोफा-ली” [मी आनंदी आहे]

त्यानेही त्याना अभिवादन केले आणि त्याच्या जागेवर बसला.

सामोआच्या गव्हर्नरने तक्रार केलेल्या व वॉकरने त्याच्या नेहमीच्या हट्टीपणाप्रमाणे दुर्लक्ष केलेल्या, एका अहवालावर काम करतांना तो लिहायला लागला. मॅकिन्टॉशने त्याची टिपणे काढली, तेव्हा सूडबुद्धीने वॉकरने त्याचा अहवाल द्यायला उशीर केल्याचे, त्याच्या लक्षात आले. कारण तो इतका अडाणी होता की त्याला कागद आणि पेन घेऊन काहीही काम न करण्याची बळकट इच्छा होती. आणि शेवटी एकदाचे ते नेमके तयार झाले. तो त्याच्या कनिष्ठांच्या कामाला काहीही गौरवोद्गार न काढता

मान्यता देत असे आणि ते जसेच्या तसे त्याच्या वरिष्ठांकडे फसवेपणे त्याने तयार केल्यासारखे, सरकवत असे. मग त्याने त्यातले एकही अक्षर लिहिलेले का नसेना.

मॅकिन्टॉशने रागाने विचार केला, की त्याच्या बॉसने पेन्सिल हातात धरून, काही चित्र काढले, तर ते पोरकट भाव असलेले व चुकीची भाषा असलेले वाटेल. जर त्याने जोराने विरोध केला किंवा त्याच्या मनात अभिप्रेत असलेला अर्थ समजेल अशा भाषेत सांगितला, तर वॉकर भावनेच्या पुरात वाहून जाईल व रडेल.

“मी व्याकरणाची का म्हणून पर्वा करू? तेच व तसेच मला म्हणायचे आहे.”

शेवटी वॉकर आला. तो आल्याबरोबर लगेच त्याचे लक्ष वेधून घेण्यासाठी, देशी लोकांनी त्याला घेरले. पण तो त्यांच्या अंगावर जोराने खेकसला व त्याना गप्प बसण्यास सांगितले. त्याने धमकी दिली, की जर ते गप्प बसले नाहीत तर तो सगळ्यांना बाहेर हाकलून देईल व दिवसभरात त्यांच्याकडे ढुंकूनही बघणार नाही. त्याने मॅकिन्टॉशकडे बघून, मान हलवली.

“काय रे मॅक, शेवटी आलास का? मला समजत नाही दिवसातील सर्वात चांगला वेळ तू अंथरुणात लोळून कसा घालवतोस. तू माझ्यासारखे उजाडण्यापूर्वी उठायला हवेस. आळशी भिकारडा कुठला!”

तो धपकन खुर्चीत बसला. डोक्याला बांधायच्या रंगीत रुमालाने त्याने चेहरा पुसला.

“अरे देवा, मला तहान लागली आहे.”

दारात उभ्या असलेल्या, सामोआचे सुती कापड, लावा-लावा व पांढरे जाकीट घातलेल्या पोलिसाकडे तो वळला व त्याला कावा आणायला सांगितली. खोलीच्या कोपऱ्यात कावाचा बाऊल होता. पोलिसाने नारळाची करवंटी अर्धी भरून वॉकरकडे आणली. त्याने काही थेंब जमिनीवर टाकले. नेहमीचे शब्द पुटपुटला. ते प्यायला व त्याचे छान समाधान झाले. मग त्याने थांबलेल्या देशी लोकाना ते देण्यासाठी पोलिसाला सांगितले. प्रत्येकाच्या जन्माप्रमाणे व महत्वाप्रमाणे, त्याला करवंटी देण्यात आली आणि त्यांनी ती त्याच पद्धतीने संपवली.

मग त्याने दिवसाचे काम सुरु केले. तो बुटका व छोटासा मनुष्य होता. चांगला धट्टाकट्टा होता. त्याचा चेहरा मोठा, मांसल व घोटून दाढी केलेला होता. दोन्ही गाल ओघळलेले होते. हनुवटी मोठी होती. लहानसहान अवयव मासात रुतले होते. त्याच्या डोक्यामागील पांढऱ्या केसांची चंद्रकोर सोडली, तर त्याला पूर्ण टक्कल होते. तो तुम्हाला मिस्टर पिकविकची आठवण करून देत होता. तो कुरूप, चेष्टा करण्यासारखा होता आणि तरीही विचित्रपणे तो रुबाबदार होता. सोनेरी काड्यांच्या चष्म्यामागील त्याचे निळे डोळे मोठे अभिमानी व आकर्षक होते. त्याच्या चेहऱ्यावर बाणेदारपणा होता. तो साठ वर्षांचा होता. पण त्याचा देशी दणकट गावरानपणा वाढत्या वयावर विजय मिळवत होता. त्याची हालचाल चपळ होती. तो मोठ्या डौलाने चाले, जसे काही त्याला पृथ्वीवर त्याच्या वजनाचा भार द्यायचा आहे. तो मोठ्या, खर्जातील भसाड्या आवाजात बोले.

दोन वर्षांपूर्वी वॉकरचा मदतनीस म्हणून मॅकिन्टॉशला नेमण्यात आले. वॉकर गेली पंचवीस वर्षे, सामोआ गटातील एका मोठे बेट

असलेल्या तालुआचा व्यवस्थापक होता. दक्षिण समुद्रावरील महत्वाचा, नावाजलेला व्यवस्थापक होता. त्यांच्या पहिल्या भेटीकडे, मॅकिन्टॉश मोठ्या जिवंत चौकसपणे बघत होता. या पदावर रुजू होण्यापूर्वी काही आठवडे त्याने अपियामधील, चॅप्लिन हॉटेल व इंग्लिश क्लबमध्ये घालवले होते. तिथे त्याने वॉकरबद्दल खूप गोष्टी ऐकल्या होत्या. त्याने त्यातील त्याच्या रुचीपेक्षा विरोधभासात्मक दृष्ट्या विचार केला. त्यानंतर

त्याने त्या वॉकरकडून शंभर वेळा ऐकल्या. वॉकरला माहिती होते, की तो मोठा माणूस आहे आणि त्याच्या कीर्तीचा अभिमान बाळगत, मुद्दाम तसे वागत होता. त्याला त्याच्या आख्यायिकांबद्दल हेवा होता आणि त्याला सांगितल्या गेलेल्या गोष्टींबद्दलच्या खऱ्याखुऱ्या बाबी जाणून घेण्यास, तो उत्सुक होता. परक्या लोकांना चुकीच्या गोष्ट सांगणाऱ्यांचा त्याला फारच राग होता. मॅकिन्टॉशला जरी पहिल्यांदा ते आकर्षक वाटले, तरी वॉकरबद्दल त्याला मनापासून प्रेम होते. वॉकरला कुणीतरी श्रोता मिळाल्याचा आनंद होता. तो त्याला सगळया ताज्या व उत्कृष्ट बातम्या सांगे. तो चांगला विनोदी, आनंदी व पर्वा करणारा होता. मॅकिन्टॉश लंडनमध्ये सरकारी नोकरी करत होता. त्याला चौतिसाव्या वर्षी न्यूमोनियाचा दौरा पडल्यामुळे व क्षयरोगाची भीती असल्याने, त्याने त्याला जबरदस्तीने प्रशांत महासागरी बेटावरील नोकरी शोधायला लावली.

वॉकरचे आस्तित्व असामान्यपणे अद्भुतरम्य होते. ज्या साहसाने त्याने परिस्थितीवर विजय मिळवणे सुरु केले, हे त्या माणसाचे गुणविशेष होते. तो पंधरा वर्षांचा असतांना समुद्रावर पळून गेला. आणि वर्षभरात कोळसा काढायच्या खाणीत खाणकामगार म्हणून रुजू झाला. तो लहानखुरा मुलगा होता. इतर माणसे व मित्र त्याच्याशी दयाळूपणे वागत.

पण काही कारणाने कॅप्टनला त्याच्याबद्दल रानटी नावड वाटे. तो त्या मुलाला दुष्टपणे वागवे. त्याला मारे, लाथा हाणे. त्यामुळे मुलाच्या हातांना वेदना होऊन, झोप येत नसे. कॅप्टनविषयी त्याला उबग येत असे. बेलफास्ट [उत्तर आयर्लंडची राजधानी] मध्ये त्याचा एक मित्र होता. त्याच्याकडून त्याने पंचवीस पौंड मिळवले व एका रेसमध्ये त्याला बक्षिसी म्हणून, काही पौंड मिळाले. मोठ्या संकटातून जाऊन ते त्याने बाहेरच्या एका घोड्यावर लावले. जर तो हरला तर परत करायला त्याच्याकडे पैसे नव्हते. पण आजपर्यंत तो कधी हरला नव्हता. तो स्वतःला नशीबवान समजे. घोडा जिंकला आणि त्याच्याकडे हजार पौंडांपेक्षा जास्त पैसे जमा झाले. आता त्याला संधी मिळाली. त्याने गावातील सर्वात चांगला वकील शोधून काढला --- तो खाण कामगार मग आयरिश किनाऱ्यावर कुठेतरी गेला. तिथे विकाऊ जहाजांची चौकशी करून, ते विकत घेतले. वकील त्याच्या लहानशा पक्षकारावर खूष झाला. तो फक्त सोळा वर्षांचा होता आणि तेवढा मोठाही दिसत नव्हता. त्याच्याबद्दलच्या सहानुभूतीने भारावून जाऊन, वकीलाने सर्व गोष्टी सुरळीत करण्याचेच नव्हे तर त्याचा सौदा फायद्यात करून देण्याचे मान्य केले. काही वेळाने छोटा वॉकर जहाजाचा मालक झाला. त्या विजयोत्सवी क्षणी मग त्याने कॅप्टनला तंबी दिली व अर्ध्या तासात त्याला जहाजावरून निघून जाण्यास सांगितले. त्याने त्याच्या मित्राला कॅप्टन केले आणि जहाज नऊ महिन्यांसाठी हाकारले. त्यानंतर त्याने ते फायद्यात विकले.

सव्वीस वर्षांचा असताना तो बेटावर शेतकरी म्हणून आला. त्या जर्मन चढाईच्या काळात, तालुआमध्ये स्थिरस्थावर झालेल्या थोड्या गोऱ्या लोकांपैकी तो एक होता. आणि देशी लोकांवर त्याचा प्रभाव

आधीच पडला होता. जर्मनांनी त्याला व्यवस्थापक नेमले. त्या जागेवर तो वीस वर्षे राहिला. जेव्हा ब्रिटिशांनी बेटाचा ताबा घेतला, तेव्हा त्याचे तेच पद निश्चित झाले. त्याने बेटावर अमाप सत्तेचे पण पूर्णपणे यशस्वी राज्य केले. या यशाचे दुसरे कारण होते, मॅकिन्टॉशने त्यात घेतलेला रस.

पण त्या दोन माणसांचे पुढे फारसे पटणार नव्हते. मॅकिन्टॉश कुरूप, दबलेला व लाजरे हावभाव असणारा, उंच, बारीक, अरुंद छातीचा, झुकलेल्या खांद्यांचा आणि पिवळसर फिकट तपकिरी, सुरकुतलेल्या गालांचा, माणूस होता. त्याचे डोळे मोठे पण मंद होते. तो चांगला वाचक होता. जेव्हा त्याने मागवलेली पुस्तके येत व खोलली जात, तेव्हा वॉकर ती बघायला येत असे. मग तो मॅकिन्टॉशकडे वळून कडवटपणे हसे. तो विचारी, "तू कशासाठी हा फुकटचा पसारा आणला आहेस? यावर मॅकिन्टॉश लाजून लाल होई.

"तुला हा फुकटचा पसारा वाटतो, याबद्दल मी दिलगीर आहे. पण मी ती मागवतो, कारण मला ती वाचायची असतात."

"तू म्हणालास, तुझ्याकडे बरीच पुस्तके येणार आहेत, तेव्हा मला वाटले, त्यातील काही मला वाचण्यासाठी असतील. तुझ्याकडे काही गुप्तहेरांच्या गोष्टी नाहीत का?"

"तसल्या गोष्टींमध्ये मला रुची नाही."

"मग तू फारच मूर्ख आहेस."

"तुला असे म्हणायचे असेल, तर खुशाल म्हण."

वॉकरला प्रत्येक डाकेने न्यूझीलंडहून नियतकालिके व अमेरिकेहून मासिके येत असत. हे त्याला चिडायला लावत असे, की मॅकिन्टॉश त्या

थोडक्या काळाकरता असलेल्या प्रकाशनांबद्दल राग व्यक्त करत असे. मॅकिन्टॉशचा रिकामा वेळ खाणाऱ्या त्या वाचनसाहित्याबद्दल त्याला असे वाटे, की याला खरी रुची नसून, हा गिबनचे पतन किंवा बर्टनचे शरीरशास्त्र काही कारण नसतांना उगीचच वाचतो. आणि त्याला जिभेवर ताबा ठेवायचे कधी माहिती नसल्याने, तो त्याच्या सहकाऱ्याबद्दलचे त्याचे मत सरळ उघड करत असे. मॅकिन्टॉशला तो खरा माणूस समजू लागला. वरवर आनंदी, बडबड्या व विनोदाची जाण असलेला असा तो, आतून, बेकार, लबाड व द्वेष वाटेल, असा हुकमत गाजवणारा, चढेल माणूस होता. हे विचित्र होते, की त्याचा लाजाळूपणा असह्य होता. त्यामुळे त्याच्याइतके हुशार नसलेले लोक त्याला आवडत नसत.

तो अननुभवी असल्यासारखा, इतरांना त्यांच्या भाषेवरून जोखे. त्याच्या स्वतःच्या भाषेत बऱ्याचशा प्रमाणात असणाऱ्या शपथा आणि लैगिक वर्णने, जर त्यांच्या भाषेत नसतील, तर तो त्यांच्याकडे संशयाने बघे. संध्याकाळी ते दोघे पत्त्यांचे जादूचे खेळ करत असत. तो वाईट रीत्या, पण वृथाभिमान बाळगून खेळे. जेव्हा तो जिंके, तेव्हा दुसऱ्यावर ओरडू लागे आणि हरे तेव्हा त्याचा रागाचा पारा चढे. काही खास प्रसंगी, खूपसे शेतकरी व व्यापारी ब्रिज खेळत. तेव्हा मॅकिन्टॉश ज्याला अंगभूत गुण म्हणे तसा वॉकर मिरवणारा होता. तो भिडूची पर्वा न करता, स्वतःच्या इच्छेनुसार खेळे. विरुद्ध पक्षाच्या भिडूवर अथकपणे जोराने ओरडे. तो सतत हे कायदेशीर नाही, असे म्हणे, तेव्हा तो वरच्या पट्टीत ओरडून मान्यता मिळवे. “ओहो, नीटसे न दिसणाऱ्या म्हाताऱ्याविरुद्ध तुम्ही काही बोलू शकत नाही.” त्याला हे माहिती होते का, की त्याच्या विरुद्ध बाजूचे लोक त्याला उजव्या बाजूला ठेऊन, खेळाच्या नियम पाळण्यासंबंधी कडक धोरण

अवलंबायला कां कू का करतात? मॅकिन्टॉश त्याच्याकडे थंडगार रागाने बघे. जेव्हा खेळ संपला, आणि ते पाइप ओढत होते, आणि व्हिस्की पित होते, तेव्हा त्यांनी गोष्ट सांगायला सुरवात केली.

वॉकरने मोठ्या रुचीने त्याच्या लग्नाची गोष्ट सांगितली. तो लग्नाच्या मेजवानीला इतका प्यायला होता, की नवरी पळून गेली आणि त्यानंतर त्याने तिला कधीच पाहिले नाही. त्याने बेटावरील बायकांबरोबर अनेक अनैतिक आणि सर्वसामान्य साहसे केली. ती त्याने मोठ्या गर्विष्ठपणे वर्णन केली. मॅकिन्टॉशच्या लक्ष देऊन ऐकणाऱ्या कानांना ती त्रासदायक कृत्ये वाटली. वॉकर पूर्णपणे इंद्रियसुख भोगणारा म्हातारा होता. त्याला मॅकिन्टॉश गरीब बिचारा वाटे. कारण तो त्याचे अनेक बायकांशी असलेले संबंध गुप्त ठेवे आणि त्याच्याबरोबरचे लोक पीत सुटत, तेव्हा तो न पिता चांगल्यापैकी भानावर असे.

तो त्याच्या कार्यालयीन कामातील शिस्तीकरता देखील त्याला कःपदार्थ समजे. मॅकिन्टॉशला सगळी कामे शिस्तीत करायला आवडत. त्याचे टेबल नेहमी छान आवरलेले असे. त्याचे कागद नेहमी नीट लावलेले असत. कारवाई करण्यासाठी कुठलाही कागद त्याला नेमका सापडे व त्याच्या बोटाच्या टोकावर त्याला कामासाठी पाहिजे तो मजकूर उपलब्ध असे.

वॉकर बोलला, “ऐका. ऐका. मी हे बेट गेली वीस वर्षे कुठलाही कायदा न मोडता, चालवतो आहे आणि आता तो ठपका मला नको आहे.”

मॅकिन्टॉश उत्तरला, “तुला जेव्हा पत्र लिहायचे असते, तेव्हा तुला त्यासाठी अर्धा तास प्रयत्न करावे लागतात, की तुला ते अगदी सोपे जाते?

“तू पक्का कार्यतत्पर आहेस. पण तू वाईट मनुष्य नाहीस. तू एक दोन वर्षे इथे काढलीस, की एकदम योग्य होशील. तुझे काय चुकत असेल तर ते म्हणजे, तू पित नाहीस. जर तू आठवड्यातून एकदा प्यायला लागलास, तर मग तू काही वाईट प्रकारचा उरणार नाहीस.”

दर महिन्याला वॉकरच्या हाताखालच्या माणसाबद्दलची त्याची नावड वाढत चालली होती, ही मोठी चौकस गोष्ट होती. पण जरी तो त्याला हसत असला, तरी त्याला मॅकिन्टॉशची जसजशी सवय होऊ लागली, तसतसा तो त्याला आवडू लागला. दुसऱ्यांच्या काही विशेषतांसाठी त्याच्याकडे सहनशक्ती होती. मॅकिन्टॉशला त्याने विचित्र माणूस म्हणून गृहीत धरले. कदाचित नकळत तो त्याला आवडू लागला, कारण तो त्याला झाडू शके. त्याचा विनोद खडबडीत व लैंगिक असला, तरी खेळकर असे. मॅकिन्टॉशचा ठामपणा, त्याची नैतिकता, मवाळपणा, हे सगळे फलदायी विषय होते. त्याचे स्कॉटीश असणे, त्याला स्कॉटलंडबद्दल विनोद करायला संधी देत असे. तो स्वतः त्याचा खूप आनंद घेई. तिथे दोन तीन माणसे अशी होती, की ज्यांना तो मॅकिन्टॉशमुळे हसवू शकत असे. तो देशी लोकांना स्वतःबद्दलच्या विचित्र गोष्टी सांगे. आणि अजून सामोआबद्दल फारसे ज्ञान नसलेला मॅकिन्टॉश, वॉकर जेव्हा उबग येईल असे किस्से सांगून त्यांची खुली करमणूक करे, तेव्हा चांगल्या भावाने हसे.

वॉकर त्याच्या खर्जातील भसाड्या आवाजात म्हणे, “मॅक, मी आता तुला जे सांगतो ते विनोदाने घे.”

मॅकिन्टॉश म्हणे, “विनोद म्हणजे काय? मला माहिती नाही.”

जोरात हसून वॉकर म्हणे, “स्कॉट्स कोण मोठे लागून गेले! त्यांना विनोद समजवायचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे त्याची चिरफाड करणे.”

वॉकरला थोडेसे माहिती होते, की मॅकिन्टॉशला फालतूपणा सहन होत नसे.. तो पावसाळ्यातील मुश्किलीने श्वास घेता येणाऱ्या रात्री जागा होई. आदल्या रात्री वॉकरने निष्काळजीपणे पिल्लाला उद्देशून पश्चात्तापदग्ध आवाजात उच्चारलेल्या शब्दांनी त्याच्या हृदयाला रागाने सूज येई. तो त्याच्या मनात चित्र रंगवे, की तो एखाद्या मारकुट्याबरोबरदेखील जमवून घेतो आहे. त्याने त्याला उत्तर द्यायचा प्रयत्न केला, पण वॉकरला चटपटीत, जाड्याभरड्या व सहज संभाषणाची देणगी लाभलेली असल्याने तो त्याचा फायदा घेई. त्याच्यात बुद्धिमत्तेचे मरगळलेपण असल्याने त्याच्यावर नाजूक गोष्टींचा परिणाम होत नसे. त्याच्या स्वसमाधानाने त्याला जखमी करणे, अशक्य केले होते. त्याचा मोठा आवाज, त्याचे गडगडाटी हसणे, ही त्याची शस्त्रे होती त्याविरुद्ध मॅकिन्टॉश काही करू शकत नसे. आणि तो शिकला की सर्वात शहाणपणाची गोष्ट म्हणजे, त्याच्या चिडण्याला कधीही प्रत्युत्तर द्यायचे नाही. तो स्वतःवर काबू ठेवणे शिकला. पण त्याचा द्वेष त्याला वेड लागेपर्यंत वाढला. त्याने धोक्याच्या जाणीवेने मनाच्या विस्कटलेल्या अवस्थेत, वॉकरचे निरीक्षण केले. वॉकरच्या बाजूने लबाडीच्या असभ्यतेचा प्रत्येक पोरकट पोकळ दिमाख हा त्याच्या अभिमानाला खतपाणी घालत गेला. वॉकर अधाशीपणे, आवाज करत अस्वच्छ पद्धतीने खात असे. मॅकिन्टॉशने समाधानपूर्वक त्याचे निरीक्षण केले. त्याने वॉकर बोललेल्या मूर्ख गोष्टींची व व्याकरणाच्या चुकांची नोंद घेतली. त्याला माहिती होते, की वॉकर त्याला अगदी फालतू समजे. त्याला कटूपणे त्याच्या वरिष्ठाच्या त्याच्याबद्दलच्या मताचे समाधान मिळाले. त्रुटी असून

स्वसमाधानी असणाऱ्या व कोत्या स्वभावाच्या म्हाताऱ्या वरिष्ठाबद्दल त्याचा राग वाढू लागला. त्याला याचा विशेष आनंद झाला, की त्याला वॉकरबद्दल वाटणाऱ्या द्वेषाचा वॉकरला मुळीच पत्ता नव्हता. प्रसिद्धी आवडणारा तो एक मूर्ख होता आणि तो निरागसपणे तर्क करत असे, की प्रत्येकजण त्याची भलावण करतो. एकदा मॅकिन्टॉशने वॉकरला त्याच्याविषयी बोलतांना आडून ऐकले.

तो म्हणाला, “मी त्याला चांगली अद्दल घडवेन, तेव्हा तो ताळ्यावर येईल. तो मालकावर प्रेम करणारा चांगला कुत्रा आहे.”

मॅकिन्टॉश गुपचूप त्याच्या लांब, पिवळ्या तपकीरीसर फिकट चेहऱ्यावरील सुरकुतीही न हलवता, मनभरून खूप हसला.

पण त्याचा द्वेष आंधळा नव्हता, तर विशेष स्पष्टपणे दिसणारा होता आणि तो वॉकरच्या क्षमतांचा नेमकेपणे अंदाज घेई. तो त्याचे लहानसे राज्य पूर्ण क्षमतेने चालवे. तो प्रामाणिक व न्यायी होता. त्याची या जागेवर पहिल्यांदा नेमणूक झाली, त्यापेक्षा पैसे मिळवायच्या संधीबद्दल तो गरीब होता. त्याच्या म्हातारपणाचा केवळ आधार म्हणजे निवृत्तीनंतर त्याला मिळणारे पेन्शन हेच होते. त्याच्या हाताखाली मदतनीस व मिश्र जातीचा कारकून असण्याचा त्याला गर्व होता. बेट अपियामध्ये मुख्यत्वे असणाऱ्या उपोलूंपेक्षा, तो चांगल्या तऱ्हेने कारभार चालवे. त्याच्याकडे कर्तव्यतत्पर सेना होती. त्याच्या अधिकारात तो काही देशी पोलीसानादेखील वापरू शके. पण तो तसे करत नसे.

तो त्याच्या आयरिश विनोदीपणे व पोकळ धमक्या देऊन कारभार हाकत असे.

तो म्हणे, “त्यांना माझ्याकरता तुरुंग बांधायचा होता. पण मला कशाकरता तुरुंगाची जरुरी होती? मी काही देशी लोकांना तुरुंगात डांबणार नव्हतो. जर ते चुकीचे वागले, तर त्याना कसे सरळ करायचे, हे मला माहिती होते.”

अपियामधील एका उच्च अधिकाऱ्याशी त्याचे भांडण झाले होते, कारण त्याने बेटावरील सर्व देशी लोकांवर अधिकार गाजवायचा प्रयत्न केला होता. जेव्हा ते गुन्हा करत, तेव्हा तो कोर्टात जात नसे. तो त्यांच्याशी सामना करण्यात माहीर होता. खूप वेळा उपोलूच्या गव्हर्नरबरोबर रागाने त्याचे वाजत असे. कारण तो देशी लोकांकडे त्याच्या मुलांसारखे बघे. ती त्या असभ्य, स्वार्थी व आडदांडपणे वागणाऱ्या माणसाची आश्चर्यकारक बाब होती. तो अनेक वर्षे रहात असलेल्या बेटावर भावनामयतेने प्रेम करे आणि त्याच्या मनात देशी लोकांबद्दल नवल वाटेल असा, कनवाळूपणा होता.

त्याच्या म्हाताऱ्या करड्या घोडीवरून त्याला बेटभर फिरायला आवडे आणि बेटाच्या सुंदरतेचा त्याला कधी कंटाळा येत नसे. नारळाच्या झाडांमधून गवताळ वाटेने तो निसर्गाचे कौतुक करण्यासाठी सतत थांबे. गावाचा मुख्य त्याला फिरता फिरता थांबवून बाउलभर कावा पाजे. तो मधमाशीच्या पोळ्यांसारख्या असणाऱ्या, घंटेच्या आकाराच्या, उंच गवताने शाकारलेल्या घरांच्या समुदायाकडे बघत थांबे. त्याच्या जाड चेहऱ्यावर स्मित पसरे. वाढणाऱ्या हिरव्या फळझाडांवर आनंदाने त्याची नजर पडे.

“खरोखर, ही जणू इडनची बागच आहे.”

कधीकधी त्याची चक्कर किनाऱ्याने, झाडांमधून असे. एकाही होडीशिवाय असलेला सुनसान रानटी समुद्र तो बघे. कधीकधी तो टेकडीवर चढे. त्यामुळे त्याला तो त्या सर्व जगाचा राजा असल्यासारखे वाटे. बेटाचे विहंगम दृष्य दिसे. उंच झाडांमधून वसलेली छोटी घरे दिसत. तो तिथे आनंदाने भावनांचे उचंबळणे अनुभवत, तासभर बसे. पण त्याच्या भावना त्याला शब्दांकित करता येत नसत. मग तो ताण घालवण्यासाठी, एखादा अश्लील शब्द उच्चारे.

मॅकिन्टॉश दुःखाने, थंडपणे त्याच्या भावनांचे निरीक्षण करे. वॉकर नेहमीच फार पित असे. जेव्हा तो अपियामध्ये रात्र घालवे, तेव्हा त्याच्या अर्ध्या वयाची माणसे त्याच्या आज्ञेत रहातांना पाहून त्याला स्वतःच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटे. आणि त्याला तो शिखरावर असल्यासारखे वाटे. त्याच्याकडील मासिकांमधील गोष्टी वाचून, तो रडे. तरीही तो वीस वर्षे ओळखत असलेल्या कुणा व्यापाऱ्याला कर्ज देण्यास नकार देई. तो त्याचे पैसे सांभाळून ठेवत असे. एकदा मॅकिन्टॉश त्याला म्हणाला, "तुला कुणीही पैसे देण्यावरून शिवीगाळ करू शकणार नाही."

त्याने ते त्याची स्तुती करत असल्याप्रमाणे घेतले. त्याच्यासारख्या दारुड्याचा निसर्गाबद्दलचा उत्साह भलताच भावनामय होता. त्याच्या वरिष्ठाच्या देशी लोकांबद्दलच्या भावनेबद्दल मॅकिन्टॉशला काही सहानुभूती नव्हती. जसा स्वार्थी माणूस त्याच्या कुत्र्यावर प्रेम करेल, तसा तो त्यांच्यावर प्रेम करे, कारण ते त्याच्या अधिकाराखाली असत. त्याची त्या लोकांबद्दलची मानसिकता एका मर्यादेपर्यंतच असे. त्यांचा विनोद उबग आणणारा असे. लैंगिक बाबतीतल्या शेरेबाजीच्या बाबतीत त्याला काही धरबंध नव्हता. तो त्यांना समजून घेई व ते त्याला समजून घेत. त्यांच्यावर

असलेल्या त्याच्या वचकाचा त्याला अभिमान वाटे. तो त्यांच्याकडे ती त्याची मुले असल्यासारखे बघे आणि त्यांच्या सर्व सणसमारंभात व सुखदुःखात सहभागी होई. तो त्यांच्यावर करड्या नजरेने हुकमत गाजवून, राज्य करत असला, तरी पण त्याच्या अधिकाराविषयी तो फार जागरूक होता. तो त्यांचा विरोध अजिबात सहन करत नसे. बेटावरील गोऱ्या माणसांना तो, त्यांचा फायदा घेऊ देत नसे. त्याने मनाई केलेले काही कृत्य केल्यास, तो मिशनऱ्यांकडे संशयाने बघे. मग तो त्यांचे आयुष्य इतके असह्य करून टाके, की त्याने त्यांना हाकलले नाही, तरी ते आपण होऊन निघून जात. देशी लोकांवर त्याची इतकी सत्ता होती, की चर्चमधील धर्मगुरूलाही ते धान्य द्यायला वा त्याच्याकडे श्रमाची कामे करायला नकार देत. तर दुसरीकडे तो व्यापाऱ्यांना झुकते माप देत नसे. ते गावकऱ्यांना फसवणार नाहीत, याची तो काळजी घेई. त्यांच्या कामाबद्दल आणि नारळाच्या करवंट्यांबद्दल त्यांना योग्य तो मोबदला मिळेल, पण ते विकणाऱ्या वस्तूंमधून त्यांना भरमसाट नफा मिळणार नाही, असे तो बघे. अयोग्य व्यवहाराबद्दल तो दया दाखवत नसे. कधीकधी अपियातील व्यापारी तक्रार करत की त्यांना चांगली संधी मिळत नाही व त्यामुळे त्यांना त्रास होतो. वॉकर त्यांना न फसवता किंवा खोटे न बोलता, त्यांच्याबरोबर मिळून मिसळून राही आणि त्यांच्या लक्षात येई, की त्याना फक्त शांतता नको आहे, तर जगण्यासाठी त्याना तो म्हणेल ती परिस्थिती मान्य करायला पाहिजे. एकापेक्षा जास्त वेळा, एका व्यापाऱ्याचे दुकान फार वाईट रीत्या जाळले गेले. व्यवस्थापकाने ही योग्य कारवाई केली, असे सर्वत्र बोलले गेले. एकदा एका स्वीडिश मिश्रजातीच्या व्यापाऱ्याचे दुकान जाळल्याने तो

पार गाळात गेला. तो जाऊन वॉकरला शिवीगाळ करू लागला. तेव्हा वॉकर त्याच्या तोंडावर हसला.

"तू घाणेरडा कुत्रा! तुझी आई देशी असून तू देशी लोकांना फसवत होतास. जर तुझे खराब, जुने दुकान जाळले, तर ते राज्याला दिव्य तऱ्हेने न्याय दिल्यासारखेच झाले. चल, चालता हो."

त्या व्यापाऱ्याला दोन देशी पोलीसांनी हाकलून दिले, तेव्हा वॉकर जोराने हसला.

राज्याचा दिव्य न्याय!

आता मॅकिन्टॉशने त्याला दिवसाचे काम सुरु करतांना पाहिले.

वॉकर त्याच्या इतर कामांबरोबर आजारी लोकांना डॉक्टरही उपलब्ध करून देई. तो आजारी माणसांपासून सुरवात करे. त्याचा कार्यालयाची मागील खोली औषधांनी भरलेली असे. निळा लावा-लावा घातलेला, अंगावर मोठे टॅटू काढून घेतलेला, कुरळे, करडे दाट केस असलेला एक वयाने मोठा माणूस पुढे आला. त्याची कातडी सुरकुतलेली होती.

वॉकरने त्याला मध्येच विचारले, "तू का आला आहेस?"

तो रानटी आवाजात उत्तरला, की त्याला ओकारी झाल्याशिवाय खाता येत नाही आणि त्याला इकडे तिकडे कळा येत आहेत.

वॉकर त्याला म्हणाला, "मिशनऱ्याकडे जा. तुला माहिती आहे, की मी फक्त मुलांना बरे करतो."

"मी त्यांच्याकडे गेलो होतो. पण त्यांनी मला बरे केले नाही."

"मग घरी जाऊन मरायची तयारी कर. तू इतका जगला आहेस. तरीही अजून जगायची इच्छा करतोस. तू मूर्ख आहेस."

तो मनुष्य तक्रारखोर सुरात जोराने त्याची बाजू मांडू लागला. पण वॉकर एका कडेवर आजारी मूल असलेल्या बाईकडे निर्देश करत, तिला पुढे आणा असे बोलला.

तो म्हणाला, "मी तुला औषध देतो. तो मिश्र जातीच्या कारकुनाकडे वळून बोलला, "औषधांच्या खोलीत जा आणि मला कॅलोमलच्या गोळ्या आणून दे.

त्याने एक गोळी मुलाला गिळायला लावली आणि दुसरी आईच्या हातात दिली. "मुलाला घेऊन जा व त्याला उबदार ठेव. उद्या तो मरेल किंवा बरा होईल."

तो खुर्चीत रेलून बसला व पाइप पेटवला. "कॅलोमल चांगली गोळी आहे. अपियाच्या दवाखान्यातील सर्व डॉक्टरांनी जेवढ्या मुलांना वाचवले असेल, त्यापेक्षा जास्त मुलांची आयुष्ये मी या गोळीने वाचवली आहेत."

वॉकरला त्याच्या कसबाचा फार अभिमान होता आणि अज्ञान ही खरी गोष्ट असल्याचे समजत, उपचारासाठी वैद्यकीय व्यवसायातील व्यक्तींवर अवलंबून रहाण्याइतका धीर त्याला नव्हता.

तो म्हणाला, "सगळ्या डॉक्टरांनी काही करणे शक्य नाही म्हणून सोडून दिलेली केस घ्यायला मला आवडते. जेव्हा डॉक्टर म्हणतात की ते काही करू करू शकत नाहीत, तेव्हा मी त्यांना म्हणतो, "माझ्याकडे या. एका कर्करोग झालेल्या माणसाची हकीगत मी तुला सांगितली का?"

मॅकिन्टॉश बोलला, "खूप वेळा."

“मी त्याला तीन महिन्यात बरे केले.”

“जे लोक तुझ्याकडून बरे झाले नाहीत, त्यांच्याबद्दल तू मला कधीच सांगितले नाहीस.

त्याचे हे काम करून संपले आणि तो विश्रांतीसाठी गेला. ती एक छान सुरावट होती. एक नवऱ्याबरोबर न पटणारी बाई होती आणि एका माणसाची बायको पळून गेली, म्हणून तो तक्रार करत होता.

वॉकर म्हणाला, “नशीबवान माणूस आहे. बऱ्याचशा माणसांना असे वाटत असते, की त्यांच्या बायकोने असे करावे.”

काही यार्ड जमीन एकदा लांबलचक वादाच्या भोवऱ्यात सापडली होती. मासे पकडण्यावरुन, त्या पाण्यावरून भांडण चालले होते. एका गोऱ्या व्यापाऱ्याविरुद्ध तक्रार होती कारण त्याने मापात फसवले होते. वॉकर प्रत्येक केस नीट ऐकून घ्यायचा. त्याच्या मनात पटकन निर्णय घ्यायचा. मग तो काही ऐकून घ्यायचा नाही. जर रोग्याची कुरकुर सुरु राहिली, तर त्याला पोलीसाकडून बाहेर हाकलून द्यायचा.

मॅकिन्टॉशने हे सगळे वाईटपणे राग येत ऐकून घेतले. या सगळयावरून कदाचित एवढे कबूल करावे लागले असते, की कसातरी न्याय दिला जाई, पण सहाय्यकाला खूप नैराश्य येई, कारण त्याचा वरिष्ठ खऱ्या पुराव्यापेक्षा त्याच्या त्या क्षणी त्याला वाटणाऱ्या भावनेवर विश्वास ठेवतो आहे, असे त्याला वाटे. तो कारणाकडे फारसे लक्ष देत नसे. तो त्यांना स्वतःच्या मर्जीप्रमाणे करायला लावे आणि जेव्हा ते ऐकत नसत, तेव्हा तो त्यांना चोर व खोटारडे म्हणे.

खोलीच्या कोपऱ्यात बसलेल्या शेवटच्या गटाला त्याने सोडले. त्याने मुद्दाम त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यांच्यात एक उंच, उमदा. लहान पांढरे केस असलेला, नवीन लावा-लावा घातलेला मुख्य म्हातारा होता. त्याने मोठा बॅच लावला होता. त्याचा मुलगा व गावातील इतर महत्वाचे अर्धा डझन लोक त्याच्याबरोबर होते. वॉकरचे त्यांच्याबरोबर शत्रुत्व होते आणि वॉकरने त्यांना मारले होते. त्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे चढेलपणे तो त्याच्या विजयाच्या बाता मारत होता. ते बिचारे निरुपायाने त्याच्या फायद्यासाठी दबले गेले होते. गोष्टी विशेष होत्या. वॉकरला रस्ते बांधायची खुमखुमी होती. जेव्हा तो तालुआला आला, तेव्हा तिथे थोडेच रस्ते होते. पण काही काळात, त्याने त्या भागात रस्ते बांधले व गावे जोडली. त्यामुळे बेटाच्या या भागात सुबत्ता नंदू लागली. जुन्या काळी जमिनीतून उगवलेला माल विशेषतः करवंट्या व कोरडे खोबरे विकले जाणे अवघड होते. आता तो बोटींवर लादून, अपियाला नेता येई. नेणे आणणे सुलभ झाले. पूर्ण बेटाभोवती रस्ता बांधायची त्याची महत्वाकांक्षा होती. त्याचा काही भाग आधीच बांधून झाला होता.

"दोन वर्षात तो बांधून होईल. मग मी मरेन किंवा ते नोकरीतून मला काढून टाकतील. मला काही पर्वा नाही."

त्याचे रस्ते म्हणजे त्याचा आनंद होता. ते सुस्थितीत आहेत ना, हे बघण्यासाठी तो नेहमी चक्कर मारत असे. साधे, मोठे, गवताने झाकलेले व शेतांमधून नीट काढलेले रुंद रस्ते! पण वाटेतील झाडे मात्र तोडावी लागत. खडक फोडावे लागत. आणि इकडे तिकडे सपाटीकरण करावे लागे. अशी अवघड कामे केल्याबद्दल त्याला अभिमान वाटे. या त्याच्या कृत्यांबद्दल त्याचा ऊर भरून येई. आता त्यामुळे केवळ सोय झाली, एवढेच नव्हे, तर

त्याला मनापासून आवडणाऱ्या बेटाच्या सौदर्यातही भर पडली. तो रस्त्यांबद्दल बोले, तेव्हा त्याच्या कवित्वाला भर येई. ते त्या छानशा दृष्यांमधून भटकत, सरळ रस्त्याने जातील, याची वॉकर काळजी घेई. त्यांना झाडांमधून हिरवीगार दृष्ये दिसत रहात. इकडे तिकडे वळणे घेऊन, वैविध्यतेवर तुमची दृष्टी खिळलेली राहत असे. हे आश्चर्यकारक होते, की या रुक्ष आणि भावनाशील नसलेल्या मनुष्याने त्याच्या डोक्यात आलेले विचार प्रत्यक्षात उतरवण्यासाठी इतकी हुशारी दाखवली. त्याने रस्ते बनवतांना जपानी माळयाची कुशलता वापरली होती. त्याला मुख्य कार्यालयाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. पण त्याने अभिमानाने त्यातील थोड्याच पैशांचा वापर केला. एका वर्षात, त्याला दिलेल्या हजार पौंडांपैकी त्याने फक्त शंभर पौंड खर्च केले.

तो गरजला, "एवढे पैसे कशाला लागतात? त्याचे असे आहे की, मिशनरी त्याना देतात त्या न लागणाऱ्या फालतू गोष्टींवर, ते फुकट खर्च करतात.

बाकी कुठल्या विशेष कारणाने नव्हे, तर फक्त त्याच्या कार्यात आर्थिक बचत केल्याने, त्याला भलताच अभिमान वाटे. अपियामधील अधिकाऱ्यांच्या फुकट खर्च करायच्या पद्धतीच्या पार्श्वभूमीवर त्याने देशी लोकांना त्याच्या मर्जीप्रमाणे कमी मजुरीवर कामाला लावले. त्या बाबतीत बोलण्यासाठीच आता ही माणसे त्याच्याकडे आली होती. मुख्य माणसाचा मुलगा एक वर्ष उपोलू होता. त्याने अपियाच्या मुख्य कार्यालयाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सगळयांना सांगितले होते. दीर्घ काळ चालणाऱ्या एकसुरी बोलण्यातून, त्याने त्यांची हृदये जास्त पैसे मिळवण्यासाठी पेटवून दिली होती. त्याने त्याना मोठ्या संपत्तीचे प्रलोभन

दाखवले होते. त्याना व्हिस्की विकत घेता येईल, असे सांगितले होते --- हा चांगला, सगळ्यांना आवडेल असा विचार होता. गोऱ्या लोकांना ज्या किमतीत व्हिस्की मिळते, त्याच्या दुप्पट भावात देशी लोकांना ती विकत देण्याचा कायदा होता --- सुवासिक साबण, पॅकबंद साल्मन, व इतर चैनीच्या वस्तू ठेवलेल्या चंदनी पेट्यांसाठी, बेटावरील रहिवासी जीव टाकत असत. त्यामुळे जेव्हा किनाऱ्यालगतचा रस्ता तयार करण्याच्या कामाबद्दल त्यांना विचारण्यात आले, तेव्हा वीस पौंडांच्याऐवजी त्यांनी शंभर पौंड मजुरी मागितली. त्या गटाच्या मुख्य माणसाच्या मुलाला मानुमा म्हणत असत. तो उंच, देखणा, तांब्याच्या रंगाचा, लाल केसांचा व गळ्याभोवती लाल बेरींची माळ घातलेला मनुष्य होता. त्याने कानामागे ज्वाळेसारखे शेंदरी फूल घातले होते. वरती तो उघडा होता. पण तो आता रानटी नसल्याचे व तो अपियामध्ये रहात असल्याचे दाखवण्यासाठी त्याने लावा-लावा ऐवजी खांद्यावर पट्टे बांधायची सुती पँट घातली होती.

तो त्याना सांगत होता, की आपण एकत्रितपणे आपली मागणी लावून धरली, तर व्यवस्थापकाला ती मान्य करावीच लागेल. त्याला मनापासून रस्ते बांधायची इच्छा होती आणि जेव्हा त्याच्या लक्षात आले, की ते कमी पैशात काम करणार नाहीत, तेव्हा त्याने त्यांची मागणी मान्य केली. पण यावर त्यांनी आता ठाम रहायला हवे आणि कामात कुचराई करता कामा नये, असे तो म्हणाला. जेव्हा त्यांनी शंभर पौंड मजुरी मागितली, तेव्हा वॉकर खूप वेळ हसत राहिला होता. त्याने त्या सगळ्यांना सांगितले होते, की असा मूर्खपणा करू नका. तर झटपट कामाला लागा. कारण त्या दिवशी तो विनोद करण्याच्या मनस्थितीत होता. रस्त्याचे काम संपल्यावर त्याने त्यांना मेजवानी देण्याचे वचन दिले. पण जेव्हा त्याला

आढळले, की कामाला सुरवातच होत नाही आहे, तेव्हा तो गावात जाऊन लोकांना विचारू लागला, ते काय मूर्खासारखा डाव खेळत आहेत. मानुमाने त्यांना चांगले प्रशिक्षण दिले होते. ते शांत होते. त्यांनी वाद घालायचा प्रयत्न केला नाही --- खरे तर गावच्या लोकांना वाद घालायची खुमखुमी असते. पण त्यांनी फक्त खांदे उडवले. त्यांनी ते शंभर पौंडांसाठी केले होते. आणि जर त्याने ते त्यांना दिले नाहीत, तर ते काम करणार नव्हते. त्याने स्वतःला खूष ठेवायला हवे होते. त्यांना काही पर्वा नव्हती. वॉकर मनापासून विचार करू लागला. मग तो चिडला. त्याची बुटकी जाड मान, काही नको ते होण्याच्या भीतीने सुजली. त्याचा लाल चेहरा जांभळा झाला. तोंडात थुकी साठली. तो शिवीगाळी करून त्यांचा अपमान करू लागला. त्याला चांगले माहिती होते, की त्यांना कसे जखमी करायचे व लाज आणायची. तो भयंकर होता. म्हातारे लोक फिके पडले व अस्वस्थ झाले. पण त्यांनी नकार देणे चालू ठेवले. जर मोठ्या जगाची माहिती असलेला मानुमा नसता आणि त्यांनी वॉकरला तंगवून ठेवले नसते, तर ते शरण आले असते. वॉकरला मानुमाने उत्तर दिले.

“आम्हाला शंभर पौंड द्या. मग आम्ही काम करतो.”

वॉकरने त्याच्यावर मूठ उगारत, त्याच्यावर झेप घेतली. देशी माणसावर चालून जाण्याची व हात उगारण्याची ही काही पहिली वेळ नव्हती. त्यांना त्याची ताकद माहिती होती. जरी वॉकर वयाने त्यांच्या तिप्पट होता आणि सहा इंचाने बुटका होता, तरी त्याना माहिती होते, की तो मानुमाला सहज हरवेल. त्या व्यवस्थापकाच्या रानटी हल्ल्याला विरोध करायचा विचार कोणीही केला नाही. वॉकर काही बोलला नाही. तो गालातल्या गालात हसला.

तो म्हणाला, “मी माझा वेळ मूर्खांच्या गटाबरोबर फुकट घालवणार नाही. मी परत सांगतो. तुम्हाला माहिती आहे, मी तुम्हाला काय देईन. जर तुम्ही आठवड्याभरात कामाला लागला नाहीत, तर तुमची माझ्याशी गाठ आहे.”

तो वळून चालता झाला. त्याने त्याची जुनी घोडी काढली व त्याचे व देशी लोकांचे पहिल्यापासून जसे संबंध होते, तसे एका वयाने मोठ्या माणसाने सपाट केलेल्या खडकावरून घोडीवर बसण्यासाठी त्याला मदत केली.

त्या रात्री वॉकर त्याच्या घराजवळून, घोडीवरून रस्त्याने रपेट मारत असतांना, त्याला वेगाने त्याच्याजवळून काही गेल्याचा आवाज आला आणि झाडाला एक धक्का बसला. त्याच्यावर काही फेकले गेले होते. त्याने लगेच बचावात्मक पवित्रा घेतला. ”कोण आहे?” तो ओरडला. जिथून ती वस्तू आली, त्या दिशेने तो धावला. त्याला एक माणूस झुडुपांमधून निसटताना दिसला. अंधारात त्याचा पाठलाग करण्यात काही अर्थ नव्हता. थोड्याच वेळात वॉकर दमून गेला असता. त्यामुळे तो थांबला व घरी परतला. त्याने मॅकिन्टॉशला व चिनी मुलाला बोलावले.

“त्यांच्यापैकी एकाने माझ्या अंगावर काहीतरी फेकले. इकडे येऊन ते काय होते, ते शोधा.”

त्याने मुलाला कंदील आणायला सांगितले. त्यांच्यापैकी तिघेजण त्या ठिकाणी गेले. त्यांनी जमिनीवर शोधले. पण त्यांना काही सापडले नाही. अचानक मुलगा विचित्र आवाजात ओरडला. काय झाले, हे बघण्यासाठी ते वळले. त्याने कंदील उंच धरला. उजेडात तिथे गंभीरपणे

घाबरवणारे काही दिसले. एक मोठा चाकू नारळाच्या झाडाच्या खोडात खुपसलेला होता. तो इतक्या जोराने मारला होता, की तो बाहेर काढायला फार प्रयत्न करावा लागला.

"अरे देवा, जर तो माझ्यावरून चुकला नसता, तर मी मेलोच असतो."

वॉकरने चाकू हातात घेऊन पाहिला. तो चाकू म्हणजे शंभर वर्षांपूर्वी बेटावर आलेल्या गोऱ्या माणसाच्या / खलाशाच्या चाकूची नक्कल होती. ते खून करायचे हत्यार होते. त्याचे पाते बारा इंच लांब असून खूप धारदार होते. वॉकर गालातल्या गालात हसला.

"राक्षस, हरामखोर राक्षस!"

तो चाकू मारणारा मानुमा असल्याबद्दल त्याला खात्री होती. तीन इंचाने त्याचे मरण टळले होते. तो चिडला नव्हता. उलट तो फार उत्साही होता. या साहसाने तो आनंदित झाला होता. जेव्हा ते परत घरी आले, तेव्हा त्यांनी पेय मागवले. त्याने विजयानंदाने हात चोळले.

"याबद्दल मी त्याना चांगली शिक्षा करेन."

त्याचे लहान डोळे चमकले. तुर्की कोंबड्यासारखी त्याने आरोळी मारली. अर्ध्या तासात दुसऱ्यांदा त्याने आग्रहाने मॅकिन्टॉशला घटनेचे इत्यंभूत वर्णन ऐकवले. मग त्याने त्याला पिक्वेट वाजवायला सांगितले आणि तो वाजवत असतांना, त्याचे बेत काय आहेत, याबद्दल बढाया मारल्या. मॅकिन्टॉशने ओठ मिटून सर्व ऐकून घेतले.

"पण तू त्यांचा पाणउतारा का केलास? तुला त्यांच्याकडून जे काम करून घ्यायचे आहे, त्यासाठी वीस पौंड अगदीच कमी आहेत."

“मी त्यांना काही देतो आहे, याबद्दल त्यांनी माझे आभार मानले पाहिजेत.”

“ते विसर. हा काही तुझा पैसा नाही. सरकारने तुला योग्य रक्कम दिली आहे. ती तू खर्च केलीस, तर त्यांची काही तक्रार असणार नाही.”

“ते अपियामधील मूर्खांचा गट आहेत.”

मॅकिन्टॉशने पाहिले की वॉकरचा उद्देश निव्वळ मिरवणे, एवढाच होता. त्याने त्याचे खांदे उडवले.

“तुझ्या जिवाची किंमत देऊन त्यांना अपियाला पाठवणे फारसे चांगले ठरणार नाही.”

तू बघ, ते लोक मला काही करणार नाहीत. ते करूच शकणार नाहीत. ते माझी पूजा करतात, मानुमाची नाही. मानुमा मूर्ख आहे. त्याने तो चाकू मारून, मला घाबरवण्याचा प्रयत्न केला आहे.”

दुसऱ्या दिवशी वॉकर परत गावात चक्कर मारायला गेला. त्याला माटॉटू म्हणत. तो घोडीवरून खाली उतरला नाही. जेव्हा तो गावातील मुख्य माणसाच्या घरी पोचला, तेव्हा त्याने बरेच लोक गोलाकारात बोलत बसलेले पाहिले. त्याने तर्क केला की ते रस्त्याच्या प्रश्नाबद्दल बोलत असावेत. सामोआंची घरे अशा पद्धतीने बांधत असतः एका बारीक झाडाचे खोड मध्यभागी ठेऊन, तिथून उताराच्या दिशेने छत शाकारत असत. नारळाच्या झावळ्यांचे खिडक्यांचे पडदे असत. रात्री किंवा पाऊस पडत असेल तर, ओढून खाली घेता येत. सर्वसामान्यपणे झोपडी सर्व बाजूंनी उघडी असे, जेणेकरून वरा मोकळेपणे वाहू शके. वॉकर झोपडीलगत उभा राहिला व गावप्रमुखाला बाहेर येण्यासाठी हाक मारली.

“अरे तंगॅटू, काल रात्री तुझ्या मुलाने त्याचा चाकू झाडात रुतलेला ठेवला. मी तो तुझ्याकडे परत आणला आहे.”

त्याने हळू आवाजाने हसत तो जमिनीवर गोलाकारामध्ये फेकला.

सोमवारी त्यांनी काम सुरु केले आहे, की नाही हे बघण्यासाठी तो बाहेर पडला. त्याचे काही चिन्ह नव्हते. त्याने गावात चक्कर मारली. पण गावकरी त्यांच्या रोजच्या कामात दंग होते. काहीजण पॅनडॅनसच्या पानांच्या चटया विणत होते. एक म्हातारा कावाचा बाउल घेऊन बसला होता. मुले खेळत होती. बायकांचे घरकाम सुरु होते. वॉकर ओठांवर हसू खेळवत गावप्रमुखाकडे आला.

गावप्रमुख म्हणाला, “टालोफा-ली.”

वॉकर उत्तरला, “टालोफा.”

मानुमा सिगरेट ओढत, जाळे विणत होता. त्याने विजयाने वर वॉकरकडे बघितले.

“तू ठरवले आहेस, की रस्ता तयार करायचा नाही?”

गावप्रमुख म्हणाला, “तू आम्हाला शंभर पौंड देण्याचे कबूल केल्याशिवाय नाही.”

तो मानुमाकडे वळून बोलला, “तुला याचा पश्चात्ताप होईल. अरे मुला, तू म्हातारा व्हायच्या आधीच तुझी पाठ दुखायला लागली, तर मला काही नवल वाटणार नाही.”

तो गालातल्या गालात हसत निघून गेला. त्याने गावकऱ्यांना अस्वस्थ करून सोडले. ते त्या जाड्या, भीतीदायक म्हाताऱ्याला घाबरू लागले. मिशनऱ्यांनी पण त्याला शिव्या दिल्या. मानुमा उघडपणे त्याचा

अपमान करू लागला. पण कोणीही त्या लबाड राक्षसाच्याविरुद्ध जाऊ शकले नाही कारण त्यांना आज ना उद्या तो आपले काही वाईट करेल, ही भीती होती. त्यांनी चोवीस तासात सुगावा लावला, की त्याने काय योजना शोधून काढली आहे. ती नामी होती. कारण दुसऱ्या दिवशी सकाळी बायका, पुरुष व मुलांचे एक मोठे पथक गावात आले. गावप्रमुख म्हणाला, की त्यानी रस्ता बांधण्यासाठी, वॉकरबरोबर एक सौदा ठरवला आहे. वॉकरने त्याना वीस पौंड देऊ केले आहेत आणि त्यांनी ते मान्य केले आहे. आता लबाडी इथे आहे, की प्रशांत महासागरातील बेटांच्या तीन विभागांपैकी एकातील लोकांचा आदरातिथ्याचा असा कायदा होता, सरबराईची अशी कायदेशीर पद्धत होती, की पाहुण्यांना फक्त रहायला जागाच द्यायची नाही, तर त्याना रहायचे तितके दिवस अन्न व पेयेदेखील पुरवायची. माटॉटूच्या रहिवाश्यांनी हा मोठा शहाणपणाचा चांगला मार्ग शोधून काढला होता. प्रत्येक सकाळी ते लोक आनंदाने पथक मिरवत नेत. झाडे तोडत, खडक फोडत, जमिनीचे सपाटीकरण करत. संध्याकाळी परत जमत. पोटभर खात, पित, नाचत, गात आणि मजा करत. त्यांच्यासाठी ती जणू सहल होती. पण लवकरच त्यांचे पुढाऱ्यांचे चेहरे लांब झाले. विचित्र लोकांची भूक अमर्याद असे. त्यांच्या हावरटपणापुढे धान्य, पाव आणि फळे संपून जाऊ लागली. चांगल्या भावाने अपियाला पाठवली जाणारी पेरची फळे इथेच संपू लागली. त्यांचे चेहरे लांबट दिसू लागले. त्यांना असे आढळले की हे विचित्र लोक, फार मंद गतीने काम करतात. त्याना असे करण्यासाठी वॉकरकडून सूचना मिळाली होती का? अशा रीतीने रस्त्याचे काम संपल्यावर गावात अन्नाचा एक कणदेखील उरला नसता आणि त्याहून वाईट म्हणजे, ते जेव्हा काही कारणाने दुसऱ्या वस्तीत जात, तेव्हा

त्यांना ही गोष्ट माहिती असल्याचे ते हसत हसत सांगत. राग दाखवत, त्याचे हसे केले जाई. गावकऱ्यांना त्यांची टर उडवलेली सहन होत नसे. हळूहळू त्यांच्यात असंतोषाचे वातावरण पसरू लागले. मानुमा आता नायक राहिला नाही. त्याला बरेचसे साधे सरळ बोलावे लागे. एक दिवस वॉकरने सुचवलेले खरे ठरले. गरम वाद भांडणात बदलला आणि अर्धा डझन माणसे गाव प्रमुखाच्या मुलावर चालून गेली आणि त्याला इतके चोपून काढले, की आठवडाभर तो मार लागून काळानिळा पडला होता व सुजलेले शरीर घेऊन पॅनडॅनुसच्या चटईवर पडून होता. तो या कुशीवरून त्या कुशीवर वळताना कण्हत होता. व्यवस्थापक त्याच्या म्हाताऱ्या घोडीवर स्वार होऊन, एक दोन दिवसांनी चक्कर मारे व रस्त्याच्या कामाची प्रगती बघे. घडलेल्या दुःखद प्रसंगाबद्दल विरोधाने टोमणे मारायचा त्याला मोह होई. माटॉटूच्या रहिवाश्यांना त्यांच्या लाजीरवाण्या प्रसंगातील कटूपणा दाखवून देण्याची संधी तो सोडत नसे. तो त्यांचे धैर्य पळवून लावे. बोलून बोलून, त्यांचा अभिमान खच्ची करे. ते सगळे विचित्र लोकांबरोबर निघत व रस्त्याच्या कामाला सुरवात करत. जर पीक आणि अन्न वाचवायचे असेल, तर ते काम लवकर पूर्ण करणे गरजेचे होते. त्यामुळे सर्व गाव कामाला लागले होते. ते शांतपणे, पण खूप आक्रमक रागाने व हृदयातील मोठ्या शरमेने काम करत. मुलेसुद्धा गुपचूप श्रम करत. बायका लाकडाचे भारे वाहतांना दुःख करत. वॉकर त्यांना बघे, तेव्हा इतका हसे, की तो घोडीवरून पडायला येई. ही बातमी झटपट सर्वदूर पसरली आणि त्यामुळे बेटावरील लोक मरणांतिक अस्वस्थ झाले. त्या लबाड, म्हाताऱ्या, गोऱ्या माणसाचा हा सर्वात मोठा विजय होता. त्याने, म्हणजे वॉकरने, वीस पौंडात काम करायला तयार नसणाऱ्या गावातील लोकाना बाजूला पाडून, लांबलांबच्या

गावाहून कुटुंबकाबिल्यासह येणाऱ्या देशी लोकांकडून रस्त्याचे काम करून घेतलेले पाहणे, म्हणजे फार मोठा विनोद होता. त्यामुळे गावातील लोकांना आता काहीच काम नव्हते. पण ते जितके कष्ट करत, तेवढी पाहुणे मंडळी खूष होत. जर त्यांना चांगले जेवण काही न करता मिळत असेल, तर मग त्यांनी घाई का करावी? जितके ते काम लांबवतील, तितका जास्त मोठा विनोद होईल. बिचाऱ्या गावातील लोकांना हे सहन होईना. त्यामुळे आज सकाळी ते असे सांगत आले होते, की या गावाबाहेरून आलेल्या लोकांना परत पाठवा. ते लोक परत गेले तर त्यांनी उरलेले रस्त्याचे काम फुकट करायचे आश्वासन दिले. वॉकरसाठी हा पूर्ण विजय होता. गावकरी नम्र झाले होते. त्याच्या कोऱ्या चेहऱ्यावर घमेंडखोर समाधान पसरले होते. खुर्चीत बसलेला तो, एखाद्या मोठ्या बेडकासारखा फुगला होता. त्याने काहीसा गंभीर आव आणलेला बघून, मॅकिन्टॉश उबग येऊन शहारला. मग खालच्या आवाजात त्याने बोलायला सुरवात केली.

"मी माझ्या भल्यासाठी रस्ता करतो आहे का? तुम्हाला काय वाटते, यामुळे माझा फायदा होणार आहे का? तो तुमच्यासाठी आहे. तो केल्यामुळे तुम्हाला तुमचा माल घेऊन आरामात चालता येणार आहे. जरी तो तुमच्या स्वतःच्या कामाचा असला, तरी मी तुम्हाला या कामासाठी पैसे देतो आहे. तुमच्यासाठीच हा रस्ता केला जातो आहे. तरीही मी तुम्हाला त्याचे पैसे देण्याचे कबूल केले होते. मी तुमच्या बाबतीत उदारपणा केला होता. तो तुम्ही नाकारलात. आता तुम्ही माझे काम केले पाहिजे. मी मानुआच्या लोकांना आता घरी पाठवून देणार आहे. आता तुम्ही पैसे भरा तुम्ही रस्ता पूर्ण केलात आणि वीस पौंड भरलेत, तर ते वीस पौंड मी त्याना देईन व मग हाकलून देईन."

तिथे मोठ्याने जयघोष झाला. त्यांना वॉकरचे म्हणणे पटले. त्यांनी त्याला सांगितले, की त्यांच्याकडे पैसे नाही आहेत. ते म्हणाले त्या प्रत्येक गोष्टीला त्याने बुद्धीला किंवा भावनाशीलतेला न साजेसे फसवे उत्तर दिले. मग गजर झाला.

तो म्हणाला, "जेवायची वेळ झाली. सर्वांना बाहेर काढा."

तो जोर लावून खुर्चीवरून उठला. आणि खोलीबाहेर पडला. जेव्हा मॅकिन्टॉश त्याच्या मागोमाग गेला, तेव्हा त्याने वॉकरला आधीच टेबलाशी बसलेले पाहिले. त्याने गळयाभोवती रुमाल बांधला होता. चिनी स्वयंपाकी आणत असलेल्या जेवणासाठी त्याने हातात काटा चमचा तयार ठेवला होता. तो मोठ्या आनंदात होता.

मॅकिन्टॉश बसल्यावर तो म्हणाला, "मी त्यांना चांगले खाली मान घालायला लावले. आता यापुढे रस्ते बांधण्यासाठी मी विशेष श्रम घेणार नाही."

मॅकिन्टॉश थंडपणे म्हणाला, "मला वाटले, तू विनोद करत आहेस."

"म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?

"तू खरे तर त्याना वीस पौंडात काम करायला लावणार नव्हतास ना?

"पाहिजे तर, तुझ्या आयुष्याची पैज लाव. पण मी असेच करणार होतो."

"असे करायचा तुला काही अधिकार असल्याबद्दल, मला खात्री नाही."

“नाही का? मला या बेटावर पाहिजे तशी गोष्ट करून घ्यायचा, अधिकार आहे.”

“मला वाटते, तू त्यांना फार राबवून घेतले आहेस.”

वॉकर जोरात हसला. मॅकिन्टॉशला काय वाटत होते, त्याची त्याने पर्वा केली नाही. “जेव्हा मला तुझे मत हवे असेल, तेव्हा मी ते विचारेन.”

मॅकिन्टॉश गोरामोरा झाला. कटू अनुभवातून, त्याला कळले होते, की तो गप्प बसण्याशिवाय, काही करू शकत नाही. फार प्रयत्न करून त्याला त्याच्या चिडलेल्या मनाला आवर घालावा लागला. त्यामुळे तो मंद व आजारल्यासारखा झाला. त्याच्यासमोर असलेले अन्न तो खाऊ शकेना. उबग येऊन तो वॉकरला त्याच्या मोठ्या तोंडात मास कोंबताना बघत होता. तो वाईट खादाड होता. त्याच्याबरोबर टेबलावर बसणे, म्हणजे बळकट पोट हवे. मॅकिन्टॉश शहारला. त्या लबाड आणि दुष्ट माणसाला लज्जित करावे, त्याला धुळीला मिळवावे, त्याने इतरांना जेवढा त्रास दिला, तेवढा तरी त्याला द्यावा, अशी खोलवर इच्छा त्याच्या मनात उफाळून आली. त्याने कुठल्याही हट्टी, जणू माजलेल्या बैलाला इतका उन्मत्तपणा करतांना पाहिले नव्हते.

दिवस चालले होते. मॅकिन्टॉशने जेवल्यावर झोपायचा प्रयत्न केला,

पण त्याच्या मनातील सूडाची इच्छा, त्याला तसे करून देईना. त्याने वाचायचा प्रयत्न केला. पण त्याच्या डोळ्यापुढे अक्षरे नाचू लागली. कठोरपणे सूर्य भाजून काढत होता. तो पावसासाठी तरसला होता. पण त्यामुळे आपल्याला थंड वाटणार नाही, तर त्यामुळे आणखी उकडून गुदमरल्यासारखे होईल, हे त्याला माहिती होते. तो देशी ॲबर्डीन

[स्कॉटलंडमधील एक शहर] होता. त्या शहरातील बर्फाळ वारे कसे ग्रॅनाईटच्या रस्त्यांवरून शीळ घालत वहात असत, त्या आठवणींने तो व्याकुळ झाला. इथे तो नीरव समुद्राचाच नव्हे, तर त्या म्हाताऱ्या, भयंकर कैद्याबद्दलच्या द्वेषाचासुद्धा कैदी होता. त्याने त्याच्या दुखणाऱ्या डोक्याला हात लावला. त्याला स्वतःला मारून घ्यायला आवडले असते. पण त्याने धीर गोळा केला. त्याने त्याचे मन कुठेतरी दुसरीकडे वळवले पाहिजे. तो वाचू शकत नव्हता, त्याने ठरवले की तो त्याचे खासगी कागदपत्र नीट लाऊन ठेवेल. हे काम त्याला खूप दिवस करायचे होते आणि खूप दिवस न करता तसेच ठेवले जात होते. त्याने त्याच्या टेबलाच्या खणाचे कुलूप उघडले आणि मुठभर पत्रे बाहेर काढली. त्याची नजर पिस्तुलावर पडली. ते बाजूला ठेवण्यापेक्षा, त्याच्या डोक्यात अशी सणक आली, की त्यात गोळी भरून, ती वॉकरला मारावी आणि असह्य जीवनेच्छेपासून सुटका करून घ्यावी. त्याच्या लक्षात आले, की दमट हवेत पिस्तुल थोडे गंजले होते. त्याने एक तेलाची चिंधी घेऊन, ते स्वच्छ करायला सुरवात केली. अशा तऱ्हेने तो कामात गुंतला असतांना, त्याच्या लक्षात आले, की कोणीतरी दरवाज्याशी आले आहे. त्याने वर बघून म्हटले, “कोण आहे?”

क्षणभरानंतर मानुमा पुढे आला.

“तुला काय हवे आहे?”

गावप्रमुखाचा मुलगा क्षणभर चिडून पण शांतपणे उभा राहिला व बोलला, तेव्हा त्याचा आवाज थरथरत होता.

“आम्ही वीस पौंड भरू शकत नाही. आमच्याकडे पैसे नाहीत.”

मॅकिन्टॉश बोलला, “मग मी काय करणार? मिस्टर वॉकर काय म्हणाले, ते तू ऐकलेस.”

मानुमा अर्ध्या इंग्लिशमध्ये व अर्ध्या सामोअनमध्ये वाद घालू लागला. ते कवितेत दुःखाचे ओरडणे होते. एखाद्या भिकाऱ्यासारखा आवाजात चढउतार होत, थरथरत, तो ते गाणे तो गात होता. त्यामुळे मॅकिन्टॉशला उबग आला. माणसाने इतके अत्याचार सहन करावेत, याचा त्याला संताप आला. त्याला मानुमाची दया आली.

मॅकिन्टॉश रागाने बोलला, “मी काही करू शकत नाही. तुला माहिती आहे, की इथे मिस्टर वॉकर सर्वेसर्वा आहेत.”

मानुमा पुन्हा शांत झाला. अजूनही तो दारात उभा होता. शेवटी तो

बोलला, “मी हरलो व आजारी पडलो आहे. मला काही औषध द्या.”

“तुला काय झाले आहे?”

“मला कळत नाही. पण मी आजारी आहे. माझ्या शरीरातून कळा येत आहेत.”

“तिथे उभा राहू नकोस. आत ये आणि मला तुझ्याकडे पाहू दे.”

मानुमा आत शिरला आणि टेबलासमोर उभा राहिला. “माझ्या सर्वांगातून कळा येत आहेत.”

त्याने त्याचे हात त्याच्या कपड्यांना व चेहऱ्याला लावले आणि तोंडावर दुःखी भाव आणले. अचानक मॅकिन्टॉश भानावर आला, की दारात उभा असतांना त्याने टेबलावर ठेवलेल्या पिस्तुलावर, मानुमाचे डोळे स्थिर झाले होते. दोघांमधील शांतता मॅकिन्टॉशच्या दृष्टीने शेवट नसलेली

होती. मानुमाच्या डोक्यातील विचार त्याला स्पष्टपणे जाणवले. त्याचे हृदय धडधडू लागले. काहीशा वेगळयाच इच्छेच्या जोराने त्याच्यावर कब्जा केला. तो स्वतः हलला नाही पण त्या अनोख्या शक्तीने त्याला हलवले. अचानक त्याचा घसा कोरडा पडला. बोलण्यासाठी, आपोआप त्याचा हात तिथे गेला. तो मानुमाची नजर टाळू लागला. त्याचा गळा कोणीतरी आवळल्यासारखा तो बोलला, "जरा इथे थांब. मी तुला दवाखान्यातून काही आणून देतो."

तो उठला. तो थोडा डळमळत चालतो आहे, असे त्याला का वाटले? मानुमा शांतपणे उभा होता. त्याचे डोळे स्थिर होते. मॅकिन्टॉशला माहिती होते, की तो मलूलपणे दाराबाहेर बघतो आहे. त्याला बाहेर कोणीतरी दिसत होते व बाहेर बोलावत होते. मॅकिन्टॉशने पटकन मूठभर कागद गोळा करून, पिस्तुलावर ठेवून ते झाकले व आत गेला. त्याने एक गोळी आणली आणि एका लहान बाटलीत निळे द्रावण ओतले. मग बाहेर अंगणात आला. त्याला परत त्याच्या बंगल्यात जायचे नव्हते. म्हणून त्याने मानुमाला हाक मारली. "इकडे ये."

त्याने त्याला औषध दिले व ते कसे घ्यायचे, ते सांगितले. त्या गावठी माणसाकडे बघणे त्याला शक्य का होत नव्हते, ते त्याला कळत नव्हते. बोलतांना त्याचे लक्ष मानुमाच्या खांद्याकडे होते. मानुमाने औषध घेतले व गेटबाहेर पडला.

मॅकिन्टॉश जेवायच्या खोलीत गेला आणि परत जुने वर्तमानपत्र उघडले. पण त्याला ते वाचवेना. घर चिडीचूप होते. वरच्या मजल्यावर वॉकर झोपला होता. चिनी स्वयंपाकी कामात मग्न होता. बाहेर दोन पोलीस मासे पकडत होते. घरावर पसरलेली शांतता काही वेगळीच जाणवत होती.

मॅकिन्टॉशच्या डोक्यात घणाघाती विचार चालले होते, की अजूनही पिस्तुल त्याने ठेवले त्या जागीच पडलेले होते का? त्याला जाऊन ते बघायचे धाडस होत नव्हते. अनिश्चितता भयंकर होती. पण निश्चितता त्याहूनही भयंकर होती. तो घामेजला. त्याला शेवटी शांतता असह्य झाली. शेवटी त्याने ठरवले की रस्त्याला लागून मैलभर लांब असलेल्या जर्व्हीस नावाच्या व्यापाऱ्याच्या दुकानात जायचे. तो मिश्र जातीचा होता. पण त्याच्या अंगात असलेले अर्धेमुर्धी गोरे रक्त त्याच्याशी बोलायला लावत होते. त्याला बंगल्यापासून, कशाही पसरलेल्या कागदांच्या टेबलापासून आणि त्याखाली असलेल्या कशापासून तरी किंवा कशापासूनच नव्हे, पण दूर जायचे होते. तो रस्त्याने चालू लागला. गावप्रमुखाच्या झोपडीवरुन जातांना त्याने त्याला अभिवादन करत हाक मारली. मग तो दुकानाशी आला. तिथे व्यापाऱ्याची काळया रंगाची व मोठमोठे नाक डोळे असलेली मुलगी गुलाबी ब्लाउज व पांढऱ्या स्कर्टमध्ये बसली होती. जर्व्हीसला तिचे लग्न करून द्यायची इच्छा होती. त्याच्याकडे पैसा होता आणि त्याने मॅकिन्टॉशला सांगितले होते, की त्याला चांगला सुस्थितीतला जावई हवा आहे. मॅकिन्टॉशला पाहिल्यावर ती थोडी लाजली.

“आज सकाळी आलेली काही खोकी बाबा रिकामी करत आहेत. मी त्यांना तुम्ही आल्याचे सांगते.”

तो बसला आणि मुलगी दुकानाच्या मागे गेली. क्षणभरात तिची आई आली. ती मोठी जाड म्हातारी बाई होती. ती खूप मोठ्या जमिनीची मालकीण होती. तिने त्याच्याबरोबर हस्तांदोलन केले. तिचा जाडेपणा म्हणजे जणू गुन्हाच होता. पण ती शान राखून होती. ती प्रेमळ पद्धतीने लक्ष

न देणारी नसूनही, मित्रत्वाने वागणारी होती. पण तिच्या दर्जाचा आब राखून होती.

“मिस्टर मॅकिन्टॉश, तुम्ही तसे परके आहात, पण टेरेसा आज सकाळीच म्हणत होती, की हल्ली तुम्ही दिसत नाही.”

स्वतःला त्या व्यापाऱ्याचा जावई समजून, तो थोडा शहारला. त्याच्या गोऱ्या रक्ताची पर्वा न करता, ती मोठ्या रुबाबात तिच्या नवऱ्यावर वर्चस्व गाजवत होती, हे खट्याळपणाचे होते. तो तिचा अधिकार होता आणि ती व्यापाराची मुख्य होती. गोऱ्या लोकांसाठी ती मिसेस जर्व्हीसपेक्षा अधिक काही नव्हती, पण तिचे वडील राजघराण्याच्या रक्ताचे प्रमुख होते. तिचे वडील व वडिलांचे वडील राजा म्हणून राज्य करत होते. त्याच्या दबाव टाकणाऱ्या बायकोपुढे लहान दिसणारा, काळा, दाढी राखलेला, देखणा व चमचमत्या दातांचा व्यापारी आला. तो खास ब्रिटीश होता. त्याचे संभाषण जास्त वाक्प्रचार असलेले होते. पण तो इंग्लिश परदेशी उच्चाराने बोलत होता. त्याच्या कुटुंबाबरोबर तो देशी भाषेत बोलत होता. तो दुसऱ्याच्या मदतीस तत्पर असलेला, घाबरट व आज्ञाधारक माणूस होता.

“ओहो, मिस्टर मॅकिन्टॉश, हे आनंदमय आश्चर्य आहे. टेरेसा, व्हिस्की आण. मिस्टर मॅकिन्टॉश आपल्याबरोबर थोडी घेतील.”

काही वेळ पाहुण्याच्या डोळ्यांकडे बघत, त्याने अपियामधील अलीकडच्या बातम्या दिल्या. अशा तऱ्हेने त्याने मॅकिन्टॉशचे स्वागत केले.

“वॉकर कसा आहे? मी अलीकडे त्याला पाहिले नाही. मिसेस जर्व्हीस त्याच्याकडे एका त्रासदायक माणसाला या आठवड्यातील एखाद्या दिवशी पाठवणार आहे.”

टेरेसा म्हणाली, “त्यांना आज सकाळी घोडीवरून घरी परततांना मी पाहिले.”

जर्व्हीस व्हिस्कीची बाटली हातात धरून म्हणाला, “हं. व्हिस्की आली.”

मॅकिन्टॉश प्यायला. दोन बायका त्यांच्याकडे बघत बसल्या. मिसेस जर्व्हीसने काळा गाउन घातला होता. मॅकिन्टॉशची नजरानजर झाल्यावर टेरेसा हसण्यासाठी उत्सुक होती. काही त्रास न घेता, व्यापारी लंब्याचौड्या बाता मारत होता.

अपियामध्ये असे बोलले जाते आहे, की वॉकर निवृत्त व्हायची वेळ जवळ आली आहे. तो आता काही इतका तरूण राहिला नाही. तो इथे बेटावर आल्यापासून खूप गोष्टी बदलल्या आहेत. पण तो त्याबरोबर बदलला नाही.”

मुख्य बाई म्हणाली, “तो फार टोकाला जातो आहे. त्यामुळे देशी लोक समाधानी नाहीत.”

व्यापारी हसत बोलला, “रस्त्याबद्दल चांगला विनोद झाला. मी अपियामध्ये जेव्हा त्याबद्दल सांगितले, तेव्हा त्यांचे मनोरंजन होऊन, ते खूप हसले. बिचारा वॉकर!”

मॅकिन्टॉशने त्याच्याकडे रानटीपणे पाहिले. तो त्याच्याबद्दल असे का बोलतो आहे? एका मिश्र जातीच्या व्यापाऱ्याचे वॉकरबद्दलचे मत असे होते. त्याच्या जिभेने शिवराळ भाषेत टोकाचे असमाधान व्यक्त केले. मॅकिन्टॉश काही बोलला नाही.

जर्व्हीस बोलला, “मिस्टर मॅकिन्टॉश, मला वाटते, तो जाईल, तेव्हा तू त्याची जागा घेशील. बेटावरील सर्वांना तू आवडतोस. तू देशी लोकांना समजून घेतोस. आता ते शिकले आहेत. जुन्या काळापेक्षा आता त्यांना वेगळ्या पद्धतीने वागवायला पाहिजे. त्याच्यासाठी तुझ्यासारखा शिक्षित मनुष्य पाहिजे. वॉकर फक्त माझ्यासारखा व्यापारी होता.”

टेरेसाचे डोळे चमकले.

जेव्हा वेळ येईल, तेव्हा जर कोणी काही करू शकत असेल, तर तो तूच असणार, याबद्दल माझी खात्री आहे. मी सर्व मुख्य मंडळींना अपियाला जाऊन तसा अर्ज करायला सांगणार आहे.”

मॅकिन्टॉशला फारच आजारल्यासारखे वाटायला लागले. त्याला हे माहिती नव्हते, की वॉकरला काही झाल्यास, त्याची त्या जागी नेमणूक होईल. हे खरे होते, की त्याच्या कार्यालयातील कोणालाच त्याच्याइतकी बेटाची माहिती नव्हती. तो अचानक उठला आणि निरोप घेऊन, बाहेर चालू पडला. आता तो सरळ त्याच्या खोलीवर गेला. त्याने टेबलावर एक झटपट कटाक्ष टाकला. त्याने कागदपत्रांमध्ये शोध घेतला. तिथे पिस्तुल नव्हते.

त्याचे हृदय धडधडू लागले. खुर्च्या, खण असे सगळीकडे त्याने ते शोधले. अगदी कसून शोधले. सर्व वेळ त्याला माहिती होते की ते तिथे नसणार आहे. अचानक त्याला वॉकरचा खर्जातील, उत्साही आवाज आला.

“मॅक, अरे काय करतो आहेस?”

वॉकर दारात उभा होता. क्षणार्धात मॅकिन्टॉश वळला आणि टेबलावरील कागद लपवू लागला.

“आवराआवरी चालली आहे का? मी त्यांना करडा कागद दिसेल असा, वरती ठेवायला सांगितले आहे. मी टाफोनीकडे अंघोळीसाठी जातो आहे. तू पण चल.”

मॅकिन्टॉश म्हणाला, “ठीक आहे.”

तो वॉकरबरोबर असेपर्यंत तरी नक्कीच काही होणार नव्हते. ते जाणार असलेली जागा तीन मैल दूर होती. तिथे, समुद्रापासून खडकांनी वेगळे केलेले ताज्या पाण्याचे तळे होते. ते देशी लोकांना अंघोळीसाठी राखून ठेवलेले होते. समुद्राच्या चिकट पाण्यापेक्षा हे थंड आणि उत्साहित करणारे होते. उन्हाळ्यात अशा जागा राखून ठेवल्या जात. गवताळ वाट व समुद्राचे जमलेले उथळ पाणी तुडवत ते निघाले. काही देशी गावे मागे पडली. घंटेच्या आकाराच्या झोपड्या एकमेकांपासून विखुरलेल्या होत्या. पांढरे चर्च मध्यभागी होते. तिसऱ्या गावी ते घोड्यांवरून उतरले. घोडे बांधले आणि तळ्याकडे निघाले. त्यांच्याबरोबर चार पाच मुली व डझनभर मुले चालत होती. लवकरच ते पाण्यात बागडत, ओरडत व हसत होते. लावा-लावा घातलेला वॉकर गडद करड्या रंगाच्या मोठ्या व्हेल माशाप्रमाणे इकडून तिकडे फेऱ्या मारत पोहत होता. मुलींबरोबर पांचट विनोद करत होता. त्या त्याच्याखाली उड्या मारून पोहत पसार होण्याचा आनंद घेत होत्या. जेव्हा तो दमला व खडकावर विश्रांती घेऊ लागला, तेव्हा मुलामुलींनी त्याला वेढले. जणू काही ते एक सुखी कुटुंब होते. त्याच्या चंद्रकोरीसारख्या पांढऱ्या केसांनी व चकाकणाऱ्या टकलानी म्हातारा समुद्रदेवतेसारखा दिसत होता. एकदा मॅकिन्टॉशला त्याच्या डोळ्यात अगदी तरल झाक दिसली.

तो म्हणाला, “ही आवडती मुले आहेत. ती माझ्याकडे मी वडील असल्यासारखी बघतात.”

आणि न थांबता तो एका मुलीकडे वळला व एक उबग आणणारा शेरा मारला. त्यामुळे सगळे जोरात हसू लागले. मॅकिन्टॉश कपडे घालू लागला.

त्याच्या बारीक हातापायांनी तो हास्यास्पद, पण गंभीरपणे घाबरवणाऱ्या आकृतीसारखा, अव्यवहार्य आदर्शवादी दिसू लागला. वॉकर त्याच्याबद्दल आचरट विनोद करू लागला. ते थोडेसे हसून साजरे केले गेले. मॅकिन्टॉश त्याच्या शर्टाशी झगडत होता. त्याला माहिती होते, की तो विचित्र दिसत होता. पण त्याला कुणी हसलेले त्याला आवडत नव्हते. तो शांतपणे रागाने बघत उभा होता.

“जर तुला वेळेवर जेवायला जायचे असेल, तर आता पाण्याबाहेर यायला पाहिजे.”

तू काही वाईट माणूस नाहीस. मॅक, फक्त तू मूर्ख आहेस. तू एक गोष्ट करत असतांना तुला नेहमी दुसरी गोष्ट करायची असते. असे करून चालत नाही.”

पण तरी तो उभा राहून कपडे घालू लागला. ते परत घरी येऊ लागले. गावप्रमुखाबरोबर बाउलभर कावा प्यायले. मग आळशी गावकऱ्यांचा निरोप घेऊन, ते घरी आले.

जेवणानंतर त्याच्या सवयीप्रमाणे, वॉकर त्याची सिगरेट पेटवत बाहेर चक्कर मारायची तयारी करू लागला. मॅकिन्टॉशला अचानक भीतीने घेरले.

“तुला असे वाटत नाही का, की रात्रीच्या वेळी एकट्याने असे बाहेर जाणे शहाणपणाचे नाही?”

वॉकरने त्याच्या गोल निळया डोळयांनी त्याच्याकडे रोखून पाहिले.

“तुला काय म्हणायचे तरी काय आहे?”

“त्या रात्रीचा चाकू आठव. ते लोक परत तुझ्यावर चालून येऊ शकतात.”

“छे, त्यांची छाती होणार नाही.”

“पूर्वी कुणाची तरी झाली होती.”

“ती एक थाप होती. ते मला जखमी करू शकत नाहीत. ते मला वडिलांसमान मानतात. त्यांना माहिती आहे की मी जे काही करतो, ते त्यांच्या भल्यासाठीच असते.”

मॅकिन्टॉशने मनात राग धरून, त्याच्याकडे पाहिले. त्या माणसाचे स्वसमाधान, त्याला चिडचिडे करून गेले. तरीही, काय ते त्याला कळत नव्हते, पण ते त्याला आग्रह करायला भाग पाडत होते.

आज सकाळी काय झाले, ते आठव. आजची रात्र घरी राहिलास तर काही बिघडणार नाही. मी तुझ्याबरोबर पिक़्वेट हा पत्त्यांचा खेळ खेळेन.”

मी परत आल्यावर तुझ्याशी तो खेळ खेळतो. माझा बेत बदलायला लावणारा देशी माणूस अजून पैदा झालेला नाही.”

“मग मी तुझ्याबरोबर येतो.”

“तू आहेस, तिथेच रहा.”

मॅकिन्टॉशने त्याचे खांदे शहारवले. त्याने त्या माणसाला पूर्णपणे सावध केले होते. जर त्याने त्याकडे लक्ष दिले नाही, तर तो त्याचा प्रश्न होता. वॉकरने त्याची टोपी घातली व बाहेर पडला. मॅकिन्टॉशने वाचायला सुरवात केली. पण मग त्याच्या मनात एक विचार आला. कदाचित तो कुठे आहे, हे स्पष्ट केलेले बरे ठरले असते. त्याने स्वयंपाकघर ओलांडले आणि काहीतरी सबब काढून, काही मिनिटे स्वयंपाक्याशी बोलला. मग त्याने ग्रामोफोन बाहेर काढला आणि एक तबकडी लावली. पण त्याच्यावर उदास धून व लंडनचे एक विनोदी गाणे वाजायला लागल्यावर, त्याच्या कानांना ते ओझे वाटू लागले व त्याला रात्रीकडे दूर ओढू लागले. त्याच्या कोपरापाशी आवाज वाढत चालला. तो गोंगाट करणारा कर्कश आवाज त्याला सहन होईना. त्याला या जगाबाहेरील शांततेने घेरल्यासारखे वाटू लागले. समुद्राच्या पाण्याचा खडकांवर आपटणारा बारीकसा आवाज त्याने ऐकला. लांबवर नारळाच्या झावळ्यांमध्ये वाऱ्याची झुळूक सुस्कारत होती. असे किती वेळ चालणार? हे भयंकर आहे.

त्याला कर्कश हसणे ऐकू आले. "आश्चर्य कधी संपणार नाही. मॅक, तू नेहमी रेकॉर्ड लावत नाहीस."

खिडकीत लाल तोंडाचा, फसवा, आनंदी वॉकर उभा होता.

"तर तू बघतो आहेस, की मी जिवंत व उत्फुल्ल आहे. तू काय खेळायचे म्हणत होतास?"

वॉकर आत आला.

"तुला थोडे मलूल वाटते आहे का? छान वाटण्यासाठी तू गाणे लावत होतास का?"

“मी चर्चची प्रार्थना लावत होतो.”

“ते भिकार काय असते?”

“गळून गेल्यासारखे झाले असेल तर, पेलाभर कडक बिअर घे.”

“ते जलद तालातील छान गाणे आहे. मी ते कितीही वेळा ऐकू शकतो. आता पत्ते खेळतांना मी तुझ्याकडून पैसे काढू शकतो.”

ते खेळू लागले आणि वॉकर त्याच्या भिडूला हरवत, त्याच्या चुकांवर वाकुल्या दाखवत, वेडीवाकडी हालचाल करत, कडक शब्द वापरत, मोठ्या उन्मादाने, जिंकण्याचा दिशेने निघाला. मॅकिन्टॉशने त्याचा थंडपणा परत मिळवला. त्या अरेरावी करणाऱ्या म्हाताऱ्याला त्याच्या रुबाबात बघणे, त्याच्यासाठी एक वेगळाच आनंद होता. कुठेतरी मानुमा त्याच्या संधीची वाट बघत दबा धरून बसला होता.

वॉकर खेळांमागून खेळ जिंकत होता. संध्याकाळच्या शेवटी विनोद करत, त्याचा खिसा चांगला जड झाला होता.

“माझ्याविरुद्ध जिंकायला तुला थोडे म्हातारे व्हावे लागेल. मॅक, खरी गोष्ट अशी आहे, की मी नैसर्गिकपणे पत्ते चांगले खेळतो.”

“यात पण काही अशी देणगी असू शकते, हे मला माहिती नव्हते. तू तर पत्त्यांचा एक्काच निघालास.”

वॉकर बोलला, “चांगल्या खेळाडूंना चांगले पत्ते येतात. मला तुझे हात मिळाले असते, तर मी जिंकलो असतो.”

अनेक चतुर लोकांबरोबर खेळलेल्या पत्त्यांच्या डावांबद्दलच्या मोठ्या गोष्टी वॉकर सांगत बसला. त्यांच्याकडचे सगळे पैसे त्याने कसे लुटले, या बढाया तो मारत होता. स्वतःचे कौतुक करत होता. मॅकिन्टॉश

लक्षपूर्वक ऐकत होता. आता त्याचा द्वेष उफाळून आला. वॉकर सांगत असलेली प्रत्येक गोष्ट, त्याची प्रत्येक हालचाल, त्याला अधिकाधिक अरुचीपूर्ण वाटू लागली. शेवटी वॉकर उठला.

आता त्याला खायचे होते.

त्याने मोठी जांभई देत म्हटले, "मला उद्या खूप काम आहे."

"तू काय करणार आहेस?"

"मी उद्या बेटाच्या दुसऱ्या बाजूला जाणार आहे. मी पाचला निघेन. पण मी रात्री जेवायच्या वेळेपर्यंत तरी येईन का, शंकाच आहे."

सहसा ते सातला जेवत असत.

"आपण ती वेळ साडेसात करू."

"मला वाटते, तसेच करावे लागेल."

मॅकिन्टॉशने त्याला पाइपमधून राख झटकताना पाहिले. त्याचा बळकटपणा व चापल्य थोडे उद्धटपणाकडे झुकणारे पण रसरशीत होते. त्याच्या डोक्यावर मृत्यू नाचत असल्याचा विचार करणे विचित्र होते. मॅकिन्टॉशच्या फिकट व थंड डोळयातून, पुसटसे हसू निसटले.

"तुला मी तुझ्याबरोबर आलेले आवडेल का?"

"असे मला का हवे असेल? मी माझी घोडी नेणार आहे आणि तीस मैल जायला ती आपल्या दोघांचे ओझे घेऊ शकणार नाही."

माटॉटूच्या लोकांना काय वाटते आहे, हे कदाचित तुझ्या लक्षात आलेले नाही. मी तुझ्याबरोबर आलो, तर ते सुरक्षित ठरेल."

वॉकर रागावून, जोरात हसू लागला. ”तू एक प्रकारचा भंगार माल आहेस. मी कशाची भीती बाळगत नसतो.”

आता मॅकिन्टॉशच्या डोळयांवरून, त्याचे हास्य ओठांपर्यंत पोचले व पूर्ण चेहरा दुःखाने हसरा झाला.

‘अशिष्ट असे लैंगिक वर्तन करणाऱ्या मनाला कोणीही भ्रष्टाचारी बनवू शकते.’

वॉकर बोलला, “ते काय असते?”

मॅकिन्टॉश बाहेर जात बोलला, “ती मी लॅटीन म्हण बोललो.”

आणि आता तो गालातल्या गालात हसला. त्याची मनस्थिती बदलली. त्याने शक्य ते सगळे केले. आता सगळे नशीबाच्या हवाली होते. अनेक आठवडे तो झोपला नव्हता, इतक्या बिनघोरपणे तो झोपला. सकाळी तो उठून बाहेर गेला. सकाळच्या लवकरच्या हवेत त्याला छान ताजेपणा व आनंद गवसला. समुद्र जास्त निळा होता. आकाश जास्त प्रकाशमान होते. मखमलच्या कापडावर कसाही ब्रश फिरवल्यासारखे, वाऱ्याच्या झुळुकेबरोबर लगूनचे पाणी वरखाली होत होते. त्याला स्वतःला बळकट व तरुण वाटले. तो उत्साहाने दिवसाच्या कामाला लागला. जेवणानंतर तो परत झोपला. आणि संध्याकाळ होऊ लागली, तसा तो झुडुपांमधून रेंगाळत चालू लागला. त्याला नेहमीसारखे वाटत होते. तो वॉकरसंबधीच्या विचारातून बाहेर पडू शकला, ही असामान्य गोष्ट होती. जसा काही तो कधी अस्तित्वातच नव्हता. तो उशीरा घरी परतला. फिरून तो घामेजला होता. त्याने अंघोळ केली. मग तो पाइप ओढत, लगूनवरचा दिवस मावळतांना बघत गॅलरीत बसला. सूर्यास्तात, लगून फार सुंदर गुलाबी, जांभळे, हिरवे

दिसत होते. त्याला जग व स्वतःशीदेखील शांत वाटले. जेव्हा स्वयंपाक्याने बाहेर येऊन सांगितले, की जेवण तयार आहे, तर अजून थांबायचे आहे का. तेव्हा मॅकिन्टॉश त्याच्याकडे बघून मित्रत्वाच्या डोळ्यांनी हसला. त्याने त्याच्या घड्याळाकडे पाहिले.

“साडेसात झाले. आता थांबायला नको.” मुलाने मान हलवली.

पुढच्याच क्षणी मॅकिन्टॉश गरम सूपचा बाऊल घेऊन अंगणात आला. आळसावून तो उठला व जेवणाच्या खोलीत जाऊन, त्याचे जेवण जेवला. ते घडले का? संदिग्धता मनोरंजन करत होती आणि मॅकिन्टॉश शांतपणे गालातल्या गालात हसला. जरी हॅम्बर्गर स्टेक स्वयंपाक्याचा नेहमीचा पदार्थ असला, तरी त्याने काही चमत्काराने तो रसदार व चविष्ट बनवला होता. अन्न त्याला नेहमीप्रमाणे त्याच त्याच प्रकारचे वाटले नाही. जेवणानंतर तो आळशीपणे त्याच्या बंगल्यावर जाऊन, पुस्तक वाचत पडला. त्याला सुनसान शांतता आवडायची. आता रात्र झाली होती व आकाशात तारे चमकत होते. त्याने दिव्याकरता आरडाओरडा केला आणि तो चिनी मुलगा अनवाणी पायाने अंधारातून दिवा घेऊन आला. त्याने टेबलावर दिवा ठेवला आणि आवाज न करता खोलीबाहेर पडला. मॅकिन्टॉश जमिनीला खिळलेला राहिला. कारण तिथे अर्धवट पसरलेल्या कागदपत्रात पिस्तुल लपलेले होते. त्याचे हृदय कळ येऊन धडधडले व त्याला गोड वाटले. म्हणजे ते केले गेले तर! त्याने थरथरणाऱ्या हाताने ते उचलले. त्याचे चार कप्पे रिकामे होते. तो क्षणभर थांबला. त्याने संशयाने रात्रीकडे पाहिले. पण तिथे कोणीच नव्हते. त्याने झटकन चार गोळ्या रिकाम्या कप्प्यांमध्ये भरल्या. आणि पिस्तून बंद करून खणात ठेवून दिले.

तो बसून वाट बघू लागला.

एक तास गेला. दुसरा गेला. काही झाले नाही. ती लिहित असल्यासारखा टेबलाशी बसला. पण तो वाचत नव्हता व लिहीतही नव्हता. तो फक्त ऐकत होता. लांबवरून काही आवाज ऐकण्यासाठी त्याने कानांना ताण दिला. शेवटी त्याला अडखळणारी पाऊले ऐकू आली. तेव्हा त्याला समजले तो चिनी स्वयंपाकी होता.

त्याने हाक मारली, "आह-संग"

मुलगा दाराशी आला. "साहेबांना उशीर झाला. अन्न टिकणार नाही."

मॅकिन्टॉशने त्याच्याकडे रोखून बघितले. त्याला नवल वाटले, की काय झाले आहे, हे याला कसे समजले आणि जर समजले असेल, तर त्याचे आणि वॉकरचे संबंध कसे आहेत? तो शांतपणे हसत त्याचे काम करत राहिला. त्याच्या मनात काय चालू आहे, हे कोणाला समजणार?

"मला वाटते, त्याने वाटेत जेवण घेतले असणार. पण काही झाले तरी तुला सूप गरम ठेवायला हवे."

त्याच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतात न पडतात, तोच शांतता भंग पावून एकाएकी गोंधळ सुरु झाला. रडारड, जोराचा पायरव ऐकू येऊ लागला. बरेच गावकरी अंगणात धावत होते. पुरुष, स्त्रिया आणि मुले. ते मॅकिन्टॉशभोवती गोळा झाले व एकदम बोलू लागले. मॅकिन्टॉशला काहीच कळेना. ते उद्दीपित झाले होते. घाबरले होते. काहीजण रडत होते. मॅकिन्टॉशने गर्दीतून वाट काढली व तो गेटजवळ गेला. जरी ते काय बोलत आहेत, ते त्याला समजत नव्हते, तरी काय झाले असणार याचा त्याला अंदाज होता. तो गेटशी गेल्यावर कुत्र्याची गाडी आली. घोडीला एक उंच

गावकरी घेऊन आला. गाडीतून वॉकरला धरून दोघेजण उतरले. गाडीभोवती देशी लोकांनी गर्दी केली होती.

घोडीला अंगणात आणले गेले. त्यामागोमाग देशी लोकांची गर्दी आत घुसली. मॅकिन्टॉश त्यांच्या अंगावर मागे होण्यासाठी ओरडत होता. तेव्हा कुठून कोण जाणे, गर्दीला आक्रमकपणे हटवत, दोन पोलीस अवतरले. आतापर्यंत त्याला एवढे समजले, की मासे पकडणारी दोन मुले गावाकडे परत येतांना, त्याना उथळ पाण्यातून घरी परतणारी गाडी दिसली. घोडी अंधारात रस्त्यावरील औषधी वनस्पती हुंगत चालली होती. अंधारात त्यांना बसायच्या जागेच्या व घोडीच्या मानेवरील लगामाच्या जागेच्या मध्ये म्हाताऱ्या वॉकरच्या पांढऱ्या कपड्यांसारखे काही अडकल्यासारखे दिसले. त्याना पहिल्यांदा वाटले, की तो जास्त प्यायला आहे. त्यांनी हसत आत डोकावून पहिले, तेव्हा त्यांना तो कण्हताना ऐकू आला. मग काही नको ते झाले असल्याचे, त्यांना समजले. ते ओरडत गावाकडे गेले व मदतीसाठी आरडाओरडा केला. मग पन्नास लोकांच्या घोळक्यासकट ते परतू लागले तेव्हा त्याना समजले, की वॉकरला गोळी मारण्यात आलेली आहे.

मॅकिन्टॉशने धक्का बसत विचारले, की तो आधीच मेला आहे का. पहिल्यांदा त्याला गाडीतून बाहेर काढायला हवे होते. आणि वॉकर जाड असल्याने, ते कठीण काम होते. चार बळकट माणसांचे ते काम होते. त्यांनी जोर लावून त्याला उचलले, तेव्हा ही तो कण्हला. शेवटी कसेबसे त्याला घरात वरच्या मजल्यावर आणले आणि त्याच्या अंथरुणावर ठेवले. मग मॅकिन्टॉशला त्याच्याकडे बघणे शक्य झाले. कारण अंगणात सोसाट्याच्या वादळातील अंधारात, विझायच्या बेतात असलेले अर्धा डझन दिवे

लुकलुकत होते. वॉकरच्या अंगातील पांढरे कपडे रक्ताने डागाळले होते. त्याला उचलणारे लोक लाल, चिकट हात झटकून लावा-लावाला पुसत होते. मॅकिन्टॉशला वॉकर इतका फिका पडला असेल, असे वाटले नव्हते. त्याचे डोळे मिटलेले होते. पण अजून त्याचा श्वास चालू होता. क्षीणपणे त्याची नाडी लागत होती. पण हे कळत होते, की तो मरायला टेकला आहे. त्याचे स्नायू कसेबसे आकुंचन प्रसरणाची क्रिया करत असतांना बघून, मॅकिन्टॉशला बसलेला जोरदार धक्का त्याने सहन केला. त्याला गावातील कारकून तिथे दिसला. त्याने घोगऱ्या आवाजात त्याला दवाखान्यात जाऊन, आवश्यक ते इंजेक्शन आणायला सागितले. एका पोलिसांने व्हिस्की आणली. मॅकिन्टॉशने जबरदस्तीने ती थोडी त्याच्या घशात ओतली. खोली देशी लोकांनी भरून गेली होती. ते घाबरून, मूकपणे जमिनीवर बसले होते. दर काही वेळाने एखादा गळा काढत होता. फार उकडत होते. पण मॅकिन्टॉश गार पडला होता. त्याचे हात पाय बर्फासारखे झाले होते. सगळे शरीर थरथरू नये, म्हणून तो प्रयत्न करत होता. काय करावे, ते त्याला कळत नव्हते. अजूनही वॉकरच्या अंगातून रक्त ठिबकते आहे का, हे देखील त्याला कळत नव्हते. आणि तसे होत असेल, तर ते कसे थांबवावे, हेदेखील कळत नव्हते.

कारकुनाने इंजेक्शन आणले.

मॅकिन्टॉश म्हणाला, ते त्याला दे. सवय असल्याने, माझ्यापेक्षा तुला ते जास्त चांगले करता येईल."

त्याचे डोके फार दुखत होते. त्याच्या आत जणू काही रानटी गोष्टी घडत होत्या व त्या बाहेर पडायला बघत होत्या. आता हळूहळू वॉकरने डोळे उघडले. तो कुठे आहे, हे त्याला समजत नव्हते.

मॅकिन्टॉश म्हणाला, “बोलू नकोस. तू घरी आहेस आणि सुरक्षित आहेस.”

वॉकरचे ओठ मंद हसले.

तो कुजबुजला, “त्यांना मी सापडलो.”

“मी जर्व्हीसला त्याची मोटरबोट अपियाला लगेच पाठवायला सांगतो. उद्या दुपारपर्यंत आपल्याला डॉक्टर मिळेल.”

म्हाताऱ्याने उत्तर देण्यापूर्वी बराच वेळ तो थांबला. “तोपर्यंत, मी मरून जाईन.”

मॅकिन्टॉशच्या फिकट चेहऱ्यावर भीती पसरली. तो बळजबरीने हसला.

“गप्प बस. काहीही बोलू नकोस. तू बरा होणार आहेस.”

वॉकर बोलला, “मला काही कडक पेय दे.”

थरथरत्या हातांनी मॅकिन्टॉशने अर्धी व्हिस्की व अर्धे पाणी ओतले व पेला त्याच्यासमोर धरला. वॉकरने ते घटाघटा पिऊन टाकले. त्यामुळे त्याला बरे वाटल्याचे दिसले. त्याने एक मोठा सुस्कारा सोडला. त्याच्या मांसल चेहऱ्यावर थोडा रंग आला. मॅकिन्टॉशला फारच असहाय्य वाटले. तो उभा राहून वॉकरकडे निरखून पाहू लागला.

तो म्हणाला, “जर तू मला सांगितलेस की मी काय करू, तर मी ते करेन.”

“करण्यासारखे काही नाही. मला एकट्याला राहू द्या. झाले तेवढे बास झाले.”

मोठ्या अंथरुणावर झोपलेला तो मोठा, दणकट व फुगलेला माणूस अतिशय दयनीय दिसत होता. तो इतका आजारलेला, इतका फिका पडलेला बघणे, मन मोडणारे होते. त्याने विश्रांती घेतल्यावर, त्याचे मन स्वच्छ झालेले वाटले.

तो म्हणाला, "मॅक, तू मला सावध केले होतेस, ते बरोबर होते."

"मी तुझ्याबरोबर असावे, अशी देवाची इच्छा असायला हवी होती."

"मॅक, तू चांगला माणूस आहेस. फक्त तू पित नाहीस."

परत खूप वेळ शांतता पसरली. हे स्पष्ट होते, की वॉकर मरायला टेकला होता. अंतर्गत रक्तस्त्राव झाला होता. त्याच्या अज्ञानासकट, मॅकिन्टॉशला एवढे कळले होते, की त्याचा वरिष्ठ तासा दोन तासांचाच सोबती होता. तो त्याच्या अंथरुणाशेजारी स्तब्धपणे उभा होता. कदाचित अर्धा तास वॉकर डोळे मिटून पडला होता. मग त्याने डोळे उघडले.

तो हळूहळू बोलला, "ते माझे पद तुला देतील. मागच्या वेळी मी अपियाला गेलो, तेव्हा मी त्याना सांगितले होते, की त्या जागेसाठी, तू ठीक राहशील. माझी कारकीर्द संपली, तू आता माझे रस्त्याचे राहिलेले काम पूर्ण करायला हवेस. सर्व बेटभर रस्त्यांचे जाळे बांधायला हवे."

"मला तुझे पद नको. तू बरा होशील."

वॉकरने अती दमल्यासारखी मान हलवली.

"माझा वाटा संपला. त्यांना चांगले वागव. ते चांगले ठरेल. ती मुले आहेत, हे तू नेहमी लक्षात ठेवले पाहिजेस. तू त्यांच्याशी दयाळूपणे वाग, पण गुळमुळीतपणा करू नकोस. न्यायनिष्ठता सोडू नकोस. मी त्यांना कधी

गुद्दे मारले नाहीत. मी वीस वर्षात कधी शंभर पौंड वाचवले नाहीत. रस्ते बांधणे, ही मोठी गोष्ट आहे. ते काम तू पूर्ण कर.''

मॅकिन्टॉशला एक बारीक हुंदका फुटला.

''मॅक, तू नेहमीच एक चांगला माणूस राहिलास, मला तू कायम आवडत आलास.''

त्याने डोळे मिटले. मॅकिन्टॉशला वाटले, की ते आता पुन्हा उघडणार नाहीत. त्याचे तोंड इतके कोरडे पडले होते, की त्याच्या स्वतःसाठी काही पिण्याची जरुरी होती. त्याच्या चिनी स्वयंपाक्याने त्याला खुर्ची आणून दिली. तो अंथरुणाशेजारी त्यावर बसून, वाट पाहू लागला. त्याला माहिती नव्हते, की किती वेळ जाईल. रात्र सरता सरत नव्हती. मॅकिन्टॉशच्या लक्षात आले, की या वेळेपर्यंत खोली देशी माणसांनी भरून गेली होती. ते बायका व पुरुष जमिनीवर, अंथरुणाकडे टक लावून बघत, ढुंगणावर बसले होते.

मॅकिन्टॉश म्हणाला, ''हे लोक इथे काय करत आहेत? त्याना इथे बसण्याचा अधिकार नाही. त्या सगळ्यांना बाहेर हाकला. बाहेर हाकला.''

त्याच्या शब्दांमुळे वॉकरने परत एकदा डोळे उघडले. आता ते अगदी धुरकट झाले होते. त्याला बोलायचे होते. पण तो इतका अशक्त झाला होता, की तो काय बोलतो आहे, हे कळायला मॅकिन्टॉशला त्याच्या कानांवर ताण द्यावा लागला.

''त्याना थांबू दे. ती माझी मुले आहेत. ती इथे असायलाच हवीत.''

मॅकिन्टॉश देशी लोकांकडे वळला. ''इथेच थांबा. त्याला तुम्ही हवे आहात. पण शांत रहा.''

त्या म्हाताऱ्याच्या पांढऱ्या चेहऱ्यावर मंद स्मित तरळले.

तो म्हणाला, “जवळ ये.”

मॅकिन्टॉश त्याच्यावर वाकला. त्याचे डोळे मिटलेले होते आणि नारळाच्या झाडांच्या पानांमधून वाऱ्याने सुस्कारा टाकावा, तसा त्याचा आवाज येत होता.

“मला अजून एकदा पेय दे. मला काही बोलायचे आहे.”

यावेळेस मॅकिन्टॉशने त्याला नुसती व्हिस्की दिली. त्याच्या शेवटच्या इच्छेप्रमाणे, वॉकरने त्याची शक्ती गोळा केली.

“फार उद्दीपित होऊ नका. पंच्याण्णव साली काही त्रासाच्या वेळी गोरे लोक मारले गेले. नेव्ही आली आणि त्यांनी गावांचे रक्षण केले. यात काही संबंध नसलेले अनेक लोक मारले गेले. ते अपियामधील अतिशय मूर्ख लोक होते. ते काही गडबड करू लागल्यामुळे उगीचच चुकीचे लोक पकडले गेले. मला कुणालाही शिक्षा झालेली नको आहे.”

तो थोडा वेळ विश्रांती घेण्यासाठी थांबला.

“तुम्ही असे सांगितले पाहिजे, की हा अपघात होता. कोणालाही दोषी ठरवू नका. मला तसे वचन द्या.”

मॅकिन्टॉश कुजबुजला, “तुला आवडेल तसे काहीही करायला, मी तयार आहे.”

“अनेकांमधील एक चांगला माणूस! ती मुले आहेत. मी त्यांचा पिता आहे. जर त्यांच्या हातात असेल, तर वडील कधीही मुलांना त्रास होऊ देत नाहीत.”

त्याच्या घशातून हास्याची घरघर आली. हे नवलपूर्ण रीत्या विचित्र आणि भीतीदायक होते.

“मॅक, तू धार्मिक मनुष्य आहेस. त्याना क्षमा करशील ना? तुला माहिती आहे.”

थोडा वेळ मॅकिन्टॉश काही बोलला नाही. त्याचे ओठ थरथरत होते.

“ते काय करतात, ते त्यांना कळत नाही. म्हणून त्यांना क्षमा करु?”

“बरोबर आहे. त्यांना क्षमा कर. तुला माहिती आहे, मी त्यांच्यावर प्रेम करतो.”

त्याने सुस्कारा टाकला. त्याचे ओठ क्षीणपणे हलले आणि आता तर मॅकिन्टॉशला ऐकण्यासाठी त्याचे कान अगदी जवळ न्यावे लागले.

तो बोलला, “माझे हात धर.”

मॅकिन्टॉशने धापा टाकल्यासारखे केले. त्याचे हृदय धडधडल्यासारखे त्याला वाटले. त्याने म्हाताऱ्याचा थंड, अशक्त हात हातात घेतला व त्याच्या हातात धरला. अशा तऱ्हेने तो त्याच्या जागेवरून जवळजवळ उठला. एका आवाजाने अचानक शांतताभंग झाला. तो आवाज भयंकर व अमानवी होता. वॉकर वारला. देशी लोक जोरजोराने रडू लागले. त्यांच्या चेहऱ्यावरून अश्रू ओघळू लागले. ते छाती बडवू लागले.

मॅकिन्टॉशने मृत माणसावरून त्याचा हात काढून घेतला आणि प्यायल्यासारखा व झोपेत असल्यासारखा चालत तो बाहेर गेला. तो त्याच्या लिहायच्या टेबलाच्या खणाशी गेला आणि पिस्तुल बाहेर काढले. तो समुद्राकडे व लगूनकडे गेला. प्रवाळ व खडकांवर आपटू नये म्हणून, तो

पाणी त्याचा काखेला लागेपर्यंत काळजीपूर्वक चालत होता. मग त्याने त्याच्या डोक्यावर गोळी मारून घेतली.

तासाभराने तो पडला होता, तिथे अर्धा डझन तपकिरी बारीक शार्क पाणी उडवत फिरत होते.

Rain

# पाऊस



जवळजवळ झोपायची वेळ झाली होती आणि सकाळी ते उठतील तेव्हा जमीन दिसू लागलेली असेल. डॉ मॅकफेलने त्याचा पाइप पेटवला आणि कठड्यावर वाकून, समोर आकाशात सप्तर्षीचा तारा शोधला. युद्धानंतर दोन वर्षांनी, जखमेने बरी होण्यासाठी जरुरीपेक्षा जास्त वेळ घेतला होता. आता तो निदान बारा महिन्यांकरता शांतपणे अपियामध्ये

स्थिरस्थावर होणार असल्याने, आनंदित झाला होता. प्रवासाने त्याला आधीच चांगले वाटत होते. दुसऱ्या दिवशी येणाऱ्या पागो-पागोला काही प्रवासी उतरणार होते. त्या संध्याकाळी त्यांनी थोडा नाच केला. त्याच्या कानात यांत्रिक पियानोचे उच्च पट्टीतील स्वर आदळत होते. पण शेवटी एकदाचे डेक शांत झाले. थोड्या अंतरावर त्याला लांब खुर्चीतील त्याची बायको डेव्हिडसनशी बोलतांना दिसली आणि तो तिच्यावर वाकला होता. जेव्हा तो दिव्याखाली बसला व टोपी काढली, तेव्हा त्याचे लाल केस, मधोमध असलेले टक्कल, उन्हामुळे तपकीरीसर झालेली कातडी व त्यावरील लाल केसांची लव दिसली. तो चाळीशीचा मनुष्य होता. त्याचा चेहरा सुरकुतलेला व पडलेला होता. तो शांतपणे, खालच्या पट्टीत, स्कॉटीश उच्चार करत बोलत होता.

मिशनरी असलेल्या डेव्हिडसन व मॅकफेल यांच्यात एकाच बोटीत असल्याने जवळीक झाली होती, जातीमुळे वा कसल्या आवडीमुळे अशी नव्हे. धुरकट खोलीत दिवसरात्र पोकर किंवा ब्रिज खेळणाऱ्या आणि सतत पिणाऱ्या माणसांमधील नापसंतीबद्दल मुख्यतः त्यांच्यात समझोता झाला होता. मिसेस मॅकफेलला असा विचार करायला जराही काही वाटत नव्हते, की ती आणि तिचा नवरा हे बोटीवरील दोनच लोक होते की ज्यांना सहवास देण्यास, डेव्हिडसन राजी होते. आणि लाजाळू असलेल्या, पण मूर्ख नसलेल्या डॉक्टरानी, थोड्या अजाणतेपणी त्यांचे आभार मानले. याचे कारण ते जरा वादविवाद घालणारे होते आणि त्यांच्या केबिनमध्ये रात्री ते दुसऱ्यांच्या चुका काढत होते.

मिसेस मॅकफेल त्यांचे रूप ठीकठाक करत बोलल्या, की मिसेस डेव्हिडसन म्हणत होती, की आम्ही नसतो, तर त्यांचा प्रवास कसा झाला असता!

ती म्हणाली, की त्यांना विचारणारे बोटीवर फक्त आपणच होतो.”

“मला असे वाटले नव्हते, की बोटीवरील मिशनरी इतका ढोंगीपणा करणारे असतील.”

“तो ढोंगीपणा नाही. तिला काय म्हणायचे आहे, हे मला नेमकेपणे समजले आहे.

धुरकट खोलीतील जरा अडाणी लोकांमध्ये मिसळणे, डेव्हिडसन मंडळींना फार चांगले वाटले नसते.”

डॉ मॅकफेल गालातल्या गालात हसत म्हणाले, “त्यांचा धर्मसंस्थापक इतका काही असाधारण नव्हता.”

त्याची बायको उत्तरली, “मी तुम्हाला अनेक वेळा सुचवले आहे, की धर्माबद्दल विनोद करत जाऊ नका. अलेक, मला तुमचा हा असला स्वभाव आवडत नाही. तुम्ही लोकांमध्ये काय चांगले आहे, ते बघत नाही.”

त्याने त्याच्या फिकट, निळया डोळयांच्या कडेने तिच्याकडे पाहिले. अनेक वर्षांच्या वैवाहिक आयुष्यानंतर तो हे शिकला होता, की बायकोचा शब्द मानणे, हे शांतता टिकवण्याचे निर्णायक रहस्य आहे. तो झोपायच्या तयारीने वरच्या अंथरुणावर चढला. थोडे वाचन करून, मग झोपायचा त्याचा विचार होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो जेव्हा डेकवर आला, तेव्हा ते जमिनीच्या जवळ आले होते. त्याने अधाशीपणे जमिनीकडे पाहिले. तिथे

चंदेरी वाळूचा अरुंद पट्टा होता. तो हळूहळू डोंगरापर्यंत छान झाडाझुडुपांनी बहरत गेला होता. जाड, हिरवीगार नारळाची झाडे अगदी पाण्याच्या कडेला भिडली होती. त्यात इकडेतिकडे तुम्हाला सॅमोअन्सची गवताळ घरे व छोटेसे, चकाकीत पांढरे चर्च दिसत होते. मिसेस डेव्हिडसन आली आणि त्याच्याशेजारी बसली. तिने काळे कपडे केले होते. गळ्याभोवती मध्ये क्रॉस लटकणारी सोनेरी चेन घातली होती. ती फिकट तपकिरी केस व्यवस्थित पण नखरेलपणे विंचरलेली लहानशी बाई होती. नाकावर क्लिप असलेल्या अदृष्य चष्म्यामागे तिचे मोठे निळे डोळे होते. एखाद्या बकरीप्रमाणे तिचा चेहरा लांबट होता. पण ती मूर्ख वाटत नसे. उलट ती फार चटपटीत होती. पक्ष्यासारख्या तिच्या हालचाली चपळ होत्या. तिच्याबाबतीत असलेली उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, तिचा किरटा, स्पष्ट पण शब्दाचा शेवट ठासून न करणारा आवाज. तो एकसुरी आवाज हवेच्या दाबाने सतत कर्कश हातवारे केल्यासारखा कानांच्या नसांवर जोराने आदळे.

डॉ मॅकफेल कसेबसे किंचित हसत म्हणाले, ‘‘तुम्हाला इथे घरच्यासारखे वाटत असेल.’’

‘‘तुम्हाला माहिती आहे, की आमची बेटे खालती आहेत. यासारखी प्रवाळमय नाहीत. ही ज्वालामुखीची आहेत. तिथे पोचायला आपल्याला अजून दहा दिवस लागतील.’’

डॉ मॅकफेल विनोदी अंगाने म्हणाले, ‘‘हा भाग म्हणजे तुमच्यासाठी घरापुढील गल्लीसारखाच आहे.’’

“हे म्हणजे जरा जास्तच होते आहे. पण एखाद्याने दक्षिण समुद्रातील अंतरे फार मनावर घेऊ नयेत. त्यामुळे तुमचे बरोबर आहे.”

डॉ मॅकफेलने हळूच सुस्कारा टाकला.

तिने चालू ठेवले, “आपण इथे रहात नाही आहोत, ते बरे आहे. काम करायला ही जागा फार अवघड असल्याचे बोलले जाते. तेथील बोटींमुळे व बंदरामुळे, इथे लोक स्थिरस्थावर होऊ शकत नाहीत. आमच्या इथे जगण्यासाठी अशा काही अडचणी नाहीत. अर्थात तिथे एक दोन व्यापारी आहेत, पण आम्ही त्याना काळजीपूर्वक नीट वागायला लावतो. त्यांनी तसे केले नाही, तर आम्ही त्यांना इतके सळो की पळो करून सोडतो, की ते आनंदाने चालू पडतात.”

नाकावरचा चष्मा घट्ट करुन तिने हिरव्या बेटाकडे टक लाऊन बघितले.

“मिशनरींसाठी येथील काम फार अवघड आहे. इथे ते नसल्याबद्दल, मी देवाचे आभार मानते.”

सामोआच्या उत्तरेला बेटांचा समूह असलेला जिल्हा डेव्हिडसन यांचा होता. ती बेटे रानटीपणे एकमेकांपासून अलग होती आणि दोन्ही कडांना अरुंद असणाऱ्या लहान बोटीने पार करावी लागत. त्यावेळी त्याची बायको रहायच्या मुख्य ठिकाणी राहून, मिशनची व्यवस्था बघे. ज्या तडफदारपणे ती ते करे, ते बघून डॉ मॅकफेल यांचे मन भरून येई. तिथे रहाण्यातील त्रुटी सांगतांना, मनापासून उमटलेल्या टोकाच्या भीतीने तिच्या जिभेला खीळ नसे. तिच्या मनातील भाव अगदी खास प्रकारचा तरल असा होता. त्यांच्या नवीन ओळखीच्या दिवसात, ती त्याला म्हणाली,

“आम्ही पहिल्यांदा या बेटावर रहायला आलो, तेव्हा त्याच्यातील लग्नाच्या चालीरीती इतक्या धक्कादायक होत्या, की मला त्यांचे वर्णनदेखील करवत नाही. पण मी मिसेस मॅकफेलला त्या सांगेन व ती तुम्हाला सांगेल.”

नंतर त्याची बायको व मिसेस डेव्हिडसन यांच्या खुर्च्या डेकवर चिकटून असलेल्या त्याने पाहिल्या. अगदी गुंग होऊन दोन तास त्यांचे संभाषण चालू होते. तो व्यायाम करतांना त्यांच्या पुढून व मागून चालत गेला, तेव्हा जणू डोंगरातून मोठ्या जोराने खळाळत निघणारा झरा असावा, तशी मिसेस डेव्हिडसनची रागीट कुजबुज त्याने ऐकली व त्याच्या बायकोचे आ वासलेले तोंड व मलूल चेहरा बघितला. तिच्या दृष्टीने त्या थरारक अनुभवाचा ती मनापासून आनंद घेत होती. रात्री त्यांच्या केबिनमध्ये तिने ऐकलेले सगळे तिने त्याला सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मिसेस डेव्हिडसन विजयाने आनंदित होऊन ओरडली, “मी तुला काय सांगितले? याहून अधिक भयंकर असे तू काही ऐकले होतेस का? तू जरी डॉक्टर असलीस, तरी तुला आश्चर्य वाटले नाही का, की मी तुला हे कसे सांगू शकले. वाटले ना?”

मिसेस डेव्हिडसनने तिचे नीट निरीक्षण केले. नाटकी उत्सुकतेने तिने इच्छित परिणाम झालेला पाहिला.

“तुला आठवते का, की आपण पहिल्यांदा तिकडे गेलो, तेव्हा किती उदास झालो होतो! कुठल्याही गावात एखादी चांगली मुलगी मिळणे अशक्य आहे, हे मी तुला जेव्हा सांगितले, तेव्हा तुझा माझ्यावर कदाचित विश्वास बसला नसेल.”

तिने चांगली हा शब्द कडकपणे तांत्रिक रीत्या वापरला.

"मिस्टर डेव्हिडसन व मी यावर बोललो. आम्ही पहिली कुठली गोष्ट ठरवली असेल, तर ती म्हणजे नाच बंद करायचा. येथील लोक नाचाच्या बाबतीत वेडे आहेत."

डॉ मॅकफेल म्हणाला, "मी तरूण होतो, तेव्हा नाचाला माझा विरोध नव्हता."

"काल रात्री तुम्ही मिसेस मॅकफेलना त्याबद्दल विचारलेत, तेव्हा मला हा बराच अंदाज आला. जर मनुष्य त्याच्या बायकोबरोबर नाचला, तर त्यात काही त्रास आहे, असे मला वाटत नाही. पण ती नाचली नाही, तेव्हा मी सुटकेचा निःश्वास टाकला. अशा परिस्थितीत मला हे बरे वाटते, की आपले आपण रहावे."

"कुठल्या परिस्थितीत?

मिसेस डेव्हिडसनने त्याच्याकडे तिच्या नाकावरील क्लिपच्या चष्म्यातून एक झटपट नजर टाकली. पण त्याच्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

ती पुढे म्हणाली, "पण गोऱ्या लोकांच्या बाबतीत ते तसे नाही. तरी मला मिस्टर डेव्हिडसनकडे असे कबूल केले पाहिजे, की कोणाला बाजूला उभे राहून आपली बायको कुणा दुसऱ्याच्या बरोबर नाचतांना त्याच्या बाहूत असलेली बघणे, कसे काय जमते, हे समजत नाही. माझ्यापुरते बोलायचे झाले, तर लग्न झाल्यापासून मी अजिबात नाचले नाही. देशी नाच हे वेगळे प्रकरण आहे. ते फक्त अनैतिक आहे असे नव्हे, तर ते तुम्हाला खात्रीपूर्वक अधःपतनाकडे नेते. तरीही मी देवाचे आभार मानते, की आपण ते करत

नाही. मला वाटत नाही, की आपल्या भागातील कोणी गेल्या आठ वर्षात नाचले नाही, असे मी म्हटले तर ते चुकीचे ठरेल.

आता ते बंदराच्या तोंडाकडे आले आणि मिसेस मॅकफेल त्यांना सामील झाली. बोट गरकन वळली आणि तिने हळूवारपणे वाफ सोडली. लढाऊ जहाजांचा ताफा मावेल असे, जमिनीनी वेढलेले ते मोठे बंदर होते. सर्व बाजूंनी ते उंच आणि सरळसोट हिरवागार कडा असल्यासारखे होते. त्याच्या आत शिरण्याच्या जागी समुद्राकडून झुळूक वहात होती. तिथे बागेत व्यवस्थापकाचे घर उभे होते. झेंड्यांवरील पट्ट्या आणि चांदण्या दमल्यासारखे लहरत होते. त्यांनी दोन तीन बंगले व मग टेनिस कोर्ट पार केले. मग ते दगडी धक्का असलेल्या कच्चा माल ठेवायच्या इमारतीपाशी आले. मिसेस डेव्हिडसनने त्यांच्यापासून दोनतीनशे यार्डावर उभ्या असलेल्या, त्यांना अपियाला नेणाऱ्या शिडाच्या जहाजाकडे निर्देश केला. बेटाच्या सर्व भागातून आलेल्या, उत्सुक, गडबड्या आणि कुतूहल असलेल्या चांगल्या स्वभावाच्या लोकांची तिथे गर्दी झाली होती. त्यातील काहीजण नुसते बघे होते, तर बाकीचे सिडनीच्या वाटेवर असलेल्या प्रवासी लोकांशी सौदा करत होते. त्यांच्याकडे अननस, केळीचे मोठे घड, कपडे, शंखशिंपल्यांच्या माळा, शार्कचे दात, बाउल्स आणि युद्धातील छोट्या बोटींच्या प्रतिकृती होत्या. बारीक असलेले, घोटून दाढी केलेले, नीट दिसणारे, व चेहऱ्यावरून मोकळ्या मनाचे वाटणारे, अमेरिकन खलाशी त्यांच्यामधून सावकाशीने हिंडत होते. त्यात काही कामाच्या लोकांचा गटही होता त्यांचे सामान जमिनीवर उतरवले जात होते. मॅकफेल्स आणि मिसेस डेव्हिडसन गर्दीचे निरीक्षण करत होते. विषुववृत्तीय प्रदेशातील कांजिण्यांचा संसर्गजन्य आजार झालेल्या, गात्रे शिथिल करणाऱ्या व

फोडांमुळे कांती वाईट झालेल्या, बऱ्याचशा मुलांकडे व आणि तरुणांकडे डॉ मॅकफेल बघत होते. जेव्हा त्यांच्या अनुभवात पहिल्यांदाच त्यांनी हत्तीरोगाचे रुग्ण पाहिले, तेव्हा त्यांची डॉक्टरची व्यावसायिक नजर चमकली. ती रोगी माणसे सुजून लठ्ठ झालेल्या हाताने वा पायाने खुरडत चालली होती. त्यांनी मऊ सुती कापड, लावा-लावा घातले होते.

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “हे अगदी काहीतरीच कपडे आहेत. मिस्टर डेव्हिडसनना वाटते, की अशा कपड्यांवर कायद्याने बंदी आणायला पाहिजे. जेव्हा लोक कंबरेभोवती फक्त लाल सुती कापड गुंडाळतात, तेव्हा तुम्ही त्यांच्याकडून नैतिकतेची अपेक्षा कशी काय करू शकता?”

त्यांच्या कपाळावरील घाम पुसत, डॉक्टर म्हणाले, “येथील हवेला असे कपडे पुरेसे योग्य असतात.”

इतक्या सकाळीदेखील जर जमिनीवर इतकी उष्णता आहे, तर हे फारच छळवाद करणारे आहे. डोंगरांच्या मध्ये असल्यामुळे इथे पागो-पागो मध्ये जरासुद्धा वाऱ्याची झुळूक येत नाही.

मिसेस डेव्हिडसन तारस्वरात म्हणाली,” आमच्या बेटांमध्ये आम्ही मऊ सुती कापड, लावा-लावा जवळजवळ हद्दपार केले आहे. काही म्हातारे लोक अजून ते वापरतात, पण तेवढेच. सगळ्या बायका पूर्ण उंचीचा, सैलसर गाउन आणि पुरुष पँट व बिनहाताचा गंजीफ्रॉक वापरतात. आम्ही इथे नुकतेच रहायला आलो, तेव्हा मिस्टर डेव्हिडसन त्यांच्या एका अहवालात म्हणाले, की जोपर्यंत येथील दहा वर्षांवरील मुले पँट घालत नाहीत, तोपर्यंत, या बेटावरील रहिवासी कधीच पूर्णपणे ख्रिश्चन होऊ शकणार नाहीत.”

पण मिसेस डेव्हिडसनने बंदराच्या तोंडाशी तरंगत आलेल्या आलेल्या करड्या ढगांवर पक्ष्यासारखे दोन तीन कटाक्ष टाकले. दोन चार थेंब पडू लागले.

ती म्हणाली, "आपण छपराखाली गेलेले बरे."

त्या सगळ्या गर्दीने, गंजलेल्या पत्र्याखाली आश्रय घेतला. धुवाधार पाऊस सुरु झाला. ते तिथे काही वेळ उभे राहिले. मग तिथे मिस्टर डेव्हिडसन आले. प्रवासात ते मॅकफेल्सबरोबर नम्रतेने वागत होते. पण त्यांच्याकडे त्यांच्या बायकोसारखी समाजात मिसळायची वृत्ती नव्हती. ते त्यांचा बहुतेक वेळ वाचनात घालवत. ते शांतताप्रिय व लहरी होते. तुम्हाला असे वाटेल, की त्यांचा मित्रत्वाचा दृष्टीकोन म्हणजे त्यांनी स्वतःवर लादलेले ख्रिश्चनपणाचे ओझे होते. ते स्वभावाने घुमे व रागीट होते. त्यांचे दिसणे वेगळयाच प्रकारचे होते. ते खूप उंच आणि बारीक होते. त्यांचे हात लांब असून ते सैलसरपणे खांद्यापासून लोंबकाळत असत. त्यांचे गाल खोल पण गालांची हाडे चमत्कारिकपणे वर आलेली असून, ते इतके अशक्त होते, की त्यांचे ओठ इतके भावनामय व भरीव कसे होते, याचे नवल वाटे. ते केस लांब राखत असत. त्यांचे डोळे खोबणीत खोल रुतलेले व काळेभोर होते. ते मोठे असून दुःखी वाटत. लांबसडक बोटे असलेले त्यांचे मोठे हात, छान आकाराचे होते. ते त्याना बळकटी देत. पण त्यांच्या बाबतीतील विचित्र गोष्ट ही होती, की ते तुम्हाला दबलेल्या आगीसारखे वाटत. ते मोठे वजन पाडणारे, पण त्रासदायक होते. ज्याच्याबरोबर जवळीक साधली जाऊ शकेल, असा माणूस ते नव्हते.

आता त्यांनी स्वागतार्ह नसलेली बातमी आणली. गोवराची साथ आली होती. त्या बेटावरील रहिवाशांमध्ये तो गंभीर आणि मरणांतिक

आजार पसरला होता. शिडांच्या जहाजातील प्रवासी ताफ्यालादेखील त्या आजाराने ग्रासले होते. आजारी माणसांना किनाऱ्यावर आणले जात होते व त्यांना दवाखान्यात विलगीकरण कक्षात ठेवले जात होते. अपियाहून फोनने संदेश आले होते, की ताफ्यातील कोणालाही आता तो आजार नाही, अशी खात्री होईपर्यंत, प्रवाश्यांना बंदरावर उतरू दिले जाऊ नये.

"याचा अर्थ आपल्याला इथे निदान दहा दिवस रहावे लागणार."

डॉक्टर मॅकफेल म्हणाले, "पण मला तातडीने अपियाला पोचायचे आहे."

"पण ते शक्य नाही. जर बोटीवर अजून केसेस झाल्या नाहीत, तर प्रवाश्यांना गोऱ्या लोकांबरोबर प्रवास करता येईल. पण बेटावरील सर्व देशी लोकांना तीन महिने प्रवास करता येणार नाही."

मिसेस मॅकफेलने विचारले, "इथे हॉटेल आहे का?"

डेव्हिडसन गालातल्या गालात हसला. "नाही."

"मग आपण काय करायचे?"

"मी व्यवस्थापकाशी बोलतो आहे. पुढील बाजूस एक व्यापारी आहे तो खोल्या भाड्याने देतो. आणि माझी अशी सूचना आहे, की पाऊस थांबल्याबरोबर आपण तिथे जावे. आणि काय करता येईल, ते पहावे. फार आरामाची अपेक्षा ठेऊ नका. आपल्याला झोपायला कॉट आणि डोक्यावर छप्पर मिळाले तरी खूप होईल."

पण पाऊस थांबायची चिन्हे दिसेनात. शेवटी बरीच वाट बघून, छत्र्या व रेनकोट घेऊन, ते निघाले. तिथे गाव असे नव्हते. पण काही ऑफिसच्या इमारती, एखादे दुकान असे होते. आणि मागे नारळांच्या

झाडात आणि खुरट्या झुडुपांमध्ये, काही देशी घरे होती. बंदरापासून ते रहात असलेले घर पाच मिनिटाच्या अंतरावर होते. ते. चांगल्या रुंद गॅलऱ्या असलेले, दुमजली घर होते. त्याला छपराला नळीचे पत्रे होते. हॉर्न नावाचा अर्ध्या घराचा मालक, त्याची देशी बायको व इतस्ततः बागडणारी लहान तपकीरीसर मुले ही मंडळी तिथे होती. पहिल्या मजल्यावर बंद डब्यातील माल व सुती कापड तो विकत असे. त्याना दिलेल्या खोल्यांमध्ये अगदी मोजके फर्निचर होते. मॅकफेल्सकडे असलेल्या खोलीत, एक कशीतरी विणलेली बाज व एक फाटकी मच्छरदाणी होती. एक मोडकी खुर्ची व कपड्यांचा स्टँड होता. ते दुःखाने इकडेतिकडे बघू लागले.. पावसाची संततधार लागलेलीच होती.

मिसेस मॅकफेल म्हणाली, ‘‘जरुरीपेक्षा जास्त सामान मी काढणार नाही.’’

ती मोठ्या प्रवासी बॅगेचे कुलूप उघडत असतांना, मिस्टर डेव्हिडसन खोलीत आला. ती फार सावध व जेवढ्यास तेवढे बोलली. भोवतालच्या उदास वातावरणाचा तिच्यावर काही परिणाम झाला नव्हता.

ती म्हणाली, ‘‘जर तुम्ही माझे ऐकलेत, तर आपण सुती कापड व रीळ आणून, मच्छरदाणी दुरुस्त करायला सुरवात करू. नाहीतर तुम्हाला आज रात्री मिनिटभर सुद्धा झोप मिळणार नाही.’’

डॉ मॅकफेल म्हणाले, ‘‘त्या फार वाईट आहेत का?’’

‘‘आता ती वापरण्याचा काळ आहे. तुम्ही अपियामधील सरकारी कार्यालयात विचारले, तर तुम्हाला समजेल, की ते बायकांना त्यांचे सामान ठेवण्यासाठी एक आभ्रा देतात.’’

मिसेस मॅकफेल म्हणाल्या, “पाऊस जरा थांबायला पाहिजे. जर सूर्यप्रकाश पडला, तर मला ही जागा थोडी नीटनेटकी करायचा प्रयत्न करता येईल.”

“ओहो, त्यासाठी तुम्ही थांबलात, तर ते फार होईल. पॅसिफिकमधील सर्वात जास्त पाउस पडणारी पागो-पागो ही जागा आहे. टेकड्या व खाडी पावसाला आकर्षित करतात. तसेही वर्षातील यावेळी पाऊस पडतोच.

तिने खिन्नतेने हरवलेल्या आत्म्यासारखे, खोलीतील वेगवेगळ्या भागात उभे राहून, मिस्टर मॅकफेलकडून मिसेस मॅकफेलकडे बघितले आणि ओठाची हालचाल केली.

तिला जाणवले की सर्व आवराआवरी करायला पाहिजे. नैसर्गिकपणे तिच्यातील व्यवस्थितपणाच्या उर्मीने तिचे हात शिवशिवत होते.

“तू बॅगेतून वस्तू बाहेर काढ. मी सुई व कापड घेऊन, मच्छरदाणी दुरुस्त करते. जेवण एक वाजता आहे. डॉ मॅकफेल, तुम्ही खाली किनाऱ्यावर जाऊन, तुमचे जड सामान कोरड्या जागी ठेवले आहे ना, हे बघा. तुम्हाला हे देशी लोक कसे आहेत, ते माहिती आहे. सर्व वेळ पाऊस लागेल, अशा ठिकाणी त्या ठेवायला ते मागेपुढे पहाणार नाहीत.”

डॉक्टरने परत रेनकोट चढवला आणि खाली गेला. दारात मिस्टर हॉर्न आताच आलेल्या बोटीच्या ऑफिसरशी व डॉ मॅकफेलने अनेक वेळा बोटीवर पाहिलेल्या, एका दुसऱ्या वर्गाच्या प्रवाश्याशी बोलत उभा होता.

कोरडेपणामुळे, डोळे उघडमिट करणाऱ्या, अत्यंत घाणेरड्या माणसाने जाता जाता मान हलवली.

तो म्हणाला, “डॉक, हे या साथीच्या रोगासंबंधीचे काम करणे, फार वाईट आहे. मला दिसते आहे, की तुम्ही तुम्हाला आधीच अलग ठेवले आहे.”

डॉ मॅकफेलने विचार केला, की तो या माणसाला ओळखतो आहे. पण तो घाबरट मनुष्य असल्याने, त्याने काही ओळख दाखवली नाही.

“हो. आम्हाला वरच्या मजल्यावर एक खोली मिळाली आहे.”

“मिस थॉम्पसन तुमच्याबरोबर अपियाला जाण्यासाठी प्रवास करत होती. त्यामुळे मी तिला इथे आणले आहे.”

बोटीच्या ऑफिसरने त्याच्या अंगठ्याने, त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या बाईकडे निर्देश केला. ती कदाचित सत्तावीस वर्षांची असून जाडसर होती. वेड्यावाकड्या फॅशन केलेली, पण सुंदर होती. तिने शुभ्र कपडे व शुभ्र टोपी परिधान केली होती तिच्या पांढरे मोजे घातलेल्या जाड पोटऱ्या, पांढऱ्या बुटांच्यावर गोड मुलासारख्या फुगल्या होत्या. ती मॅकफेलकडे बघून गोड हसली.

ती घोगऱ्या आवाजात म्हणाली, “तो मनुष्य मला दीड डॉलरमध्ये एक लहान आकाराची खोली अर्धा दिवस द्यायला बघतो आहे.

ऑफिसर म्हणाला, “मी सांगतो की ती माझी मैत्रीण आहे. ती एक डॉलरपेक्षा जास्त देऊ शकणार नाही. आणि तुम्हाला तेवढ्या पैशात तिला जागा द्यावीच लागेल.”

तो व्यापारी जाड आणि गुळगुळीत होता. तो शांतपणे हसत होता.

“ठीक आहे, मिस्टर स्वान, जर मी असे म्हटले, की मी मला काय करता येईल, ते बघतो. मी मिसेस हॉर्नशी बोलतो. जर आम्हाला पैसे कमी करणे शक्य असेल, तर मी करतो.”

मिस थॉम्पसन म्हणाली, “माझ्याबरोबर ही गोष्ट जास्त ताणू नका. आपण याचा काय तो निकाल आताच लाऊ. तुम्हाला खोलीसाठी दिवसाला एक डॉलर मिळेल. त्याहून जास्त नाही.”

डॉ मॅकफेल हसला. तिने ज्या प्रकारे धीटपणे तो व्यवहार केला, त्याची त्याने स्तुती केली. तो अशा प्रकारचा मनुष्य होता, की तो कधीही असे काही न करता मागितलेले पैसे देऊन टाकत असे. घासाघीस करण्यापेक्षा, जास्त पैसे गेलेले त्याला बरे वाटे. व्यापाऱ्याने सुस्कारा टाकला.

“ठीक आहे. मी मिस्टर स्वानचे म्हणणे मान्य करतो.”

मिस थॉम्पसन म्हणाली, “हे चांगले झाले. आत या आणि आपण थोडे पेय घेऊ. मिस्टर स्वान, तुम्ही ती आणलीत, तर त्यात खरी, चांगली राई आहे. डॉक्टर, तुम्ही पण या.”

तो उत्तरला, “नाही, मी येईन असे वाटत नाही. आभारी आहे. मी खाली जाऊन आपले सामान सुरक्षित आहे ना, हे बघतो.” तो पावसात बाहेर पडला. पलीकडील किनारा पुसट दिसत होता आणि बंदरावरील उघड्या जागेत तो कोसळत होता. त्याने दोन तीन उघड्या पण लावा-लावात गुंडाळलेल्या व मोठी छत्री डोक्यावर घेतलेल्या, देशी माणसांना ओलांडले. ते सावकाशीने, ताठ चालले होते. जाता जाता त्यांनी हसून विचित्र भाषेत डॉक्टरला अभिवादन केले.

तो परत आला तेव्हा जेवायची वेळ होत आली होती. आणि व्यापाऱ्याच्या दुकानात ते मांडले होते. ती खोली रहाण्याची नव्हती. पण ती वातावरण निर्मितीच्या उद्देशाने तयार केली होती. ती कुबट वास असलेली व उदास हवा असणारी होती. भिंतींभोवती विकायच्या रेशमी, सुती व इतर कापडांच्या थप्प्या नीटपणे लावलेल्या होत्या. छताच्या मध्यापासून, पिवळया कागदाने गुंडाळून माशांपासून संरक्षित केलेले असे झुंबर लटकत होते. डेव्हिडसन आला नाही.

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, "मला माहिती आहे, तो व्यवस्थापकाला

बोलावायला गेला आहे. आणि मला वाटते, त्याने त्याला जेवायला थांबवून घेतले असावे."

एक लहानशा देशी मुलीने हँबर्गरच्या जाड तुकड्यांची ताटली आणली. नंतर व्यापाऱ्याने येऊन त्याना जे पाहिजे ते, मिळाले की नाही, ते बघितले.

डॉ मॅकफेल म्हणाला, "मिस्टर हॉर्न, इथे अजून एकजण आमच्याबरोबर रहायला आली आहे."

तो व्यापारी म्हणाला, "तिने खोली ताब्यात घेतली. ती सामान घेऊन, येते आहे." त्याने दोन बायकांकडे आज्ञाधारकपणे पाहिले.

"मी तिला खाली ठेवले आहे, म्हणजे ती तुमच्या मध्ये मध्ये येणार नाही. तुम्हाला तिचा त्रास होणार नाही."

मिसेस मॅकफेल म्हणाली, "ती बोटीत होती का?"

“हो, बाईसाहेब. ती दोन क्रमांकाच्या केबिनमध्ये होती. ती अपियाला चालली आहे. तिथे ती रोखपाल म्हणून रुजू होणार आहे.”

“ओहो!”

व्यापारी गेल्यावर मॅकफेल म्हणाला, “मला वाटते तिच्या खोलीत जेवण मागवणे, तिला फारसे आनंददायी वाटले नसेल.”

मिसेस डेव्हिडसन उत्तरली, “जर ती दोन क्रमांकाच्या केबिनमध्ये होती तर --- मला ती नक्की कोण होती, ते आठवत नाही.”

तिला व्यवस्थापकाने आणले, तेव्हा मी तिथे होते. तिचे नाव थॉम्पसन आहे.”

मिसेस डेव्हिडसनने विचारले, “काल रात्री व्यवस्थापकाबरोबर नाच करणारी बाई का?”

मिसेस मॅकफेल म्हणाली, “तीच ती असणार. मी नवल करत होते, की ही कोण बाई असावी. ती जरा चालूच दिसते आहे.”

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “आणि काय तिचे नखरे!”

त्यांनी इतर विषयांवर बोलायला सुरवात केली. लवकर उठल्याने व दमलेल्या असल्याने, जेवणानंतर त्या झोपण्यासाठी आपापल्या खोलीत गेल्या. जेव्हा त्या जाग्या झाल्या, तेव्हा आभाळ अजून करडे असले तरी व ढग खाली आले असले तरी, पाऊस पडत नव्हता अमेरिकनांनी खाडीच्या कडेने बांधलेल्या चढाच्या रस्त्यावर त्या फिरायला गेल्या.

परतीच्या रस्त्यावर, त्याना डेव्हिडसन तिथे आताच आलेला दिसला.

तो चिडून म्हणाला, “बहुधा आपल्याला इथे पंधरवडा काढावा लागणार. मी व्यवस्थापकाबरोबर वाद घातला. पण तो काही करता येणार नसल्याचे म्हणाला.”

“मिस्टर डेव्हिडसनला कामाला लागायची घाई झाली आहे.” त्याची बायको त्याच्याकडे काळजीने कटाक्ष टाकत म्हणाली.

गॅलरीत फेऱ्या मारत, तो बोलला, “एक वर्ष झाले, आम्ही कामापासून दूर आहोत. देशी मिशनरी लोकांची मुख्य सत्ता मिशनकडे आहे मी खूपच उदास झालो आहे, की ते सर्व काही बाजूला टाकत आहेत. त्यांच्याकडे चांगले लोक आहेत. मी त्यांच्याविरुद्ध काही बोलत नाही आहे. ते देवाला घाबरणारे, धार्मिक व खरे ख्रिश्चन आहेत --- त्यांचा ख्रिश्चनपणा येथील तथाकथित ख्रिश्चनांना लाजायला लावतो आहे --- पण ते दयनीयपणे उत्साहात कमी पडत आहेत. ते एकदा सरसावतात, पुन्हा दुसऱ्यांदा उभे रहातात. पण ते सतत त्या जोमाने काम करू शकत नाहीत. जर तुम्ही देशी मिशनरींच्या प्रमुखाला काढून टाकले, तर तो कितीही विश्वासू असला, तरी काही काळात तुम्हाला असे सापडेल, की तो काही वाईट गोष्टी आत शिरू देतो आहे. मिस्टर डेव्हिडसन स्तब्ध झाला. त्याच्या उंच, ताठ आकृतीने आणि त्याच्या फिकट चेहऱ्यावरील मोठ्या चमकदार डोळ्यांनी, तो छाप पाडणारा असामी दिसत होता. त्याच्या हावभावातून, व घंटेसारख्या आवाजातून तो आग ओकत होता.

“”’माझी अपेक्षा आहे, माझ्यासाठी मला कामातून कटाप करावे. मी मनापासून काम करेन. जर झाड किडले असेल तर ते कापून आगीत टाकायला हवे.”

चहानंतर संध्याकाळी, त्यांच्या दिवसाच्या शेवटच्या जेवणाच्या वेळी ते जेवायच्च्या खोलीत बसले होते. बायका काम करत होत्या आणि डॉ मॅकफेल पाइप ओढत होते.

मिशनरी त्यांना त्याच्या या बेटावरील कामाबद्दल सांगत होता.

तो म्हणाला, “आम्ही इथे आलो, तेव्हा त्यांना पापाची काही जाणीवच नव्हती. ते एकामागून एक बायबलमधील आज्ञा मोडत असत. यात आपण काही चूक करत आहोत, असे त्यांना वाटत नसे. त्या देशी लोकांमध्ये पापाची जाणीव रुजवणे, हा माझ्या कामाचा सर्वात कठीण भाग होता.”

मॅकफेल्सना आधीच माहिती होते, की डेव्हिडसनने सोलोमोन्समध्ये त्याचे लग्न होण्यापूर्वी पाच वर्षे काम केले आहे. त्याची बायको चीनमध्ये मिशनरी होती. बोस्टनमध्ये त्यांची ओळख झाली.

तिथे ते मिशनरी कॉंग्रेसला हजेरी लावण्यासाठी, त्यांचा रजेचा काळ व्यतीत करत होते. लग्नानंतर त्यांची नेमणूक या बेटावर झाली व तेव्हापासून ते इथे काम करत आहेत.

मिस्टर डेव्हिडसनबरोबरच्या या सर्व संभाषणाच्या काळात, एक गोष्ट स्पष्टपणे दिसून आली आणि ती म्हणजे, या माणसाचे अतुलनीय धैर्य. तो मिशनरी डॉक्टर होता. त्याला गटातील कुठल्याही बेटावर कधीही बोलावणे आले असते. पावसाळ्यात खवळलेल्या प्रशांत सागरात व्हेलबोट सुद्धा सुरक्षित नसते. पण त्याला नेहमी छोट्या होडीने पाठवले जाई. त्यात तर फारच धोका होता. त्यात नेहमी आजाराच्या किंवा अपघाताच्या बातम्या येत. निदान डझनभर वेळा तरी त्याने पूर्ण रात्र

जीवावर उदार होऊन, काढलेली होती आणि एकाहून जास्त वेळा मिसेस डेव्हिडसनला तो मेला की काय असे वाटलेले होते. एकाहून जास्त वेळा तो हरवलेला होता.

ती म्हणाली, ‘‘मी कधी कधी त्याने जाऊ नये म्हणून किंवा निदान वातावरण निवळेपर्यंत तरी त्याने थांबावे, अशी त्याची विनवणी केलेली आहे. पण त्याने कधीच ती ऐकली नाही.’’

डेव्हिडसन ओरडला, ‘‘जर माझाच देवावर विश्वास नसेल, तर मी येथील देशी लोकंना ते करायला कसे सांगणार? आणि मी तसा नाही. जर त्यांच्या त्रासात त्यांनी मला बोलावले आणि मला ते शक्य असेल, तर मी जाईनच. मी देवाचे काम करत असतांना तो मला मनाई करेल, हे तुम्हाला शक्य वाटते का? त्याच्या मर्जीनुसार वारा वाहतो आणि त्याच्या शब्दाने लाटा रौद्र उसळी घेतात.’’

डॉ मॅकफेल भित्रा माणूस होता. त्याला मध्येच सटकण्याची अजिबात सवय नव्हती. तो जेव्हा आधुनिक स्टेशनवर काही काम करत असे, तेव्हा त्याच्या भुवईतून घाम गळू लागे. आणि मग त्याच्या अस्थिर हातावर ताबा मिळवण्यासाठी, तो त्याचा चष्मा सावरून धरे. मिशनऱ्याकडे पाहून तो शहारला.

तो म्हणाला, ‘‘माझी अशी इच्छा आहे, मी कधीच घाबरत नाही, असे मला म्हणता यावे.’’ दुसरा बोलला, ‘‘जर तू देवावर विश्वास ठेवलास, तर तुला तसे म्हणता येईल.’’

पण काही कारणाने त्या संध्याकाळी त्याचे विचार, त्याने आणि त्याच्या बायकोने मिळून जे सुरवातीचे दिवस बेटावर काढले, तिथे विहरू लागले.

“कधीकधी मिसेस डेव्हिडसन आणि मी एकमेकांकडे बघत असू आणि आमच्या गालावरून पाणी ओघळू लागे. आम्ही न थांबता, दिवस रात्र काम करत असू आणि तरी काही प्रगती साधता येते आहे, असे आम्हाला वाटेना. तेव्हा मी तिच्याशिवाय काय केले असते, कुणास ठाऊक! जेव्हा मी असा विचार करे, तेव्हा मला फार वाईट वाटे व मी दुःख करू लागे. तेव्हा ती मला धीर देऊन आशा दाखवे.”

मिसेस डेव्हिडसनने तिच्या कामाकडे खाली पाहिले. आणि तिच्या बसलेल्या गालांवर थोडी लाली चढली. तिचे हात थोडे थरथरले. आपण बोलू शकू की नाही, हे तिला कळेना. मिस्टर डेव्हिडसनने चालू ठेवले. “आमच्याकडे मदतीला कुणी नव्हते. आमच्या माणसांपासून हजारो मैल लांब आम्ही एकटे होतो. सभोवताली अंधार होता. जेव्हा मी मोडून पडे, तेव्हा ती तिचे काम बाजूला ठेऊन, बायबल काढे आणि मी शांत होईपर्यंत मला वाचून दाखवे. एखाद्या मुलासारखी अलगद माझ्या डोळ्यांवर झोप उतरे. शेवटी जेव्हा ती वाचन बंद करे, तेव्हा ती म्हणे, “ते कसेही असले तरी आम्ही त्यांना वाचवू.” मग देवावर ठाम विश्वास बसून, मी बोले, “हो, देवाच्या मदतीने मी त्यांना वाचवेन. मला त्याना वाचवायलाच हवे.” तो टेबलासमोर येऊन अशा तऱ्हेने उभा राहिला, की तो जसा काही स्टँडवरील पुस्तक वाचतो आहे.

तुम्हाला समजेल की ते नैसर्गिक रीत्या इतके वंचित आहेत, की त्यांना त्यांचा दुष्टपणा समजावून सांगताच येत नाही. त्याना नैसर्गिक

हालचाली वाटतात, त्या पाप असल्याचे आपल्याला वाटते. चोरी, खोटे बोलणे व अनैतिक लैंगिक संबंध हेच फक्त पाप असल्याचे आपल्याला वाटते. पण शरीर उघडे टाकणे, नाच करणे आणि चर्चमध्ये न जाणे, हे त्यांच्यात सर्रास चालते. मुलीने छाती उघडी टाकणे आणि माणसाने पँट न घालणे, हे पाप असल्याचे मला त्यांना पटवावे लागले.”

डॉ मॅकफेलने आश्चर्य वाटत विचारले, “हे तुम्ही कसे पटवले?”

“मी त्यांना दंड करायला सुरवात केली. लोकांना पटवायचा आणि जर त्यांनी पापी क्रिया केली तर त्याना शिक्षा करायचा तोच एकमेव मार्ग होता. ते चर्चमध्ये गेले नाहीत वा त्यांनी कपडे बरोबर केले नाहीत, तरी मी त्यांना दंड करायला सुरवात केली. प्रत्येक पापाला पैसे तरी भरावे लागत किंवा श्रम करावे लागत. अशा तऱ्हेने शेवटी त्याना ते समजले.”

पण त्यांनी कधी दंड भरायला नकार दिला नाही?”

मिशनरी म्हणाला, “असे कसे काय ते करतील?”

मिसेस डेव्हिडसन ओठ दाबत म्हणाल्या, “मिस्टर डेव्हिडसन यांच्याविरुद्ध उभे रहाण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे शौर्य होते.”

पण डॉ मॅकफेलने डेव्हिडसनकडे त्रासिक डोळ्यांनी पाहिले. त्याने जे ऐकले, त्यामुळे त्यांना धक्का बसला. पण त्यांनी नापसंती दाखवायची टाळाटाळ केली.

“तुम्ही हे लक्षात ठेवले पाहिजे, की त्यांचे चर्चचे सभासदत्व रद्द करून, मी त्याना शेवटच्या एका घरात हाकलून देत असे.”

“त्याचे त्यांना काही वाटे का?”

डेव्हिडसन थोडासा हसला व त्याचे हात चोळले.

“ते त्यांचे नारळ विकू शकत नसत. ते मासे पकडत, तेव्हा त्याना त्यातील वाटा मिळाला नाही, तर त्यांना उपासमार झाल्यासारखे वाटे. हो, ते त्याना फार लागे.”

मिसेस डेव्हिडसन म्हणाल्या, “त्यांना फ्रेड ओह्ल्सनची गोष्ट सांगा.

मिशनऱ्याने त्याचे भीतीदायक डोळे डॉ मॅकफेलवर स्थिर केले.

फ्रेड ओह्ल्सन हा एक डॅनिश व्यापारी होता. तो या बेटावर खूप वर्षे होता. तो चांगला श्रीमंत मनुष्य होता. आम्ही तिथे आल्याने तो फार खूष नव्हता. तो त्याच्या मर्जीप्रमाणे वागत असे. तो देशी लोकांना त्यांच्या नारळांचे त्याच्या मर्जीप्रमाणे पैसे देत असे. आणि तो पैशांऐवजी, व्हिस्की व काही इतर माल देत असे. त्याची बायको त्या गावातील होती. पण तो तिच्याशी एकनिष्ठ नव्हता. तो दारुड्या होता. मी त्याला सुधारायची संधी दिली. पण त्याने ती घेतली नाही. तो मला हसला.”

डेव्हिडसनचा आवाज खर्जातील झाला. तो शेवटचे शब्द बोलला आणि मिनिटभर शांत झाला. ती वादळापूर्वीची शांतता होती.

“दोन वर्षात तो खंगला. तो कफल्लक झाला. पाव शतकात त्याने साठवलेली सर्व संपत्ती तो घालवून बसला. शेवटी मी सांगितल्यावरून, तो एखाद्या भिकाऱ्यासारखा माझ्याकडे आला. त्याने मला विनंती केली, की मी त्याला सिडनीला परत पाठवावे.”

मिशनऱ्याची बायको म्हणाली, “माझी इच्छा आहे, की तो मिस्टर डेव्हिडसनना भेटायला आला, तेव्हा तुम्ही त्याला बघायला हवे होते. तो छान, दणकट मनुष्य होता. त्याच्या अंगावर खूप मास होते. त्याचा

आवाजही मोठा होता. पण आता तो आकाराने अर्धा झाला आहे. आणि थरथरत असतो. अचानक तो म्हातारा मनुष्य झाला आहे.''

डेव्हिडसनने हरवलेल्या नजरेने, रात्रीकडे पाहिले. परत पाऊस पडत होता.

अचानक खालून काही आवाज आला. डेव्हिडसनने वळून, प्रश्नार्थक नजरेने बायकोकडे पाहिले. तो कर्कश आणि मोठा आवाज व ढमढम ताल ग्रामोफोनचा होता.

त्याने विचारले, ''ते काय आहे?''

मिसेस डेव्हिडसनने तिचा नाकावर क्लिप असलेला चष्मा घट्ट केला.

''एका दुसऱ्या वर्गाच्या प्रवाश्याला घरातील खोली दिली आहे. मला वाटते, तो आवाज तिथून येतो आहे.''

त्यांनी शांतपणे तो ऐकला. आणि आता त्याना नाचण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. मग गाण्याचा आवाज थांबला. मग त्यांना बाटल्यांची बुचे उघडल्याचा आवाज आला. आणि मग संभाषणाचे चढलेले व उत्तेजित आवाज ऐकू येऊ लागले.

डॉ मॅकफेल म्हणाला, ''मला वाटते, ती बोटीतील तिच्या मित्रांना निरोपाची मेजवानी देत असावी, नाही का?''

डेव्हिडसन काही बोलला नाही. त्याने घड्याळाकडे बघितले.

त्याने बायकोला विचारले, ''तू तयार आहेस का?''

तिने उठून तिचे काम आवरले.

ती उत्तरली, “हो, मला वाटते, मी तयार आहे.”

डॉक्टर म्हणाला, “अजून झोपायला जायला अवकाश आहे, नाही का?”

मिसेस डेव्हिडसनने स्पष्ट केले, आपल्याला अजून खूप वाचायचे आहे. आपण कुठेही असलो, तरी झोपण्यापूर्वी बायबलचे एक प्रकरण वाचतोच. त्यावरील टीकेचा अभ्यास करतो आणि त्यावर सखोल चर्चा करतो. ते मनाला उत्तम प्रशिक्षण असते.”

दोन जोडप्यांनी एकमेकांना शुभरात्र म्हटले. डॉ आणि मिसेस मॅकफेल एकटेच राहिले. दोन तीन मिनिटे ते काही बोलले नाहीत.

शेवटी डॉक्टर म्हणाले, “मी जाऊन पत्ते घेऊन येतो.”

मिसेस मॅकफेलने त्याच्याकडे संशयाने पाहिले. डेव्हिडसन्सबरोबरील बोलण्याने ती जरा अस्वस्थ झाली होती. पण डेव्हिडसन्स केव्हाही परत येऊ शकला असता आणि पत्ते खेळू नये, असा विचार ती करते आहे, हे सांगणे तिला आवडले नसते. डॉ मॅकफेल ते घेऊन आले. ती विनाकारण थोड्या अपराधीपणाच्या भावनेने त्याला निरखून बघत होती. तो पेशन्स खेळू लागला. खालून माणसांच्या गडबडीचे आवाज येत राहिले.

“दुसऱा दिवस छान होता. मॅकफेल्सनी पागो-पागोमध्ये छान गोष्टींची तयारी करण्यात, पंधरवडा आळसात घालवला. ते खाली खाडीकडे गेले. त्यांची खोकी व खूपशी पुस्तके आणली. डॉक्टरने मुख्य सर्जनला बोलावले आणि बोटीच्या दवाखान्यातील पेशंट मंडळींना त्याच्याबरोबर भेट दिली. त्यांनी पत्ते व्यवस्थापकाकडे ठेवले. त्यांना रस्त्यात मिस थॉम्पसन भेटली.

डॉक्टरने टोपी काढली. तिने आनंदी आवाजात त्याला मोठ्याने शुभ सकाळ म्हटले. तिने आदल्या दिवशीसारखा पांढराशुभ्र झगा घातला होता. तिचे उंच टाचांचे चकाकीत पांढरे बूट तिच्या मासल पायांमधून, बाहेर आले होते. ते विचित्रपणे दूर परदेशाची आठवण करून देत होते.

मिसेस मॅकफेल म्हणाली. "मला नाही वाटत, की तिने योग्य कपडे घातले आहेत. मला ती फारच सर्वसाधारण दिसते आहे."

जेव्हा ते घरी परत आले, तेव्हा ती व्यापाऱ्याच्या एका काळ्या मुलाबरोबर गॅलरीत खेळत होती.

डॉ मॅकफेल बायकोच्या कानात कुजबुजला, "तिला काही सांग. ती इथे एकटी आहे आणि तिच्याकडे दुर्लक्ष करणे, निर्दयीपणाचे ठरेल."

मिसेस मॅकफेल लाजाळू होती. पण नवरा जे सांगेल, ते करायची तिची सवय होती.

ती मूर्खपणे बोलली, "आपण इथे एका जागी रहात आहोत."

मिस थॉम्पसन म्हणाली, "मला वाटते, हे एका घोड्याच्या टांग्यात सगळ्यांना कोंबल्यासारखे भयंकर आहे, नाही का? आणि ते म्हणत आहेत, की एक खोली मिळाल्याने मी सुदैवी आहे. मी अशा गावंढ्या गावातील घरात रहात असल्याची कल्पना करू शकत नाही. पण तेच इथे करावे लागते आहे. इथे हॉटेल का नाही, हे मला समजत नाही."

त्या अजून थोडे बोलल्या. मिस थॉम्पसन बडबडी, मोठा आवाज असलेली व गावगप्पा मारायला उत्सुक, अशी होती. पण मिसेस मॅकफेलकडे बोलायला फार काही नव्हते. ती आता म्हणाली, "मला वाटते, आपण वरती जावे."

संध्याकाळी जेव्हा ते चहासाठी जमले, तेव्हा तिथे आल्यावर डेव्हिडसन्स म्हणाले,

“खालच्या बाईकडे बरेच खलाशी बसले आहेत. मला कळत नाही तिची त्यांच्याशी कुठे ओळख झाली?

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “ती कोणी विशेष अशी तर दिसत नाही.”

काही काम नसलेला, कंटाळवाणा, दिवस घालवून, ते दमले होते.

डॉ मॅकफेल बोलले, “जर इथे पंधरा दिवस रहायची पाळी आली, तर शेवटी आपल्याला कसे वाटेल, कुणास ठाऊक!

मिशनरी उत्तरला, "“दिवसभराचा वेळ काही ना काही करण्यात घालवणे, हाच एक उपाय यावर दिसतो आहे. मी दिवसातील काही वेळ अभ्यासासाठी व काही व्यायामासाठी राखून ठेवेन. पावसाच्या दिवसात, त्याकडे काही लक्ष न देता आपली आपण करमणूक करून घेणे, हेच ठीक राहील.”

डॉ मॅकफेलने त्यांच्या मित्रांकडे बघितले. डेव्हिडसनचे कार्यक्रम ऐकून, तो खट्टू झाला. ते परत हॅंबर्गरचे जाड तुकडे खात होते. तेथील स्वयंपाक्याना एवढाच पदार्थ करता येत असावा. मग खाली ग्रामोफोन सुरु झाला. तो ऐकून डेव्हिडसनने तोंड वाकडे केले. पण तो काही बोलला नाही. माणसांचे आवाज तरंगू लागले. मिस थॉम्पसनचे पाहुणे प्रसिद्ध गाणे लावत होते. आता तिचाही मोठा, घोगरा आवाज ऐकू येऊ लागला. तिथे खूप आरडाओरडा व किंचाळणे चालले होते. वरचे चार लोक संवाद साधू बघत होते , पण त्यांचे लक्ष खालील गाणी, पेल्यांची किणकिण आणि खुर्च्यांच्या

आवाजाकडे जात होते. तिथे गर्दी करायला नक्कीच अजून लोक आले असणार. मिस थॉम्पसन मेजवानी देत होती.

मिशनरी आणि तिचा नवरा यांच्यातील वैद्यकीय संभाषण अचानक थांबवत मिसेस मॅकफेल म्हणाली, “मला नवल वाटते, ती एवढ्या लोकांना कसे जमवते!”

ते तिचे विचार भरकटणारे असल्याचे दिसत होते. डेव्हिडसनच्या कपाळावरील आठी सिद्ध करत होती, की जरी तो शास्त्रीय गोष्टी बोलत असला, तरी त्याचे मन त्याच गोष्टीत गुंतलेले होते. डॉक्टर त्याच्या व्यवसायातील युद्धभूमीवरील काही अनुभव सांगत असतांना, अचानक उठून उभा राहिला व किंचाळला.

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “आल्फ्रेड काय झाले?”

“अर्थात! मला असे कधी झाले नव्हते. ती लेवेलीची आहे.

“ती अशी कशी असेल? ते शक्य नाही.”

“ती होनोलुलूला बोटीत चढली. ते साहजिक होते. आणि ती तिचा व्यवसाय इथे चालवते आहे. इथे.”

त्याने शेवटचे शब्द रागाच्या भरात उच्चारले.

मिसेस मॅकफेल बोलली, “लेवेली म्हणजे काय?”

त्याने त्याचे पेंगुळलेले डोळे तिच्यावर रोखले. त्याचा आवाज भीतीने थरथरत होता.

“होनोलुलूचा वाईट वस्तीचा टापू. बदनाम जागा. तो संस्कृतीवर धब्बा आहे.”

तो टापू गावाच्या सीमेवर होता. तुम्ही बंदराच्या खालच्या रस्त्याने अंधारात, रिकेटी पुलाने सुनसान रस्त्यावर येता. तो सगळा बदनाम भाग आहे. अचानक तुम्ही उजेडात येता. तिथे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोटारी उभ्या करायला जागा आहे. तिथे सवंग आणि झगमगीत कुंटणखाने, आहेत. प्रत्येक वास्तु गडबड असलेली आहे. तिथे यांत्रिक पियानो आहे. न्हाव्याची व तंबाखूची दुकाने आहेत. तिथे सगळीकडे मौजमजेचे वातावरण असून, तेथील हवा उत्तेजित करणारी आहे. कुंटणखाने रस्त्याच्या दोन्ही बाजूला आहेत. सगळीकडे अपेक्षित असा आनंद आहे.. हवेत हालचाल भरून राहिली आहे. तुम्ही अरुंद गल्लीत वळता. उजवीकडे व डावीकडे रस्ता दोन ठिकाणी विभागला जातो आणि तुम्ही त्या लेवेली या बदनाम भागात शिरता. तिथे नीट हिरवा रंग दिलेल्या, लहान बंगल्यांच्या ओळी आहेत. त्यांच्यामधील रस्ता चांगला प्रशस्त आणि सरळ आहे. हे बागांचे गाव म्हणून वसवले गेले. हा चांगला, व्यवस्थित व चटपटीत भाग आहे. पण तिथे फसवी भीती वाटते, कारण प्रेमाचा शोध इतक्या पद्धतशीरपणे व नेटकेपणे कुठेच घेतला गेलेला नाही. वेगळयाच प्रकारच्या दिव्यांनी रस्त्यांवर उजेड आहे. पण तो बंगल्यांच्या उघड्या खिडक्यांमधून आलेला आहे. खिडकीत वाचत किंवा शिवत बसलेल्या बायकांकडे बघत पुरुष माणसे फिरत आहेत. जाणाऱ्या येणाऱ्या माणसांकडे कोणी ढुंकूनही बघत नाही. इथे सर्व देशांमधील बायका आहेत. अमेरिकन्स, येथील बंदरात थांबलेल्या जहाजांवरील खलाशी, लढाऊ जहाजांवरील व जमिनीवरील भरपूर दारू ढोसलेले सैनिक, काळे आणि गोरे, दोन तीनच्या गटात चाललेले जपानी बेटावरील रहिवासी, हवाईयन्स, पायघोळ झगा घातलेले

चिनी आणि विचित्र टोप्या घातलेले फ़िलिपाइन्स. ते सगळे छळ झाल्यासारखे शांत असतात. दबलेली कामेच्छा उदास करणारी आहे.

डेव्हिडसन जोरात म्हणाला, “प्रशांत महासागरातील हे सर्वात रडवणारे प्रकरण आहे. मिशनरी त्याविरुद्ध किती वर्षे लढत आहेत. शेवटी स्थानिक छापखान्याने ते काम अंगावर घेतले. पोलीसांनी यात दखल घ्यायला नकार दिला.ते म्हणाले, की हा दुर्गुण अटळ आहे. त्याला स्थानिक स्वरूप देऊन त्यावर नियंत्रण ठेवणे, हेच उत्तम राहील. त्यातील सत्य असे आहे, की त्यांना त्यातून पैसा मिळतो. मसाजवाले, मवाली भडवे, आणि स्वतः वेश्यांकडून हप्ता दिला जातो. पण शेवटी त्या वेश्यांना तिथून हाकलण्यात आले.”

डॉ मॅकफेल म्हणाले, “मी याबद्दल होनोलुलूच्या वर्तमानपत्रातून वाचले.”

पाप आणि लज्जा यासकट लेवेली हा भाग आपण इथे आलो, त्याच दिवशी नष्ट झाला. तेथील सर्व प्रजेला न्यायालयासमोर आणले गेले. मला ती बाई त्या प्रकारची असल्याचे लगेच कसे कळले नाही, कुणास ठाऊक!”

मिसेस मॅकफेल बोलली, “तुम्ही हे आता बोलत आहात. मला आठवते, बोट सुटण्यापूर्वी अगदी जेमतेम मी तिला चढतांना पाहिले.”

डेव्हिडसन रागाने किंचाळला, “तिची इथे येण्याची हिंमत कशी झाली? मी याला विरोध करेन.”

तो दाराकडे गेला.

मॅकफेलने विचारले, “तू काय करणार आहेस?”

“तुमची माझ्याकडून काय अपेक्षा आहे? मी हे थांबवणार आहे. मी हे घर --- मध्ये बदलू देणार नाही.”

तो शब्द बायकांच्या कानावर पडू नये म्हणून त्याने उचारला नाही. त्याचे डोळे चमकत होते आणि भावनामयतेने त्याचा फिकट चेहरा अजून फिकट झाला होता.

त्याची बायको म्हणाली, “जर तुम्हाला असे वाटत असेल, की व्यक्तिगत धोका त्याला कर्तव्यापासून दूर करेल, तर तुम्ही त्याला ओळखत नाही, असेच म्हणावे लागेल.” उदासीनतेने ती तिच्या हातांची घडी घालून बसली. तिच्या गालांवर थोडी लाली चढली. खाली आता काय होणार, याकडे तिचे लक्ष लागले होते. सगळयांचेच तसे झाले होते.

लाकडी जिन्याने खाली जातांना व दार उघडतांना त्याचा आवाज ऐकू आला. अचानक गाणे थांबले. पण ग्रामोफोनवरील सवंग धून वाजतच राहिली त्यांनी डेव्हिडसनचा व काहीतरी जड पडल्याचा आवाज ऐकला. त्यांना शब्द काय ते कळले नाहीत. त्यांना मिस थॉम्पसनची जोरात मारलेली किंकाळी ऐकू आली. मग खूप लोक बेंबीच्या देठापासून ओरडत असावेत, तसा एक गोंधळलेला गोंगाट ऐकू आला. मिसेस डेव्हिडसनने श्वास रोधून धरत, हात आखडून घेतले. डॉ मॅकफेलने खात्री नसल्यासारखे तिच्याकडून, त्याच्या बायकोकडे पाहिले. त्याला खाली जायचे नव्हते, पण इतरांना तसे वाटत असावे, असा विचार त्याने केला. मग तिथे तोंडाने श्वास घेतल्यासारखा आवाज आला. आता तो आवाज जास्त स्पष्ट येऊ लागला. कदाचित डेव्हिडसनला खोलीबाहेर फेकले गेले असावे. दार आपटले गेले. क्षणभर शांतता पसरली आणि त्याना जिन्यातून डेव्हिडसन वरती येत असल्याचे समजले. तो त्याच्या खोलीत गेला.

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “मला वाटते, मी त्याच्याकडे जावे.”

ती उठली व त्याच्याकडे गेली.

मिसेस मॅकफेल म्हणाली, “हवे असेल, तर मला हाक मार. मला आशा आहे, त्याला लागले नसेल.”

डॉ मॅकफेल म्हणाला, तो कशाला नसते उपद्व्याप करायला गेला?”

ते एक मिनिट शांत बसले. मग ते दोघे निघाले. ग्रामोफोन भांडखोरपणे वाजतच होता. उत्तान गाण्याचे फसवे घोगरे आवाज येत होते.

दुसऱ्या दिवशी मिस्टर डेव्हिडसन अशक्त व दमलेले दिसत होते. तिने डोके दुखत असल्याची तक्रार केली. ती म्हातारी व सुरकुतलेली दिसत होती. ती मिसेस मॅकफेलला म्हणाली की मिशनरी झोपलाच नाही. तो घाबरला होता. राग आलेल्या अवस्थेत होता. पहाटे पाच वाजता उठून, तो बाहेर गेला. पेलाभर बिअर त्याच्यावर ओतली गेली व त्याच्या कपड्यांना डाग पाडले गेले. त्यांना घाण वास येऊ लागला. मिस थॉम्पसनबद्दल बोलतांना, मिसेस डेव्हिडसनच्या डोळ्यात आग दिसू लागली

ती म्हणाली, “तिने मिस्टर डेव्हिडसनची अवज्ञा केली. तेव्हा आता दिवसभर ती खंत करेल. मिस्टर डेव्हिडसन यांचे हृदय नवलपूर्ण आहे. आजपर्यंत दुःखी असलेले कोणी त्याच्याकडून सांत्वना मिळाल्याशिवाय गेले नाही. पण पापाला त्याच्याकडून दया नाही. जेव्हा त्याचा राग उफाळतो, तेव्हा तो भयानक असतो.”

मिसेस मॅकफेलने विचारले, “मग आता तो काय करेल?”

“मला माहिती नाही. पण आता मी काही झाले, तरी दुसऱ्यांच्या दृष्टीकोनातून विचार करू शकत नाही.”

मिसेस मॅकफेल शहारली. त्या छोट्या बाईच्या हावभावात विजयाची खात्री असल्यासारखे, काही दिसत होते. त्या सकाळी त्या दोघी एकत्र बाहेर चालल्या होत्या. त्या कडेने जिना उतरल्या. मिस थॉम्पसनचे दार उघडे होते. त्यांनी तिला अंथरूणातील अवतारात, गाउनमध्ये पाहिले. ती ताटलीत काही शिजवतांना त्यांनी पाहिले.

ती बोलली, “शुभ सकाळ. मिस्टर डेव्हिडसन आता बरे आहेत का?”

त्या नाक वर करून, काही न बोलता रागाच्या झटक्याने पुढे गेल्या, जसे काही ती तिथे नव्हतीच. ती छद्मीपणे जोरात हसू लागली. मिसेस डेव्हिडसन अचानक तिच्याकडे वळून किंचाळत बोलली, “तुझी माझ्याशी बोलायची हिंमत कशी झाली? तू जर माझा अपमान केलास, तर मी तुला इथून हाकलून लावेन.”

“मी काही मिस्टर डेव्हिडसनना आमंत्रण दिले होते का?”

मिसेस मॅकफेल घाईने कुजबुजली, ‘तिच्या तोंडी लागू नकोस.”

त्या भरभर चालू पडल्या.

“ती निर्लज्ज धीटपणे व धक्कादायक रीतीने खोटारडी आहे.” रागाने तिचा श्वास अडला.

घरी परततांना, त्याना ती खाडीकडे निघालेली दिसली. ती आता छान नटली होती. तिची पांढरी मोठी टोपी व त्यावरील दिखाऊ, सपक फुले राग आणणारी व अपमानकारक वाटत होती. तिने शेजारून जातांना त्याना आनंदाने साद घातली. तिथे उभे असलेले काही अमेरिकन खलाशी त्या

दोन बायकांच्या थंड चेहऱ्याकडे बघून हसले. पावसाला सुरवात होण्यापूर्वी त्या घरी परतल्या.

मिसेस डेव्हिडसन कटूपणे हसत म्हणाली, “मला वाटते, आता तिचे छान कपडे खराब होतील.”

त्यांचे अर्धे जेवण झाले, तरी डेव्हिडसन आला नव्हता. तो चिंब भिजला होता. पण त्याने कपडे बदलले नाहीत. तो शांतपणे रागावून बसला. त्याने अगदी थोडेसे खाल्ले आणि पडणाऱ्या पावसाकडे बघत बसला. जेव्हा दोनदा मिस थॉम्पसनशी त्या समोरासमोर आल्याचे मिसेस डेव्हिडसननी त्याला सांगितले, तेव्हा त्याने काही उत्तर दिले नाही. त्याने रागाने भुवई चढवली. त्यावरून त्याला ते ऐकू आल्याचे कळले.

डॉ मॅकफेल म्हणाला, “मला वाटते, ती बोटीतील तिच्या मित्रांना निरोपाची मेजवानी देत होती.”

मिसेस डेव्हिडसननी विचारले, “तुम्हाला असे वाटत नाही का, की मिस्टर हॉर्नला सांगून, तिला इथून हाकलून द्यावे? आपण तिला आपला अपमान करून देता कामा नये.”

मॅकफेल म्हणाला, “तिला जायला इतर कुठे जागा नाही.”

“ती एखाद्या येथील रहिवाश्याबरोबर राहू शकते.”

“अशा हवेत, येथील रहिवाश्यांची घरे रहाण्यासारखी नसतात.”

मिशनरी म्हणाला, “मी अनेक वर्षे अशा घरात राहिलो आहे.”

त्याना रोज जेवणाच्या शेवटी काही गोड मिळत असे. जेव्हा लहानशा देशी मुलीने तळलेली केळी आणली, तेव्हा डेव्हिडसन तिच्याकडे

वळून बोलला, “मिस थॉम्पसनला सोयीस्कर वेळ केव्हा आहे, ते विचार. मला तिला भेटायचे आहे.”

त्या मुलीने लाजून मान हलवली व ती गेली.

त्याच्या बायकोने विचारले, “अल्फ्रेड, तुला तिला कशाकरता भेटायचे आहे?”

“ते माझे कर्तव्य आहे. प्रत्येक संधी दिल्याशिवाय, मी तिला सोडणार नाही.”

“ती कशी आहे ते तुला माहिती नाही. ती तुझा अपमान करेल.”

“करू दे. तिला माझ्यावर थुकू दे. तिचा आत्मा अमर आहे. माझ्यात तिला वाचवायचे जेवढे सामर्थ्य आहे, ते मी वापरणार.”

मिसेस डेव्हिडसनच्या कानात अजून त्या वेश्येचे फसवे हास्य घुमत होते.

“ती फार पुढे गेलेली आहे.”

“देवाच्या कृपेसाठी फार दूर? त्याचे डोळे अचानक चमकले आणि त्याचा आवाज मऊ आणि निवांत झाला.

“कधीच नाही. पापी माणूस पापात नरकापेक्षाही पार बुडालेला असतो. तरीही येशूचे प्रेम त्याच्यापर्यंत पोचू शकते.”

ती मुलगी निरोप घेऊन परत आली. ‘जोपर्यंत डेव्हिडसन तिच्या कामाच्या वेळात येत नाही तोपर्यंत ती कधीही त्याला आनंदाने भेटायला तयार आहे.’

तिथे शांतता पसरली. डॉ मॅकफेलच्या ओठांतून घाईने स्मितहास्य बाहेर पडले. इतर लोकांवरही ते पसरले. त्याला माहिती होते, जर त्याला मिस थॉम्पसन धीटपणे मनोरंजक वाटली, तर त्याची बायको त्याच्याबरोबर आनंदाने सहमत होईल.

त्यांनी न बोलता जेवण संपवले. ते संपले, तेव्हा दोघी बायका उठल्या व कामाला लागल्या. मिसेस मॅकफेल अनेक स्वेटर्सपैकी दुसरा बनवत होती. हे ती लढाईच्या काळापासून करत होती. डॉक्टरने त्याचा पाइप पेटवला. पण डेव्हिडसन खुर्चीत बसलेला राहिला. तो टेबलाकडे शून्यपणे बघत होता. शेवटी तो उठला आणि एकही शब्द न बोलता, खोलीबाहेर गेला. त्यांनी त्याला खाली जातांना ऐकले आणि त्याने दार वाजवल्यावर, मिस थॉम्पसनचे ‘आत या’ देखील ऐकले. तो तिच्याबरोबर तासभर राहिला. डॉ मॅकफेल पावसाचे निरीक्षण करत होता. तो बघून त्याला चिडायला होत होते. तो आपल्या इंग्लिश पावसासारखा जमिनीवर हळूवार पडणाऱ्या थेंबांसारखा मुळुमुळू नव्हता, तर तो एखाद्या दुष्टासारखा भयंकर कोसळत होता. निसर्गाच्या आद्य शक्तींपैकी एक प्रमाणाबाहेर वाढणारी अशी ती शक्ती वाटत होती. तो नुसता ओतत नव्हता, तर वहात होता. धातूच्या भक्कम छतावर स्वर्गातून, जणू तो वेड लागल्यासारखा महापूर आणत होता, जणू रागाने बेभान झाला होता. कधीकधी तुम्हाला असे वाटत होते, आता हे जर थांबले नाही, तर तुम्हाला जोरात किंचाळायला पाहिजे. आणि अचानक तुम्हाला सत्ताहीन वाटू लागते. जसे काही तुमची हाडे अचानक मऊ झाली आहेत आणि गोंधळून तुम्ही निराश झाला आहात.

मिशनरी परत आला, तेव्हा मॅकफेलने डोके वळवले. दोन बायका बघत होत्या.

“मी तिला पुरेशी संधी दिली आहे. मी तिला पश्चात्ताप करायला खूप प्रोत्साहन दिले आहे. ती दुष्ट, पापी बाई आहे.”

तो थांबला. डॉ मॅकफेलने त्याचे डोळे गडद झालेले, फिकट चेहरा कडक झालेला आणि हावभाव कठोर झालेले पाहिले. “बेकायदेशीर कारभार करणाऱ्या लोकांना व कर्जे देणाऱ्यांना, येशूने मोठ्या पवित्र देऊळांबाहेर हाकलले होते, तो चाबूक आता मी हातात घेणार आहे.”

तो खोलीभर फिरू लागला. त्याचे तोंड गप्प झाले आणि काळ्या भुवया वर चढल्या.

“जर ती पृथ्वीच्या वरच्या भागात पळून गेली, तर मी तिचा पाठलाग करेन.”

त्याने अचानक गिरकी घेतली व खोलीबाहेर पडला. त्यांनी त्याला परत खाली जातांना ऐकले.

मिसेस मॅकफेलने विचारले, “तो आता काय करणार आहे?”

मिसेस डेव्हिडसनने तिचा नाकावर क्लिप असलेला चष्मा काढून पुसला. “जेव्हा तो देवाच्या कामावर असतो, तेव्हा मी त्याला काही प्रश्न विचारत नाही.” तिने एक सुस्कारा टाकला.

“काय झाले?”

“तो स्वतःला त्रास करून घेईल. पण स्वतःला त्रास करून घेणे म्हणजे काय, तेच त्याला माहिती नाही.”

ज्याच्या घरात ते रहात होते, त्या मिश्र जातीच्या व्यापाऱ्याकडून डॉ मॅकफेलने मिशनऱ्यांच्या कामाचा पहिला धडा शिकला होता. त्याच्या दुकानावरून डॉ मॅकफेल जात असतांना त्याने त्याला थांबवले आणि बाहेर

येऊन, वाकून त्याच्याशी बोलला. त्याच्या जाड चेहऱ्यावर काळजी दिसत होती.

तो म्हणाला, “चर्चचा सभासद असलेल्या डेव्हिडसनने मला आग्रह केल्यामुळे, मी मिस थॉम्पसनला इथे खोली दिली. पण तेव्हा मला माहिती नव्हते, की ती कोण आहे. जेव्हा लोक मला विचारायला येतात, की आम्हाला जागा भाड्याने देता का, तेव्हा मला हे माहिती करून घ्यायचे असते, की ते मला भाडे देऊ शकतील, की नाही. तिने आठवडाभर आधी मला पैसे दिले.”

डॉ मॅकफेलला स्वतःला काही कबूल करायचे नव्हते.

तो म्हणाला, “जेव्हा सगळे सांगून आणि करून झाले, तेव्हा हे घर तुमचे आहे. तुम्ही आम्हाला इथे रहायला दिल्याबद्दल, आम्ही तुमचे ऋणी आहोत.”

हॉर्नने त्याच्याकडे संशयाने पाहिले. अजून त्याला खात्री नव्हती की मॅकफेल किती ठामपणे मिशनऱ्याच्या मागे उभा रहातो.

तो घाईने म्हणाला, “मिशनरी एकमेकांबरोबर आहेत. जर ते व्यापाऱ्यासाठी एकत्र आले असले, तर त्याला त्याचे दुकान बंद करून निघून जावे लागेल.”

“तुम्ही तिला हाकलावे, अशी त्याची इच्छा आहे का?”

तो म्हणाला, नाही, जर ती नीट वागली, तर तो मला असे करायला सांगू शकणार नाही. तो मला म्हणाला, की तो माझ्यावर अन्याय होऊ देणार नाही. मी त्याला वचन दिले, की तिच्याकडे आता गिऱ्हाइके येणार नाहीत. तिला मी आता तसे सांगितले आहे.”

“तिने ते मान्य केले का?”

“तिने मला शिव्या दिल्या.”

व्यापाऱ्याने उदासीनतेने त्याचे शरीर घुसळले. त्याला मिस थॉम्पसन अडाणी भाडेकरू वाटली.

“ओहो, ठीक आहे. मी असे सांगायचे धाडस करतो, की ती जाईल. जर कुणी गिऱ्हाइके येणार नसतील, तर तिला इथे रहायचे नसेल.”

“पण तिला कुठे जायला जागा नाही. फक्त एक गावातील जुने घर आहे पण तिथे आता तिला ते घेणार नाहीत. कारण त्यांना मिशनऱ्यांचा धाक आहे.”

डॉ मॅकफेलने पडणाऱ्या पावसाकडे पाहिले.

“मला नाही वाटत, की हा थांबेल म्हणून वाट बघावी.”

संध्याकाळी ते जेवायच्या जागी बसले, तेव्हा डेव्हिडसन त्यांच्याशी त्याच्या कॉलेजच्या दिवसांबद्दल बोलला. त्याच्याकडे पैसे नव्हते आणि तो सुट्टीमध्ये मिळतील ती कामे करायचा. खालच्या मजल्यावर शांतता होती. मिस थॉम्पसन तिच्या लहानशा खोलीत एकटीच बसली होती. अचानक ग्रामोफोन वाजू लागला. तिचा एकटेपणा घालवण्यासाठी, तिने तो जोराने लावला होता. पण तिथे गायला कोणीच नव्हते आणि त्याचे स्वर करूण होते. ते मदतीसाठी टाहो फोडल्यासारखे होते. डेव्हिडसनने त्याकडे काही लक्ष दिले नाही. तो एक प्रसंग सांगत होता आणि चेहऱ्यावरचे काही भाव न बदलता, त्याने ते चालू ठेवले. ग्रामोफोन केकाटत होता. मिस थॉम्पसन एकामागून एक गाणी लावत होती. असे दिसत होते, जणू रात्रीची शांतता तिला असह्य होत होती. सर्वत्र निःस्तब्ध व गरम होते. जेव्हा मॅकफेल्स

झोपायला गेले, तेव्हा त्यांना झोप येईना. ते डोळे टक्क उघडे ठेऊन, शेजारी शेजारी झोपले होते. त्यांच्या पडदयाबाहेरील डासांची दुष्ट गुणगुण ऐकत होते.

शेवटी मिसेस मॅकफेल कुजबुजली, “ते काय आहे?”

लाकडी पडदयाआडून त्यांनी डेव्हिडसनचा आवाज ऐकला. तो एकसुरी आग्रहाचा व कळकळीचा होता. तो मिस थॉम्पसनची विनवणी करत होता.

दोन तीन दिवस गेले. आता जेव्हा त्यांना मिस थॉम्पसन रस्त्यात भेटे, तेव्हा ती त्याना हसून किंवा विरोधभासात्मक पद्धतीने अभिवादन करेनाशी झाली. ती नाक वर करून जाऊ लागली. तिच्या रंगरंगोटी केलेल्या चेहऱ्यावर वाईट भाव येऊ लागले. भुवई वर चढू लागली. ती काही पाहिलेच नाही अशा तऱ्हेने पुढे जाऊ लागली. व्यापारी मॅकफेलला म्हणाला, की ती दुसरीकडे जागा मिळवायच्या प्रयत्नात आहे. पण तिला ती मिळत नाही आहे. संध्याकाळी तिने ग्रामोफोनवर अनेक गाणी लावली. पण मनोरंजनाचे ढोंग चालूच होते. तो काळया अमेरिकनांचा रॅगटाईम संगीताचा हृदयद्रावक, मोडून टाकणारा सूर होता. जणू काही ती दुःखाची एक पायरी होती. जेव्हा ती रविवारी ग्रामोफोन लाऊ लागली, तेव्हा डेव्हिडसनने हॉर्नला तिला आज देवाचा दिवस असल्याने, तो ताबडतोब बंद करायला सांगायला पाठवले. मग तो बंद झाला व पावसाचा लोखंडी छप्परावरील आवाज सोडून घरात शांतता पसरली. दुसऱ्या दिवशी व्यापारी मॅकफेलला म्हणाला, “मला वाटते आपले काम होते आहे. तिला माहिती झाले असावे, की मिस्टर डेव्हिडसन काय करणार आहेत आणि त्यामुळे, ती घाबरली असावी.”

.त्या सकाळी मॅकफेलची तिच्याशी नजरानजर झाली आणि त्याला जाणवले की, तिचे उद्दाम हावभाव बदलले आहेत. तिच्या चेहऱ्यावर पराभवाचे भाव होते. त्या मिश्र जातीच्या व्यापाऱ्याने त्याच्याकडे कडेने बघितले.

तो फटकारला, "मला वाटते, तुम्हाला माहिती नाही, की मिस्टर डेव्हिडसन याबद्दल काय करणार आहेत?"

"नाही, मला माहिती नाही."

मिस्टर हॉर्नने त्याला तो प्रश्न विचारावा, हे विचित्र होते. कारण त्याला याची कल्पना होती, की मिशनरी झपाट्याने कामाला लागलेला आहे.

त्याला असे वाटत होते की मिशनरी त्या बाईभोवती काळजीपूर्वक, पद्धतशीरपणे व अचानक जाळे टाकतो आहे. जेव्हा सगळी तयारी पूर्ण होईल, तेव्हा तो फास आवळेल.

व्यापारी म्हणाला, "त्याने मला तिला सांगायला सांगितले आहे, की तिला कधीही तो हवा असेल तर तिने निरोप पाठवल्यासरशी तो हजर होईल."

"तुम्ही तिला तसे सांगितल्यावर, ती काय म्हणाली?"

"ती काही बोलली नाही. मी थांबलो नाही. मी तिला म्हटले, की मी फक्त त्याचा निरोप सांगितला. त्यामुळे ती घाबरली असावी. मला वाटले, ती आता शोक करायला सुरवात करणार."

डॉक्टर चिडून म्हणाला, "एकटेपणा तिच्या अंगावर येत असणार, याबद्दल मला काही संशय नाही. आणि पाऊस --- तो कुणालाही अस्वस्थ

बनवण्यासाठी पुरेसा आहे. या बेकार जागेमधून तो कधी जाणार तरी आहे, की नाही?”

“पावसाळ्यात तो असाच सतत पडतो. आमच्याकडे वर्षाला तीनशे इंच पाऊस पडतो. खाडीचा आकारच असा आहे, की प्रशांत महासागरातील सर्व ढगांना तो आकर्षित करतो.”

डॉक्टर म्हणाला, “त्या आकाराला आग लागो.”

त्याने डास चावलेली जागा खाजवली. त्याला फार राग आला. जेव्हा पाऊस थांबला, आणि सूर्य चमकू लागला, तेव्हा ते घर तप्त झाले. दमट, दबलेला राग असलेले व श्वास कोंडणारे झाले. रानटी आक्रमकपणे प्रत्येक गोष्ट वाढते आहे, अशी विचित्र भावना होऊ लागली. अविचारी मुलासारखी कीर्ती असलेले, टॅटू काढलेले, केस रंगवलेले व काहीसे विचित्र दिसणारे देशी लोक, जेव्हा अनवाणी पाऊलांनी तुमच्या पायात येतात, तेव्हा तुम्ही आपोआप त्यांच्याकडे बघता. तुम्हाला वाटते, की कुठल्याही क्षणी ते तुमच्या मागोमाग येतील आणि मोठा सुरा तुमच्या खांद्यात खुपसतील. त्यांच्या मोठ्या डोळ्यात काय काळे विचार दडलेले आहेत, हे काही सांगता येत नाही. देऊळावर चित्रित केलेल्या इजिप्शियन लोकांसारखे ते दिसतात आणि एक पुरातन जरब, त्यांच्यात वास करत असल्यासारखे वाटते.

मिशनरी आला आणि गेला. तो कामात होता. पण मॅकफेल्सना माहिती नव्हते, की तो काय करतो आहे.

हॉर्नने डॉक्टरला सांगितले, की तो व्यवस्थापकाला रोज भेटतो. एकदा डेव्हिडसननेही त्याचा उल्लेख केला.

तो म्हणाला, “त्याच्याकडे बघून तो फार निश्चयाचा वाटतो. पण तुम्ही जेव्हा महत्वाच्या मुद्द्यांची चर्चा करायला लागता, तेव्हा तो बिनकण्याचा वाटतो.”

डॉक्टरने विनोद करत सुचवले, “याचा अर्थ मला वाटते, तुम्हाला जे हवे आहे ते नेमकेपणे तो करणार नाही.”

मिशनरी हसला नाही.

“मला त्याने जे योग्य आहे, ते करायला हवे आहे. त्यासाठी त्या माणसाचे मन वळवायला हवे.”

“पण काय योग्य आहे, याबाबत दुमत असू शकेल.”

“जर माणसाला गँगरीन झालेला पाय असेल, तर तो कापू न देणाऱ्या माणसाबरोबर तुम्ही शांतपणे राहू शकाल, का?

“गँगरीन ही वस्तुस्थिती आहे.”

“आणि पाप?”

डेव्हिडसनने काय केले, ते लवकरच समजले. त्यांच्यापैकी चौघांनी दुपारचे जेवण नुकतेच संपवले होते. आणि अजून ते बायकांना व डॉक्टरला टाळता न येणाऱ्या दुपारच्या विश्रांतीसाठी वेगळे झाले नव्हते. डेव्हिडसनला ती आळशी सवय फारशी नव्हती. अचानक दार उघडले गेले आणि मिस थॉम्पसन आत शिरली. तिने खोलीभर पाहिले व मग डेव्हिडसनकडे गेली.

“काही वाईट झाले का?”

“तुम्ही माझ्याबद्दल काय नको नको ते, व्यवस्थापकाला सांगितलेत?”

ती रागाने थरथरत होती. क्षणभर शांतता पसरली. मग मिशनऱ्याने खुर्ची पुढे केली.

“मिस थॉम्पसन, तुम्ही बसणार नाही का? मला तुमच्याशी बोलायचे आहे.”

“तू गरीब, खालच्या वर्गातला पशु कुठला!”

तिने अपमानांची, चुकांची व शिव्यांची लाखोली वाहिली. डेव्हिडसनने त्याचे थंड डोळे तिच्यावर रोखलेले ठेवले तो म्हणाला, “मिस थॉम्पसन, मी तुम्ही दिलेले अपशब्द मला चिकटवलेच नाहीत. पण मी तुम्हाला सांगू इच्छितो, की इथे महिला हजर आहेत.”

आता अती रागाने तिच्या डोळयातून पाणी येऊ लागले. दम घुटल्यासारखा, तिचा चेहरा लाल झाला व सुजला.

डॉक्टर मॅकफेल म्हणाला, “काय झाले आहे?”

“एक मनुष्य आताच इथे आला होता आणि तो म्हणत होता, की मी पुढील बोटीने इथून निघून जावे.”

मिशनऱ्याचे डोळे चमकले का? त्याचा चेहरा थंड राहिला.

“व्यवस्थापकाने तुम्हाला अशा परिस्थितीत, इथे राहू देण्याची अपेक्षा तुम्ही करू शकत नाही.”

ती किंचाळली, “तू हे केले आहेस. तू मला फसवू शकत नाहीस. तू हे केले आहेस.”

“मला तुला फसवायचे नाही. मी व्यवस्थापकाला सांगितले, की हरकतीशी सुसंगत असा निर्णय तू घे.”

“तुम्ही माझे मला का सोडत नाही? मी काही तुम्हाला त्रास देत नव्हते.”

“तर खात्री बाळग की तुला असे करावे लागले, तर पश्चात्ताप होणारा मी शेवटचा माणूस असेन.”

“तुला असे वाटते का, की या तटबंदी असलेल्या जुन्या किल्ल्यासारख्या घरात रहायला मला आवडत असेल? मी काही रानटी दिसत नाही, दिसते का?”

तो उत्तरला, “असे असेल तर, तुम्हाला तक्रार करायचे काय कारण आहे?”

तिला स्पष्ट करता न आल्यामुळे फारच राग आला. ती इतक्या जोरात ओरडली, की तो आवाज खोलीबाहेर गेला. थोडा वेळ तिथे शांतता पसरली.

शेवटी डेव्हिडसन बोलला, “हे ऐकून मला संतोष झाला, की शेवटी व्यवस्थापकाने काही निर्णय घेतला. तो अशक्त आणि निर्णय घेऊ न शकणारा मनुष्य आहे. तो म्हणाला, ती इथे फक्त पंधरा दिवस आहे. जर ती अपियाला गेली, तर ते ब्रिटीश न्यायव्यवस्थेखाली होईल. आणि त्यात त्याचा काही संबंध नसेल.”

मिशनऱ्याने पाय पुढे टाकला व तो खोलीबाहेर पडला.

“जबाबदारी टाळणाऱ्या इथल्या अधिकारी माणसांची कमाल आहे. ते असे म्हणतात की ‘दृष्टीआड सृष्टी’ असलेले पाप, हे पाप नाहीच आहे.

त्या बाईचे आस्तित्व, हेच एक प्रकरण आहे. आणि त्यामुळे तिला दुसऱ्या बेटावर ठेऊन सुद्धा हे संपणार नाही आहे. शेवटी मला सरळ सरळ आज्ञा करावी लागेल.”

डेव्हिडसनची चढलेली भुवई पूर्ववत झाली. त्याने त्याची ठाम हनुवटी त्याने पुढे काढली.

“तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“आपले काम हे पूर्णपणे वॉशिंग्टनच्या दबावापासून अलग चालणारे असे नाही. मी व्यवस्थापकाच्या लक्षात आणून दिले आहे, की तो इथे ज्या तऱ्हेने गोष्टींची व्यवस्था बघतो आहे, त्याबद्दल काही तक्रारी आल्या, तर ते त्याच्या दृष्टीने चांगले ठरणार नाही.”

थोड्या शांततेनंतर डॉक्टरने विचारले, “ती इथून केव्हा जाणार आहे?”

“पुढच्या मंगळवारी सिडनीहून सॅनफ्रॅन्सिस्को इथे जाणारी बोट येणे अपेक्षित आहे.

. त्यात बसून ती जाणार आहे.”

“म्हणजे अजून पाच दिवसांनी. हातून काहीतरी चांगले काम व्हावे म्हणून, डॉ मॅकफेल त्याचा सकाळचा बहुतेक वेळ तेथील दवाखान्यात घालवत असे. दुसऱ्या दिवशी तिथून परततांना, त्या मिश्र जातीच्या माणसाने वर जातांना त्याला थांबवले.

“माफ करा डॉक्टर मॅकफेल, मिस थॉम्पसन आजारी आहे. तुम्ही तिला बघायला याल का?”

“नक्कीच.”

हॉर्नने त्याला तिच्या खोलीत नेले. ती न वाचता वा न शिवता, तिच्यासमोर शून्य दृष्टीने बघत, रिकामपणे एका खुर्चीत बसली होती. तिने पांढरा ड्रेस व त्यावर फुले असलेली मोठी टोपी घातली होती. मॅकफेलला जाणवले, की पावडरच्या खाली तिची कांती पिवळी व मातकट होती आणि डोळे जड झाले होते.

तो म्हणाला, "तुम्हाला बरे नाही, हे ऐकून, मला वाईट वाटले."

"ओहो, खरे तर मी आजारी नाही. मी तसे सहज म्हणाले, कारण मला तुम्हाला भेटायचे होते. मला सॅनफ्रॅन्सिस्कोला जाणाऱ्या बोटीतून जायचे आहे."

तिने त्याच्याकडे पाहिले आणि त्याला तिचे डोळे धक्का बसल्यासारखे दिसले. तिने तिच्या हातांची उघडमिट केली. पण ते आखडल्यासारखे थंड पडले होते. दारात व्यापारी ऐकत उभा होता.

डॉक्टर म्हणाला, "म्हणजे मला समजले."

तिने एक आवंढा गिळला. "मला वाटते, मला आता सॅनफ्रॅन्सिस्कोला जाणे फारसे सोयीस्कर नाही. काल दुपारी मी व्यवस्थापकाला भेटायला गेले होते, पण मी त्याला भेटू शकले नाही. मी त्यांच्या सचिवाला भेटले आणि त्याने मला सांगितले, की मला त्या बोटीतून जायचे आहे आणि एवढेच बोलणे झाले. मला व्यवस्थापकाला भेटायचे असल्याने, मी आज सकाळी त्याच्या घराबाहेर थांबले. तो बाहेर आला, तेव्हा मी त्याच्याशी बोलले. मी म्हणेन, की त्याला माझ्याशी बोलायचे नव्हते. पण मी त्याला तसे करून दिले नाही. शेवटी तो म्हणाला, की चर्च सभासद असलेल्या मिस्टर डेव्हिडसनना चालत असेल, तर

सिडनीला जाणारी पुढची बोट येईपर्यंत, मी इथे राहिले, तरी त्याची काही आडकाठी नाही.”

ती थांबली आणि तिने काळजीपूर्वक डॉ मॅकफेलकडे पाहिले. तो म्हणाला, “मी काय करू शकेन याबद्दल मला खात्रीने काही सांगता येणार नाही.”

“मला वाटते, तुम्ही त्याला विचारावे. मी देवाशपथ सांगते, जर त्याने मला इथे राहून दिले तर मी इथे काही सुरु करणार नाही. जर मला तसे मानवले, तर मी घराबाहेरदेखील पडणार नाही. एका पंधरवड्याचाच तर प्रश्न आहे.”

“मी त्याला विचारतो.”

हॉर्न म्हणाला, “मला हे पसंत नाही. मंगळवारी तो तुम्हाला बाहेर काढेल. तेव्हा तुम्ही त्याची तयारी ठेवा.”

“त्याला सांगा मला सिडनीत काम मिळेल. म्हणजे, ही सरळ गोष्ट आहे. हे विचारणे काही फार नाही.”

“मला करता येईल, ते मी करतो.”

“आणि काय झाले, ते मला येऊन सांगा, सांगाल का? कुठलीही गोष्ट तडीस नेल्याशिवाय मला चैन पडत नाही.”

डॉक्टरला ही गोष्ट काही पसंत पडली नाही. आणि कदाचित स्वभावानुसार, त्याने आडूनआडून ती गोष्ट केली. मिस थॉम्पसन काय म्हणाली, ते त्याने बायकोला सांगितले. तिने मिसेस डेव्हिडसनशी बोलावे, असे तिला सांगितले. मिशनऱ्याचा दृष्टीकोन जरा असातसाच होता. त्या मुलीला पागो-पागो मध्ये अजून एक पंधरवडा राहून दिले असते, तरी

त्यामुळे काही त्रास झाला नसता. पण तो त्याच्या मुत्सद्देगिरीचा परिणाम भोगायला तयार नव्हता. मिशनरी सरळ त्याच्याकडे आला.

"मिसेस डेव्हिडसन म्हणाली, की मिस थॉम्पसन तुमच्याशी बोलणार आहे."

अशा तऱ्हेने तो लाजरा असल्याने, डॉक्टर मॅकफेलने मोकळेपणे न बोलता, त्या प्रश्नाला बगल दिली. त्याला राग येऊ लागला आणि तो लाजला.

"मला नाही वाटत, की ती सॅनफ्रॅन्सिस्कोऐवजी सिडनीला गेली तर काही फरक पडेल. आणि इथे राहून ती धड वागणार असेल, तर तिला हाकलून लावायचे काही कारण नाही."

मिशनऱ्याने निश्चयी डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिले. "ती सॅनफ्रॅन्सिस्कोला जायला का तरार नाही?" डॉक्टर कडक सुरात म्हणाला, "मी चौकशी केली नाही. मला वाटते कोणी दुसऱ्याच्या भानगडीत नाक खुपसू नये."

कदाचित हे फार हुशारीचे उत्तर नव्हते.

व्यवस्थापकाने तिला पहिल्या बोटीने हे बेट सोडून जायला सांगितले होते. त्याने त्याचे कर्तव्य केले होते आणि तो आता यात काही ढवळाढवळ करणार नव्हता. तिचे इथे असणे गंभीर धोक्याचे होते.

डॉक्टर म्हणाला, "मला वाटते, तुम्ही फार कडकपणे व अधिकाराचा दुष्ट वापर करत, हा निर्णय घेतला आहे."

त्या दोन स्त्रियांनी डॉक्टरकडे चमकून पाहिले. पण त्यांना भांडणाची भीती वाटायचे काही कारण नव्हते. कारण मिशनऱ्याने हसून पाहिले.

“तुम्हाला जर असे वाटले असेल, तर मला माफ करा. डॉक्टर मॅकफेल, माझ्यावर विश्वास ठेवा. मला त्या दुर्दैवी बाईची दया येते. पण मी माझे कर्तव्य करतो आहे.”.

डॉक्टरने काही उत्तर दिले नाही. तो वाईट रीतीने खिडकीबाहेर बघू लागला. आता पाऊस पडत नव्हता. खाडीपलीकडे झाडांमध्ये देशी लोकांच्या झोपड्या दिसत होत्या.

तो म्हणाला, “मला वाटते, पाऊस थांबल्याचा फायदा घेऊन, मी बाहेर जाऊन येतो.”

डेव्हिडसन उदासीनतेने म्हणाला, “कृपया मी काही वाईट केले असे समजू नका, कारण मी तुमची इच्छा मान्य करू शकत नाही. मी तुम्हाला खूप मानतो. डॉक्टर, आणि तुम्हाला मी वाईट वागतो आहे, असे वाटले असेल, तर मला माफ करा.”

डॉक्टर कडकपणे उत्तरला, “माझा शांतपणा सहन करुन, स्वतःचे पुरेसे चांगले मत तुम्ही मांडलेत, याबद्दल मला काही संशय नाही.”

डेव्हिडसन गालातल्या गालात हसत बोलला, “तेच माझे काम आहे.”

डॉ मॅकफेल निराशेने खाली जात, स्वतःशीच म्हणाला कारण तो कारणाशिवाय त्रासला होता. मिस थॉम्पसन दार उघडे टाकून, त्याची वाट बघत होती.

ती म्हणाली, “ठीक आहे. तुम्ही त्यांच्याशी बोललात का?”

निराशेमुळे, तिचाकडे न पाहता तो म्हणाला, “हो. पण मला माफ करा. तो काही करणार नाही.”

पण नंतर त्याने लगेच तिच्याकडे पाहिले. कारण तिला हुंदका फुटला. त्याने पाहिले, की तिचा चेहरा भीतीने पांढरा पडला. दुःखाने त्याला धक्का बसला. आणि अचानक त्याला एक कल्पना सुचली.

“पण अजून आशा सोडू नका. तुम्हाला ते ज्या प्रकारे वागवत आहेत, ते लाजलावणे आहे. मी व्यवस्थापकाला स्वतः भेटतो.”

“या वेळी?”

त्याने मान हलवली. तिचा चेहरा उजळला.

“हा खरेच तुमचा मोठेपणा आहे. जर तुम्ही माझ्यासाठी बोललात, तर ते मला नक्की राहून देतील. मी इथे असेपर्यंत, करू नये अशी कुठलीही गोष्ट करणार नाही.”

व्यवस्थापकाला भेटायचे त्याने का ठरवले, हे मॅकफेलला स्वतःलाही कळले नाही. मिस थॉम्पसनच्या प्रकरणापासून तो पूर्णपणे अलिप्त होता. पण मिशनऱ्याने त्याला चिरडीला आणले होते. आणि त्याचा स्वभाव चिडका होता. त्याला व्यवस्थापक घरीच सापडला. तो मोठा देखणा मनुष्य होता. ब्रशसारख्या करड्या मिशा असलेला तो खलाशी पांढराशुभ्र डागविरहीत गणवेष घालून बसला होता.

मॅकफेल म्हणाला, “मी आमच्याच घरात खालील मजल्यावर रहाणाऱ्या बाईसंबंधी भेटायला आलो आहे. तिचे नाव मिस थॉम्पसन आहे.”

व्यवस्थापक हसत म्हणाला, “डॉ मॅकफेल, मला वाटते, मी तिच्याबद्दल पुरेसे ऐकले आहे. मी तिला पुढील मंगळवारी इथून जाण्याची आज्ञा दिली आहे. मी एवढेच करू शकतो.”

“मला तुम्हाला असे विचारायचे आहे, की तुम्ही सॅनफ्रॅन्सिस्कोहून बोट येईपर्यंत, तिला इथे राहू द्याल का, म्हणजे तिला सिडनीला जाता येईल. मी तिने चांगले वागायची हमी देतो.”

व्यवस्थापकाने हसणे चालू ठेवले. पण त्याचे डोळे बारीक व गंभीर झाले.

“डॉ मॅकफेल, मी तुमचे म्हणणे ऐकले असते. पण मी आधीच आज्ञा दिलेली आहे आणि तीच आता पाळली जाणार.”

डॉक्टरने त्याच्या दृष्टीने खूप प्रयत्न करून पाहिला. पण आता व्यवस्थापकाने हसणे थांबवले. त्याने रागावून दुर्लक्ष करत, सर्व काही ऐकून घेतले होते. मॅकफेलला जाणवले, की त्याचा काही प्रभाव पडू शकत नाही.

“कुठल्याही बाईची गैरसोय होण्यास, मी कारणीभूत ठरलो असल्यास, मला माफ करा. पण पुढील मंगळवारी तिला इथून जावेच लागेल.”

“पण त्याने काय फरक पडणार आहे?”

“माझे ऐका, डॉक्टर. योग्य अधिकारी सोडून कुणी माझ्याकडून स्पष्टीकरण मागू शकत नाहीत.”

मॅकफेलने त्याच्याकडे गर्वाने पाहिले. त्याला डेव्हिडसनची सूचना आठवली, की त्याने धमक्यांचा वापर केला होता. व्यवस्थापकाच्या दृष्टीत त्याने एक वेगळीच लज्जा पाहिली होती.

तो रागाऊन म्हणाला, “डेव्हिडसन म्हणजे कामाचा, पण भिकार माणूस आहे.”

“डॉ मॅकफेल, आपल्याआपल्यात सांगतो, मी असे म्हणणार नाही, की मिस्टर डेव्हिडसनबद्दल माझे फार चांगले मत झाले. पण मला असे कबूल केले पाहिजे, की त्याने त्याच्या अधिकारात मला धोका दाखवून देण्याचे काम केले, की जिथे देशी लोकांमध्ये काही चांगले सुसंस्कृत लोक रहात आहेत, तिथे मिस थॉम्पसनसारख्या चारित्र्याच्या बाईचे आस्तित्व धोकादायक आहे.”

तो उठला आणि डॉ मॅकफेलनेही तसेच केले.

“तुम्ही मला माफ कराल, असे मी समजतो. मला एक काम आहे. कृपया मिसेस मॅकफेलना माझा नमस्कार सांगा.”

डॉक्टर उदास आणि निराश झाला. त्याला माहिती होते, की मिस थॉम्पसन त्याची वाट बघत असेल. त्याची शिष्टाई काही चालली नाही, हे तिला सांगणे नको वाटल्याने, तो मागील दाराने जिना चढला व जसे काही त्याला काही लपवायचे असल्याप्रमाणे, घरात शिरला.

संध्याकाळच्या जेवणाच्या वेळी तो शांत पण थोडा चिडलेला होता. पण मिशनरी आनंदी, उत्साही असून मित्रत्वाने वागत होता. डॉ मॅकफेलने विचार केला आणि त्याचे डोळे विजयाच्या चांगल्या भावनेने मिशनऱ्यावर खिळले. त्याला अचानक जाणवले, की डेव्हिडसनला त्याच्या व्यवस्थापकाला दिलेल्या भेटीबद्दल, आणि ती यशस्वी न झाल्याबद्दल, माहिती होते. पण त्याला ते कसे समजले? त्या माणसाच्या शक्तीबद्दल काही विचित्रता होती. जेवणानंतर, त्याला गॅलरीत हॉर्न दिसला. त्याच्याशी थोडे बोलावे, म्हणून तो तिथे गेला.

व्यापारी कुजबुजला, “तुम्ही व्यवस्थापकाला भेटलात का, हे तिला जाणून घ्यायचे आहे.”

“हो. तो काही करू शकत नाही. मी दिलगीर आहे. मी अजून काही करू शकत नाही.”

“तो काही करू शकणार नाही, हे मला माहिती होते. ते मिशनऱ्यांविरुद्ध काही करू शकत नाहीत.”

डेव्हिडसन बाहेर येत, हसत, मित्रत्वाने बोलला, “तुम्ही काय बोलत आहात?

व्यापारी ठामपणे बोलला, “मी म्हणत होतो की अजून एक आठवडा तरी अपियाला जाणे शक्य नाही आहे.”

तो निघून गेला आणि दोन माणसे जेवणाच्या ठिकाणी परतली. मिस्टर डेव्हिडसन जेवणानंतर एक तास मनोरंजनात घालवत असत. आता दारावर एक घाबरट थाप आली.

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “आत या.”

दार उघडले नाही. तिने उठून ते उघडले. त्यांनी मिस थॉम्पसनला दारात उभे असलेले पाहिले. पण तिच्यातील बदल असामान्य होता. ती आता रस्त्यात त्याना दिसली होती, तशी फसवणारी, भपकेबाज व उद्धट दिसत नव्हती, तर मोडून पडलेली, घाबरट बाई दिसत होती. तिचे केस नेहमीसारखे नखरेल रीतीने विंचरलेले नव्हते तर विस्कटून, तिच्या मानेवर पडले होते. तिने झोपायच्या वेळेच्या स्लीपर्स व स्कर्ट ब्लाउज घातला होता. पण ते मळलेले व अव्यवस्थित होते. ती दरवाज्यात आत यायला घाबरत, रडत उभी होती.

मिसेस डेव्हिडसन कठोरपणे म्हणाली, “काय हवे आहे?”

ती गुदमरलेल्या आवाजात बोलली, “मी मिस्टर डेव्हिडसनशी बोलू शकते का?”

मिशनरी उठून तिच्याकडे गेला.

तो मृदु आवाजात बोलला, “मिस थॉम्पसन, इकडे या. मी तुमच्यासाठी काय करू शकतो?”

ती खोलीत शिरली.

“मी तुम्हाला त्या दिवशी काय बोलले त्याबद्दल व इतर सर्व गोष्टींबद्दल माफी मागते. मला वाटते, मी थोडी उद्दीपित झाले होते. मला समजून घ्या”

“ओहो, त्यात काय एवढे? मला वाटते, थोडे कठीण शब्द झेलायला माझी पाठ चांगली रुंद आहे.”

ती भयानक पद्धतीने त्याच्यावर धाऊन आली. “तुम्ही मला पुरते मारलेत. मी पार खलास झाले. तुम्ही मला सॅनफ्रॅन्सिस्कोला परत पाठवू शकत नाही.”

त्याची आनंदी वृत्ती मावळली. अचानक त्याचा आवाज कठोर आणि कडक झाला.

“तुला तिकडे का जायचे नाही आहे?”

ती त्याच्यासमोर थरथरत शहारली. “मला वाटते, माझे लोक तिथे रहातात. त्यांनी मला असे पहावे, असे मला वाटत नाही. मी आणखी कुठेही जायला तयार आहे.”

पण तुला सॅनफ्रॅन्सिस्कोला का जायचे नाही?”

"मी तुम्हाला सांगितले.".

तो पुढे झुकून तिच्याकडे त्याच्या मोठ्या चमकत्या डोळ्यांनी टक लाऊन पाहू लागला. तो जणू तिच्या आत्म्यात शिरू पहात होता. अचानक त्याचा श्वास रोधला गेला.

"तुरुंग."

ती किंचाळली आणि त्याच्या पायाशी पडून तिने त्याचे पाय घट्ट धरले.

"मला परत तिकडे पाठवू नका. मी तुमच्यासमोर शपथ घेते, की मी यापुढे चांगली वागेन. मी पूर्वीचे सगळे काही सोडून देईन."

जणू कोंडलेली वाफ बाहेर पडावी, तशा अवस्थेत ती त्याची विनवणी करू लागली.

तिच्या रंगवलेल्या गालांवरून, अश्रू ओघळू लागले. तो तिच्यावर वाकला

आणि तिचा चेहरा उचलून, तिला त्याच्याकडे बघायला लावले.

"तो तुरुंग आहे का?"

ती धापा टाकत म्हणाली, "त्यांनी मला पकडण्यापूर्वी मी इथून निसटते. जर त्या लोकांनी मला पकडले, तर मी फक्त तीन वर्षे जगेन."

त्याने तिच्यावरील पकड ढिली केली. ती जोराने हुंदके देत जमिनीवर पडली. डॉ मॅकफेल उभा राहिला.

तो बोलला, "यामुळे सर्व काही बदलते आहे. तुला हे माहिती असतांना तू तिला तिथे पाठवू शकत नाहीस. तिला दुसरी संधी दे. तिला जीवनाचे नवीन पान सुरु करू दे."

"मी तिला कधी मिळाली नसेल, अशी सर्वात चांगली संधी देणार आहे. तिला पश्चात्ताप होत असेल, तर तिला शिक्षा भोगू दे."

तिने काही वेगळेच ऐकून वर पाहिले. तिच्या जड झालेल्या डोळ्यात आशा तरळली.

"तुम्ही मला जाऊ द्याल का?"

"नाही. तुला मंगळवारी सॅनफ्रॅन्सिस्कोच्या बोटीत बसावे लागेल."

तिने एक किंकाळी मारली. आणि मग खर्जात, हळू ओरडू लागली. ते पशूचे ओरडणे वाटत होते. ती तिचे डोके जमिनीवर जोरजोरात बडवून घेत होती. डॉ मॅकफेल धावत तिच्याजवळ गेला व तिला उचलले.

"चल, तुला ते केलेच पाहिजे. तू तुझ्या खोलीत जावेस, ते बरे. तिथे जाऊन पडून रहा. मी तुझ्यासाठी काहीतरी आणतो."

त्याने तिला उठवून उभे केले. आणि थोडे ओढत तिला खाली नेले. तो मिस्टर डेव्हिडसनवर व त्याच्या बायकोवर रागावला होता, कारण त्यांनी तिला मदत करायचा काही प्रयत्न केला नाही. मिश्र जातवाला जिन्यात उभा होता. त्याच्या मदतीने तो तिला तिच्या पलंगापर्यंत नेऊ शकला. ती रडत होती. शोक करत होती. ती जवळ जवळ काही न कळायच्या अवस्थेत होती. त्याने तिला एक इंजेक्शन दिले. तो वर गेला तेव्हा घामाने डबडबला होता व दमला होता.

"मी तिला झोपवून आलो."

तो तिथून निघाला, तेव्हा त्या दोन बायका व डेव्हिडसन जसे उभे वा बसलेले होते, तसेच ते अजूनही होते. ते जराही हलले किंवा बोलले नव्हते.

डेव्हिडसन विचित्र, लांबून आल्यासारख्या आवाजात बोलला, “मी तुझ्यासाठी थांबलो होतो. मला तुम्ही सगळयांनी आपल्या वाट चुकलेल्या बहिणीसाठी प्रार्थना करायला हवी आहे.”

त्याने मांडणीतून बायबल काढले आणि ते जेवले, त्या टेबलाशी बसला. ते अजून स्वच्छ केले गेले नव्हते. त्याने चहाचे भांडे बाजूला सारले. शक्तिमान पण खोल आवाजात त्याने येशू व लैंगिक अधःपतन झालेल्या बाईच्या भेटीचे वर्णन होते. तो मजकूर वाचला.

“आता माझ्याबरोबर गुडघे टेका आणि आपण आपल्या दुःखी थॉम्पसन बहिणीच्या आत्म्यासाठी प्रार्थना करू.”

त्यने भावनामयतेने मोठी प्रार्थना म्हटली. त्यात त्याने देवाला त्या पापी बाईवर दया दाखवण्याची विनंती केली. मिसेस मॅकफेल व मिसेस डेव्हिडसन डोळे मिटून गुडघ्यांवर बसल्या. डॉक्टरला नवल वाटून, तो भांबावला व बकरीसारखा वाकला. मिशनऱ्याच्या प्रार्थनेचा आवाज रानटी होता. ती म्हणतांना तो असामान्यपणे आतून हलला होता. त्याच्या गालावरून अश्रु ओघळत होते. बाहेर निर्दयपणे सतत पाऊस कोसळत होता. तो अमानवी, भयानक व वाढत असलेला होता.

शेवटी मिशनरी थांबला. क्षणभर थांबून, तो म्हणाला, “आता आपण देवाची प्रार्थना पुन्हा म्हणू.”

ते म्हणाले आणि त्याच्याबरोबर गुडघ्यांवरुन उठले. मिसेस डेव्हिडसनचा चेहरा फिकुटला होता आणि शांत झाला होता. ती समाधान पावली होती. पण मॅकफेल्सना अचानक लाजल्यासारखे होत होते. त्यांना कळत नव्हते, की काय करावे.

डॉ मॅकफेल म्हणाले, “मी खाली जाऊन आता ती कशी आहे ते बघतो.”

जेव्हा त्याने तिचे दार वाजवले, तेव्हा हॉर्नने ते उघडले. मिस थॉम्पसन फिरत्या खुर्चीत बसली होती व शांतपणे हुंदके देत होती.

तो बोलला, “तू काय करते आहेस? मी तुला पडून रहायला सांगितले होते.”

“मी झोपू शकत नाही. मला मिस्टर डेव्हिडसनना भेटायचे आहे.”

“माझ्या बाळा, त्याचा काय उपयोग आहे? तू त्याला बदलू शकणार नाहीस.”

तो म्हणाला होता, की मी बोलावले, तर तो येईल.”

मॅकफेल व्यापाऱ्याकडे वळला. “जा. त्याला बोलावून आण.”

तो शांतपणे तिच्याबरोबर थांबला व व्यापारी वरती गेला. डेव्हिडसन आला.

ती त्याच्याकडे गंभीरपणे बघत बोलली, “तुम्हाला इथे यायला सांगितल्याबद्दल माफ करा.”

“मला तशी अपेक्षा होती. मला माहिती होते, देव माझी प्रार्थना ऐकेल.”

ते जरा वेळ एकमेकांकडे बघत राहिले. मग तिने नजर वळवली. तिने बोलतांना तिचे डोळे बाजूला वळवून ठेवले होते. “मी वाईट बाई आहे. मला पश्चात्ताप करायचा आहे.”

"मी देवाचा आभारी आहे. त्याने आपली प्रार्थना ऐकली." तो त्या दोन माणसांकडे वळला. "मला तिच्याबरोबर एकटे सोडा. मिसेस डेव्हिडसनला सांगा, की आपल्या प्रार्थनेचा उपयोग झाला.

ते बाहेर पडले व त्यांच्यामागे त्यांनी दार लावले.

व्यापारी बोलला, "हे आश्चर्य आहे."

त्या रात्री डॉ मॅकफेलला खूप वेळ झोप आली नाही. जेव्हा त्याने मिशनऱ्याला वर आलेले ऐकले, तेव्हा घड्याळात पाहिले. दोन वाजले होते. पण तरीही तो लगेच झोपायला गेला नाही. कारण ज्या लाकडी तक्तपोशीने त्यांचा खोल्या अलग केल्या होत्या, त्यातून त्याला डेव्हिडसन मोठ्याने करत असलेल्या प्रार्थनेचा आवाज येत होता. तो त्याने दमेपर्यंत ऐकला व शेवटी झोपला.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने जेव्हा डेव्हिडसनकडे पाहिले, तेव्हा तो आश्चर्यचकित झाला. तो नेहमीपेक्षा अशक्त व दमलेला दिसत होता. पण त्याचे डोळे अमानवी तेजाने चमकत होते. त्याला अपरिमित आनंद झाल्यासारखे वाटत होते.

तो बोलला, "मला वाटते तू खाली जाऊन, मिस थॉम्पसनला बघून ये. तिचे शरीर ठीक असेल, असे मला वाटत नाही. पण तिचा आत्मा --- त्यात परिवर्तन झाले आहे."

डॉक्टरला अशक्त आणि उदास वाटत होते.

तो म्हणाला, "तू तिच्याबरोबर काल रात्री उशीरापर्यंत होतास."

"मी तिथून निघून जाणे, तिला सहन झाले नसते."

डॉक्टर चिडून म्हणाला, "तू तर खूप खूष झालेला दिसतो आहेस."

डेव्हिडसनचे डोळे खूप आनंदी असल्यासारखे दिसत होते.

“मी तिला खूप दया दाखवली. काल रात्री मी एक भटकणारा आत्मा येशूच्या प्रेमळ हातात आणला.”

मिस थॉम्पसन परत फिरत्या खुर्चीत बसली होती. अंथरूण तयार केलेले नव्हते. खोली पसरलेली होती. तिने चांगले कपडे घालायचे कष्ट घेतले नव्हते. तिने मळकट गाउन घातला होता. केसांची कशीतरी गाठ मारली होती. चेहरा ओल्या टॉवेलने पुसला होता. पण तो सुजला होता आणि रडून, त्यावर सुरकुत्या पडल्या होत्या. ती फिकट व उदास दिसत होती.

डॉक्टर आले, तेव्हा तिने नजर वर केली. ती मोडून गेली होती. तिने विचारले, “मिस्टर डेव्हिडसन कुठे आहेत?”

मॅकफेल कटूपणे बोलला, “जर तुला हवे असेल, तर ते आता येतील. तू कशी आहेस, हे बघायला मी आलो.”

“ओहो, मला वाटते, मी बरी आहे. तुम्ही काळजी करायचे काही कारण नाही.”

“तू काही खाल्लेस का?”

“हॉर्नने माझ्यासाठी कॉफी आणली.”

तिने काळजीने दाराकडे पाहिले.

“तुम्हाला वाटते का, की ते आता खाली येतील? मला वाटते, ते माझ्याबरोबर असतांना फारसे भयंकर नव्हते.”

“अजूनही तू मंगळवारी जाणार आहेस का?”

“हो, ते म्हणतात, मला जावेच लागेल. त्याना खाली यायला सांगाल का? तुम्ही माझे काही चांगले करू शकणार नाही. मला आता फक्त तेच मदत करू शकतात.”

डॉ मॅकफेल म्हणाला, “ठीक आहे.”

पुढील तीन दिवसात, मिशनऱ्याने त्याचा बहुतेक सगळा वेळ तिच्याबरोबर घालवला. तो इतरांना फक्त जेवणापुरता भेटत असे. डॉ मॅकफेलच्या लक्षात आले, की तो जवळजवळ जेवतच नसे.”

मिसेस डेव्हिडसन दयनीयतेने म्हणाली, “तो वाळत चालला आहे. त्याने काळजी घेतली नाही, तर तो मोडून पडेल. पण तो काही लक्ष देत नाही आहे.”

ती स्वतःदेखील अशक्त होऊन, पांढरी पडली होती. ती मिसेस मॅकफेलला म्हणाली की तिला झोप येत नाही. जेव्हा मिस थॉम्पसनकडून मिशनरी वर येत असे, तेव्हा तो दमेपर्यंत प्रार्थना करत बसे. पण तरी किती वेळ झोपत नसे. झोपला तरी एकदोन तासात उठून कपडे करून, खाडीवर फिरायला जात असे. त्याला विचित्र स्वप्ने पडत.

मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “आज सकाळी तो मला बोलला, की त्याला नेब्रास्काच्या डोंगरांचे स्वप्न पडले.”

डॉ मॅकफेल म्हणाला, “हे विचित्र आहे.”

जेव्हा त्याने अमेरिका ओलांडली, तेव्हा गाडीच्या खिडकीतून ते पाहिल्याचे त्याला आठवले. ते घुशीने माती उकरून केलेले गोल, मऊसर प्रचंड डोंगर होते. ते सपाट जमिनीवर अचानक उगवत. डॉ मॅकफेलला

आठवले, की ते बाईच्या स्तनांसारखे असल्याचे वाटल्याने त्याला कसा धक्का बसला होता.

डेव्हिडसनचा अस्वस्थपणा त्याला स्वतःलाही असह्य होत होता. पण तो नवलपूर्ण आनंदाच्या भावनेने भारून जणू तरंगत होता. तो त्या गरीब बिचाऱ्या बाईच्या हृदयातील कोपऱ्यांमध्ये लपून बसलेल्या पापांच्या मुळांचा मागमूसही तोडून टाकत होता. ती त्याच्याबरोबर बायबल वाचे आणि प्रार्थना करे.

रात्रीच्या जेवणाच्या वेळी तो एकदा त्यांना म्हणाला, “हा पुनर्जन्म असून नवलपूर्ण आहे. रात्रीसारखा काळाकुट्ट असणारा तिचा आत्मा आता नव्याने पडलेल्या बर्फासारखा शुद्ध झाला आहे. मी नम्र आहे व घाबरलेला आहे. पापामुळे तिला खोलवर जाणवणारी खंत आणि पश्चात्ताप सुंदर आहे. मी तिच्या वस्त्राच्या टोकाला स्पर्श करण्याच्या लायकीचाही नाही.”

डॉक्टर म्हणाला, “तू तिला सॅनफ्रॅन्सिस्कोला परत पाठवू शकशील? तीन वर्षे अमेरिकन तुरुंगात. मला वाटले, तू तिला कदाचित त्यापासून वाचवले असशील.”

“ओहो, तुला दिसत नाही का? ते गरजेचे आहे. तुला असे वाटते का, की माझे हृदय तिच्यासाठी झुरत नाही? मी माझ्या बायकोबहिणीसारखे तिच्यावर प्रेम करतो. ती जो सर्व वेळ तुरुंगात असेल, तेव्हा मी तिच्या सर्व वेदनांचा अनुभव करेन.”

डॉक्टर अधीरपणे ओरडला, “काहीही बोलू नकोस.”

“तुला समजत नाही, कारण तू आंधळा झाला आहेस. तिने पाप केले आहे आणि तिने त्रास भोगला पाहिजे. मला माहिती आहे, ती काय सहन

करू शकेल. तिचा छळ होईल, तिला उपाशी ठेवले जाईल आणि तिला लज्जित केले जाईल. माणसाने देवाला बळीचा नैवेद्य दाखवावा, तशी ती शिक्षा तिने आनंदाने सहन करावी, असे मला वाटते. आपल्यापैकी अनेकांना क्वचित मिळणारी ही संधी आहे. देव दयाळु आणि चांगला आहे.”

डेव्हिडसनचा आवाज उद्दीपित होऊन थरथरू लागला. त्याच्या ओठांमधून अती भावनामयतेने शब्द बाहेर पडत होते.

दिवसभर मी तिच्याबरोबर प्रार्थना करतो. मी तिच्यापासून लांब जातो. आणि परत प्रार्थना करतो. मी तिच्यासाठी पूर्ण शक्तीनिशी प्रार्थना करतो, जेणेकरून येशूने तिच्यावर मोठी दया दाखवावी. मला तिचे हृदय शिक्षा मिळण्याच्या अशा भावनेने भारून टाकायचे आहे, की शेवटी मी तिला त्यापासून परावृत्त करू बघितले, तरी ती त्याला नकार देईल. मला तिला असे जाणवून द्यायचे आहे, की तुरुंगवासाची कटू शिक्षा हे तिने देवाच्या चरणांशी रुजू केलेले आभार आहेत. देव तिला आयुष्य अर्पण करेल.”

दिवस सावकाश चालले होते. सर्व घराचे लक्ष त्या खाली रहाणाऱ्या, छळ होणाऱ्या, एक प्रकारच्या अनैसर्गिक अशा उन्मनी अवस्थेत असणाऱ्या, दुःखी बाईकडे लागले होते. ती एखाद्या बळीसारखी होती. रक्ताळलेल्या आदर्शवाद्यांने रानटीपणे तिला बळी देण्यासाठी तयार केले होते. तिच्या भीतीने तिला मूक बनवले होते. ती डेव्हिडसनला नजरेसमोरून हलून देत नव्हती. तो बरोबर असल्यावरच फक्त तिला धीर येई. ती त्याच्यावर एखाद्या गुलामासारखी अवलंबून होती. ती खूप रडत असे. ती बायबल वाचे. प्रार्थना करे. कधीकधी ती दमून जाई. तिला काही

उत्साह उरत नसे. मग ती तिच्या निष्क्रीयतेकडे बघे. त्यामुळे तिला ती सहन करत असलेल्या रागापासून दूर नेणारी भक्कम पळवाट सापडे. तिला फुकटची भीती सहन होत नसे. तिच्या पापांबरोबर तिने तिचा व्यक्तिगत अहंकारही बाजूला ठेवला होता. गबाळया अवतारानिशी, भपकेबाज पण सवंग गाउनमध्ये ती तिच्या खोलीत फिरत होती. तिने चार दिवसात तिचे रात्रीचे कपडे बदलले नव्हते. मोजे घातले नव्हते. तिची खोली अस्वच्छ व पसरलेली होती. मध्यंतरीच्या काळात धुवाधार पाऊस सतत पडत होता. तुम्हाला वाटू लागते, आता आभाळ रिकामे झाले असेल. पण तरी सरळ व जोरात पडणारा पाऊस चालूच रहातो. वेड लागेल, असे सातत्य दाखवत, लोखंडी छतावर पडत रहातो. प्रत्येक गोष्ट दमट होऊन, हाताला बुळबुळीत लागते. भिंतीवर व जमिनीवरील बुटांवर पांढरा बुरशीसारखा थर जमा होतो. झोपेविनाच्या रात्रीमधून डास रागावून, चावत फिरत रहातात.

डॉ मॅकफेल म्हणाला, “निदान एक दिवस जरी पाऊस थांबला, तरी फार बरे वाटेल.”

ते सगळे मंगळवारची, सिडनीहून सॅनफ्रॅन्सिस्कोला जाणाऱ्या बोटीची, वाट बघत होते. तो ताण आता असह्य झाला होता. डॉ मॅकफेलची दया आणि पश्चात्ताप दुर्दैवी बाईच्या विचारातून सुटका करून घेण्याच्या विचाराने, मुक्त होऊन गेली होती. जे अटळ आहे, ते मान्य केलेच पाहिजे. जेव्हा जहाज निघून जाईल, तेव्हाच तो जास्त मोकळेपणे श्वास घेऊ शकेल, असे त्याला वाटले. व्यवस्थापकाच्या कार्यालयातील एक माणूस मिस थॉम्पसनला बोटीवर नेणार होता. या माणसाला सोमवारी रात्री बोलावण्यात आले होते. आणि मिस थॉम्पसनला सकाळी अकरा वाजता तयार रहायला

सांगितले होते. तिच्याबरोबर डेव्हिडसन होता. तो म्हणाला, “मी अकराला सगळे काही तयार असेल, असे बघतो आणि बोटीवर तिच्याबरोबर येतो.”

मिस थॉम्पसन काही बोलली नाही.

जेव्हा डॉ मॅकफेलने त्याची मेणबत्ती विझवली, आणि काळजीपूर्वक रांगत त्याच्या मच्छरदाणीत शिरला, तेव्हा त्याने सुटकेचा सुस्कारा सोडला.

“देवाचे आभार, की हे प्रकरण आता संपेल. उद्या यावेळेला ती गेलेली असेल.”

“मिसेस डेव्हिडसनलासुद्धा आनंद होईल. ती म्हणते, त्याला फार काम पडते आहे.”

“ती वेगळ्या प्रकारची स्त्री आहे.”

“कोण?”

“मिस थॉम्पसन. मला वाटले नव्हते, की हे कधी शक्य होईल. यामुळे मी नम्र बनलो आहे.”

डॉ मॅकफेलने उत्तर दिले नाही. तो झोपला. तो दमला होता. तो नेहमीपेक्षा गाढ झोपला.

त्याच्या दंडावर ठेवलेल्या हाताने तो सकाळी जागा झाला. उठून पाहिले, तेव्हा त्याला हॉर्न त्याच्या अंथरुणाशेजारी उभा असलेला दिसला. त्याने काही उद्गार काढू नयेत म्हणून त्या व्यापाऱ्याने ओठांवर बोट ठेवले. आणि त्याला येण्यासाठी खूण केली. नियम असल्याप्रमाणे त्याने गबाळे कपडे घातले होते. आता त्याच्या पायात बूट नव्हते. देशी लोकांप्रमाणे त्याने फक्त लावा-लावा घातले होते. अचानक तो रानटी दिसू लागला. डॉ

मॅकफेलनी अंथरुणाबाहेर पडतांना पाहिले, त्याने अंगभर टॅटू काढले होते. हॉर्नने त्याला गॅलरीत यायची खूण केली. त्याप्रमाणे तो गेला.

हॉर्न कुजबुजला, "आवाज करू नका. तुम्ही हवे आहात. कोट आणि बूट घालून झटपट चला.

डॉ मॅकफेलला पहिल्यांदा वाटले, की मिस थॉम्पसनला काही झाले आहे.

"काय झाले आहे? मी माझी बॅग आणू का?"

"घाई करा. कृपया घाई करा."

डॉ मॅकफेल पुन्हा झोपायच्या खोलीत गेला. पायजम्यावर रेनकोट घातला. रबरी बूट घातले. व्यापाऱ्याजवळ आला. ते दोघे पाय न वाजवता जिना उतरले. रस्त्यावर उघडणारे दार उघडे होते. आणि तिथे पाच सहा देशी लोक उभे होते.

डॉक्टरने परत विचारले, "काय झाले आहे?"

हॉर्न म्हणाला, "माझ्याबरोबर या."

तो बाहेर पडला आणि डॉक्टर त्याच्या मागोमाग गेला. त्यांच्या मागे ते लोक आले. त्यांनी रस्ता ओलांडला. ते समुद्रकिनारी आले. डॉक्टरने देशी लोकांचा एक गट पाण्याच्या कडेला काही वस्तूभोवती उभा असलेला पाहिला. त्यांनी घाई केली. कदाचित काही यार्ड अंतरावर, आल्यावर त्या लोकांनी बाजूला होऊन, डॉक्टरसाठी वाट केली. मग त्याने बघितले, अर्धवट पाण्यात व अर्धवट बाहेर, एक भयंकर गोष्ट, म्हणजे डेव्हिडसनचे प्रेत पडले होते. डॉ मॅकफेल त्यावर वाकला --- कठीण काळात डोके चालणार नाही, असा मनुष्य तो नव्हता --- त्याने प्रेत वळवले. या

कानापासून त्या कानापर्यंत गळा चिरला होता. आणि उजव्या हातात अजूनही ज्याने हे कृत्य केले गेले, ते रेझरचे पाते होते.

डॉक्टर म्हणाला, "हा थंड पडला आहे. तो काही वेळापूर्वी मेला असला पाहिजे."

"एका मुलाने कामाला जाताना त्याना आता इथे पडलेले पाहिले आणि येऊन मला सांगितले. तुम्हाला काय वाटते, त्याने स्वतः ते केले असेल?"

"कोणीतरी पोलिसांना बोलवायला पाहिजे."

हॉर्न गावठी भाषेत काहीतरी बोलला. दोन तरुण पळत गेले.

डॉक्टर म्हणाला, "पोलीस येईपर्यंत, आपण इथून जायला नको."

"त्याला माझ्या घरात न्यायला नको. मला तो तिथे नको आहे."

डॉक्टर कडकपणे म्हणाला, "अधिकारी काय सांगतील, तसे करावे लागेल. अशा परिस्थितीत मला वाटते, ते त्याला प्रेतागारात नेतील."

ते सगळे होते तिथेच थांबून राहिले. व्यापाऱ्याने त्याच्या लावा-लावाच्या निरीतून सिगरेट बाहेर काढली व एक डॉ मॅकफेलला दिली. प्रेताकडे बघत ते सिगरेट ओढू लागले. डॉ मॅकफेलला काही कळेना.

हॉर्नने विचारले, "तुम्हाला काय वाटते, त्याने हे का केले?

डॉक्टरने त्याचे खांदे शहारवले. थोड्याच वेळात स्थानिक पोलीस आले. नाविक दलातील त्यांचा मुख्य स्ट्रेचर घेऊन आला. लगेच पाठोपाठ काही नाविक ऑफिसर आले. आणि नाविक डॉक्टरही आला. त्यांनी व्यावसायिकपणे सर्व व्यवस्था पाहिली.

एक ऑफिसर म्हणाला, “बायकोचे काय?”

आता तुम्ही आला आहात, तर मी घरी जाऊन काही वस्तू आणतो. तिला ही हकीगत सांगतो. त्याचे प्रेत जरा ठीकठाक करेपर्यंत, तिने आता त्याला न बघितलेले बरे.”

नाविक डॉक्टर म्हणाला, “मला वाटते, ते बरोबर आहे.”

जेव्हा डॉ मॅकफेल परत गेला तेव्हा त्याला त्याची बायको कपडे करून तयार झालेली दिसली.

तो आल्याबरोबर ती त्याला म्हणाली, “मिसेस डेव्हिडसन तिच्या नवऱ्याबद्दल भयंकर काळजी करते आहे. रात्रभर तो अंथरुणात नाही. तिने दोन वाजता त्याला मिस थॉम्पसनच्या खोलीबाहेर पडतांना पाहिले. पण तो बाहेर गेला. जर तेव्हापासून तो फिरत असेल, तर नक्कीच तो मेला असेल.”

डॉ मॅकफेलने काय झाले ते तिला सांगितले आणि मिसेस डेव्हिडसनला ती बातमी सांगायला सांगितले.

तिने धक्का बसून विचारले, “पण त्याने असे का केले?”

“मला माहिती नाही.”

“पण मला हे तिला सांगणे शक्य नाही. मला शक्य नाही.”

“तुला ते तसे करावेच लागेल.”

तिने त्याच्याकडे घाबरून पाहिले आणि ती बाहेर गेली. त्याने तिला मिसेस डेव्हिडसनच्या खोलीत गेलेले पाहिले. एक मिनिटाने तो भानावर आला मग तो दाढी व अंघोळ करू लागला. तो कपडे करून अंथरुणावर बसला व बायकोची वाट बघू लागला. शेवटी ती आली.

ती म्हणाली, “तिला त्याला बघायचे आहे. “

“त्यानी प्रेत प्रेतागारात हलवले असेल. आपण तिच्याबरोबर गेलेले बरे. तिने ती बातमी कशी घेतली?”

“मला वाटते, ती अवाक झाली. पण ती रडली नाही. ती एखाद्या पानासारखी थरथरत होती.”

“आपण लवकर जाऊ.”

जेव्हा त्यांनी तिच्या दारावर टकटक केले, तेव्हा मिसेस डेव्हिडसन बाहेर आली. ती अशक्त दिसत होती. पण तिचे डोळे कोरडे होते. डॉक्टरला ती अनैसर्गिकपणे शांत वाटली. काही बोलणे झाले नाही. ते शांतपणे रस्त्याला लागले. जेव्हा ते प्रेतागाराशी आले, तेव्हा मिसेस डेव्हिडसन म्हणाली, “मला एकटीला आत जाऊन, त्याला बघू दे.”

ते बाजूला उभे राहिले. एका देशी माणसाने दार उघडले आणि तिच्यामागे बंद केले. ते वाट बघत बसून राहिले. एक दोन गोरी माणसे आली व त्याच्याबद्दल कुजबुजत बोलली. डॉ मॅकफेलने त्याना या दुःखद घटनेबद्दल त्याला काय माहिती आहे, ते सांगितले. शेवटी शांतपणे दार उघडले गेले आणि मिसेस डेव्हिडसन बाहेर आली. सर्वत्र शांतता भरून राहिली होती.

ती म्हणाली, “मी आता परत जायला तयार आहे.”

तिचा आवाज कठीण पण ठाम होता. डॉ मॅकफेलला तिच्या डोळ्यातील भावना समजेनात. तिचा फिकट चेहरा कठोर होता. ते एकही शब्द न बोलता, परत आले. शेवटी ते सावकाश चालत, त्यांच्या घराच्या वळणाशी आले. मिसेस डेव्हिडसनने श्वास रोधून धरला. क्षणभर ते स्तब्ध

उभे राहिले. त्यांच्या कानावर एक विश्वास बसणार नाही असा आवाज पडला. इतका वेळ शांत असलेला ग्रामोफोनवर काळ्या अमेरिकनांचे संगीत कर्णकर्कशपणे वाजत होते.

मिसेस मॅकफेल भीतीने ओरडली, "हे काय आहे?" मिसेस डेव्हिडसन म्हणाली, "आपण जाऊ या."

ते जिना चढू लागले. त्यांच्या घरात शिरले. मिस थॉम्पसन खलाशाशी बोलत, दारात उभी होती. तिच्यात अचानक बदल झाला. गेल्या काही दिवसात ती जशी घाबरलेली व दमलेली दिसत असे, तशी दिसत नव्हती. तिने छान पांढरा ड्रेस घातला होता. उंच टाचांचे चमकणारे बूट घातले होते. तिच्या जाड फुगलेल्या पोटऱ्यांवर तिने सुती मोजे घातलेले दिसत होते. केस मस्तपैकी आवरलेले होते आणि डोक्यावर मोठी टोपी होती. ओठांना शेंदरी लिपस्टिक लावली होती. ती ताठ उभी होती. त्यांना पहिल्यांदा ती माहिती होती, तशी ती असूया निर्माण करणारी राणी होती. ते आल्यावर, ती मोठ्याने, गर्विष्ठपणे हसू लागली. जेव्हा मिसेस डेव्हिडसन आपोआप थांबली, तेव्हा तिने तिच्या तोंडातील थुकी जमा केली व ती मिसेस डेव्हिडसनवर थुकली. मिसेस डेव्हिडसन मागे झाली. अचानक तिच्या गालांवर दोन लाल ठिपके उमटले. मग तिचा चेहरा हातांने झाकून, ती रडू लागली व जिन्यावर धावली. डॉ मॅकफेल संतापला. त्याने त्या बाईला तिच्या खोलीत ढकलले.

तो ओरडला, "कैदाशिणे, तू काय करत आहेस? ते ग्रामोफोनचे तुणतुणे थांबव."

तो तिकडे गेला आणि रेकॉर्ड काढून भिरकावली.

ती त्याच्याकडे वळली. “डॉक, तुम्ही माझ्याशी असे वागू शकत नाही. तुम्ही माझ्या खोलीत हे काय करत आहात?”


तो ओरडला, “तुला काय करायचे आहे? काय ते भिकार मशीन थांबव.”

तिने धीर गोळा केला. तिच्या हावभावातील अवर्णनीय रागाने व द्वेषाने तिचा चेहरा पेटून उठला. “तुम्ही ढोंगी पुरुष! घाणेरडी डुकरे! तुम्ही सगळे सारखेच असता. सगळी डुकरे! डुकरे!

डॉ मॅकफेलने श्वास रोधून धरला. त्याला समजले. मिशनरी डेव्हिडसनने तिच्याबरोबर काय केले, हे तिने सांगायची गरज नव्हती. आणि त्यामुळे भयंकर लज्जित होऊन, त्याने स्वतःला मारून घेतल्याचेही त्याला न सांगता कळले.

# THE FALL OF EDWARD BARNARD

# एडवर्ड बर्नार्डचे पतन



बॅटमन हंटर खूप झोपला. त्याला बोटीने पंधरा दिवसात टाहितीपासून सॅनफ्रॅन्सिस्कोला आणले होते. त्याला सांगायच्या गोष्टीचा तो विचार करत होता. तीन दिवस रेल्वे गाडीमध्ये, तो त्या शब्दांची उजळणी करत होता. पण आता काही तासांनी तो शिकॅगोला असणार होता. संशय त्याच्यावर हल्ला करून आला. त्याची सद्सदविवेकबुद्धी सतत जागरुक असे. पण तिची चलबिचल होत होती. शक्य ते सगळे त्याने केले का, याबद्दल त्याची खात्री नव्हती. शक्य आहे, त्यापेक्षा जास्त करण्यात त्याचा मान दडलेला होता. आणि त्याला रुची असलेल्या गोष्टींमधील विचार सत्यापेक्षा अद्भुतरम्यतेवर जास्त भर देत होता. हा विचार त्याला अस्वस्थ करत होता. त्याच्या कल्पनेत स्वतःला मारून देवाला अर्पण करण्याच्या भावनेने इतका जोर धरला, की तसे करणे शक्य नसल्याने तो नाराज झाला. तो दानशूर होता आणि गोरगरीबांसाठी निःस्वार्थी हेतूने त्याने आदर्श घरे उभारली होती. त्याला वाटत होते, की त्याने खूप फायदेशीर गुंतवणूक केली आहे. त्याचे समाधान तो रोकू शकत नव्हता.

पण त्याला लाजलावणी भावना असे, की त्याच्या गुणांपासून त्याला वाईट रीतीने, ती छोट्या चुका करायला लावे. बॅटमन हंटरला माहिती होते, की तो मनाने शुद्ध होता. पण त्याची खात्री नव्हती, की तो जेव्हा तिला त्याची गोष्ट सांगेल, तेव्हा तो इसाबेल लॉन्गस्टफेच्या करड्या, थंड डोळयांची परीक्षा किती ठामपणे सहन करू शकेल. ते डोळे शहाणे व दूरदृष्टी असलेले होते. स्वतःच्या खूप बारकाईने लक्ष देण्याच्या पद्धतीने ती दुसऱ्यांना जोखत असे. तिला समाधानकारक न वाटणाऱ्या दुसऱ्यांच्या वागणुकीबद्दल थंडपणे गप्प बसून नाराजी दाखवत असे. यापेक्षा जास्त स्पष्टतेने तिचे बोलणे नसे. तिच्या मतावर कुणी काही बोलत नसे. एकदा

तिने ठरवले, की ते कधीच बदलत नसे. पण बॅटमनलादेखील ती त्याहून वेगळी वाटत नव्हतीच. तो तिच्या बारीक आणि ताठ शरीराच्या सुंदरतेवर, ताठ, अभिमानी मानेवरच नव्हे, तर तिच्या आत्म्याच्या सौदर्यावरही प्रेम करे. तिचा सच्चेपणा, मान देण्याची ठाम भावना, निर्भय दृष्टीकोन, या सर्वांमुळे त्याला त्याच्या देशातील लोकांमध्ये जे वाखाणण्याजोगे आहे, ते सर्व काही तिच्यात असल्यासारखे वाटे. सर्वगुणसंपन्न अमेरिकन मुलीपेक्षा जास्त काही त्याला तिच्यात दिसे. त्याला वाटे, की तेथील वातावरण बघता, तिचे सौदर्य व नाजूकता विशेष प्रकारची होती. त्याची खात्री होती, की शिकॅगो सोडून जगातील इतर कुठलेही शहर तिला जन्म देऊ शकले नसते. टोकेरी दुःखाची भावना त्याच्यात अचानक उगवली जेव्हा त्याला आठवले, की जेव्हा त्याने एडवर्ड बर्नार्डचा विचार केला होता, तेव्हा त्याच्या मनातील राग असा काही उफाळून आला होता, की त्याने त्याच्या अभिमानाला आणि रागाला भलताच कटू ठोसा हाणला होता.

पण शेवटी गाडी शिकॅगोला पोचली आणि जेव्हा त्याने करड्या घरांचा लांब रस्ता पाहिला, तेव्हा विजयाने त्याची मान उंचावली. राज्यातील वॅबाश नदी, त्यांची गर्दीची घरे, गजबजती सुसाट वाहने आणि त्यांचा मोठा आवाज यांच्या विचाराने तो फारच अधीर झाला. तो घरी पोचला. तो अमेरिकेतील सर्वात महत्वाच्या शहरात जन्माला आल्याचा त्याला आनंद झाला. सॅनफ्रॅन्सिस्को त्यामानाने राजधानीबाहेरचे लहानसे शहर होते. न्यूयॉर्क जास्त गर्दीचे प्रदूषणयुक्त शहर होते. त्याच्या आर्थिक प्रगतीवर अमेरिकेचे भवितव्य अवलंबून होते. आणि त्याच्या स्थानामुळे आणि तेथील रहिवाश्यांच्या उत्साहामुळे, शिकॅगो देशाची खरी राजधानी होण्याच्या योग्यतेचे दिसत होते.

फलाटावर उतरतांना, बॅटमन स्वतःशीच बोलला, “मला वाटते, मी इतका जास्त जगेन, की शिकॅगो जगातील एक मोठे शहर झाल्याचे मी बघेन.”

त्याचे वडील त्याला भेटायला आले होते. जोराने हातमिळवणी केल्यावर, त्यांची उंच, बारीक, पातळ ओठांची, सुदृढ व स्वयंशिस्तप्रिय प्रभावाची जोडी स्टेशनबाहेर पडली. मिस्टर हंटरची मोटार त्यांच्यासाठी थांबलेली होती. ते त्यात बसले. रस्त्यात मिस्टर हंटरने त्याच्या मुलाच्या अभिमानी व आनंदी नजरेला नजर मिळवली.

त्याने विचारले, “मुला, तुला परत आल्यामुळे आनंद झाला का?”

बॅटमन म्हणाला, “हो. मी आनंदी झालो, असाच विचार मी आता करत होतो.”

त्याचे डोळे अधाशीपणे अस्वस्थ दृष्ये बघत होते.

मिस्टर हंटर हसत बोलले, “मला वाटते, तुझ्या दक्षिणेकडील

समुद्रातील बेटापेक्षा इथे थोडी वाहनांची गर्दी जास्त आहे. तुला तिथे आवडायचे का?”

बॅटमन उत्तरला, “बाबा, मला शिकॅगो बघू द्या.”

“तू तुझ्याबरोबर एडवर्ड बर्नार्डला आणले नाहीस?”

“नाही.”

“तो कसा होता?”

बॅटमन क्षणभर गप्प राहिला. त्याचा देखणा, भावदर्शी चेहरा काळवंडला.

शेवटी तो म्हणाला, "बाबा, मी लवकरच त्याच्याबद्दल बोलतो."

"मुला, ते ठीक आहे. मला वाटते, आज तुझ्या आईला आनंद होईल."

ते गर्दीच्या विळख्यातून बाहेर पडले. मिस्टर हंटर यांनी काही वर्षांपूर्वी लोरी नदीवरील फ्रेंच पद्धतीने बांधलेल्या घरासारख्या झकपक घराच्या दिशेने त्यांनी गावातील तळ्याकडे गाडी नेली. बॅटमन त्याच्या खोलीत शिरल्यावर त्याने फोन करून एक नंबर विचारला. त्याला उत्तर देणारा आवाज ऐकल्यावर त्याचे हृदय उसळी घेऊ लागले.

तो आनंदाने म्हणाला, "इसाबेल, शुभ सकाळ."

"बॅटमन, शुभ सकाळ."

"तू माझा आवाज कसा ओळखलास?"

"मी तो ऐकून फार दिवस झाले नाहीत. शिवाय मी तू इथे येण्याची अपेक्षा करत होते."

"मी तुला कधी भेटू?"

"तुला याहून जास्त चांगले काही करायचे नसेल, तर आज रात्री तू माझ्याबरोबर जेव."

"तुला चांगले माहिती आहे, की याहून जास्त चांगले असे करायला माझ्याकडे काही नाही आहे."

"मला वाटते, तुझ्याकडे सांगण्यासारखे खूप काही असेल, नाही का?"

त्याला तिच्या आवाजात काळजी किंवा भीतीचा सूर जाणवला."

तो उत्तरला, “हो.”

“मग आज रात्री तू मला ते नक्की सांग. अच्छा.”

तिने फोन ठेवला. ही तिची सवय होती की तिला अगदी

महत्वाच्या वाटणाऱ्या गोष्टींसाठी देखील गरज नसलेले अनेक तास थांबायची तिची तयारी असायची. बॅटमनला तिच्यात तिच्या भावना तिच्या कह्यात ठेवायची धमक दिसायची.

जेवताना तो इसाबेल व तिचे आईवडील सोडून कुणीही हजर नव्हते. त्याने तिला शहरी छोट्या किश्यांचे संभाषण करण्यात मार्गदर्शन करतांना पाहिले. आणि त्याला असे वाटले की गिलोटीनच्या छायेखाली असणाऱ्या व उद्याचा दिवस दिसेल, की नाही अशा दडपणाखाली असणाऱी मार्क्विस [उच्च सामाजिक दर्जा असलेल्या उमरावाची बायको] दिवसातील गोष्टींशी जसे खेळ करेल, तसे तिचे चालले होते. तिचे नाजूक अवयव, उमरावी पद्धतीचा वरचा लहानसा ओठ आणि केसांचे छान सौदर्य पुन्हा मार्क्विसला सुचवत होते. आणि हे सहजपणे शक्य होते, की जरी तिच्या धमन्यांमधून वाहणारे रक्त शिकॅगोचे असले तरी, वाईट म्हणून प्रसिद्ध नव्हते. जेवायची खोली तिच्या नाजूक सुंदरतेला साजेशी होती. कारण इसाबेलने व्हेनिसच्या मोठ्या कालव्यावरील शानदार राजवाड्याच्या प्रतिकृतीसारखी ती बनवली होती. पंधराव्या लुईच्या शैलीत, इंग्लिश निष्णात माणसाने त्यातील देखणे फर्निचर बनवले होते. आणि डौलदार सजावट त्या एकाधिकारशाहीच्या आकर्षणासारखी सुंदर प्रतीत होत होती. त्याच वेळी त्यातून जास्त दिलखेचकपणा दृगोचर होत होता. कारण इसाबेलचे मन उच्च विचारांनी युक्त होते आणि तिचे संभाषण हलकेसे असले, तरी गंभीर नव्हते. ती आणि

तिच्या आईने दुपारी पाहिलेल्या संगीतिकेबद्दल, ती बोलत होती. नाट्यगृहात एका इंग्लिश कवीने दिलेल्या भाषणाबद्दल बोलत होती. राजकीय परिस्थिती आणि तिच्या वडिलांनी नुकतेच पन्नास हजार डॉलरला न्यूयॉर्कमधून घेतलेल्या प्रसिद्ध कंपनीच्या ग्रामोफोनबद्दल बोलत होती. तिचे बोलणे ऐकून, त्याला समाधान वाटले. त्याला वाटले, की तो परत एकदा सुसंस्कृत जगात आणि दुसऱ्यांपासून स्वतःला उच्च समजणाऱ्या लोकांमध्ये व त्याला त्रासदायक असणाऱ्या, पण तरीही त्याच्या इच्छेविरुद्ध मोठ्याने आरडाओरडा करणाऱ्या काही आवाजांमध्ये आला आहे. पण तरीही त्याचे मन शांत झाले

तो बोलला, “ओहो, मी परत शिकॅगोला आलो, म्हणून बरे झाले.”

शेवटी जेवण संपले. ते सगळे जेवायच्या खोलीबाहेर पडले. इसाबेल तिच्या आईला म्हणाली, “मी “बॅटमनला माझ्या गुहेत घेऊन जाते. आम्हाला खूप काही बोलायचे आहे.”

मिसेस लॉन्गस्टफ म्हणाली, “माझ्या प्रिय मुली, ठीक आहे. तुझे होईल, तेव्हा मी व तुझे वडील दोघे बरी बाईसाहेबांच्या खोलीत असू.

इसाबेल त्या तरुण माणसाला घेऊन वरती तिच्या खोलीत गेली. त्याच्याकडे त्या खोलीच्या खूप सुंदर आठवणी होत्या. परंतु तरीही त्याच्याकडून नेहमी उस्फूर्तपणे निघणारे उद्गार, तो दाबू शकला नाही. तिने हसून त्याच्याकडे पाहिले.

ती म्हणाली, “मला वाटते, हे यश आहे. मुख्य गोष्ट म्हणजे, ते व्हेनिसच्या राजवाड्याच्या प्रतिकृतीसारखे आहे. त्यातील ॲश ट्रे सुद्धा त्या काळातल्यासारखाच आहे.”

मला वाटते, त्यामुळेच हे इतके नवलपूर्ण झाले आहे. तू करतेस, त्या सगळ्या गोष्टींप्रमाणे, ते उच्च प्रकारे योग्य आहे.”

ते मोठ्या शेकोटीसमोर बसले. इसाबेलने त्याच्याकडे थंड, शांत अशा डोळ्यांनी पाहिले.

“आता तुला मला काय सांगायचे आहे?”

“कसे बोलावे, ते मला समजत नाही.”

“एडवर्ड बर्नार्ड परत येतो आहे का?”

“नाही. ”

पुन्हा बॅटमनने बोलायला सुरवात करण्यापूर्वी, खूप वेळ शांतता पसरली. प्रत्येकाच्या मनात भावनांचा कल्लोळ उठला होता. त्याला सांगायची गोष्ट अवघड होती. कारण त्यात अशा बाबी होत्या, ज्या तिच्या भावनाशील कानांसाठी पश्चात्तापयुक्त दुःखाच्या ठरल्या असत्या. तरीही तिला न्याय देण्यासाठी व त्यापेक्षा जास्त त्याला न्याय देण्यासाठी, त्याने तिला पूर्ण सत्य सांगणे क्रमप्राप्त होते.

हे खूप पूर्वी सुरु झाले, जेव्हा तो आणि एडवर्ड बर्नार्ड कॉलेजमध्ये होते. कॉलेजमध्ये असतानाच तिची समाजाशी ओळख करून देण्यासाठी दिलेल्या एका चहा पार्टीत त्यांना इसाबेल लॉन्गास्टफ भेटली. ते तिला ती लहान असल्यापासून ओळखत होते. आणि ते खोटारडे होते. तिचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी दोन वर्षे ती युरोपमध्ये होती. आणि ती परत आल्यावर त्यांनी त्या सुंदर मुलीशी त्यांची ओळख वाढवली. दोघेही पूर्णपणे तिच्या प्रेमात पडले. पण बॅटमनने झटपट पाहिले, की तिला फक्त एडवर्ड आवडतो आहे, आणि मित्रप्रेमाला जागून, त्याने त्याच्या प्रेमाला तिलांजली दिली.

तो एडवर्डचा सच्चा मित्र बनला. त्याने कटू आठवणी मागे टाकल्या. तो खूप मनापासून जपत असलेली एडवर्ड व त्याच्यातील मैत्री मात्र होती तशीच राहिली. कटू आठवणी मागे पडल्या. पण एडवर्डचे नशीब चांगले होते, हे तो नाकारू शकला नाही. आणि त्याला खूप किमती वाटणारी मैत्री कुणी तोडू नये म्हणून, तो जपून होता. त्याने कधीही स्वतःच्या भावना उघड केल्या नाहीत. तसे काही सुचवलेही नाही. सहा महिन्यात तरुण जोडीचा साखरपुडा झाला. पण ते वयाने लहान असल्याने इसाबेलच्या वडिलांनी ठरवले, की निदान एडवर्ड पदवी मिळेपर्यंत तरी त्यांनी लग्न करू नये. त्याना एक वर्ष थांबावे लागले. जेव्हा इसाबेल आणि एडवर्डचे लग्न होणार होते, तो हिवाळयाचा शेवटचा काळ बॅटमनला आठवत होता. तो नाचाचा, मेजवान्यांचा आणि नाटकसिनेमांचा, आनंदी असण्याचा काळ होता. तेव्हा तो तिसरा म्हणून कायम त्यांच्याबरोबर हजर होता. थोडेच दिवसात, ती त्याच्या मित्राची बायको होणार होती, पण त्यामुळे तो तिच्यावर कमी प्रेम करत नव्हता. तिचे हसणे, त्याच्यावर फेकलेले आनंदी शब्द, तिच्या प्रेमातील विश्वास, याचा आमोद त्याच्या दृष्टीने कधीच कमी होत नसे. त्याबद्दल थोडा धोका जाणवूनही समाधानाने, तो स्वतःचे अभिनंदन करे. त्यांच्या आनंदाचा तो हेवा करत नसे. मग अपघात झाला. एडवर्ड बर्नार्डच्या वडीलांच्या अंगावर ओंडका पडून ते जखमी व अपंग झाले. एका रात्री ते घरी आले व बायकोला म्हणाले, की ते कफल्लक झाले आहेत आणि जेवणानंतर अभ्यासिकेत जाऊन, त्यांनी स्वतःवर गोळी मारून घेतली. आठवड्याने, एडवर्ड पांढऱ्या पडलेल्या व दमलेल्या चेहऱ्याने, इसाबेलकडे गेला व तिला लग्न मोडायला सांगू लागला. तिने उत्तर म्हणून त्याच्या मानेभोवती हात घालून रडायला सुरवात केली.

“प्रिये, माझ्यासाठी हे अजून कठीण करू नकोस.”

“तुला वाटते का, की मी तुला असे सोडून देईन? मी तुझ्यावर प्रेम करते.”

“मी तुला माझ्याशी लग्न करायला कसे सांगू? सर्व आशांवर पाणी फिरले आहे. तुझे वडील याला कधीही तयार होणार नाहीत. माझ्याकडे फुटकी कवडीदेखील नाही.”

“त्याची मला काही पर्वा नाही. मी तुझ्यावर प्रेम करते.”

त्याने तिला त्याचा बेत सांगितला. त्याला लगेच पैसे मिळवायची गरज होती. त्यांच्या कुटुंबाचा जुना हितचिंतक, जॉर्ज ब्राउन्सचमिड्ट याने त्याला स्वतःच्या व्यवसायात घ्यायचे ठरवले होते. तो दक्षिण समुद्रावरील व्यापारी होता आणि प्रशांत महासागरातील अनेक बेटांवर त्याच्या कंपनीच्या शाखा होत्या. त्याने सुचवले, की एक दोन वर्षांसाठी एडवर्डने ताहितीला जावे. तिथे त्याच्या व्यवस्थापकाच्या हाताखाली तो तेथील व्यापाराचे अनेक बारकावे शिकेल. आणि त्यानंतर त्याने त्याला शिकॅगोला नोकरी देण्याचे कबूल केले. ही नवलपूर्ण संधी होती. त्याचे हे सांगून झाल्यावर इसाबेल परत एकदा हसू लागली.

“अरे मूर्ख मुला, तू मला विचित्र मनस्थितीत का टाकतो आहेस?”

तिचे बोलणे ऐकून, त्याचा चेहरा उजळला. डोळे चमकू लागले.

“इसाबेल, तुला असे तर म्हणायचे नाही ना, की तू माझ्यासाठी थांबशील?”

ती हसून बोलली, “त्यासाठी तू लायक आहेस, असे तुला वाटत नाही का?”

“आहा, आता माझ्याकडे बघून हसू नकोस. मी तुला गंभीर व्हायला सांगतो आहे. हे कदाचित दोन वर्षे चालेल.”

“काही घाबरू नकोस. मी तुझ्यावर प्रेम करते. एडवर्ड, तू परत आल्यावर, आपण लग्न करू.”

एडवर्डच्या मालकाला उशीर केलेला आवडत नसे. त्याने एडवर्डला सांगितले होते, की जर त्याला हे काम करायचे असेल, तर त्याने त्याला सॅनफ्रँन्सिस्कोहून या आठवड्यात निघावे लागेल. एडवर्डने त्याची शेवटची संध्याकाळ इसाबेलबरोबर घालवली. जेवणानंतर मिस्टर लॉन्गास्टफ यांना एडवर्डबरोबर बोलायचे असल्यामुळे, ते त्याला सिगरेट ओढायच्या खोलीत घेऊन गेले. मिस्टर लॉन्गास्टफ यांनी त्यांच्या मुलीने सांगितलेली गोष्ट काही पद्धतीने मान्य केली होती होती आणि आता काय चमत्कारिक संवाद त्या दोघांमध्ये घडून येणार होता, याची एडवर्डला काहीच कल्पना नव्हती. तिच्या वडिलांना शरम वाटत असल्याचे पाहून, तो गोंधळला. तो तुटक्या आवाजात काही इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलला. अचानक मिस्टर लॉन्गास्टफ रागाने भुवई दाबत जोराने बोलले, “मला वाटते, तू अर्नोल्ड जॅक्सनबद्दल ऐकले असशील.

एडवर्ड हो नाही करू लागला. तो सहजपणे हे नाकारू शकला असता. पण त्याचा नैसर्गिक सच्चेपणा त्याला तसे करून देत नव्हता.

“हो, पण त्याला खूप वर्षे झाली. मला वाटते, मी त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नाही.”

मिस्टर लॉन्गास्टफ कटूपणे बोलले, “अर्नोल्ड जॅक्सनचे नाव ऐकले नाही, असे शिकॅगोमध्ये फार लोक नसतील. आणि कुणी असतील, तर

त्याना काही अडचण न येता कुणीही आनंदाने सांगेल. तो मिसेस लॉन्गास्टफचा भाऊ होता, हे तुला माहिती होते का?”

“हो, मला ते माहिती आहे.”

“अर्थात गेली बरीच वर्षे आमचा काही संपर्क राहिलेला नाही. त्याला शक्य झाल्याबरोबर त्याने हा देश सोडला. आणि माझ्या अंदाजाप्रमाणे, तो गेल्याचे देशाला काही वाईट वाटले नाही. मला समजल्याप्रमाणे, तो ताहीतीत रहातो. माझ्या उपदेशाप्रमाणे त्याच्यापासून लांब रहा. पण तुला त्याच्याबद्दल काही समजले, तर आम्हाला तू कळव आणि मी व माझी बायको त्यामुळे नक्की आनंदित होऊ.”

“नक्की.”

तिथे काही कुटुंबे अशी आहेत, की त्यांच्या सदस्यांपैकी एकाला, शेजाऱ्यांनी परवानगी दिल्यास, ते खुषीने विसरतील. आणि एक दोन पिढ्यांमधील अंतर अनपेक्षितपणे अद्भुतरम्य, जादुई असेल, तेव्हा ते नशीबवान ठरतील. ‘तो स्वतःचा सोडून, कुणाचाच शत्रू नाही.’ हे वचन त्याला लागू पडत असेल, तर तो खरोखर जिवंत असेल. आणि तो दारुच्या व्यसनाला किंवा सतत बदलणाऱ्या प्रेमाला सोकावलेला असेल, तर तो सुरक्षित असल्याबद्दल गप्प बसलेलेच बरे.”

“एवढेच मला तुला सांगायचे होते. मला वाटते, आता तुला इसाबेल व तिची आई याना भेटायला आवडेल.”

अर्नोल्ड जॅक्सनच्या बाबतीत लॉन्गास्टफ यांनी हा दृष्टीकोन घेतलेला होता. ते त्याच्याबद्दल कधीच बोलत नसत. तो रहात असलेल्या रस्त्याने, ते कधीच जात नसत. त्याच्या चुकांसाठी त्याच्या बायको मुलांना त्रास देत

नसत. त्यांनी युरोपमध्ये रहावे या समजुतीवर, ते त्यांना अनेक वर्षे आधार देत आलेले होते. अर्नोल्ड जॅक्सनच्या बाबतीतील प्रवादांबद्दल त्यांनी शक्य तेवढा काना डोळा केला होता. तरीही त्यांना माहिती होते, की उघड्या जगातील लोकांमध्ये हे गैरप्रकरण जेव्हा फुटले, तेव्हाइतकेच ते आजही ताजे होते. एखाद्याच्या काळयाकुट्ट प्रकरणाचा जेवढा त्रास कुटुंबाला होईल तेवढा अर्नोल्ड जॅक्सनमुळे झालेला होता.

चर्चमध्ये नावाजलेला, दुसऱ्यांचे भले इच्छिणारा, सर्वांकडून मान मिळणारा, [ धमन्यांमधून शिकॅगोचे निळे रक्त वहाणारा ] एक श्रीमंत बँकर फक्त त्याच्या नातेवाईकांमुळेच नव्हे, तर त्याच्या खंद्या चारित्र्यामुळे, जेव्हा अफरातफरीच्या गुन्ह्याखाली पकडला जातो, आणि हा गुन्हा काही अचानक मोह झाल्याने केलेला नसून पूर्वनियोजित पद्धतीने बेत आखून केलेला असल्याचे उघड होते, तेव्हा याचे काही स्पष्टीकरण असू शकत नाही. अर्नोल्ड जॅक्सन चोर होता. जेव्हा त्याला तुरुंगवासाची सात वर्षांची शिक्षा झाली तेव्हा तो तिथून पळून गेला.

कालच्या शेवटच्या संध्याकाळी जेव्हा प्रेमिकांची ताटातूट झाली, तेव्हा जोरदारपणे प्रेमाच्या आणाभाका झाल्या. एडवर्डच्या भावनामय प्रेमाच्या खात्रीमुळे, इसाबेलचे रडणे थोडे कमी होत होते. हे तिचे वाटणे विचित्र होते. त्याला दुरावणे तिला कष्टी करत होते, पण त्याने केलेल्या कौतुकामुळे ती आनंदीदेखील झाली होती.

हे दोन वर्षांपेक्षा जास्त काळापूर्वी झाले.

त्यानंतर तो तिला सतत लिहित राहिला. त्याने महिन्याला एक, अशी चोवीस पत्रे लिहिली. ती सगळी प्रेमपत्रे होती. ती सुंदर व प्रेमाने

ओथंबलेली होती. नंतरनंतरची कधी विनोदी होती व कोवळीक असलेलीही होती. पहिल्यांदा त्याला घराची आठवण येत असे. त्यात नेहमी परत मी शिकॅगोला व इसाबेलकडे कधी येतो, असा सूर असे. थोड्या काळजीने ती त्याला चिकाटी धरण्याबद्दल विनवित असे. तिला भीती वाटे, की तो मिळालेली संधी सोडून धावत इथे परत येतो की काय! तिला तिच्या प्रियकराने सहनशीलता सोडायला नको होती. तिने त्याला लिहिलेः

'प्रिय, मी तुझ्यावर इतके प्रेम करू शकणार नाही. प्रेमापेक्षा मी तुला जास्त मान देईन.'

पण आता तो तिथे स्थिरस्थावर झाल्यासारखा वाटत होता. त्या जगाच्या अनोख्या, विसरलेल्या भागात, तो वाढत्या उत्साहाने अमेरिकन पद्धती वापरू लागल्याचे पाहून, इसाबेल खूप खूष झाली. पण ती त्याला ओळखत होती आणि वर्षाच्या शेवटी, त्याला ताहितीला रहाणे अशक्य झाल्यावर, तेव्हा त्याला घरी परतण्यापासून परावृत्त करण्यासाठी, तिला तिचा सगळा परिणामकारकपणा वापरावा लागला. त्याने खोलात जाऊन व्यवसाय शिकून घ्यावा, हे चांगले होते. तो एक वर्ष तिथे राहू शकला, मग अजून एक वर्ष का नाही? ती हे उदार मित्र, बॅटमन हंटरबरोबर बोलली. [ एडवर्ड गेल्यानंतरच्या लगेचच्या काळात, बॅटमन हंटर नसता, तर तिने काय केले असते, कुणास ठाऊक! ] त्यांनी ठरवले, की एडवर्डचा भविष्यकाळ कशाहीपेक्षा जास्त महत्वाचा आहे. जसजसा काळ गेला तसतसे तिला बरे वाटू लागले, कारण एडवर्ड परत येण्याविषयी काही बोलेनासा झाला.

ती बॅटमनला बोलली, "हे छान झाले, नाही का?"

"तो आता तिथे रमला."

त्याच्या पत्राच्या दोन ओळींमधील अर्थ काढून, ती म्हणाली, की त्याला तिकडे आवडत नाही, पण तो तिथे चिकटून राहिला आहे कारण --- “

ती जराशी लाजली आणि बॅटमनने थंडपणे, पण त्याच्या नेहमीच्या आकर्षक पद्धतीने हसून, तिचे वाक्य पूर्ण केले.

“कारण तो तुझ्यावर प्रेम करतो.”

ती बोलली, “यामुळे मला खूप नम्र वाटते आहे.”

“इसाबेल, तू नवलपूर्ण आहेस. तू फारच नवलपूर्ण आहेस.”

पण दुसरे वर्ष गेल्यावर एडवर्डकडून दर महिन्याला इसाबेलाला पत्र येऊ लागले आणि असे दिसू लागले, की तो विचित्रपणे परत येण्यासंबंधी काहीच बोलत नव्हता. तो नक्कीच ताहितीला स्थाईक झाल्यासारखाच बोलत होता. आणि ते सुद्धा अगदी आरामशीरपणे! तिला नवल वाटले. मग तिने ती सगळी पत्रे परत अनेक वेळा वाचली. त्यातील अर्थ समजावून घेतांना तिला हातातून काही निसटून गेल्यासारखे वाटले. नंतरची पत्रे पहील्यासारखीच कोवळी व आनंदी होती, पण त्यातील सूर निराळा होता. तिला त्यातील विनोद संशयास्पद वाटला. तिला आतून तिच्या स्त्रीत्वाबद्दल व त्यातील न समजणाऱ्या अविश्वासाबद्दल कळून चुकले. ती खोटी रंगीत फुले असल्याचे समजून, ती गोंधळली. तिला आता पत्रे लिहिणारा एडवर्ड, पूर्वीचा तिला माहिती असलेला एडवर्ड होता का, याची तिला खात्री वाटेना. ताहितीहून पत्र आल्याच्या दुसऱ्या दिवशी, एका दुपारी, जेव्हा ती बॅटमनबरोबर गाडीत बसली होती, तेव्हा तो तिला बोलला, “एडवर्ड परत कधी येतो आहे, याबद्दल तुला तो काही बोलला का?”

“नाही. तो तसे काही बोलला नाही. मला वाटले की तो तुला काही बोलला असेल.”

“अवाक्षरही नाही.”

ती हसत म्हणाली, “तुला माहिती आहे, एडवर्ड कसा आहे.

त्याला वेळाचे काही भान नसते. जर तुला त्याचे पत्र आले, तर तू विचार, की तो केव्हा परत येणार आहे.”

तिची पद्धत इतकी काही लागते नसल्यासारखी होती, की बॅटमनच्या खोल भावनाशीलतेला तिच्या विनंतीत उतावळेपणा दिसला. तो मंद हसला.

“हो, मी त्याला विचारेन. तो काय विचार करतो आहे, याची मी कल्पना करू शकत नाही.”

काही दिवसांनी परत त्याला भेटल्यावर तिला जाणवले, की त्याला काही त्रास होतो आहे. एडवर्डने शिकॅगो सोडल्यापासून, ते सतत बरोबर असत. ते दोघेही त्याच्याशी एकनिष्ठ होते आणि त्याच्याबद्दल बोललेले ऐकून घ्यायला तयार होते. त्यामुळे इसाबेलला बॅटमनच्या चेहऱ्यावरील प्रत्येक हावभावातील अर्थ माहिती झाला होता. तिच्या मनापासूनच्या सहजप्रवृत्तींना नकार देणे काही उपयोगाचे नव्हते. त्याची नाराजी एडवर्डशी संबंधित असल्याचे तिला समजले. आणि त्याने तसे कबूल करेपर्यंत, तिने त्याचा पिच्छा सोडला नाही.

शेवटी तो म्हणाला, “खरे तर, मी आडून आडून ऐकले की एडवर्ड ब्राउन्सचमिड्ट आणि कंपनीसाठी काम करत नाही आहे. मी काल संधी घेतली आणि मिस्टर ब्राउन्सचमिड्ट यांना स्वतःला विचारले.”

“मग?”

“एडवर्डने एक वर्षापूर्वीच त्यांची नोकरी सोडली.”

“तो याबद्दल मला काहीच बोलला नाही, हे किती विचित्र आहे!”

बॅटमन कां कू करू लागला. पण आता तो इतका पुढे गेला होता, की बाकीचे सांगायला पण तो कचरला नाही. पण ते सांगताना त्याला फारच शरम वाटली.

“त्याला काढून टाकले गेले.”

“अरे बापरे, पण का?”

“असे दिसते आहे, की त्यांनी त्याला एक दोन वेळा सांगून बघितले. आणि शेवटी हाकलले. ते म्हणतात, की तो आळशी होता आणि कामात हुशार नव्हता.”

“एडवर्ड?”

काही वेळ ते शांत होते आणि मग इसाबेल रडू लागलेले त्याने पाहिले. भावनेच्या भरात त्याने तिचा हात पकडला.

तो म्हणाला, “अग माझ्या आवडत्या मुली, रडू नको. रडू नको. मला ते बघवत नाही.”

ती इतकी उदास झाली होती, की तिने तिचा हात त्याच्या हातात राहून दिला. तो तिला शांत करायला बघत होता.

“हे समजण्याच्या पलीकडील आहे, नाही का? एडवर्ड असा कधीच नव्हता. माझी खात्री आहे यात काहीतरी गफलत असली पाहिजे.”

ती जरा वेळ गप्प राहिली. आणि बोलली, तेव्हा अडखळत बोलली.

अश्रुभरल्या डोळ्यांनी दूर बघत तिने विचारले, “अलीकडील त्याच्या पत्रांमध्ये काही खटकण्यासारखे असल्याचे तुला जाणवले होते का?”

त्याला कळेना कसे उत्तर द्यावे.

त्याने कबूल केले. ”अलीकडे मला त्यात थोडा बदल जाणवला होता. तो गंभीरपणे हरवून गेल्यासारखा वाटे. एरवी मी याबद्दल त्याचे कौतुक करत असे. एखाद्याला असे वाटेल, त्याला काहीतरी झाले आहे. तर कधी वाटे सर्व काही ठीक आहे.”

इसाबेलने काही उत्तर दिले नाही. ती अस्वस्थ झाली होती.

“कदाचित तुझ्या पत्रांना उत्तर म्हणून, त्याने तो घरी येत असल्याचे कळवले असेल. त्यासाठी थांबण्याशिवाय आपण काय करू शकतो?”

एडवर्डकडून त्या दोघांनाही अजून एक पत्र आले. त्यातही त्याच्या परत येण्याबद्दल काही लिहिलेले नव्हते. पण त्याने ते लिहिले तेव्हा त्याला बॅटमनचे त्याची चौकशी करणारे पत्र मिळाले नव्हते. पुढच्या पत्रात त्याचे उत्तर त्यांना मिळाले असते. पुढचे पत्र आले. बॅटमनला नुकतेच आलेले पत्र त्याने इसाबेलकडे वाचण्यासाठी आणले. पण त्याच्या चेहऱ्याकडे नजर टाकताच, तिला समजले, की तो अजूनही येण्याबद्दल काही बोलत नाही आहे. तिने ते काळजीपूर्वक वाचले आणि मग ओठ थोडे दाबून तिने ते परत वाचले.

ती म्हणाली, “हे फार विचित्र पत्र आहे. मला ते काही समजत नाही.”

बॅटमन लाल होत म्हणाला, “एका रात्री माझ्या मनात असा विचार आला, की तो माझ्याबरोबर चांगला विनोद करतो आहे.”

पत्र वाचून तसे वाटते आहे. पण ते मुद्दाम केलेले नसावे. एडवर्ड असे करणार नाही”

“तो परत येण्याबद्दल, काहीच बोलत नाही.”

“जर आपण त्याच्या प्रेमाबद्दल इतके आग्रही नसतो, तर --- मला विचार केला पाहिजे --- पण काय विचार करावा, तेच मला कळत नाही.”

दुपारी बॅटमनच्या डोक्यात आलेल्या विचारानुसार त्याने असे करायचे ठरवले. त्याच्या वडीलांनी सुरु केलेल्या कंपनीत तो आता भागीदार होता. ही कंपनी मोटारींचे सुटे भाग तयार करत असे. या कंपनीची होनोलुलू, सिडनी व वेलिंग्टनमध्ये एजन्सी काढायचा विचार चालला होता. कुणा व्यवस्थापकाला पाठवण्याऐवजी स्वतःच जायचा बॅटमनचा विचार होता. येताना तो ताहितीवरून येऊ शकला असता. खरे तर वेलिंग्टनहून येतांना, ते वाटेत लागलेच असते. तो एडवर्डला भेटू शकला असता.

“काही गूढ भासते आहे आणि मी स्वतः जाऊन, ते काय आहे, त्याचा छडा लाऊन येतो. या प्रकारेच फक्त ते केले जाऊ शकते.”

ती उद्गारली, “ओहो, बॅटमन, तू कसा काय इतका चांगला व दयाळु आहेस?”

“इसाबेल, तुला माहिती आहे, या जगात तुझ्या आनंदाशिवाय मला काहीच नको आहे.”

तिने त्याच्याकडे बघून त्याच्या हातात तिचे हात दिले. “बॅटमन, तू नवलपूर्ण आहेस. जगात तुझ्यासारखा कुणी असेल, याची मी कल्पना केली नव्हती. मी तुझे कसे आभार मानू?”

“मला तुझे आभार नको आहेत. मला फक्त तुला मदत करायची आहे.”

तिने डोळे खाली वळवले. ती थोडी लाजली. तिला त्याची इतकी सवय झाली होती, की तो किती देखणा आहे, हे ती विसरूनच गेली होती. तो एडवर्डइतकाच उंच व दणकट होता. पण काळसर, अशक्त चेहऱ्याचा होता. एडवर्ड गर्विष्ठ होता. अर्थात तिला माहिती होते, की बॅटमनचे तिच्यावर प्रेम आहे. तिला भरून आले. तिला त्याच्याबद्दल कोवळीक वाटली.

बॅटमन हंटर आता त्याच्या प्रवासाहून परतला होता.

त्याचे व्यवसायासंबंधीचे काम त्याच्या अपेक्षेपेक्षा लांबले. मग त्याच्या दोन मित्रांचा विचार करायला त्याला वेळ मिळाला. त्याने असा निष्कर्ष काढला, की एडवर्डला इथे यायला अडवण्यासारखे गंभीर असे काही कारण नव्हते. तो जिच्यावर मनापासून प्रेम करत होता, तिला अभिमानाने सांगता येईल, असे काही मिळवल्याशिवाय इथे परत येणे कदाचित बरोबर ठरणार नाही, असे त्याला वाटत असावे. पण किती अभिमान असावा, हेदेखील त्याने बघायला हवे होते. इसाबेल दुःखी होती. एडवर्डने त्याच्याबरोबर शिकॅगोला येऊन लगेच तिच्याशी लगेच लग्न करायला हवे होते. त्याला हंटर मोटर टायर्समध्येदेखील काम मिळाले असते. बॅटमनने जखमी हृदयाने स्वतःच्या जीवावर उदार होऊन, जगातील

तो सर्वात जास्त प्रेम करत असलेल्या व्यक्तींना अत्यंत आनंद दिला. तो कधीच लग्न करणार नव्हता. तो एडवर्ड आणि इसाबेलच्या मुलांचा तथाकथित पिता [Godfather] म्हणून भूमिका निभावणार होता. खूप वर्षांनी ते दोघे वारल्यावर, तो इसाबेलच्या मुलीला सांगणार होता, की तो कसा तिच्या आईवर खूप खूप वर्षांपूर्वी प्रेम करत होता. जेव्हा बॅटमनने हे चित्र त्याच्या मनःचक्षुंसमोर उभे केले, तेव्हा त्याचे डोळे अश्रुंनी भरून आले. एडवर्डला एकदम आश्चर्याचा धक्का देण्यासाठी त्याने त्याला तो येत असल्याचे कळवले नव्हते. शेवटी तो जेव्हा ताहितीच्या किनाऱ्याला लागला, तेव्हा त्याने एका मुलाला त्याला डे ला फ्लेउर हॉटेलला नेण्यास सांगितले. त्याच्या मित्राला त्याला बघून किती नवल वाटेल, या विचाराने तो गालातल्या गालात हसत, तिथे शिरला.

त्याने एका तरुण माणसाला विचारले, “तसेही मला एडवर्ड बर्नार्ड कुठे भेटेल, हे तुम्ही सांगू शकाल का?”

“बर्नार्ड? मला नाव ओळखीचे वाटते आहे.”

“तो अमेरिकन आहे. उंच, हलके तपकिरी केस असलेला व निळे डोळे असलेला माणूस. तो इथे गेली दोन वर्षे आहे.”

“अर्थात. आता मला समजले, तुम्ही कोण म्हणत आहात. म्हणजे मिस्टर जॅक्सन यांचा पुतण्या.”

“कोणाचा पुतण्या?”

“आर्नोल्ड जॅक्सन.”

बॅटमन थंडपणे बोलला, “मला वाटते आपण दोन वेगळ्या व्यक्तींबद्दल बोलतो आहोत.”

तो चमकला. हे चमत्कारिक होते, की मिस्टर जॅक्सन यांना अनेक लोक ओळखत होते. तो इथे त्याची हकालपट्टी झाली त्या बदनाम नावाने रहात होता. पण बॅटमनला कल्पना करता येईना, की मिस्टर जॅक्सननी कोणाला त्यांचा पुतण्या कसे बनवले. मिसेस लॉन्गस्टफ ही त्यांची एकुलती एक बहीण होती. आणि भाऊ नव्हता. तो तरुण मनुष्य थोडे परदेशी उच्चार असलेल्या जिभेच्या वळणाने बोलला आणि बॅटमनने त्याच्याकडे कडेने बघत, पूर्वी न जाणवलेले असे काही पाहिले, की त्याच्यात बरेच देशी रक्त होते. सहजपणे त्याच्या वागण्याच्या पद्धतीत थोडी प्रौढी आल्यासारखे वाटले. ते हॉटेलशी पोचले. जेव्हा तो त्याच्या खोलीत स्थिरस्थावर झाला, त्याने ब्राउन्सचमिड्ट आणि कंपनीचे कार्यालय कुठे आहे ते विचारले. समुद्रापासून वेगळे झालेल्या खाऱ्या पाण्याच्या तळ्याकडे तोंड करून पुढील भागात ते होते. आठ दिवसांच्या समुद्रप्रवासानंतर पाण्याच्या कडेने असलेल्या कडक जमिनीवरून उन्हाच्या रस्त्याने चालतांना, बरे वाटत होते. त्याला हव्या असलेल्या जागी आल्यावर, बॅटमनने त्याचे कार्ड व्यवस्थापकाकडे पाठवले. त्याला धान्य कोठारासारख्या दिसणाऱ्या व काही सामान असलेल्या एका खोलीतून कार्यालयात नेण्यात आले. तिथे एक धट्टाकट्टा, चष्मिस व टक्कल असलेला माणूस बसला होता.

"मला एडवर्ड बर्नार्ड कुठे भेटेल, हे तुम्ही सांगू शकाल का? माझ्या समजुतीप्रमाणे तो काही काळ येथील कार्यालयात होता."

"असे आहे का?" पण आता तो कुठे आहे, मला माहिती नाही."

"पण माझ्या मते तो मिस्टर ब्राउन्सचमिड्ट यांच्या शिफारसीवरून इथे आल्याचे मला नक्की माहिती आहे. मी मिस्टर ब्राउन्सचमिड्ट यांना ओळखतो."

त्या जाड्या माणसाने बॅटमनकडे संशयाने व गर्विष्ठपणे पाहिले. त्याने कोठारातील एका मुलाला बोलावले. "हेन्री, बर्नार्ड आता कुठे आहे, तुला माहिती आहे का?"

त्याच्याकडून ढिम्मदेखील न हलता, उत्तर आले, "मला वाटते, तो कॅमेरॉनकडे काम करतो आहे."

जाड्या माणसाने मान हलवली. "जर तुम्ही डावीकडे वळलात, तर तुम्ही इथून बाहेर पडाल. मग तीन मिनिटात तुम्ही कॅमेरॉनकडे पोचाल."

बॅटमन कां कू करू लागला. "मला वाटते तुम्हाला हे सांगावे, की एडवर्ड माझा खूप जुना मित्र आहे. त्याने ब्राउन्सचमिड्ट आणि कंपनी सोडल्याचे समजले, तेव्हा मला फार आश्चर्य वाटले.

जाड्या माणसाचे डोळे ठिपक्यांइतके बारीक झाले आणि त्याचा तपासणी केल्यासारख्या बघण्याने बॅटमन लाजला.

तो उत्तरला, "माझा तर्क आहे, की ब्राउन्सचमिड्ट आणि कंपनी व एडवर्ड बर्नार्ड यांचे फारसे पटत नव्हते."

बॅटमनला त्या माणसाची वागायची पद्धत फारशी आवडली नाही. त्यामुळे तो उठला व त्याला फार मान देऊन नाही पण क्षमा मागून त्याचा निरोप घेऊन. एक विचित्र भावना मनात घेऊन, तो तिथून बाहेर पडला. आता भेटलेल्या माणसाला बरेच काही सांगता आले असते, पण त्याला सांगायचे नव्हते. लवकरच त्याला कॅमेरॉन सापडले. ती एका व्यापाऱ्याची

माल साठवायची जागा होती. तशी पाच सहा तरी गोदामे त्याला वाटेत लागली होती. तो आत शिरला, तेव्हा त्याने हाताच्या शर्टमध्ये असलेल्या एडवर्डला कापसाच्या गठ्ठ्याची लांबी मोजत असलेले पाहिले. तो नम्रपणे ते काम करत होता. पण एडवर्डने वर बघितले व त्याला बॅटमन दिसला, तेव्हा त्याने आश्चर्यचकित होऊन, आनंदाने आरोळी मारली. “बॅटमन? मी तुला इथे बघेन, असे मला स्वप्नातही वाटले नव्हते.” त्याने त्याचे हात पसरून, पुढे येऊन बॅटमनचे हात हातात घेतले. तो स्वतःला विसरून गेल्यासारखा वाटत होता. आणि बॅटमन लज्जित झाला होता. “मी हा गठ्ठा हातावेगळा करेपर्यंत थांब.”

मोठ्या खात्रीने त्याने त्या मालावर कात्री चालवली. त्याची घडी घातली. त्याचे पार्सल तयार केले. आणि ते काळ्या गिऱ्हाईकाला दिले.

“त्या बाकावर पैसे भरा.”

मग चमकत्या डोळ्यांनी हसत, तो बॅटमनकडे वळला.

“तू इथे कसा काय आलास? तुला बघून मला आनंद झाला. बस. मोकळेपणे बोल.”

“आपण इथे बोलू शकणार नाही. माझ्या हॉटेलवर चल. मला वाटते, तू निघू शकशील का?”

हे तो थोड्या काळजीने म्हणाला.

“अर्थात, मी बाहेर पडू शकतो. इतर ताहितींसारखे आम्ही इतक्या व्यापारी नजरेचे नाही.” त्याने पलीकडे उभ्या असलेल्या एका चिन्याला बोलावले. “अह-लिंग, मालक आले की त्यांना सांग, की आताच

अमेरिकेहून माझा एक मित्र आला आहे. त्याच्याबरोबर पेयपान करायला मी जातो आहे.”

तो चिनी तोंड फाकवून हसला व म्हणाला, “ठीक आहे.”

एडवर्डने कोट, टोपी घातली व बॅटमनबरोबर बाहेर पडला. बॅटमनने गंभीर परिस्थिती हसत खेळत निभावून नेण्याचे ठरवले. तो हसत म्हणाला, “तू एखाद्या काळ्या माणसाला साडेतीन यार्ड लांबीचा खराब कापूस विकतांना सापडशील, असे मला वाटले नव्हते.”

“तुला माहिती आहे, ब्राउन्सचमिड्टने मला काढून टाकले.

मग मी दुसरीकडे कुठे मिळेल तिथे, नोकरी स्विकारली.”

एडवर्डचा प्रामाणिक व मोकळा दृष्टीकोन बघून, बॅटमनला फार नवल वाटले. पण त्याने विचार केला, की एडवर्डला उघडे पाडण्यापेक्षा आपण हा विषय बदलू.

तो कोरडेपणे बोलला, “मला वाटते, तू आहेस, तिथे तुझे नशीब उघडणार नाही.”

“मलाही तसेच वाटते. पण मी पोटापाण्यापुरते मिळवतो. आणि त्यात मला समाधान आहे.”

“दोन वर्षांपूर्वी तू होतास, तसा राहिला नाहीस.”

एडवर्ड आनंदाने बोलला, “आपण मोठे होतो, तसतसे अधिक शहाणे होत जातो.”

बॅटमनने त्याच्याकडे नजर टाकली. एडवर्डने पांढरा, सुती, फारसा स्वच्छ नसलेला गबाळा सूट घातला होता व काड्यांची देशी टोपी घातली होती. तो पूर्वीपेक्षा बारीक झाला होता. त्याच्या अंगावर सूर्याच्या उन्हाने

भाजल्याच्या खुणा दिसत होत्या. तो पूर्वीपेक्षा चांगला दिसत होता. पण त्याच्या दिसण्यात असे काही होते, की त्यामुळे बॅटमन अस्वस्थ झाला. तो आनंदी आणि आत्मविश्वासपूर्ण दिसत होता. त्याच्या वरवरच्या वागण्यामध्ये एक प्रकारची बेपर्वाई होती. कसला विशेष असा नव्हे, पण असा काही आनंद उत्साह दिसत होता, की ज्यामुळे बॅटमनला त्याला दोषही देता येत नव्हता. पण तो त्याला फार गोंधळायला लावत होता. तो स्वतःशी बोलला, “तो इतका आनंदी कसा राहू शकतो, हे मला कळले, तर बरे होईल.”

ते हॉटेलमध्ये आले व गच्चीत बसले. एका चिनी मुलाने त्यांच्यासाठी पेय आणले. शिकॅगोच्या सर्व बातम्या ऐकण्यासाठी एडवर्ड अधीर झाला होता. त्याने त्याच्या मित्रावर नैसर्गिकपणे गंभीर रीत्या उत्सुक प्रश्नांचा मारा केला. पण विचित्र गोष्ट अशी होती, की त्यात विविध विषय होते. बॅटमनचे वडील कसे होते, याबरोबरच तो इसाबेल कशी होती, तेही विचारत होता. तो तिच्याबद्दल जराही खंत न वाटता बोलला. ती त्याची नियोजित वधू होती की बहीण होती, असा त्याचा सूर होता. त्याच्या बोलण्यातील दडलेला अर्थ बॅटमनने काढण्यापूर्वीच, संभाषण त्याच्या कामाकडे व त्याच्या वडिलांनी अलीकडे बांधलेल्या इमारतींकडे वळले. परत संभाषणाची गाडी इसाबेलवर आणण्याचा त्याचा प्रयत्न होता आणि तशी संधी तो शोधत होता. तेव्हा त्याने पाहिले, की एडवर्डने कुणाला तरी हात केला. गच्चीमध्ये तो मनुष्य त्यांच्या दिशेने येत होता. पण बॅटमनची त्याच्याकडे पाठ असल्यामुळे, तो वळला तेव्हा त्याला तो दिसला.

एडवर्ड आनंदाने त्याला म्हणाला. “इकडे ये आणि बस.”

तो नवीन माणूस आला. तो खूप उंच होता. त्याचे कपडे पांढरे होते व केसही कुरळे असून पांढरे होते. त्याचाही चेहरा बारीक होता. नाक मोठे व पक्ष्याच्या चोचीसारखे टोक वळलेले होते. त्याचे तोंड सुंदर व भावदर्शी होते.

ओठांवर सतत हास्य खेळवत, एडवर्ड म्हणाला, “हा माझा जुना मित्र बॅटमन हंटर. मी तुला त्याच्याबद्दल सांगितले आहे.”

“मिस्टर हंटर, तुम्हाला भेटून आनंद झाला. मला तुमचे वडील माहिती होते.”

त्या अनोळखी माणसाने हात पुढे करून मित्रत्वाने, दणकटपणे बॅटमनचे हात पकडले. तोपर्यंत एडवर्डने त्याचे नाव सांगितले नव्हते.

“मिस्टर अर्नोल्ड जॅक्सन.”

बॅटमन पांढरा पडला. त्याचे हात गार पडल्यासारखे त्याला वाटले. तो इसाबेलचा मामा होता. गुन्हेगार, चोर होता. काय बोलावे, ते त्याला समजेना. तो त्याचा गोंधळ लपवण्याचा प्रयत्न करू लागला. अर्नोल्ड जॅक्सन त्याच्याकडे चमकत्या नजरेने बघत होता.

“मी असे म्हणण्याचे धाडस करतो, की माझे नाव तुम्हाला परिचित आहे.”

बॅटमनला कळेना, हो म्हणावे की नाही. आणि त्याला अजून चोरट्यासारखे झाले, कारण जॅक्सन आणि एडवर्ड दोघांचेही मनोरंजन होत होते. बेटावरील ज्या माणसाला त्याने टाळले असते, अशा माणसाशी त्याची जबरदस्तीने ओळख करून देणे, हे वाईट होते. पण त्याला शोधून

मूर्ख बनवले गेले, हे फारच वाईट होते. तरीही कदाचित त्याने या निष्कर्षावर पोचायची घाई केली असेल, कारण जॅक्सन न थांबता पुढे बोलला,

"मी समजतो, की तुमचे लॉन्गस्टफ यांच्याशी फार मैत्रीपूर्ण संबंध आहेत. मेरी लॉन्गस्टफ माझी बहीण आहे."

पूर्ण शिकॅगोला माहिती असलेल्या सर्वांत भयंकर प्रकरणाच्या बाबतीत अर्नोल्ड मुद्दाम अनभिज्ञ असल्याचे दाखवत होता का, असे बॅटमनने स्वतःला विचारले. पण अर्नोल्डने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

तो म्हणाला, "टेडी, मी बसू शकत नाही. मी कामात आहे. पण तुम्ही दोघे आज रात्री जेवायला या."

एडवर्ड म्हणाला, "हे छान होईल."

बॅटमन थंडपणे बोलला, "मिस्टर जॅक्सन, हा तुमचा दयाळुपणा आहे. पण मी इथे इतका कमी वेळ आहे आणि माझी बोट उद्या सुटणार आहे. त्यामुळे तुम्ही मला न येण्याबद्दल माफ कराल."

"ओहो, असे करू नका. मी तुम्हाला इथले खास स्थानिक जेवण देईन. माझी बायको जेवण छान बनवते. टेडी तुम्हाला घेऊन येईल. सूर्यास्त बघायला लवकर या. तुम्हाला आवडत असेल, तर मी तुम्हाला माझी पूर्ण ओळख देऊ शकतो."

एडवर्ड म्हणाला, "अर्थात आम्ही येऊ. बोट येते त्या रात्री हॉटेलमधील जेवणाची नेहमी घाई असते. पण तुझ्या बंगल्यावर आपल्याला निवांत भेटता येईल."

जॅक्सनने आग्रह चालू ठेवला. "मिस्टर हंटर, मी तुम्हाला सोडणार नाही. मला शिकॅगोची आणि मेरीची बित्तंबातमी ऐकायची आहे."

बॅटमनने काही बोलण्यापूर्वी तो मान हलवत, चालू पडला.

एडवर्ड हसत म्हणाला, “ताहितीमध्ये नकार द्यायची पद्धत नाही. शिवाय तुला या बेटावरील सर्वोत्कृष्ट जेवण मिळेल.”

“तो असे का म्हणाला, की त्याची बायको जेवण छान बनवते. मला जिनिव्हामधील त्याची बायको माहिती आहे.”

एडवर्ड म्हणाला, “बायकोसाठी, ती मोठी लांब गोष्ट आहे. आणि तो अनेक दिवसांनी तिला भेटतो आहे. मला वाटते, तो दुसऱ्या बायकोबद्दल बोलतो आहे.”

काही वेळ बॅटमन स्तब्ध राहिला. त्याच्या चेहऱ्यावर आठ्या उमटल्या. पण त्याने वर बघितल्यावर त्याला एडवर्डच्या डोळ्यात मजेशीर झाक दिसली आणि अंधारात त्याचा चेहरा लाल झाला.

तो म्हणाला, “अर्नोल्ड जॅक्सन हा चांगला माणूस नाही. तो चोर आहे.”

एडवर्ड हसत म्हणाला, “मला भीती आहे, की तो तसा आहे.”

“मला समजत नाही, की कुठल्याही भल्या माणसाला त्याच्याशी काय देणेघेणे आहे.”

“कदाचित मी भला माणूस नसेन.”

“एडवर्ड, तू त्याला वारंवार भेटतोस का?”

“हो, बरेच वेळा. त्याने मला त्याचा पुतण्या मानले आहे.”

बॅटमनने पुढे झुकून, एडवर्डच्या डोळ्यात शोधकपणे पाहिले.

“तुला तो आवडतो का?”

“खूपच.”

“पण तुला हे माहिती आहे का, की इथे रहाणाऱ्या कुणाला हे माहिती नसेल, की तो गुन्हेगार आहे. त्याला सांस्कृतिक समाजापासून दूरच ठेवले पाहिजे.”

एडवर्डने स्तब्ध हवेत वास येणाऱ्या त्याच्या सिगरेटच्या धुराच्या वलयाकडे पाहिले.

शेवटी तो म्हणाला, “मला माहिती आहे, की तो एक नंबरचा खोडकर आहे. त्याच्या दुष्कृत्यांबद्दल त्याला पश्चात्ताप झाल्यावर, त्याला नैतिक दृष्ट्या पापी समजणे, असे मी करू शकत नाही. तो ढोंगी आणि फसव्या आहे. पण मी त्याला टाळू शकत नाही. मला इतका मिळून मिसळून वागणारा मित्र अजून पर्यंत भेटलेला नाही. मला माहिती असलेली प्रत्येक गोष्ट मला त्याने शिकवली आहे.”

बॅटमनने नवल वाटून विचारले, “त्याने तुला काय शिकवले आहे?”

“कसे जगायचे.”

विरोधाभासाने बॅटमन हसू लागला. “चांगला शिक्षक आहे. त्याच्या शिकवणीनुसारच तू या भिकार ठिकाणी असले काम करू लागलास का?”

एडवर्ड मनापासून हसत म्हणाला, “त्याचे व्यक्तिमत्व नवलपूर्ण आहे. कदाचित आज रात्री तुला त्याचा अनुभव येईल.”

“तू असे म्हणत असशील, तर मी आज रात्री त्याच्याबरोबर जेवणार नाही. त्या माणसाच्या घरात मी पाऊलही टाकणार नाही.”

“बॅटमन, माझ्यावर उपकार म्हणून ये. आम्ही खूप वर्षे मित्र आहोत. मी तुला सांगत असताना, तू माझे ऐकणार नाहीस, असे होणार नाही.”

एडवर्डच्या आवाजाचा पोत बॅटमनला अपरिचित होता. त्यातील शरणागत भाव, त्याचे मन वळवायला बघत होता.

बॅटमन हसत बोलला, “एडवर्ड, तू जर असे बोलायला लागलास, तर मला यावेच लागेल.”

बॅटमनने अजून असाही विचार केला, की अर्नोल्ड जॅक्सनबद्दल अजून माहिती मिळवायची, ही संधी आहे. हे सरळ होते, की त्याला एडवर्डबद्दल आपुलकी होती. जर भांडण करायचे असले, तर त्यात नक्की काय आहे, हे शोधणे गरजेचे होते. तो जितका जास्त एडवर्डशी बोलू लागला, तितका तो अधिकाधिक सावधान होऊ लागला. त्याला जाणवले, की त्याच्यात बदल झाला आहे. त्याच्या सहजप्रवृत्तीला असे जाणवू लागले, की त्याला प्रत्येक पाऊल काळजीपूर्वक टाकायला पाहिजे. त्याची वाट त्याला स्पष्टपणे दिसेपर्यंत, त्याचा इथे येण्याचा खरा हेतू उघड न करण्याचे त्याने ठरवले. तो इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलू लागला. त्याच्या प्रवासाबद्दल, त्यातून त्याने काय हासील केले त्याबद्दल, शिकॅगोमधील राजकारणाबद्दल, त्याच्या सामाईक मित्रांबद्दल आणि त्यांच्या कॉलेजच्या दिवसांबद्दल तो बोलला.

शेवटी एडवर्ड म्हणाला, की त्याला परत कामाला लागायला पाहिजे. तो पुढे असेही म्हणाला, की तो पाच वाजता बॅटमनला घेईल व मग ते अर्नोल्ड जॅक्सनकडे गाडीने एकत्र जातील.

एडवर्डबरोबर बागेतून बाहेर पडल्यावर बॅटमन म्हणाला, “मला वाटले, तू माझ्याबरोबर इथे राहशील. माझ्या मते, इथे रहाणे संयुक्तिक ठरेल.”

एडवर्ड हसून बोलला, "नाही. नाही. हे माझ्यासाठी जरा अतीच होईल. मी शहराबाहेर एक खोली भाड्याने घेतली आहे. ती स्वस्त आणि स्वच्छ आहे."

"जर मला नीट आठवत असेल, तर तू शिकॅगोमधे रहाताना तुला या गोष्टी एवढ्या महत्वाच्या वाटत नव्हत्या."

शिकॅगो!"

"म्हणजे तुला काय म्हणायचे आहे, मला समजत नाही, एडवर्ड. ते जगातील सर्वात छान शहर आहे."

एडवर्ड म्हणाला, "मला माहिती आहे."

बॅटमनने त्याच्याकडे झटकन बघितले. पण त्याचा चेहरा अनाकलनीय होता.

"तू परत शिकॅगोला केव्हा येणार आहेस?"

एडवर्ड बोलला, "त्याबद्दल मला नेहमी नवल वाटते."

या उत्तराने व ते देण्याच्या पद्धतीने, बॅटमनला अस्वस्थ केले. पण काही स्पष्टीकरण मागण्यापूर्वी, एडवर्डने जवळून घोडागाडी चालवणाऱ्या एका मिश्र जातीच्या माणसाला हात केला. तो म्हणाला, "चार्ली, आम्हाला तुझ्याबरोबर घोडागाडीत घेऊन चल."

चार्लीने मान हलवली. एडवर्डने बॅटमनकडे बघून मान हलवली आणि आणि काही यार्ड पुढे उभ्या असलेल्या त्या घोडागाडीमागे धावला. बॅटमन तिथे गोंधळलेल्या परिस्थितीत उभा राहिला. पिंजऱ्यात अडकलेल्या घोडीसारख्या थरथरणाऱ्या, पडेल आवाजात, एडवर्डने त्याला हाक मारली. ते समुद्राच्या कडेच्या रस्त्याने जाऊ लागले. त्याच्या दोन्ही बाजूंना नारळ

आणि व्हॅनीलाची शेते होती. मधूनमधून पिवळया, लाल आणि जांभळया मोठ्या आंब्यांची भरगच्च झाडे दिसत होती. नितळ व निळी खाऱ्या पाण्याची लगून दिसत होती. डौलदार, उंच पामच्या झाडांच्या जमिनींचे तुकडे दिसत होते. अर्नोल्ड जॅक्सनचे घर एकच रस्ता जाणाऱ्या एका लहानशा टेकाडावर होते. चार्लीने घोडीला मोकळे सोडून, एका झाडाला बांधले व गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली. बॅटमनला हा सगळा प्रकार एखाद्या रामभरोसे आनंदी रहाणाऱ्या माणसासारखा वाटला. पण ते जेव्हा वर घराकडे गेले, तेव्हा त्याना एक उंच, दिसायला चांगली देशी स्त्री भेटली. तिच्याबरोबर एडवर्डने हातमिळवणी केली. त्याने बॅटमनची तिच्याशी ओळख करून दिली.

“हा माझा मित्र मिस्टर हंटर. “लविना, आम्ही तुझ्याकडे जेवायला आलो आहोत.”

पटकन हसून, ती म्हणाली, “ठीक आहे. अर्नोल्ड अजून आला नाही. तुम्ही खाली जाऊन अंघोळ करा. मी तुम्हाला काही पॅरो देते.”

ती घरात गेली.

बॅटमनने विचारले, “ती कोण आहे?”

“ओहो, ती लविना आहे. आर्नोल्डची बायको.”

बॅटमनने तोंड आवळून धरले, पण काही बोलला नाही. एका मिनिटात ती बाई एक गठ्ठा घेऊन आली. तिने तो एडवर्डला दिला. उताराच्या रस्त्याने ते दोघेजण मोठ्या नेटाने किनाऱ्यावरील नारळीबागेत गेले. त्यांनी कपडे काढले. एडवर्डने त्याच्या मित्राला लाल सुती कपडा उर्फ पॅरो गुंडाळून, त्याचा पोहायचा पोषाख कसा बनवायचा, ते दाखवले.

लवकरच ते उबदार, उथळ पाण्यात हात मारू लागले. एडवर्डला खूप उत्साह आला होता. तो हसून ओरडत होता व गात होता. तो जणु पंधरा वर्षाचा झाला होता. बॅटमनने त्याला कधीच एवढे आनंदी पाहिले नव्हते. मग जेव्हा ते किनाऱ्यावर मोकळया हवेत, सिगरेट ओढत पडले तेव्हा त्याचे मन बिनविरोध इतके हलके झाले, की ते बघून बॅटमन चक्रावूनच गेला.

तो म्हणाला, "तुला आयुष्य फारच सुखकारक वाटते, असे दिसते."

"हो."

त्यांना थोडी हालचाल ऐकू आली. आणि त्यांना दिसले की अर्नोल्ड जॅक्सन त्यांच्याकडे चालत येतो आहे.

तो बोलला, "मला वाटले, मी तुम्हाला दोघांना घेऊन येईन. मिस्टर हंटर तुम्ही अंघोळीचा आनंद घेतलात का?"

बॅटमन म्हणाला, "हो. खूप आनंद घेतला."

अर्नोल्ड जॅक्सनने बाहेरचे कपडे काढून, कंबरेला पॅरो गुंडाळले आणि अनवाणी पाऊलांनी चालू लागला. त्याचे शरीर उन्हाने तपकीरीसर झाले होते. त्याच्या लांब, कुरळया पांढऱ्या केसांनी व स्वयंशिस्तीच्या चेहऱ्यानी व त्याने घातलेल्या देशी कपड्यांनी, तो एक वैशिष्ट्यपूर्ण आकृतीचा माणूस दिसत होता. पण स्वतःविषयीच्या जागरुकतेचा, त्याच्याजवळ मागमूसदेखील नव्हता.

जॅक्सन म्हणाला, "तुम्ही तयार असाल, तर आपण घराकडे जायला लागू."

बॅटमन बोलला, "मी लगेच माझे कपडे घालतो."

"काय रे टेडी, तू तुझ्या मित्राकरता, पॅरो आणले नाहीस का?"

एडवर्ड हसत म्हणाला, “त्याला त्याचे कपडे घालू दे.”

बॅटमन थोडा घाबरून बोलला, “नक्कीच.” त्याने शर्ट घालण्यापूर्वी एडवर्डला लुंगीसारखे सुती वस्त्र कंबरेभोवती गुंडाळताना व निघण्यासाठी तयार होतांना पाहिले.

त्याने एडवर्डला विचारले, “तुला बुटांशिवाय चालतांना त्रास होत नाही का? मला तर रस्त्यातील दगड टोचत आहेत.”

“ओहो, मला त्याची सवय आहे.”

जॅक्सन म्हणाला, “गावातून परत आले, की पॅरो नेसल्यावर आरामशीर वाटते. जर तू इथे रहाणार असशील, तर मी तुला नक्की ते वापरायची शिफारस करेन. मी आतापर्यंत पाहिलेल्या कपड्यांमध्ये हे वापरणे सर्वात संयुक्तिक आहे. ते थंड, स्वस्त आणि सोयीस्कर आहेत.”

आम्ही घराकडे गेलो आणि जॅक्सनने आम्हाला पांढऱ्या रंग दिलेल्या भिंती असलेल्या एका मोठ्या छतविरहीत खोलीत नेले. बॅटमनने पाहिले, की तिथे पाचजणांच्या जेवणासाठी टेबल मांडलेले होते.

जॅक्सनने हाक मारली. “इव्हा, बाहेर ये. टेडीच्या मित्राशी ओळख करून घे आणि आमच्यासाठी पेय तयार कर.”

मग त्याने बॅटमनला एका खाली असलेल्या मोठ्या, खिडकीकडे नेले. नाटकी हावभाव करत तो बोलला, “तिकडे बघ. अगदी नीट बघ.”

लगूनकडे जाणाऱ्या उतरत्या वाटेवर नारळाची झाडे होती. कबुतराच्या छातीसारखे, वेगवेगळे, कोवळे रंग लगूनला प्राप्त झाले होते. काही अंतरावरील खाडीवर देशी लोकांच्या झोपड्यांची गर्दी होती. ओबडधोबड खडकाच्या बाजूला पॅडल मारायच्या हलक्या अरुंद बोटीची

कडा दिसत होती. त्यात बरेच देशी लोक मासेमारी करत होते. त्यापलीकडे प्रशांत महासागराची शांतता प्रतीत होत होती. वीस मैल लांब एखाद्या कवीच्या क्षुल्लक कल्पनेसारखी, हवेशीर चादर पसरली होती. ती त्या बेटाची अकल्पनीय सुंदरता होती. त्याला म्युरीया म्हणत. ते सर्व इतके नयनरम्य होते, की बॅटमन अवाक् झाला.

शेवटी तो म्हणाला, "यापूर्वी मी असे काहीच पाहिलेले नाही."

जॅक्सन त्याच्यासमोर त्याला निरखत उभा राहिला. त्याच्या डोळ्यात तरल स्वप्नाळूपणा होता. त्याचा बारीकसा, विचारी चेहरा थंड होता. तो बघून बॅटमनला परत एकदा अप्रतिम आत्मिक सौदर्य जाणवले.

अर्नोल्ड जॅक्सन बोलला, "सौदर्य! समोरासमोर असे सौदर्य तुम्हाला क्वचितच दिसते. मिस्टर हंटर हे नीट बघून घ्या. कारण असे सौदर्य तुम्हाला कुठेही बघायला मिळणार नाही. हा चिरंतन क्षण नाही. पण याची स्मृती तुमच्या मनात कायमची राहू शकते. तुम्ही अमरत्वाला स्पर्श करता."

त्याचा आवाज खोल खर्जातील पण स्पष्ट होता. त्याच्या श्वासात जणू पवित्र आदर्शवाद भरला होता. पण बॅटमनला हे लक्षात ठेवावे लागत होते, की हे बोलणारा माणूस, दुष्ट व फसवणारा गुन्हेगार होता. काही आवाज ऐकल्यासारखा एडवर्ड गोल वळला.

"मिस्टर हंटर, ही माझी मुलगी."

बॅटमनने तिच्याशी हस्तांदोलन केले. तिचे काळे डोळे छान होते. तिच्या लाल चेहऱ्यावर हास्य पसरले होते. पण तिची कांती तपकीरीसर व खांद्यावरून पुढे आलेल्या कुरळया केसांच्या बटा काळयाभोर होत्या. तिने गुलाबी रंगाचा गाउन घातला होता. तिच्या पायात चपला वा बूट नव्हते.

तिने केसात सुवासिक पांढऱ्या फुलांचा मुगुट घातला होता. ती वसंतऋतूतील देवतेसारखी दिसत होती. ती थोडी लाजरी होती, पण बॅटमनपेक्षा नव्हे. त्याला तो सर्व प्रकार लाजलावणा वाटत होता. त्यामुळे तो अस्वस्थ होता. त्या एखाद्या पक्षासारख्या मुलीने तिच्या सराईत हातांनी हलवून, पेयांचे तीन पेले तयार केले.

जॅक्सन बोलला, आपण ते पेय घेऊ या."

तिने हसतहसत तिघांना पेले दिले. तिची हलवण्याची पद्धत बघून, बॅटमन गार पडला. पण त्याची चव मस्त होती.

पाहुण्याची स्तुतीपर नजर बघून, जॅक्सन अभिमानाने हसला. "ते चांगले लागते आहे ना? मी स्वतः ते मुलीला शिकवले आहे. पूर्वी शिकॅगोला मला असे वाटायचे, की पेये देणारा मनुष्य मला मेणबत्ती दाखवेल. मी तुरुंगात असतांना, जेव्हा मला करण्यासारखे काही नसे, तेव्हा मी पेयांचे मिश्रण कसे करावे, याविषयी विचार करत बसे. पण कोरड्या मार्टीनीसारखे दुसरे काहीही नाही.

बॅटमनला वाटले त्याला कुणीतरी त्याला कोपराजवळ धक्का मारला आहे. त्यामुळे त्याला जाणवले की तो प्रथम लाल होऊन, नंतर पांढरा पडला आहे. पण त्याने काही विचार करण्यापूर्वी एका मुलाने बाऊलमधून सूप आणले आणि सगळे जेवायला बसले. जॅक्सनला अचानक जुन्या आठवणी येऊ लागल्या. कारण तो त्याच्या तुरुंगवासाविषयी बोलू लागला. तो अगदी सहजपणे बोलत होता. त्यात दुष्टावा नव्हता. जसे काही तो त्याचे अनुभव एखाद्या परदेशी विद्यापीठाशी ताडून बघत होता. तो बॅटमनशी बोलत होता. बॅटमन गोंधळून गेला होता.

त्याला नवल वाटले होते. त्याने पाहिले, की एडवर्ड त्याच्याकडे एकटक मनोरंजन झाल्यासारखे बघत होता. तो लाजून शेंदरी झाला. कारण त्याला धक्का बसला, की जॅक्सन त्याला मूर्ख बनवत होता. त्याला विचित्र वाटू लागले --- मग त्याला वाटले, की असे वाटायचे काही कारण नाही. मग तो रागावला. अर्नोल्ड जॅक्सन दुसऱ्याला पुरेसा मान देत नव्हता. याला दुसरा काही शब्द नव्हता. आणि त्याचा दुष्टावा आणि भावनाशील नसणे --- मुद्दाम किंवा नैसर्गिक --- कसेही असले, तरी चीड आणणारे होते.

नंतर जेवण आले. बॅटमनला वेगवेगळे पदार्थ खायला सांगण्यात आले. कच्चे मासे आणि काय काय! फक्त तो सुसंस्कृत असल्यानेच ते केवळ गिळत होता. पण ते चांगले असल्याने, त्याला नवल वाटले. मग एक प्रसंग घडला. तो बॅटमनच्या दृष्टीने तो त्या संध्याकाळचा, सर्वात लाजीरवाणा प्रसंग होता. त्याच्यासमोर एक फुलांचा मुगुटासारखा दागिना होता. बोलतांना त्याने एक धोकादायक शेरा मारला.

जॅक्सन म्हणाला, “हा फुलांचा मुगुट इव्हाने तुझ्यासाठी केला आहे. मला वाटते, ती लाजून तुला तो देऊ शकत नाही आहे.”

बॅटमनने तो हातात घेतला आणि मुलीचे आभार मानायला लहानसे भाषण केले.

ती हसत व लाजत म्हणाली, “तुम्ही तो घातला पाहिजे.

“मी? मला नाही वाटत की मी ते करेन.”

अर्नोल्ड जॅक्सन म्हणाला, “ती या देशाची सुंदरशी पद्धत आहे. त्याच्यासमोर तसे अजून एक दोन पडले होते. अर्नोल्डने व एडवर्डने ते डोक्यावर चढवले.

बॅटमन अस्वस्थतेने बोलला, “मला वाटते, मी त्यासाठीचे कपडेही घातलेले नाहीत. इव्हा लगेच बोलली, “तुम्हाला पॅरो घालायला आवडेल का? मी एका मिनिटात तुम्हाला तो आणून देते.”

“नको. आभारी आहे. मी आहे तसा आरामशीर आहे.”

एडवर्ड म्हणाला, “इव्हा, त्याला तो कसा घालायचा, ते दाखव.”

त्या क्षणी बॅटमन त्याच्या जिवलग मित्राचा द्वेष करू लागला. इव्हा उठली आणि हसत हसत मुगुट त्याच्या काळया केसांवर ठेवला.

मिसेस जॅक्सन म्हणाली, “तुम्हाला तो शोभून दिसतो आहे. नाही का, अर्नोल्ड?”

“अर्थात, दिसतो आहे.”

बॅटमनच्या शरीरावरील प्रत्येक रंध्रातून घाम गळू लागला.

इव्हा बोलली, “अरेरे, अंधार झाला. आपण तुमच्या तिघांचा फोटो काढायला हवा होता.”

बॅटमनने अंधार झाल्यामुळे, त्याच्या नशीबातील ग्रहांना धन्यवाद दिले. त्याला वाटले, की तो त्याच्या उंच कॉलर असलेल्या निळ्या कोटात नक्की नवलपूर्ण रीतीने मूर्ख दिसत असणार --- फार नीट आणि सभ्य माणसासारखा --- त्याच्या डोक्यावरील विचित्र मुगुटामुळे. तो रागाने खदखदत होता. टेबलावर यजमानपदी बसलेल्या अर्धनग्न अर्नोल्डवर, त्याच्या पवित्र चेहऱ्यावर आणि पांढऱ्या केसांच्या बटांवरील मुगुटावर तो संतापला. हा सर्व प्रकार फार उबग आणणारा होता.

जेवण संपत आले. इव्हा व तिची आई सर्व आवरू लागल्या आणि तीन पुरुष गॅलरीत बसलो. फार गरम होत होते. रातराणीच्या फुलांनी रात्र

सुगंधित झाली होती. निरभ्र आकाशात पूर्ण चंद्र विहार करत होता. विशाल सागरावर त्याने मोठा शाश्वत रस्ता तयार केला होता. आर्नोल्ड जॅक्सनने बोलायला सुरवात केली. त्याचा आवाज मंजुळ व भरीव होता. आता तो देशी लोकांबद्दल आणि तेथील जुन्या दंतकथांबद्दल बोलत होता. त्याने जुन्या धोकादायक विचित्र गोष्टी सांगितल्या. अज्ञात गोष्टींची अपेक्षा, प्रेम आणि मरण, द्वेष आणि सूड याबद्दलच्या त्या होत्या. दूरदूरवरच्या बेटे शोधून काढणाऱ्या व बोटीवर स्थिरस्थावर होऊन कप्तानाच्या व चंदेरी सागरतीरावर विविध प्रकारचे आयुष्य जगणाऱ्या लोकांच्या मुलीशी लग्न करणाऱ्या खलाशांची साहसे त्यात होती. बॅटमनला लाज वाटली आणि तो चिडला. राग आला तरी त्याने, प्रथम त्या ऐकून घेतल्या. पण आता शब्दातील जादू त्याच्यावर मोहिनी घालू लागली आणि तो त्या गोष्टी रस घेऊन, ऐकू लागला. अद्भुतरम्यतेचे मृगजळ सामान्य दिवसाचा प्रकाश कमी करू लागले. अर्नोल्ड जॅक्सनची जीभ चंदेरी होती, अशी जीभ, ज्यायोगे त्याने लोकांचा विश्वास जिंकून मोठ्या रकमा त्यांच्याकडून उकळल्या होत्या, ती अशी जीभ होती का, जिने त्याच्या पापांची खंडणी देण्याचे जवळजवळ टाळले होते? कुणाचेही वक्तव्य त्याच्या जिभेहून गोड नसेल. आणि कोणालाही कळसाध्यायाची त्याच्याइतकी पुरेशी जाणीव नसेल. अचानक तो उठला.

“ठीक आहे तुम्ही दोघे एकमेकांना खूप दिवसात भेटला नाहीत.

तेव्हा मी तुम्हाला गप्पाटप्पा मारण्यासाठी सोडतो. तुम्हाला झोपायचे असेल, तेव्हा टेडी तुम्हाला तुमचे हॉटेल दाखवेल.”

बॅटमनने म्हटले, “ओहो, पण मी काही इथे रात्र घालवायला आलो नव्हतो, मिस्टर जॅक्सन.”

“तुम्हाला ते जास्त आरामशीर वाटले असते. आपण असे धरून चालू, की तुमचा वेळ चांगला गेला असेल.”

त्यानंतर विनम्रतेने व सनातनपणे बिशप असल्याच्या थाटात हातमिळवणी करून, अर्नोल्ड जॅक्सनने त्याच्या पाहुण्यांचा निरोप घेतला.

एडवर्ड म्हणाला, “अर्थात, मी पाहिजे तर तुला ताहितीमधील पॅपेटला सोडू शकतो. पण मी तुला रहायला सांगेन. सकाळी लवकर वाहन चालवत जाणे त्रासाचे आहे.

थोडा वेळ कुणीच काही बोलले नाही. बॅटमनला आश्चर्य वाटले की दिवसाभरात त्याला प्रामुख्याने जे बोलायचे होते, ते बोलायला कशी सुरवात करावी.

अचानक त्याने विचारले, “तू शिकॅगोला परत कधी येणार आहेस?”

क्षणभर एडवर्ड काही बोलला नाही. मग तो आळसटल्यासारखा, त्याच्या मित्राकडे बघून हसला.

“मला माहिती नाही, कदाचित कधीच नाही.”

“अरे बापरे, तुला काय म्हणायचे तरी काय आहे?”

“मी इथे फार सुखी आहे. यात काही बदल करणे शहाणपणाचे ठरेल का?”

“पण सबंध आयुष्यभर तू इथे राहू शकणार नाहीस. हे मरणाचे आयुष्य आहे. एडवर्ड, फार उशीर होण्यापूर्वी, लगेच इथून निघ. मला वाटते, की काहीतरी चुकते आहे. तुला या जागेचे तात्पुरते आकर्षण निर्माण झाले आहे. तुझ्यावर पापी शक्ती गारुड करत आहेत. पण तुला फक्त एक जोरदार धक्का बसायची गरज आहे. तू जेव्हा या वातावरणातून सुटशील, तेव्हा तू

सगळ्या देवांना दुवा देशील. व्यसनाच्या विळख्यातून सुटलेल्या माणसासारखे तुझे होईल. मग तुला कळेल, की दोन वर्षे तू विषारी हवा हुंगत होतास. तुझ्या मायभूमीला येऊन, जेव्हा तू ताज्या, शुद्ध हवेत श्वासोच्छवास करशील, तेव्हा तुला किती सुटका झाल्यासारखे वाटेल, याची तू कल्पना करू शकणार नाहीस.

तो उद्दीपित होऊन, भरभर शब्दावर शब्द टाकत चालला होता. त्याच्या आवाजात प्रेम व गंभीरता होती. एडवर्डला भरून आले.

“माझ्या प्रिय मित्रा, माझी इतकी काळजी केल्याबद्दल मला चांगले वाटले.”

“एडवर्ड, उद्या माझ्याबरोबर परत चल. तू इथे येऊन मोठी चूक केलीस. हे काय आयुष्य आहे?”

“तू अशा तशा आयुष्याबद्दल बोलतोस. आयुष्यात माणसाला सर्वात चांगले काही कसे मिळते, असे तुला वाटते?”

“मला वाटते, स्वतःचे कर्तव्य करून, भरपूर मेहनत घेऊन, स्थानिक आणि राज्यस्तरीय कर्तव्याच्या वचनाला दोन उत्तरे नाहीत.”

“आणि त्या बदल्यात काय बक्षिसी मिळणार?”

“त्याने जे करायचे ठरवले आहे, ते ते मिळवल्याची सद्सदविवेक बुद्धीची जाणीव, हेच त्याचे बक्षिस.”

एडवर्ड म्हणाला, हे सर्व मला थोडे क्षणभराचे महत्व असल्या सारखे वाटते.” आणि रात्रीच्या हलकेपणात बॅटमनला दिसले, की तो हसत होता.

“मला भीती वाटते, की तुला असे वाटेल, की मी शारिरक, मानसिक आणि नैतिक दुःखाने मोडून पडलो आहे. अशा अनेक गोष्टी आहेत ज्या मी

असे म्हणण्याचे धाडस करतो, की मला तीन वर्षांपूर्वी त्या धक्कादायक रीत्या वाईट वाटत होत्या.”

बॅटमनने रागाने विचारले, “तू त्या अर्नोल्ड जॅक्सनकडून शिकलास का?”

“तुला तो आवडला नाही का? कदाचित तसेच होणार होते. मी पहिल्यांदा आलो, तेव्हा मलाही तो आवडला नव्हता. त्याच्याबद्दल माझा तुझ्यासारखाच पूर्वग्रह होता. तो फार असामान्य माणूस आहे. तू स्वतः पाहिले आहेस, की तो तुरुंगात होता, याबद्दल तो काही बोलायचे टाळत नाही. मला माहिती नाही, की केलेल्या गुन्ह्यांबद्दल त्याला खंत वाटते, की नाही. माझ्या ऐकण्यात आलेली अशी, तो फक्त एवढीच तक्रार करतो, की जेव्हा तो तिथून बाहेर आला, तेव्हा त्याची तब्येत ढासळली होती. अपराधीपणा काय चीज आहे, हे त्याला माहितीच नसावे. तो टोकाचा अनैतिक आहे. तो सगळ्या गोष्टी सरळ सरळ मान्य करतो. पण तो उदार आणि दयाळु आहे.”

बॅटमन मध्येच बोलला, “दुसऱ्याच्या पैशांवर, तो नेहमी तसाच होता.”

“मला तो चांगला मित्र वाटतो. तो मनुष्य मला जसा भेटला, तसा मी त्याला गोड मानून घेतले. हे तुला थोडे अनैसर्गिक वाटते, नाही का?”

“याचा परिणाम म्हणून, तू चूक आणि बरोबर यातील फरक हरवून बसला आहेस.”

‘नाही तो पूर्वी जसा होता, तसाच माझ्या मनात अजूनही आहे. पण, वाईट माणूस आणि चांगला माणूस, यात माझा थोडा गोंधळ झाला आहे.

अर्नोल्ड जॅक्सन हा चांगल्या गोष्टी करणारा वाईट माणूस आहे, की वाईट गोष्टी करणारा चांगला माणूस आहे? या प्रश्नाचे उत्तर अवघड आहे. कदाचित आपण माणसामाणसात फार जास्त भेदभाव करतो. कदाचित आपल्यातील चांगले लोकही पापी असू शकतात. आणि वाईट लोक संत असू शकतात. सर्व काही कोणाला कळते?''

बॅटमन बोलला, ''काळे पांढरे आहे आणि पांढरे काळे आहे, असे तू मला कधीच पटवून देऊ शकणार नाहीस.''

''बॅटमन, ते मला मान्य आहे.''

बॅटमनला समजेना की एडवर्डने असे कबूल केल्यावर, त्याच्या ओठांवर स्मित का झळकले. क्षणभर एडवर्ड गप्प होता.

मग तो बोलला, ''बॅटमन, तुला मी आज सकाळी पाहिले, तेव्हा मला तू मी दोन वर्षांपूर्वी होतो, तसा दिसलास. तीच कॉलर, तेच बूट, तोच निळा सूट आणि तोच उत्साह. तोच ठामपणा. देवदयेने मीदेखील उत्साही होतो. या प्रदेशाची आळसावलेली पद्धत माझ्या रक्तात काटे टोचू लागली. मी जिकडे गेलो, तिकडे मला विकासाच्या व व्यवसायाच्या संधी दिसल्या. इथेही मला माझे भविष्य बनवता आले असते. मला इथून कोरडे नारळ पोत्यात भरून नेऊन, अमेरिकेत त्याचे तेल काढणे मला हास्यास्पद वाटू लागले. त्यापेक्षा ते इथे जागच्या जागी, स्वस्त मजुरीत करुन, पाठवण्याचा खर्च वाचवणे हे पैशांची बचत करणारे होते. या बेटावर आधीच तसे कारखाने सुरूही झाले होते. पण त्यांची नारळातून तेल काढायची पद्धत मला निराशाजनक व तोकडी वाटली. मी एका मशीनचा शोध लावला. ते तासाला दोनशे चाळीस नारळातील करवंटी व खोबरे वेगळे करत असे.

बंदर पुरेसे मोठे नव्हते. मी ते मोठे करायचे आराखडे बनवले. मग लोक गोळा करून एक कंपनी काढून जमीन विकत घ्यायचे ठरवले. दोन तीन मोठी हॉटेले व बंगले इथे तात्पुरते कामाला येणाऱ्या लोकांना रहायला म्हणून बांधायचे ठरवले. कॅलीफोर्नियाहून इथे येणाऱ्या पाहुण्यांना आकर्षित करण्यासाठी वाफेवरच्या बोटींची पद्धत सुधारायचा बेत केला. वीस वर्षात या अर्ध्या फ्रेंच असलेल्या लहानशा आळशी पॅपेट गावाचा कायापालट घडवून हे दहा मजली उंच इमारतींचे, थिएटर व नाट्यगृह असलेले, स्टॉक मार्केट असलेले, महापौर असलेले, व रस्त्यावर मोठ्या टेचात गाड्या फिरणारे एक मोठे अमेरिकन शहर बनवायची स्वप्ने बघू लागलो.''

उद्दीपित होत, खुर्चीवरून उठत, बॅटमन ओरडला, ''शाबास एडवर्ड, पुढे चल. तुझ्याकडे कल्पना आहेत व क्षमताही आहे. तू ऑस्ट्रेलिया आणि जगातील सर्वात श्रीमंत मनुष्य होशील.''

एडवर्ड गालातल्या गालात मृदुपणे हसला. तो म्हणाला, ''पण मला तसे व्हायचे नाही.''

''म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का, की तुला पैसा नको आहे, लाखात मिळणारा पैसा? तुला त्यायोगे काय काय करता येईल, ते माहिती आहे का? त्यामुळे तुला कोटी शक्ती प्राप्त होतील, हे माहिती आहे का? आणि जर तुला स्वतःसाठी त्याची पर्वा नसेल, तर मानवजातीसाठी तू व्यापार उदयोगाची क्षेत्रे खुली करून हजारो जणांना काम देऊ शकतोस.''

''दूरदृष्टीने तू जे शब्द उच्चारलेस, ते माझा मेंदू पुन्हा उलगडत आहे.''

एडवर्ड हसून बोलला, “माझ्या प्रिय बॅटमन, बस. माझे नारळ फोडणारे मशीन नेहमी न वापरलेले राहील. आणि जोपर्यंत माझा संबंध आहे, पॅपेटच्या आळशी रस्त्यांवरून गाड्या कधीच धावणार नाहीत.”

बॅटमन धपकन खुर्चीत बसला. तो म्हणाला, “मला तुझे काही समजतच नाही.”

“हे माझ्या डोक्यात हळूहळू आले, एकदम नव्हे. मला येथील आयुष्य त्याच्या आरामासकट, सहजतेसकट व चांगल्या स्वभावाच्या आणि हसऱ्या, आनंदी चेहऱ्याच्या माणसांसकट आवडू लागले. मी विचार करू लागलो. मला त्यासाठी यापूर्वी कधी वेळच मिळाला नव्हता. मी वाचायला सुरवात केली.”

“तू नेहमीच वाचत होतास.”

“मी परीक्षेसाठी वाचत होतो. माझे संभाषण सुधारावे, म्हणून मी वाचत होतो. मी काही करण्यासाठी वाचत होतो. इथे मी आनंदासाठी वाचायला शिकलो. मी बोलायला शिकलो. तुला माहिती आहे का, की संवाद म्हणजे आयुष्यातील सर्वोच्च आनंद आहे? पण त्यासाठी मोकळा वेळ लागतो. मी यापूर्वी अत्यंत कामात होतो. यापूर्वी मला महत्वाचे वाटणारे आयुष्य आता क्षुल्लक आणि बेकार वाटू लागले. सतत धावाधाव करण्याचा आणि काहीतरी अधिकाधिक मिळवण्याचा काय उपयोग आहे? मी आता शिकॅगोबद्दल विचार करू लागलो, की मला ते शहर गडद करडे --- दगडांचे आणि अंत नसलेल्या गडबड व गोंधळाचे वाटू लागते. आणि या सगळया धावपळीचा काय फायदा आहे? त्यातून आयुष्यातील सर्वात चांगले काही मिळते का? यासाठी आपण जन्म घेतला का? घाईने

कार्यालयात जाणे, रात्रीपर्यंत तासनतास काम करणे, मग धावत पळत घरी येऊन जेवणे. थिएटर मध्ये जाऊन सिनेमा बघणे? अशा तऱ्हेने मी माझे तारुण्य घालवावे का? बॅटमन, तारुण्य फार टिकत नाही. आणि जेव्हा मी म्हातारा होईन, तेव्हा मी कुठल्या आशेवर जगावे? सकाळी लवकर उठून घाईने कार्यालयात जाणे, मग धावत पळत घरी येऊन जेवणे. थिएटर मध्ये जाऊन सिनेमा बघणे? तुमचे भविष्य बनत असेल, तर हे सर्व ठीक आहे. मला माहिती नाही, ते तुमच्या स्वभावावर अवलंबून आहे. पण जर तुम्ही हे करायचे नाकारले, तर मग काय? बॅटमन, मला माझ्या आयुष्यात याहून जास्त काही करायचे आहे.”

‘मग तू आयुष्यात कशाला जास्त महत्व देतोस?

“मला भीती वाटते, तू मला हसशील. सौदर्य, सत्य आणि चांगलेपणा.”

“हे तुला शिकॅगोत राहून मिळवता येईल, असे तुला वाटत नाही का?”

“काहीजणांना येईल, पण मला नाही. एडवर्ड आता उठला. तो आक्रमकपणे ओरडला, “मी तुला सांगतो, जेव्हा मी गतकाळातील आयुष्याचा विचार करतो, तेव्हा मला भीती वाटते. मी धोक्यातून सुटलो, असा विचार माझ्या मनात येऊन, मी थरथर कापतो. माझ्यात आत्मा आहे, हा शोध मला इथे येईपर्यंत लागला नव्हता. जर मी श्रीमंत मनुष्य राहिलो असतो, तर मी चांगल्यासाठी वा इतर कारणाने सर्व गमावले असते.”

बॅटमन राग दर्शवत ओरडला, “मला कळत नाही, तू असे कसे काय बोलू शकतोस? आपण नेहमी याबद्दल चर्चा करत असू.”

“हो. मला माहिती आहे. आंधळ्या, मुक्यांनी सुसंवादाबद्दल चर्चा करावी, तशा त्या चर्चा हवा तो परिणाम घडवून आणण्यात तितपतच यशस्वी होत होत्या. बॅटमन, मी कधीच शिकॅगोला परत येणार नाही.”

“आणि इसाबेलचे काय?”

एडवर्ड गॅलरीच्या टोकापर्यंत चालत गेला. रात्रीच्या जादूमयी निळाईत स्वप्नाळूपणे डोकावून बघत राहिला. त्याच्या चेहऱ्यावर थोडे हास्य होते. तो बॅटमनकडे वळला.

“इसाबेल माझ्यासाठी फारच चांगली आहे. मला माहिती असलेल्या सर्व स्त्रियांमध्ये मी तिची स्तुती करतो. ती हुशार, सुंदर व चांगली आहे. मी तिच्या उत्साहाचे आणि महत्वाकांक्षेचे कौतुक करतो. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी, ती जन्माला आली आहे. मी तिच्यासाठी योग्य नाही.”

“तिला तसे वाटत नाही.”

“बॅटमन, तू तिला हे सांगितले पाहिजेस.”

बॅटमन ओरडला, “मी? मी असे करणारा शेवटचा माणूस असेन.”

ठळक चंद्राकडे एडवर्डची पाठ होती. त्याचा चेहरा दिसत नव्हता. तो पुन्हा हसू शकत होता का?”

“बॅटमन, हे असे तिच्यापासून तू काहीही लपवण्याचा प्रयत्न करणे, चांगले नाही. तिच्या तीक्ष्ण बुद्धीमत्तेमुळे, ती पाच मिनिटात तुला पकडेल. तेव्हा तिला तू आधीच सर्व काही सांगून टाकलेले बरे.”

बॅटमन रागाने बोलला, “तुला काय म्हणायचे आहे, मला समजत नाही. अर्थात मी तुला भेटलो, हे मी तिला सांगेन. खरे सांगायचे, तर हे तिला कसे सांगावे, ते मला कळत नाही.”

“तिला सांग, मी इथे काही चांगला स्थिरस्थावर झालो नाही. तिला सांग, मी फक्त गरीबच नाही, तर मला गरीब रहाण्यातच समाधान आहे. तिला सांग, की मला कामावरून कमी करण्यात आले, कारण मी आळशीपणा व दुर्लक्ष केले. तू आज रात्री जे जे पाहिलेस व मी तुला जे जे सांगितले, ते सर्व तिला सांग.”

ती कल्पना बॅटमनच्या डोक्यात एकदम चमकली. त्यामुळे तो भानावर आला. आणि अती काळजीने त्याने एडवर्डकडे पाहिले.

“अरे मित्रा, तुला तिच्याशी लग्न करायचे नाही का?”

एडवर्डने त्याच्याकडे थंडपणे पाहिले.

“मला मोकळे सोड, असे मी तिला कधीच सांगू शकणार नाही. जर तिला मला वचनात गुरफटून ठेवायचे असेल, तर मी तिच्यासाठी चांगला, प्रेमळ नवरा बनायचा जास्तीत जास्त प्रयत्न करेन.”

“एडवर्ड, तुझी अशी इच्छा आहे का, की मी तिला हा निरोप द्यावा? ओहो, मी असे करू शकणार नाही. हे भयंकर आहे. तू तिच्याशी लग्न करू इच्छित नाहीस, हे तिच्या मनात एक क्षणदेखील आलेले नाही. तिचे तुझ्यावर प्रेम आहे. असली लाजीरवाणी गोष्ट मी तिच्यावर कशी लादू?”

एडवर्ड पुन्हा हसला.

“बॅटमन, तू तिच्याशी लग्न का करत नाहीस? तू पण कित्येक वर्षे तिच्यावर प्रेम करतो आहेस. तुम्ही दोघे एकमेकांना अनुरूप आहात. तू तिला खूप सुखात ठेवशील.”

“माझ्याशी असे बोलू नकोस. मला ते सहन होत नाही.”

“बॅटमन, मी माघार घेतो. तू चांगला माणूस आहेस. मी तुझ्या बाजूने आहे.”

एडवर्डच्या आवाजात असे काही होते की बॅटमनने झटकन वर बघितले. पण एडवर्डचे डोळे न हसणारे व थंड होते. बॅटमनला कळेना, की काय बोलावे. तो अस्वस्थ झाला. एडवर्डला असा संशय आला की काय, की आपण ताहितीला काही विशेष कारणासाठी आलो. असा विचार करून त्याला नवल वाटले. त्याला हे भयंकर असल्याचे माहिती होते, तरी त्याच्या हृदयातील विजयोन्माद तो रोखू शकला नाही.

तो सावकाश बोलला, “इसाबेलने पत्र लिहून, तिचा तुझ्याशी झालेला साखरपुडा मोडला, तर तू काय करशील?”

एडवर्ड म्हणाला, “मी जगेन.”

बॅटमन इतका चिडला की त्याने उत्तर ऐकलेच नाही.

तो रागाने बोलला, “मला वाटते, तू तुझ्या अंगावर सामान्य कपडे घातले आहेस. हा तू घेत असलेला निर्णय खूपच गंभीर आहे. तुझे भरजरी कपडे तुला अगदी साधे वाटत आहेत.”

“मी तुला खात्रीपूर्वक सांगतो, मला उंच टोपी आणि फाटक्या कोटात जसे सारखे वाटेल. तसेच पॅरोमध्ये आणि गुलाबासारख्या सुंदर कपड्यातही, सारखेच जादुई वाटते आहे.”

मग बॅटमनला वेगळा विचार सुचला. “एडवर्ड, तू माझ्यासाठी तर हे करत नाहीस ना? मला माहिती नाही, पण कदाचित यामुळे माझ्या भविष्यात खूप फरक पडणार आहे. तू माझ्यासाठी तुझा बळी देत नाही आहेस ना? तसे मला सहन होणार नाही, हे तुला माहिती आहे.”

“नाही, बॅटमन. मी भावनेने भारले न जाणे व मूर्खपणा न करणे इथे शिकलो आहे. मला तू आणि इसाबेलने आनंदी झालेले आवडेल. आणि तरीही मी जराही दुःखी होणार नाही.”

या उत्तराने बॅटमन थोडा आनंदला. पण कुणीही स्वतःच्या मर्जीने, असे कसे काय वागू शकते, असे त्याला जाणवल्यावाचून राहिले नाही. असे उमदे कृत्य करायला त्यालाही काही वाटले नसते.

“म्हणजे तुला असे म्हणायचे आहे, की इथे राहून स्वतःचे आयुष्य फुकट घालवण्यात तुला समाधान वाटते आहे? हे आत्महत्या करण्यासारखेच आहे. आपण कॉलेज सोडले, तेव्हा तुला भविष्याबद्दल किती आशा होत्या आणि आता तू साधा विक्रेता व दुकानातील सेवक असण्यात समाधन मानावेस, हे भयंकर आहे.”

“ओहो, मी आता ते करत आहे आणि त्यातून अमूल्य अनुभव मिळवत आहे. माझ्या डोक्यात दुसरे बेत आहेत. येथून हजार मैलांवर पाऊमोटासमध्ये अर्नोल्ड जॅक्सनच्या मालकीचे एक लहानसे बेट आहे. समुद्रतळ्याभोवती गोल असलेली ही बेटे आहेत. त्याने तिथे नारळाची झाडे लावली आहेत. तो ते मला देणार आहे.”

बॅटमनने विचारले, “तो असे का करणार आहे?”

“कारण इसाबेलने मला सोडले, तर मी त्याच्या मुलीशी लग्न करणार आहे.”

धक्का बसून बॅटमन म्हणाला, “तू? तू मिश्र जातीच्या मुलीशी लग्न करू शकत नाहीस. तू इतका वेडा नसशील.”

“ती चांगली मुलगी आहे आणि तिचा स्वभाव सभ्य आणि गोड आहे. मला वाटते, ती मला सुखी करेल.”

“तू तिच्यावर प्रेम करतोस का?”

एडवर्ड विचार करत बोलला, “मला माहिती नाही. मी तिच्यावर इसाबेलवर करत होतो, तसे प्रेम करत नाही. इसाबेलला मी पूजत होतो. मला वाटते मी पाहिलेल्या मुलींमध्ये ती सर्वात नवलपूर्ण होती. मी तिच्या अर्ध्यानेही चांगला नाही. इव्हाबरोबर मला तसे वाटत नाही. ती कटू वाऱ्यापासून संरक्षण करावे, असे एक सुंदर फूल आहे. मला तिचे रक्षण करायचे आहे. इसाबेलच्या बाबतीत असे संरक्षण करण्याचा कोणी विचारदेखील करणार नाही. मला वाटते, इव्हा माझ्यावर प्रेम करते, मी कोण होईन, यावर नाही. मला काही झाले, तरी चालेल. पण मी तिला दुःखी होऊन देणार नाही. ती मला योग्य आहे.”

बॅटमन शांत होता.

शेवटी एडवर्ड म्हणाला, “आपण सकाळी लवकर उठायला हवे. आता आपण झोपायला हवे.”

मग बॅटमन बोलला. त्याच्या आवाजात खरी खंत जाणवत होती.

“मी इतका घाबरलो आहे, की काय बोलावे, ते मला कळत नाही. मी इथे आलो, कारण मला वाटले काही चुकीचे होते आहे. मला वाटते, तू जे करण्यासाठी बाहेर पडलास, ते तू मिळवले नाहीस. आणि अशा अयशस्वी अवस्थेत परत शिकॅगोला यायला तुला लाज वाटते आहे. पण अशा परिस्थितीला मला तोंड द्यायला लागेल, असे मला कधीच वाटले नव्हते. एडवर्ड, मी फार दिलगीर आहे. माझी फार निराशा झाली आहे. मला

आशा होती, की तू फार मोठ्या गोष्टी करशील. पण तू इथे तुझी बुद्धिमत्ता, तारुण्य व चांगली संधी, अशा वाईट तऱ्हेने वाया घालवत असल्याचे बघणे, मला फार जड जाते आहे.”

एडवर्ड म्हणाला, अरे दोस्ता, दुःख करू नकोस. मी पराभूत झालेलो नाही. मी यशस्वी झालो आहे. मी जीवनाकडे कशा उत्साहाने बघतो, ते मला किती परिपूर्ण व आशादायक वाटते, हे तुला समजू शकणार नाही. इसाबेलशी लग्न केल्यावर कधीतरी तू माझा विचार करशील. प्रवाळयुक्त बेटावर मी घर बांधेन व तिथे झाडांवर लक्ष ठेवत, त्याची फळे चाखत, मी राहीन. अनेक वर्षे ते करत आले, तसा त्यांचा व्यापार मी करेन --- मी माझ्या बागेत सर्व प्रकारची झाडे लावेन. मी मासे पकडेन. माझा वेळ काम करण्यात छान जाईल. मी आळशी बनणार नाही, इतके काम असेल. मला माझी पुस्तके, इव्हा आणि मुले असतील. आणि सर्वात कडी म्हणजे, आकाशाचे आणि समुद्राचे अनंत रंग असतील. पहाटेची ताजगी असेल, सूर्यास्ताचे सौदर्य असेल आणि लांबलचक रात्री असतील. जिथे रान माजलेले असेल, तिथे मी बाग फुलवेन. मी काही निर्माण करेन. माझ्या मनाला सुखावणारी अशी वर्षानुवर्षे जातील आणि मी जेव्हा म्हातारा होईन, तेव्हा मी मागे वळून माझे शांत, साधे, सुखी जीवन बघेन. माझ्या लहानशा वाटचालीने मी सुद्धा सुंदरतेचा आस्वाद घेत राहीन. तुला असे वाटते का, की हे समाधान कमी आहे? आपल्याला माहिती आहे, की जर माणसाने जग जिंकले, पण आत्मा गमावला, तर माणूस फारसा सुखी होणार नाही. मला वाटते, मी तो जिंकला आहे.”

एडवर्डने त्याला खोलीपर्यंत सोडले. खोलीत दोन पलंग होते. त्यातील एकावर त्याने त्याचे अंग लोटून दिले. दहा मिनिटात बॅटमनला

त्याच्या नेहमीच्या श्वासोच्छवासाने कळले, की एडवर्ड एखाद्या मुलासारखा शांतपणे झोपी गेला आहे. पण त्याला विश्रांती मिळाली नाही. त्याचे मन अशांत होते. भुतासारख्या शांत खोलीत पहाट चोरपाऊलांनी शिरेपर्यंत, त्याला झोप लागली नाही.

बॅटमनने इसाबेलला त्याची लांबलचक गोष्ट सांगितली. तिला जखम होईल, व त्याला विचित्र वाटेल, असा भाग वगळून सर्व काही त्याने तिला सांगितले. त्याला फुलांचा मुगुट घालून जेवायला बसायला लावले हे व तिने जर एडवर्डला सोडले, तर त्या क्षणी तो तिच्या मामाच्या मिश्र जातीच्या मुलीशी लग्न करायला तयार होता, हे मात्र तिला सांगितले नाही. कदाचित त्याला माहिती होते, त्यापेक्षा इसाबेलचे अंतर्मन जास्त भावना शील असल्याने, तो गोष्ट सांगत असताना, तिचे डोळे जास्त थंड झाले असते आणि ओठ घट्ट मिटलेले राहिले असते. ती परत परत त्याच्याकडे जवळून पाहू लागली. जर त्याचे लक्ष गोष्टीत फारसे नसते, तर त्याला तिच्या चेहऱ्यावरील भाव पाहून नवल वाटले असते. त्याचे सांगून झाल्यावर, तिने विचारले, "ती मुलगी कशी होती? आर्नोल्डमामाची मुलगी. तिच्यात आणि माझ्यात काही साम्य होते का?"

बॅटमनला तो प्रश्न ऐकून आश्चर्य वाटले.

"नाही. मला तरी असे काही जाणवले नाही. तुला माहिती आहे, की मला तू सोडून कुणीच दिसत नाही व कुणी तुझ्यासारखे वाटतही नाही. तुझी बरोबरी कोण करणार?"

त्याच्या बोलण्यावर हसून, इसाबेल म्हणाली, "ती सुंदर होती का?"

“मला असे वाटते की काही लोक तसे म्हणण्याचे धाडस करू शकतील, की ती फार सुंदर होती.”

“ठीक आहे. त्याचे एवढे काही नाही. मला वाटते, तिच्याकडे जास्त लक्ष द्यायची गरज नाही.”

मग त्याने विचारले, “इसाबेल, आता तू काय करणार आहेस?”

एडवर्डने तिला साखरपुड्याला दिलेली अंगठी घातलेल्या हाताकडे, इसाबेल खाली पाहू लागली.

“मी एडवर्डला साखरपुडा मोडून देणार नाही. कारण मला वाटते, असे केल्यास, ते तो जे करू बघतो आहे, त्याला खतपाणी दिल्यासारखे होईल. मला त्याला स्फूर्ती द्यायची आहे. मला वाटते मी त्याच्यावर प्रेम करते, या विचाराने तो यश मिळवण्यास उद्युक्त होईल. माझ्याकडून मी सर्व प्रयत्न केले आहेत. हे आशादायक नाही. खऱ्या गोष्टी न ओळखणे, हा फक्त माझा कमकुवतपणा ठरेल. बिचारा एडवर्ड! तो स्वतःच स्वतःचा शत्रू आहे. तो चांगला, माझा आवडता माणूस होता. पण त्याच्यात काही कमी होते. मला वाटते, पाठीचा कणा. मला आशा आहे, की तो सुखी होईल.”

तिने बोटातून अंगठी काढली व टेबलावर ठेवली. बॅटमन तिचे निरीक्षण करत होता. त्याच्या हृदयाचे ठोके इतके जलद पडत होते, की त्याला श्वास घेता येईना. “तू नवलपूर्ण आहेस, इसाबेल, तू फारच नवलपूर्ण आहेस.”

ती हसली. उभे राहून तिने तिचा हात त्याच्यापुढे केला.

ती म्हणाली, “तू माझ्यासाठी जे केलेस त्यानंतर, मी तुझे कसे आभार मानू? तू माझ्यासाठी फार केलेस. मला माहिती आहे, मी तुझ्यावर विश्वास टाकू शकते.”

त्याने तिचा हात हातात घेतला. ती याहून सुंदर कधीच दिसली नव्हती. “ओहो, इसाबेल, मी तुझ्यासाठी याहून अधिकही काही करेन. तुला माहिती आहे, की तू मला फक्त तुझ्यावर प्रेम करायला आणि तुझी सेवा करायला परवानगी दे.”

ती सुस्कारा टाकत म्हणाली, “बॅटमन, तू इतका कणखर आहेस. त्यामुळे मला आत्मविश्वासाची छान भावना अनुभवता येते.”

“इसाबेल, मी तुझी पूजा करतो.”

त्याला क्वचितच माहिती होते, की त्याच्यात ही स्फूर्ती कशी आली. पण अचानक त्याने तिला मिठीत घेतले. तिने विरोध न करता, त्याच्या डोळ्यात पाहिले.

तो भावनातिरेकाने म्हणाला, “इसाबेल, तुला माहिती आहे का, मी तुला पहिल्यांदा पाहिले, तेव्हाच मला तुझ्याशी लग्न करावेसे वाटले.”

ती उत्तरली, “अरे वेड्या, मग तू तेव्हाच मला का विचारले नाहीस?”

ती त्याच्यावर प्रेम करत होती. हे खरे असले, तरी त्याचा त्यावर विश्वास बसत नव्हता. तिने चुंबनासाठी तिचे ओठ त्याच्यापुढे केले. त्याने तिला बाहूत कवटाळले, तेव्हा त्यांची हंटर मोटर्स कंपनी त्यांची जमीन शंभर एकर होईपर्यंत व ते लाखो मोटारी तयार करेपर्यंत कामांच्या बाबतीत, संख्येने व महत्वाने कशी वाढणार आहे आणि ती न्यूयॉर्कमधील कुठल्यांनी संग्रहाला कशी मागे टाकेल, असा चित्रांचा खूप मोठा संग्रह हा त्यांचा

असणार आहे, हा दूरदृष्टीचा विचार त्याला आठवला. तो शिंगाचा चष्मा घालेल. तिच्याभोवती त्याच्या हातांचा मधुर दाब असेल आणि तिने एक सुखाचा सुस्कारा टाकला. तिने तिला मिळणाऱ्या महागड्या घराचा विचार केला. त्यात देखणे फर्निचर असेल. तिथे ती संगीताच्या मैफिली व नृत्याचे कार्यक्रम घडवून आणेल. सुसंस्कृत, मोठ्या लोकांना जेवणे देईल.

तिने सुस्कारत म्हटले, “बिचारा एडवर्ड!”.

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे छत्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*













ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christie*


डॉ. वृषाली जोशी यां





























ज्या कव्हरवर क्लिक कराल


ते पुस्तक उघडेल










वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे सदतिसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३९),

अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन

लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।